# शिक्षण संक्रमण

पुणे | वर्ष ३ रे | अंक ८ | फेब्रुवारी २०१५ | मासिक | किंमत रु.२०/-







महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

# विनम्र अभिवादन!



छत्रपती शिवाजी महाराज



संत गाडगे महाराज



सी.व्ही रामन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

फेब्रुवारी २०१५ : शके-१९३६

♦ संपादक ♦

श्री. कृष्णकुमार भा. पाटील

सचिव, राज्यमंडळ, पुणे

कार्यकारी संपादक

श्री. अनिल गुंजाळ

सहसचिव, राज्यमंडळ, पुणे

♦ संपादन सहाय्यक ♦

श्री. गोवर्धन सोनवणे

डॉ. उमेश प्रधान

डॉ. स्नेहा जोशी

डॉ. जयश्री अत्रे

डॉ. सुलभा विधाते

♦ सल्लागार मंडळ ♦

| | |
|---|---|
| श्री. गंगाधर म्हमाणे | अध्यक्ष |
| श्री. लक्ष्मीकांत पांडे | सदस्य |
| श्री. सं. मा. गणोरकर | सदस्य |
| श्री. सुनील चौहान | सदस्य |
| श्री. द. गो. जगताप | सदस्य |
| श्री. भि. पां. कांबळे | सदस्य |
| श्री. सु. ह. डेरे | सदस्य |


# शिक्षण संक्रमण

## लेखानुक्रम


- मनोगत ४
- विद्यार्थी मित्रांनो, तुम्हा सर्वांना परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा ५
- 'गैरमार्गाविरुद्ध लढा' – कृती कार्यक्रम ८
- मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने — श्रीमती स्वाती ताडफळे १३
- खेडे म्हणजे जग – जग म्हणजे खेडे — डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर १५
- भारताच्या मंगळ मोहिमेचे शिल्पकार – डॉ. के. राधाकृष्णन — श्री. उदयकुमार पाटील १८
- विद्यार्थ्यांना नापासच करू नये — सौ. माधुरी ल. धोंड २१
- नोबेल सन्मान भाषण – कैलाश सत्यार्थी — मराठी अनुवाद – २८
- नोबेल सन्मान भाषण –युसूफझाई मलाला — डॉ. व्ही. बी. पाटील ३२
- गैरमार्गाविरुद्ध लढा – कॉपीमुक्त अभियान — श्री. एस. डी. दामोदरे ३७
- माझ्या कल्पनेतील अभिनव शिक्षण पद्धती — डॉ. निरंजन म. अंजनकर ४१
- खेळा आणि मस्त हुशार व्हा — श्री. अनंत म. निंबोळे ५३
- वेळ : अभ्यासातील महत्त्वाचा व मुलभूत घटक — डॉ. सौ. पुष्पा घळसासी ५५
- आजच्या शिक्षण पद्धतीतील उणिवा व उपाययोजना — श्री. सिद्धेश्वर चांदेकर ५८
- बालक – पालक आणि समाज — श्री. विजय भदाणे ६५
- Out Obligntions to Environment — Dr. D. G. Bhapkar ६७
- सूत्र संचालन : एक कला — प्रा. दिलीप जाधव ७५
- विद्यार्थीकेंद्री शिक्षणातील शिक्षकांची भूमिका — सौ. राधिका देशमुख ७८
- Apathy of Educational Experts Regarding — Mrs. V. V. Borgaonkar ८०
- Teaching English Grammar in Secondary & Higher Secondary Level — Dr. Samuel Roy ८३
- शिक्षण : सामाजिक परिवर्तनाचे साधन — प्रा. बबन य. माळी ८६
- स्वच्छता अभियान – काळाची गरज (भारत स्वच्छता अभियान) — श्री. जगन्नाथ कोळी ८९
- पायाभूत संबोध : डळमळता पाया — श्री. काकासाहेब वाळुंजकर १००
- Role of Teachers - While Facing New Syllabus — Shri. Anil V. Kohale १०३
- परीक्षेचा बागुलबुवा कशासाठी ? — प्रा. प्रकाश सं. माळी १०५
- परिपत्रके १०७
- Newspaper Form IV १११
- प्रतिक्रिया ११२



'शिक्षण संक्रमण' हे मासिक मालक, महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ सेकंडरी अ‍ॅण्ड हायर सेकंडरी एज्युकेशन, पुणे यांच्यासाठी मुद्रक व प्रकाशक श्री. कृष्णकुमार भास्करराव पाटील यांनी **डिलाईट प्रिंटर्स,** १६-ए, हिमालया इस्टेट, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५ येथे छापून स.नं. ८३२-ए, फायनल प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटमागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११ ००४ येथे प्रसिद्ध केले.

**संपादक : श्री. कृष्णकुमार भास्करराव पाटील**

- वर्गणी मनीऑर्डरने किंवा ड्राफ्टने पाठवावी. **वार्षिक वर्गणी :** ♦ माध्य.शाळा/क.म.विद्यालय/शिक्षक/पालक रु.२००/- किरकोळ अंक किंमत रु. २०/-

**Email :** monthly@msbshse.ac.in | **Website :** http://www.mahahsscboard.maharashtra.gov.in | फोन : ०२०-२५७०५०००



- अंकातील लेखांचे अन्यत्र कोठेही पुनर्मुद्रण करण्यासाठी राज्यमंडळाची पूर्वानुमती घेणे आवश्यक आहे.

**महत्त्वाचे : या अंकात व्यक्त झालेली मते त्या त्या लेखकाची स्वतंत्र असतात; मंडळ त्यास सहमत असेलच असे नाही.**

# मनोगत



राज्यमंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा प्रारंभ सोहळा दि. ८ जानेवारी, २०१५ रोजी मा. ना. श्री. विनोदजी तावडे, मंत्री, शालेय शिक्षण आणि आमदार, नगरसेवक, संचालक व अधिकारी व अनेक ज्येष्ठ मान्यवर यांच्या उपस्थितीत अत्यंत देखणेपणाने पार पडला. त्याबद्दल सर्व मान्यवरांचे मन:पूर्वक आभार.

उपस्थितांचे, गौरवोद्गार, शुभेच्छा आणि आपलेपणा ही आमची बलस्थाने आहेत. त्यामुळेच पुढील संपूर्ण वर्षभरातील कार्यक्रमही याच उत्तमतेने संपन्न होतील असा विश्वास वाटतो. वर्षभरातील वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमांची आखणी आपणास वेळोवेळी शिक्षणसंक्रमणच्या माध्यमातून कळेलच.

फेब्रुवारी महिना शालेय वर्षातील महत्त्वाचा इ. १०वी, १२वी परीक्षेच्या पूर्वतयारीचा, शालेय गुणवत्ता विकसनासाठी कसून प्रयत्न करावयाचा महिना अर्थात त्यासाठी आपण सर्व शिक्षक, मुख्याध्यापक प्रयत्नशील आहोतच. शाळेतील प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी परीक्षा या अत्यंत नियोजनबद्ध व पारदर्शीपणे पार पाडावयाच्या आहेत. मंडळाला त्याबद्दल आपल्याकडून तशा अपेक्षा आहेत. अर्थात सर्वच परीक्षा पारदर्शीपणे पार पडेल याबद्दल खात्रीही आहेच. लेखी परीक्षासुद्धा निर्दोष, निकोप, नियमबद्ध व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडाव्यात यासाठी मंडळही कटिबद्ध आहेच. आपणही गैरमार्गाविरुद्धचा लढा यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे.

श्रीमान योगी - जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती १९ फेब्रुवारीला साजरी होत आहे, त्यानिमित्त या युगपुरुषाला त्रिवार मुजरा ! कृतितून समाजाला प्रबोधन करणारे संत गाडगेबाबा यांना त्यांच्या जन्मदिनानिमित्त (२३ फेब्रुवारी) अभिवादन करताना आपण त्यांनी सांगितलेली जीवनप्रणाली अंगीकृत करायला हवी. २८ फेब्रुवारी राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. नोबेल पारितोषिकाने सन्मानित शास्त्रज्ञ चंद्रशेखर वेंकटरमण यांचे आपले प्रकाशाच्या विकेंद्रीकरणाबद्दलचे संशोधन याच दिवशी प्रसिद्ध झाले होते. या दिवसाचे स्मरण म्हणून व विज्ञानदिन साजरा करताना आपण आपल्या विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासपूर्ण वैज्ञानिक जाणीव रुजविण्याचे व्रतच घेतले पाहिजे. कारण - तार्किक विचारांवर आधारलेले व सिद्ध झालेले विज्ञानच मानवाला अंधश्रद्धेपासून दूर ठेऊ शकण्यास समर्थ आहे. याच दिवशी म्हणजे २८ फेब्रुवारी रोजी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांचा स्मृतिदिन आहे, त्यांना विनम्र प्रणाम !

शारदेच्या दरबारातील अत्यंत प्रतिभावान कवी, रसिक मनाचा अनभिषिक्त सम्राट कविवर्य कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिन (२७ फेब्रुवारी) याच महिन्यातील. हा दिवस 'मराठी भाषा दिन' म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त समाजातील सर्व अपरिहार्य बदलांना स्वीकारत, नवनवीन समाजाभिमुख साहित्यनिर्मिती होऊन आपली 'मराठी भाषा' अशीच प्रवाही राहू दे हीच मनापासून सदिच्छा ! सदर अंकात नेहमीप्रमाणेच दर्जेदार, अभ्यासपूर्ण लेखांचा समावेश केला आहे. वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे नोबेल पारितोषिकाने सन्मानित मा. कैलाश सत्यार्थी व मा. युसूफझाई मलाला यांच्या सन्मानित सोहळा प्रसंगी त्यांनी केलेल्या भाषणाचा मराठी अनुवाद अंकात देत आहोत. सर्व शाळांनी तो विद्यार्थ्यांपर्यंत जरूर पोहोचवावा.

सर्व विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेतील उत्तुंग व निखळ यशासाठी मनापासून शुभेच्छा!

*यशवान भव! गुणवान भव ! कीर्तीवान भव !!!*

**गंगाधर म्हमाणे**
**अध्यक्ष,**
**राज्यमंडळ, पुणे.**

# विद्यार्थी मित्रांनो,
# तुम्हां सर्वांना परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा!

भावी जीवनात एस.एस.सी. व एच.एस.सी. परीक्षेतील यशाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. भविष्यातील वाटचालीची दिशा या परीक्षाच ठरवीत असतात. परीक्षेच्या काळात क्षणिक मोहाला बळी पडून केलेल्या गैरमार्गाच्या कृत्याचे पर्यवसन क्लेशदायक घटनेमध्ये होतेच. परंतु काही वेळा अनवधानाने घडलेल्या चुकीमुळेही कधी भरून न येणारे नुकसान होऊ शकते आणि अभ्यास केलेला असूनही त्याचे फळ पदरात पडत नाही. प्रसंगी वर्षही वाया जाते. आयुष्यातील एक वर्ष म्हणजे खूप मोठा कालावधी आहे. मिळालेल्या संधीचे रूपांतर प्रामाणिक प्रयत्न करून, यशामध्ये करणे तुमच्याच हातात आहे.

निराशा टाळण्यासाठी परीक्षा तणावविरहित वातावरणात पार पाडण्यासाठी खालील सूचना आवर्जून लक्षात ठेवा. त्यांचे पालन स्वत:ही करा आणि मित्रांनाही सांगा.

## परीक्षेपूर्वी –

☞ परीक्षेचे वेळापत्रक काळजीपूर्वक पाहून लिहून घ्या. पडताळणी करा आणि तुमच्याबरोबरच्या इतर विद्यार्थ्यांशी चर्चा करा व शिक्षकांकडून तुमच्या विषयाचे दिवस व वेळ यांचे निश्चितीकरण करून घ्या. वेळापत्रक सहज दिसेल असे तुमच्या घरीसुद्धा लावून ठेवा.

☞ परीक्षेपूर्वी आपले परीक्षा प्रवेशपत्र वेळेत शाळेकडून घेऊन ते प्राप्त होताच त्यावरील फोटो, नाव, नावातील स्पेलिंग, बैठक क्रमांक, परीक्षेचे विषय, उत्तरे लिहिण्याची भाषा हे सर्व वाचून बरोबर आहे याची खात्री करून घ्या. त्याबद्दल शंका असल्यास शाळेशी संपर्क साधून संबंधित विभागीय मंडळांकडून बदल करून घ्या. शक्यतो प्रवेशपत्राची एखादी झेरॉक्स प्रत प्रमाणित करून घ्या. अधिकची प्रत जतन करा.

☞ एखादेवेळी काही कारणामुळे प्रवेशपत्र हरवले / खराब झाले तर मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्यामार्फत आवश्यक पुराव्यासह विभागीय मंडळावकडे द्वितीय प्रत मागणी करावी. तसेच घरी विसरले तर केंद्रसंचालकांशी संपर्क साधा. ते सूचना देतील त्याप्रमाणे हमीपत्र लिहून द्या. त्यानंतर आपल्या परीक्षेला बसण्याची व्यवस्था करता येते.

☞ प्रवेशपत्रावरील सूचना काळजीपूर्वक वाचा.

☞ प्रयोग परीक्षेची पूर्ण माहिती घेऊन प्रयोग वही अद्ययावत करून वेळेवर प्रयोग परीक्षा द्या. आजारपणामुळे किंवा अन्य कारणांमुळे प्रयोग परीक्षा देता येणे शक्य झालेच नाही तर शाळेमार्फत विभागीय मंडळांशी संपर्क साधून योग्य कारण व पुरावा सादर करून पुन्हा परीक्षा देण्याबाबतची माहिती घेऊन प्रयोग परीक्षा देता येते. विज्ञान विषयासाठी प्रयोग परीक्षा अत्यंत महत्त्वाची आहे.

☞ बैठक व्यवस्था (Seating Arrangement) जाहीर झाल्यानंतर तुमच्या शाळेमध्ये जाऊन स्वत:वी बैठकव्यवस्था कोणत्या शाळेत आहे याबाबत निश्चितीकरण करून घ्या. त्याप्रमाणे परीक्षेच्या आदल्या दिवशी बैठक क्रमांकाबाबत केंद्राच्या शाळेत जाऊन खात्री करून घ्या.

## परीक्षेच्या वेळी –

- कर्णबधिर विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांपेक्षा ३० मिनिटे जादा वेळ देण्यात येतो. अशा सर्व विद्यार्थ्यांनी सक्षम अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेली अपंगत्वासंबंधीची सर्व कागदपत्रे सोबत ठेवावीत व पर्यवेक्षकास त्याप्रमाणे माहिती द्यावी.
- अंध, अध्ययन अक्षम, सिकलसेल, थॅलेसेमिया, बहुविकलांग, स्वमग्न इ. विद्यार्थ्यांना प्रति तासास २० मिनिटे जादा वेळ देण्यात येतो. या विद्यार्थ्यांनी अपंगत्वतेची कागदपत्रे सोबत ठेवावीत व पर्यवेक्षकांना त्याबद्दल माहिती द्यावी. तसेच विषय योजना इत्यादींबाबतची खात्री करून घ्यावी.
- परीक्षा सुरू होताना फक्त पहिल्या दिवशी अर्धातास आधी प्रवेश मिळतो. त्यामुळे परीक्षा केंद्रावर वेळेवर उपस्थित राहा.
- परीक्षागृहामध्ये वेळेवरच पोहोचा. अपरिहार्य कारणाने उशीर झाल्यास परीक्षा सुरू झाल्यानंतर अर्ध्या तासाच्या आतच प्रवेश मिळेल. अन्यथा त्या विषयाची परीक्षा पुन्हा घेतली जाणार नाही.
- परीक्षागृहातील तुमच्या बैठक क्रमांकाची खात्री करून घेऊन त्या जागेवर बसावे.
- परीक्षा सुरू होण्यापूर्वी तुमच्याजवळ पुस्तके, वह्या अगर सुटे कागद/कोरे किंवा लिहिलेले कागद, कॅल्क्युलेटर, पेजर, मोबाईल फोन यापैकी कोणतेही साहित्य नाही याची खात्री करून घ्या व असे साहित्य तुमच्या पुढील किंवा मागील विद्यार्थ्याकडे असल्यास त्यांनाही ते परीक्षाकक्षाबाहेर ठेवण्यास सांगा.
- उत्तरपत्रिका मिळाल्यानंतर उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावरील सर्व सूचना काळजीपूर्वक वाचून त्याप्रमाणेच वागा. मुखपृष्ठावरील सर्व नोंदी काळजीपूर्वक लिहा. बैठक क्रमांक संख्येत व शब्दांत लिहिण्याचा आधीच सराव करा. दोन्ही बरोबर असल्याची खात्री करून घ्या. तुमच्याच बैठक क्रमांकाचा बारकोड असल्याची खात्री करून घेऊन स्वाक्षरी करा.
- परीक्षा सुरू झाल्यानंतर पर्यवेक्षकाव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीशी बोलू नका. परीक्षावर्गातील इतर मुलांशीसुद्धा बोलू नका. अशा प्रकारे बोलणे, कॉपी करणे हा गुन्हा आहे. अशा गुन्ह्यास गैरमार्ग प्रतिबंधात्मक कायद्यातील कलम ७ प्रमाणे सहा महिने कारावासाची शिक्षा अथवा ५०० रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा एकाच वेळी होऊ शकतात.
- परीक्षा प्रवेशपत्रावरील स्वाक्षरीप्रमाणे पर्यवेक्षक देतील त्या उपस्थिती पत्रकावर तुमच्या बैठक क्रमांकासमोर तुमच्याच बैठक क्रमांकाचा बारकोड असल्याची खात्री करून घेऊन स्वाक्षरी करा.

## लक्षात ठेवा –

- बैठक क्रमांक अक्षरांत अथवा अंकांत उत्तरपत्रिका किंवा पुरवणीच्या मुखपृष्ठावरील ठिकाणाव्यतिरिक्त आतील पृष्ठांवर कोठेही लिहू नका. अशा प्रकारे इतर कोठेही बैठक क्रमांक अथवा इतर कोणत्याही ओळखीसाठीच्या खुणा आढळल्यास त्या परीक्षेची संपूर्ण संपादणूक रद्द व एक परीक्षा प्रतिबंध अशी शिक्षा केली जाते.
- वेळापत्रकानुसार योग्य ती प्रश्नपत्रिका मिळाली असल्याची खात्री करून घ्या. प्रश्नपत्रिकेवरही बैठक क्रमांकासाठी दिलेल्या जागी तुमचा बैठक क्रमांक लिहा. प्रश्नपत्रिकेवर काहीही लिहू नका. ती कॉपी समजली जाते. काही

विषयासाठी एका परीक्षागृहामधील विद्यार्थ्यांना चार वेगवेगळ्या प्रश्नपत्रिका असणार आहेत. प्रश्नपत्रिकेवर ए बी सी किंवा डी याप्रमाणे संच असल्यास त्याप्रमाणे उत्तरपत्रिकेवर संचाचे अक्षर नमूद करण्यास विसरू नका.

- ☞ परीक्षा सुरू झाल्यानंतर एक तासपर्यंत कोणत्याही कारणासाठी परीक्षागृहाबाहेर जाता येत नाही.
- ☞ परीक्षा कालावधीत नैसर्गिक विधीसाठी बाहेर जावयाचे असल्यास पर्यवेक्षकांना विनंती करा व सोबत पर्यवेक्षकांनी सांगितलेल्या शिपायास घ्या. पाणीवाटपासाठी नेमलेल्या व्यक्तीला बरोबर घेऊ नका.
- ☞ उत्तरपत्रिकेत सर्व पृष्ठे क्रमाने असल्याची खात्री करून घ्या. नसल्यास तत्काळ पर्यवेक्षक यांच्याकडे ती उत्तरपत्रिका जमा करून नवीन घेण्यात यावी. कोणतेही पान कोणत्याही कारणासाठी फाडू नका, तो गुन्हा मानला जातो.
- ☞ निळ्या/काळ्या शाईच्या पेनानेच लिखाण करा. अन्य कोणत्याही रंगाची शाई अथवा स्केच पेन वापरू नका. कच्चे लिखाण पेन्सिलने उत्तरपत्रिकेतील डाव्या बाजूच्या पृष्ठावर लिहा.
- ☞ बीजगणित/भूगोल या विषयांच्या परीक्षेच्या वेळी आलेख पुरवणी/नकाशा मिळाल्याची खात्री करून घेऊन प्रश्नपत्रिकेतील सूचनांनुसारच कृती करा.
- ☞ गणित विषयाच्या वेळी आवश्यकता वाटल्यास पर्यवेक्षकांकडे मंडळाकडून पुरविण्यात आलेल्या लॉग टेबलची मागणी करा. काम पूर्ण होताच ते तत्काळ परत करा.
- ☞ परीक्षागृहातील इतर विद्यार्थ्यांकडे कोणत्याही साहित्याची मागणी करू नका.
- ☞ इतर विद्यार्थ्यांनी केलेल्या गैरप्रकाराबाबत तुम्हाला माहिती विचारल्यास न घाबरता संबंधित पर्यवेक्षक/केंद्रसंचालक/तपासणी अधिकारी यांना वस्तुस्थिती सांगून सहकार्य करा.
- ☞ प्रश्नपत्रिकेमध्ये काही दुरुस्ती आढळल्यास लगेचच पर्यवेक्षकांना दाखवा. दुरुस्तीबाबत काही सूचना न मिळाल्यास तो प्रश्न ज्याप्रमाणे येत असेल/माहीत असेल त्याप्रमाणे सोडवा.
- ☞ प्रश्नसंख्या व उपलब्ध वेळ यांचे चांगल्या प्रकारे नियोजन करा. परीक्षेसाठी देण्यात आलेली वेळ संपण्यापूर्वी १० मिनिटे आधी सर्व पुरवण्या मुख्य उत्तरपत्रिकेशी योग्यप्रकारे जोडून घ्या. मुखपृष्ठावर पुरवणी संख्या लिहून मुखपृष्ठावरील सर्व नोंदी तपासून पहा व वेळ असल्यास उर्वरित प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करा.
- ☞ मुख्य उत्तरपत्रिका व पुरवण्यांच्या संख्येएवढी होलोक्राफ्ट स्टिकर्स पर्यवेक्षकांकडून घ्या व उत्तरपत्रिकेवरील योग्य ठिकाणी चिकटवून खात्री करून घ्या.
- ☞ परीक्षा कक्ष सोडताना स्वत:ची उत्तरपत्रिका पुरवणीसह पर्यवेक्षकांकडे द्या.
- ☞ उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे देताना पुन्हा सर्व नोंदी व पुरवण्या योग्य प्रकारे जोडल्याची खात्री करून घ्या.

### परीक्षेनंतर –

- ☞ निकालाच्या निश्चित तारखेची खात्री करून घ्या आणि तुमच्या क्रमांकाचाच निकाल आहे याची खात्री करून घ्या व त्याप्रमाणे पुढील शिक्षणाचे नियोजन करा.
- ☞ पूर्ण तयारी करून आत्मविश्वासाने परीक्षेस सामोरे जा. यश तुमचेच आहे. पुन्हा एकदा हार्दिक शुभेच्छा !

**सचिव**

महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, पुणे.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

**माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा-फेब्रु./मार्च २०१५**

# 'गैरमार्गाविरुद्ध लढा'' – कृती कार्यक्रम

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या मार्फत राज्यातील नऊ विभागीय मंडळाद्वारा दरवर्षी फेब्रु/मार्च व सप्टें/ऑक्टो मध्ये इ.१०वी व इ.१२वीच्या सार्वत्रिक परीक्षांचे आयोजन करण्यात येते. दोन्ही परीक्षांना राज्यातून सुमारे ३२ लाख मुले दरवर्षी परीक्षेला बसतात. बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे आणि परीक्षेशी संबंधित घटकांच्या विशिष्ट वैचारिक मनोवृत्तीमुळे परीक्षेत विविध मार्गांनी निष्पन्न होणाऱ्या गैरप्रकारांचा मंडळाला सातत्याने सामना करावा लागतो. त्यादृष्टीने राज्यातील नऊ विभागीय मंडळे आपआपल्या स्तरावर विविध उपाययोजना आणि उपक्रम राबवित असतात. तथापि, या प्रयत्नात एकसूत्रीपणाची गरज सातत्याने जाणवत आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यासाठी एक नियोजनबद्ध व सर्व समावेशक असा कृती कार्यक्रम तयार करण्यात आला त्याची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे-

१. परीक्षा केंद्राबाहेरील उपद्रव थांबविण्यासाठी समाजाचीच मदत घेऊन, स्थानिक दक्षता समित्यांच्या माध्यमातून नियंत्रण आणणे.

२. शिक्षण खात्यातील सर्व विभाग व अन्य शासनाच्या इतर विभागांचीही मदत मिळवून, परीक्षा केंद्राचे संनियंत्रण अत्यंत प्रभावी बनवणे.

३. पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, विद्यार्थी व संस्थाचालक यांचे उद्बोधन व समुपदेशन करण्याचे वेळापत्रक तयार करून ते कार्यवाहीत आणणे. गैरमार्गापासून परावृत्त करण्यासाठीच्या प्रयत्नांबरोबर त्याबाबतचे शिक्षासूचीविषयक नियम, मंडळाच्या विद्यार्थी हिताच्या योजना आणि सोयीसवलती यांचीही माहिती देणे.

४. राज्य मंडळाच्या मार्गदर्शनावरून विभागीय मंडळ स्तरावरून विभागवार शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिकारी यांची सभा घेणे, परीक्षा केंद्रांतर्गत गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत सखोल मार्गदर्शन व प्रशासकीय सूचना देणे.

५. शिक्षक संघटना, शिक्षकेतर कर्मचारी संघटना, कनिष्ठ महाविद्यालयीन संघटना संस्थाचालक संघटना, व सर्व मंडळ सदस्यांच्या व सर्व संबंधित संघटनांच्या विभागवार बैठका घेऊन, वैचारिक परिवर्तनात त्यांचा सक्रीय सहभाग मिळविणे.

६. एवढे सगळे करूनही गैरप्रकार निष्पन्न झाल्यास संबंधित घटकांवर कायद्यातील तरतुदींच्या आधारे अत्यंत कठोर कारवाई करणे.

## अ) विभाग स्तर (विभागीय मंडळ)

**क्षेत्रीय अधिकारी सभा-दि.०५ फेब्रुवारी ते ०८ फेब्रुवारी २०१५**

दि.०५ फेब्रुवारी ते ०८ फेब्रुवारी २०१५ या कालावधीत प्रत्येक विभागीय मंडळाच्या कार्यालयात विभागीय अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली विभागीय शिक्षण उपसंचालक, मंडळाचे सदस्य, प्राचार्य(जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था) शिक्षणाधिकारी (सर्व), गटशिक्षणाधिकारी(सर्व), उपशिक्षणाधिकारी (सर्व), प्रशासन अधिकारी ( नगर पालिका/ महानगर पालिका) यांच्या बैठका आयोजित करून कृती कार्यक्रमाची दिशा निश्चित करणे तसेच कृती कार्यक्रम अमंलबजावणीसाठीचे नियोजन करावे. यामध्ये पुढील बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे.

१. परीक्षा वेळापत्रक व परीक्षाविषयक सविस्तर माहिती क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देणे.

२. विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सवलतीबाबतची माहिती देणे.

३. निकालापूर्वी व निकालानंतर शाळांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत माहिती देणे.

४. भरारी पथकाच्या बैठका घेणे तसेच भरारी पथक नियुक्त करणे यासाठी परीक्षांच्या तारीखनिहाय केंद्रांना भेटीसाठी नियोजन करणे.

५. **जिल्हयातील प्रत्येक विभागांतर्गत असलेल्या प्रत्येक परीक्षा केंद्रावर परीक्षेच्या प्रत्येक दिवशी शिक्षण विभागातील/इतर विभागातील किमान एक अधिकारी उपस्थित राहील याबाबत नियोजन करणे.**

६. गैरमार्गविरुद्ध लढा - कृती कार्यक्रमास स्थानिक पातळी/विभागीय पातळीवर योग्य ती प्रसिध्दी देऊन जाणीव जागृती करण्याबाबतच्या कार्यक्रमांची निश्चिती करणे.

७. परीक्षा काळात केंद्रसंचालक, बैठे पथकातील अधिकारी, सर्व शिक्षक व केंद्र दक्षता समितीच्या मदतीने प्रत्येक केंद्रावरील परीक्षा तणावमुक्त व कॉपीमुक्त होईल यादृष्टीने नियोजन करून कार्यवाही करणे.

## ब) जिल्हा स्तर-(जिल्हा शिक्षणाधिकारी,माध्यमिक)

**१. मुख्याध्यापक/प्राचार्य सभा- दि.१० फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी २०१५**

दि.१० फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी २०१५ या कालावधीत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील **मुख्याध्यापक/प्राचार्य व सर्व केंद्रसंचालक** यांची सभा आयोजित करून सर्व संबंधितांना कृती कार्यक्रमाविषयी माहिती देतील.

**२. दक्षता समिती सभा- दि.१६ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी २०१५**

दि.१६ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी २०१५ या कालावधीत मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची दक्षता समिती नेमण्याबाबत सभा आयोजित करून विभागीय मंडळांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करतील.

## क) तालुका स्तर- (गटशिक्षणाधिकारी)

**१) दक्षता समिती निर्मिती सभा :-दि.१४ फेब्रुवारी २०१५**

परिरक्षक/गटशिक्षणाधिकारी यांनी दि.१४ फेब्रुवारी २०१५ रोजी **केंद्र संचालक, प्रकल्प अधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व दक्षता समितीचे पदाधिकारी** यांची सभा आयोजित करून त्यांना खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

तालुका स्तरावर संबंधित तालुक्याचे परिरक्षक/गटशिक्षणाधिकारी यांनी तालुका पातळीवर असलेल्या सर्व केंद्रसंचालकांची बैठक आयोजित करून त्यांना योग्य त्या परीक्षाविषयक सूचना द्याव्यात.

१. तालुका पातळीवरील तालुका अंतर्गत असलेल्या सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील मुख्याध्यापक/प्राचार्य यांना तालुकास्तरीय बैठकीस उपस्थित राहण्याबाबत सूचना द्याव्यात.

२. शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या सूचनांनुसार तालुक्यातील प्रत्येक परीक्षा केंद्रावर परीक्षेच्या प्रत्येक दिवशी शिक्षण विभागातील एक अधिकारी उपस्थित राहील यादृष्टीने नियोजन करावे.

३. तालुका पातळीवर होणारी इ.१०वी व इ.१२वी परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीने संबंधित गटशिक्षणाधिकारी यांनी समन्वयक म्हणून काम करावे.

४. प्रत्येक केंद्रावर दक्षता समितीची स्थापना करणे व त्यांना योग्य त्या सूचना देणे.

**ड) केंद्र स्तर-(केंद्रसंचालक तथा मुख्याध्यापक/प्राचार्य)**

**१. स्थानिक /केंद्र स्तर दक्षता समिती- संरचना व कार्य**

परीक्षा केंद्र स्तरावरील स्थानिक दक्षता समित्या निवडण्यासाठी समन्वयक म्हणून त्या त्या केंद्राचे मुख्याध्यापक / केंद्रसंचालक काम पाहतील. सदर समित्या परीक्षा संनियंत्रणामध्ये व शाळेबाहेरील शिस्तीमध्ये कार्यरत राहतील अशा सूचना त्यांना देण्यात याव्यात. परीक्षेच्या कालावधीखेरीज परीक्षा प्रत्यक्ष सुरू होण्यापूर्वी ही समिती सदस्य जनप्रबोधनाचे आणि गैरमार्गाविरोधात वातावरण निर्मीतीचे काम करतील. समितीचे सदस्य समितीच्या अध्यक्षांची निवड करतील.

केंद्रस्तरावरील दक्षता समितीमध्ये त्या केंद्राला जोडलेल्या शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचा किमान एक प्रतिनिधी राहील.

**स्थानिक दक्षता समितीची संरचना साधारण: पुढीलप्रमाणे राहील -**

**अ) ग्रामीण भाग-**

सरपंच, पोलीस पाटील, शिक्षण समिती सदस्य, माजी सैनिक, तरुण मंडळ अध्यक्ष, पालक प्रतिनिधी, महिला प्रतिनिधी (बचतगट महिलामंडळ) गावातील अन्य प्रतिष्ठित संस्था व्यवस्थापन प्रतिनिधी, ग्रामसेवक/तलाठी/ग्रामविस्तार अधिकारी, पोलीस स्टेशन/पोलीस चौकी प्रतिनिधी, तंटामुक्त समिती अध्यक्ष/प्रतिनिधी इत्यादी.

**ब) शहरी भाग-**

नगरसेवक, माजी सैनिक, तरुण मंडळ अध्यक्ष, पालक प्रतिनिधी, महिला प्रतिनिधी (बचतगट महिलामंडळ), संस्था व्यवस्थापन प्रतिनिधी, परिसरातील अन्य प्रतिष्ठित व्यक्ती, पोलीस स्टेशन/पोलीस चौकी प्रतिनिधी.

**२. स्थानिक दक्षता समितीचे कार्य पुढीलप्रमाणे राहील-**

१) परीक्षा केंद्रावर बाहेरून होणारा उपद्रव थांबविण्याची जबाबदारी दक्षता समितीची राहील.

२) पोलीस बंदोबस्त कमी पडत असल्यास, पोलीस स्टेशनशी संपर्क साधून आवश्यक ती व्यवस्था करणे.

३) गैरमार्ग विरहित परीक्षेसाठी उद्बोधन, जनजागृती व वातावरण निर्मिती करणे.

४) नियंत्रणाबाहेर जाणाऱ्या उपद्रवी घटकांवर कारवाई करण्यासाठी पोलीस खात्याला सहकार्य करणे.

५) सदरील समिती परीक्षा केंद्राच्या हद्दीबाहेर थांबून आपले काम पाहील. प्रत्यक्ष परीक्षा केंद्राच्या आत त्यांची उपस्थिती अपेक्षित नाही.

६) ज्या गावात, शाळेत परीक्षा केंद्र नाही त्या शाळास्तरावर दक्षतासमितीचे दोन सदस्य आळीपाळीने परीक्षा केंद्राच्या ठिकाणी उपस्थित राहून, केंद्रस्तर दक्षता समितीत सहभागी होतील.

७) सर्व दक्षता समित्या प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी तारीखनिहाय कोण कोठे उपस्थित राहणार याचे काटेकोर नियोजन सर्व सदस्यांचे समवेत करतील.

## इ) कनिष्ठ महाविद्यालय/शाळा स्तर (प्राचार्य/मुख्याध्यापक)

### १. गैरमार्गाशी लढा- प्रतिज्ञा -दिनांक २६ जानेवारी २०१५

महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये दिनांक २६ जानेवारी २०१५ रोजी इ.१०वी व इ.१२वीच्या सर्व विद्यार्थ्यांनी गैरमार्गापासून दूर राहण्याची प्रतिज्ञा घेणे. प्रतिज्ञेचे प्रारूप शाळा स्तरावर निश्चित करणे.

### २. विद्यार्थी सभा- दि.२७ जानेवारी ते ३० जानेवारी २०१५

दि. २७ जानेवारी ते ३० जानेवारी २०१५ या कालावधीत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर सर्व विद्यार्थ्यांची सभा आयोजित करून त्यामध्ये शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक/मुख्याध्यापक/प्राचार्य तसेच शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शक यांच्यामार्फत परीक्षा तणावमुक्त व गैरमार्गमुक्त कशी होईल यादृष्टीने मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे. याशिवाय मार्गदर्शनात पुढील बाबींचा समावेश करावा.

१) परीक्षेच्या वेळापत्रकाचे वाचन व परीक्षेची माहिती, परीक्षा दालनातील वर्तन, श्रेणी विषय, अंतर्गत मूल्यमापन, एटीकेटी (इ.१०वी), श्रेणीसुधार योजना, बेस्ट फाईव्ह, (इ.१०वी) **उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती व उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन** यांची माहिती.

२) अंध, अपंग, मूकबधिर, अध्ययन अक्षम इत्यादींसाठीच्या परीक्षाकाळातील विविध सवलती.

३) नाव, जन्मतारीख यांची पडताळणी व त्याबाबतचे नियम मंडळाचे हॉल तिकिट काळजीपूर्वक तपासून घेणे व परीक्षा संपेपर्यंत सुरक्षित ठेवणे. हॉल तिकिट हरविल्यास करावयाची कार्यवाही. तसेच परीक्षेचे विषय व माध्यम याविषयी माहिती देणे.

४) विद्यार्थ्याने गैरमार्गाचा अवलंब केल्याने त्याचे होणारे नुकसान, कौटुंबिक बदनामी, मानसिक परिणाम, भविष्यात गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वाटचालीची शक्यता, यामुळे त्याचे भवितव्य धोक्यात येणे असे होऊ नये यासाठीचे मार्गदर्शन करणे.

५) मंडळ शिक्षासूची व प्रिव्हेन्शन ऑफ मालप्रॅक्टिस ॲक्ट यांची माहिती.

६) मंडळ हेल्पलाईनची माहिती.

७) परीक्षाकाळात मुलांची घ्यावयाची काळजी, आहार, झोप, मानसिकता,

८) समुपदेशन, वाहतूक.

९) जे विद्यार्थी प्रात्यक्षिक/तोंडी/श्रेणी परीक्षा वेळेत देऊ शकणार नाही त्यांना आऊट ऑफ टर्न परीक्षेविषयी माहिती देणे.

१०) शंकासमाधान.

११ ) प्रोत्साहन, शुभेच्छा.

## ३) मुख्याध्यापक/प्राचार्य /शिक्षक सभा :-दि.१६ फेब्रुवारी २०१५ रोजी

मुख्याध्यापक/प्राचार्य, संस्था प्रतिनिधी, शिक्षक पालक संघ यांचे प्रतिनिधी यांच्यासमवेत **दि.१६ फेब्रुवारी २०१५ रोजी** शिक्षकांची सभा आयोजित करण्यात येऊन त्यांना पुढील विषयांची माहिती देणे.

### इ.१०वी/इ.१२वी व एकूणच सर्व परीक्षांचे महत्त्व आणि गांभीर्य

१. विद्यार्थ्यांप्रती आणि शिक्षणप्रक्रियेप्रती शिक्षकाची नैतिक जबाबदारी

२. महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती नियम १९८१, नियम २२ अनुसूची 'जे' नुसार शिक्षकांची कर्तव्ये.

३. मंडळ शिक्षासूची व गैरमार्ग प्रतिबंधक कायद्यातील (Prevention of Malpractice Act) मधील तरतुदींचे वाचन व चर्चा.

४. काही शिक्षकांनी गैरमार्गास मदत किंवा गैरमार्गाकडे दुर्लक्ष केल्यामुळे समाजमानसात एकूणच शिक्षक वर्गाची तसेच शिक्षण क्षेत्राची होणारी बदनामी व अप्रतिष्ठा थांबविण्याची आवश्यकता गैरमार्गास मदत करणाऱ्या शिक्षकांबाबत विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होणारी अनादराची भावना.

## ४) पालक सभा :-दि.१७ फेब्रुवारी २०१५ रोजी

**दि.१७ फेब्रुवारी २०१५ रोजी** मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात पालकांची सभा आयोजित करून त्यांना परीक्षेविषयी खालील माहिती दयावी.

१) परीक्षेच्या वेळापत्रकाचे वाचन व परीक्षेची माहिती

२) श्रेणी विषय, अंतर्गत मूल्यमापन, एटीकेटी (इ.१०वी करीता), श्रेणीसुधार योजना, **बेस्ट फाईव्ह (इ.१०वी करिता), उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती व उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन** यांची माहिती अंध, अपंग, मूकबधिर, अध्ययन अक्षम इत्यादींसाठीच्या परीक्षाकाळातील विविध सवलती.

३) विद्यार्थ्याने गैरमार्गाचा अवलंब केल्याने त्याचे होणारे नुकसान, कौटुंबिक बदनामी, मानसिक परिणाम, भविष्यात गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वाटचालीची शक्यता, यामुळे त्याचे भवितव्य धोक्यात येणे असे होऊ नये यासाठी पालकांची कर्तव्ये.

४) मंडळ शिक्षासूची व प्रिव्हेन्शन ऑफ मालप्रॅक्टिस ॲक्ट यांची माहिती.

५) मंडळ हेल्पलाईनची माहिती.

६) परीक्षाकाळात मुलांची घ्यावयाची काळजी, आहार, झोप, मानसिकता, समुपदेशन, वाहतूक.

७) जे विद्यार्थी प्रात्यक्षिक/तोंडी/श्रेणी परीक्षा वेळेत देऊ शकले नाही त्यांना आऊट ऑफ टर्न परीक्षेविषयी माहिती देणे. तसेच जर्नल, प्रकल्प, वार्षिक काम, विद्यार्थ्याने सादर करायचे काम वेळेत सादर करण्याबाबत माहिती देणे.

८) स्थलांतर प्रमाणपत्राविषयी माहिती देणे.

उपरोक्त कृती कार्यक्रमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सचिव,<br>
राज्यमंडळ,<br>
पुणे - ४११ ००४

# मराठी भाषा दिन

**श्रीमती स्वाती ताडफळे**
राजा रघुनाथराव विद्यालय, भोर, जि. पुणे
संपर्क : ९८२२५४५९४५

*''लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी । जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी ।।*
*धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी । एवढ्या जगात माय मानतो मराठी ।।''*

सर्व शिक्षक सहकाऱ्यांना मराठी भाषा दिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा !

सरत्या वर्षाला निरोप देताना आपल्या भाषाप्रेमींसाठी .... 'मराठी भाषाप्रेमींसाठी' काही बातम्या अचानक खूप सुखावून गेल्या. त्यातील तीन ठळक बातम्या अशा :

१) 'येत्या मराठी भाषादिनापूर्वी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देऊ' शालेय शिक्षण व सांस्कृतिक मंत्री मा. विनोद तावडे यांची घोषणा.

२) ८८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. सदानंद मोरे यांची झालेली निवड.

३) ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ - डॉ. जयंत नारळीकर हे 'साहित्य अकादमी' पुरस्काराने सन्मानित.

डिसेंबर २०१४ मध्ये ठाणे येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने 'प्रतिभा संगम' हे विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय साहित्य संमेलन आयोजित केले होते. या संमेलनाच्या समारोप कार्यक्रमात मा. विनोद तावडे यांनी 'मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा येत्या मराठी भाषा दिनापूर्वी मिळवून देऊ' अशी ग्वाही दिली.

एवढेच नव्हे तर, सचिव आणि उपसचिव यांनी प्रत्येक प्रकल्पावर मराठीतून शेरा मारावा, अशी सुरुवात आपण मंत्रालयात करणार आहोत, असेही आवर्जून सांगितले.

मराठीच्या 'भाषा' म्हणून जपणुकीसाठी ही बातमी खूप आश्वासक वाटते ना ?

**दुसरी बातमी साहित्य संमेलनाध्यक्षपदाची -**

पंजाबमधील घुमान येथे ८८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. सदानंद मोरे विराजमान होणार आहेत. संत नामदेवांची कर्मभूमी असलेल्या घुमानमध्ये संत साहित्याचे अभ्यासक आणि तुकाराम महाराजांचे वंशज डॉ. मोरे संमेलनाचे अध्यक्षपद भूषवणार आहेत. हा किती छान योग आहे ना?

'संतसाहित्याचा आधुनिकतेशी संबंध आहे', असे कायम आग्रहाने प्रतिपादन करणारे मोरे सर आपली ही भूमिका साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठावरून अधिक विस्तृतपणे मांडतीलच आणि याचा परिणाम तरुण वाचक वर्ग संतसाहित्याकडे अधिक लक्षपूर्वक पाहू शकेल, असा विश्वास वाटतो.

मोरे सरांच्या अनेक साहित्यकृतींचा आधार 'संतसाहित्य' हाच आहे. महाराष्ट्र, मराठी संस्कृती आणि मराठी भाषा हा सरांच्या आस्थेचा विषय आहे. कवी, नाटककार, समीक्षक, ऐतिहासिक लेखक असं हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून मराठी भाषेसंबंधी... साहित्यासंबंधी... अभ्यासक्रमातील मराठीसंबंधी ... भाषा -

जतन – संवर्धन आणि समृद्धी यासंबंधी त्यांची भूमिका व्यक्त करतीलच. ही भूमिका शालेय स्तरावर – प्राथमिक, माध्यमिक व विशेषत: उच्च माध्यमिक शिक्षणात मराठी विषयाच्या अनिवार्यतेला पोषक असेल, अशी सकारात्मक आशा करायला काय हरकत आहे ?

**तिसरी बातमी म्हणजे –**

डॉ. नारळीकर यांना मिळालेल्या 'साहित्य अकादमी' सन्मानाची ! 'चार नगरांतले माझे विश्व' या त्यांच्या आत्मकथनपर ग्रंथासाठी त्यांना हा सन्मान जाहीर झाला आहे. अत्यंत प्रतिष्ठेचा असा हा साहित्य अकादमी सन्मान यावर्षी २२ भाषांतील साहित्यिकांना जाहीर झाला आहे.

मातृभाषेतून – 'मराठी माध्यमातून' शालेय शिक्षण घेतलेले डॉ. जयंत नारळीकर हे एक सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व ! विख्यात खगोलतज्ज्ञ, पद्मविभूषण डॉ. नारळीकर यांचे ललित वाङ्मयात 'ललितलेखक' म्हणून स्वतंत्र स्थान आहे. डॉ. नारळीकरांसारखी पथदर्शी उदाहरणे मातृभाषेतून शिक्षणाचे, मराठी माध्यमाचे महत्त्व अधोरेखित करतात हे पटतंय आपल्याला?

मित्रहो, या 'बातम्या' आपल्या मराठी संदर्भात आपली उमेद वाढविणाऱ्या आहेत, असं आपल्याला वाटतंय ना? पण फक्त बातम्या वाचून ही उमेद टिकेल... वाढेल ?

मराठीवर–भाषेवर प्रेम करता यायला हवं. मराठी विषय आवडायला हवा. शब्दाच्या–अर्थाच्या अनेक छटांची गंमत कळायला हवी. 'मराठीचे शिक्षक' म्हणून मुलांना विशेषत: शालेय स्तरावर ही भाषेची गंमत कळण्यास, मराठी विषय आवडण्यास आपण मदत करायला हवी. विशिष्ट 'भाषिक अनुभव' योजनापूर्वक द्यायला हवेत. यामध्ये पाठ्यघटकात येणारे नवे शब्द, त्यातील अर्थांचे वैविध्य, ऱ्हस्व–दीर्घ मागचे शास्त्र, शब्दाचे उपयोजन इ. प्रकारे अनुभवाची रचना करता येईल. समूह, गट इ. माध्यमातून चालू घडामोड, बातमी हा पण अनुभवाचा विषय होऊ शकेल. आपापल्या परीने आपण यामध्ये वैविध्य आणू शकू.

शालेय स्तरावर अभ्यासानुवर्ती उपक्रमात अनेक 'दिनविशेष' साजरे केले जातात. कवी कुसुमाग्रजांचा जन्मदिवस – २७ फेब्रुवारी आपण 'मराठी भाषा दिन' म्हणून साजरा करतो. फक्त साजरा करण्यापुरतंच महत्त्व या दिनविशेषाचं असू नये... तसं राहू नये. मराठी ऐकणं, मराठी लिहिणं, मराठी बोलणं, मराठी वाचणं – यासारखा दुसरा आनंद नाही. हा आनंद समजण्यासाठी आपण आपल्या विद्यार्थ्यांना मदत करायला हवी.

'वाङ्मय' शब्दाचा उच्चार व त्याचे लेखन नीट व्हायला हवे. साडी घालायची नाही तर नेसायची. माझी मदत करशील का असे न म्हणता मला मदत करशील का ? ही व या प्रकारच्या बोलण्यातील दुरुस्ती लहान वयात व वेळच्या वेळी केली तर आणि तरंच मराठीची गोडी 'अवीट' राहील. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाची भाषा मराठी आहे. त्यामुळे ती टिकवणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे, पण मराठी विषयाचे भाषाशिक्षक म्हणून आपली यासंबंधी थोडी अधिक जबाबदारी आहे, हे आपण मान्य करूया. मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने थोडे अधिक सजग होऊन मराठी अध्यापनाचा आनंद लुटूया आणि मराठी भाषा दिन साजरा करूया.

''अनंत अमुची ध्येयासक्ती,
अनंत अन् आशा,
किनारा तुला पामराला !''

*****

# खेडे म्हणजे जग - जग म्हणजे खेडे

*दि .२७ जानेवारी 'विज्ञान दिना'च्या निमित्ताने परिवर्तनावर आधारित खास लेख*


डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर
'या', हॉटेल ग्रीन फिल्ड लेन,
सदर बझार, सातारा
संपर्क : ९८२२५०३६५६


**प्राध्यापकांच्या पदवीवर 'एक्सपायरी डेट' घालून दर तीन वर्षांनी त्यांची परीक्षा घेऊन अभ्यासक्रम बदलत राहिले तर शाळा-कॉलेजात तुम्ही मिळवलेले ज्ञान अडगळ म्हणून तुमच्याबरोबर राहण्याची शक्यता अधिक.**

आपल्याभोवतालचे सारे वास्तव झपाट्याने बदलतंय. 'या चक्राची गती भयंकर' हे आज अगदी खरे आहे आणि 'विश्वाचा विस्तार केवढा, ज्याच्या त्याच्या डोक्याएवढा' हे पण खरे आहे. होणारे बदल समजावून घ्यावे लागतात. आपली वागणूक त्या बदलांशी सुसंगत करावी लागते. तसे केले तर आपण झपाट्याने पुढे जातो. तसे केले नाही तर प्रगतीच्या एका टप्प्यात कायमचे गोठवलो जातो. नकळत हळूहळू कालबाह्य होऊन हळूहळू नामशेष होतो. हे प्रगतीच्या पूर्वीच्या तीन टप्प्यावर काय झालंय ते समजावून घेऊ. अनेक काळ माणूस इतर माकडांच्याप्रमाणे झाडावर झोपायचा. ताकदवान गोरीला, चपळ चिंपांझी, वाघ, सिंह, साप यांना घाबरून असायचा. माणसाला अग्निचा शोध लागला आणि हे सारे झपाट्याने बदलले. हातात मशाल घेऊन माणूस गेला तर गोरीलापासून वाघापर्यंत सारे त्याला घाबरायचे. झाडावर न झोपता तो मैदानात झोपला आणि भोवताली मशाली ठेवल्या तर साप, वाघ कोणीही त्याच्या वाटेला जायचे नाहीत. ज्यांनी हा बदल समजावून घेतला नाही किंवा नाकारला ते वानर म्हणून प्रगतीच्या एका टप्प्यात कायमचे नामशेष झाले. त्यानंतर माणूस शेती करायला लागला. काही काळाने लक्षात आले, एकाच माणसाने शेतीतील सर्व कामे करणे त्रासाचे व वेळ खाणारे आहे. माणसाने बारा बलुतेदार ही नवी रचना बनवली. खेडी उभी राहिली. हा बदल ज्यांनी नाकारला ते आदिवासी म्हणून प्रगतीच्या त्या टप्प्यावर कायमचे गोठवले गेले. मध्ययुगात सर्वात चांगला पगार, चांगल्या सुखसोयी सैनिकांना मिळत. सैनिक व्हावयाचे म्हणजे तलवार, भाला पेलणारे बलदंड शरीर हवे. बाकीचे काडी पैलवान या सैनिकांची चाकरी करीत. त्यांच्या घोड्यांना खरारा करीत. ते देतील तेवढे पैसे निमुटपणे स्वीकारीत. बंदुकीच्या गोळीचा शोध लागला हे चित्र पार बदलले. बंदूक अचूक चालवणारा काडी पैलवान आता सर्वाधिक मान्यताप्राप्त सैनिक बनला. आणि बंदूक चालवता न येणारा बलदंड माणूस त्याचा नोकर बनला.

हे बदलाचे तीन टप्पे परवडले अशा प्रकारे आज आपल्यासमोरचे वास्तव बदललंय. आपल्या समोरची नवी नचना 'खाऊजा' ही आहे. 'खाऊजा' म्हणजे खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण. खरं तर ही रचना समजायला सोपी आहे. ती आपल्या बलुतेदार पद्धतीचे विकसित स्वरूप आहे. आपल्याला जे चांगले आणि स्वस्त करायला जमते ते जगात कोठेही विकावयाचे. आपणाला जे जमत नाही व हवे आहे ते जगात जेथे चांगले आणि स्वस्त मिळेल तेथे विकत घ्यावयाचे. मात्र

या बदलाचे खरे स्वरूप विद्यार्थ्यांनी व तरुणांनी समजावून घ्यावयास हवे. 'स्थानिक साधनसंपत्ती' हा शब्द कालबाह्य झालाय. कायमची नोकरी, 'पक्की नोकरी' हा शब्द संपलाय वा संपत आलाय. तुमच्या पदवीचा व्यावहारिक अर्थ मोडीत निघालाय. आत्तापर्यंत शाळा, कॉलेजात जा, अभ्यास करा, ज्ञान मिळवा, परीक्षा द्या, पदवी मिळवा आणि नोकरी मिळवा ही साखळी शेवटात संपली आहे. म्हणजे पदवी आणि नोकरी यांचा संबंध संपला आहे. आता यामुळेच झालंय काय, तर मग अभ्यास करा, ज्ञान मिळवा हवेच कशाला, शाळा-कॉलेजात जाऊन फक्त धमाल करावी. कॉपी करून वा न करून खेळणे म्हणून मिरवायला पदवी मिळवावी. असा सिलसिला सुरू झालाय. घोटाळा इथे झालाय. पदवी ही संकल्पना मोडीत निघायला सुरुवात झालीये. पण 'ज्ञान', खरे ज्ञान, नवे-कोरे ज्ञान ही एक अत्यावश्यक गोष्ट झालीये. हे ज्ञान फार महत्त्वाचे आहे. 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर' त्याप्रमाणे 'ज्ञान दाखव नाहीतर रस्ता धर' अशी परिस्थिती आहे. त्यातून हे ज्ञान पुस्तकी हवे आणि जीवनोपयोगी कलांचे पण हवे. त्यातून पुस्तकी ज्ञान गतिमान आहे. ती गती विलक्षण आहे. प्राध्यापकांच्या पदवीवर 'एक्सपायरी डेट' घालून दर तीन वर्षांनी त्यांची परीक्षा घेऊन अभ्यासक्रम बदलत राहिले तर शाळा-कॉलेजात तुम्ही मिळवलेले ज्ञान अडगळ म्हणून तुमच्याबरोबर राहण्याची शक्यता अधिक. म्हणजे हे ज्ञान तुमचे तुम्हीच मिळवले पाहिजे. आजच्या तंत्रयुगात ते तसे मिळवणे सोपे आहे. ते कसे ते पुढे पाहू. त्याचबरोबर वर आपण जीवनोपयोगी कला असे जे म्हटलंय, ते पण नीट समजावून घ्यावयास हवे. 'इलेक्ट्रिशिअन' आणि 'प्लंबर' हे जीवनोपयोगी शिक्षण दाखवतात. मात्र आजचे जीवनोपयोगी शिक्षण याच्याही फार पुढे गेलंय.

पुढे जाण्यापूर्वी आणखी एक गोष्ट समजावून घेऊ. जगात आज ज्ञानाचा, माहितीचा आणि तंत्रज्ञानाचा अक्षरशः स्फोट होतोय. १ जानेवारी २००१ रोजी एका शास्त्रज्ञाने 'वॉशिंग्टन पोस्ट' मध्ये एक लेख लिहिला होता. त्याने लिहिले होते. १ जानेवारी १९०१ रोजी आपण जगातील प्रमुख शास्त्रज्ञांना, प्राध्यापकांना, विचारवंतांना, संपादकांना विचारले असते की 'पुढील शंभर वर्षात विज्ञान आणि तंत्रज्ञान माणसाला काय देईल ते सांगा' तर त्यापैकी कुणीही १९९० मध्ये जगातील सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यात असलेल्या ९० टक्के गोष्टी सांगितल्या नसत्या. कारण १९०१ मध्ये अणूची रचना नीटपणे समजलेली नव्हती. अणूबॉम्ब कल्पनेतही नव्हता. चंद्रावर माणूस उतरेल यावर त्यांनी विश्वासही ठेवला नसता. साधी ॲन्टिबायोटिक्स औषधे निर्माण होतील हे त्यांना पटले नसते. अशा अनेक १९०१ मध्ये कल्पनेतही न बसणाऱ्या पण १९९० मध्ये मानवी जीवनात रुजलेल्या अनेक गोष्टींची यादी देऊन त्याने सांगितले होते. १९०१ मध्ये व त्यानंतर विज्ञान व तंत्रज्ञान फार धिम्या गतीने प्रवास करीत असताना हे स्थित्यंतर, कल्पनेतही न मावणारे स्थित्यंतर झाले. आज २००१ मध्ये विज्ञान तंत्रज्ञानाने प्रचंड गती घेतली आहे. दर दहा वर्षांनी असे कल्पनेतही न बसणारे बदल मानवी समाजात होणारेत. त्याचे म्हणणे खरे होते हे आता आपल्या लक्षात आलंय. २००१ मध्ये आपण दिल्लीत एक उच्चस्तरीय समिती नेमली होती. पुढील पंचवीस वर्षात भारतातील प्रत्येक खेड्यात टेलिफोन व्यवस्था द्यावयाची असेल तर किती हजार टन प्लॅस्टिक टेलिफोन यंत्रे बनवावयास लागेल, किती लाख किलोमीटर केबल लागेल. यासाठी किती हजार तंत्रज्ञ लागतील. याचा अहवाल त्यांनी तयार केला होता. त्यावेळी भ्रमणध्वनी भारतात आला होता. पण येणाऱ्या व जाणाऱ्या प्रत्येक मिनिटासाठी सोळा रुपये मोजायला लागायचे. ते ध्वनियंत्र पण महाग होते. आज भ्रमणध्वनी यंत्र प्रत्येकाच्या हातात आहे. त्याच्याशिवाय आपले चालू शकेल असेल आपणाला वाटत नाही. आणि निवासी ध्वनियंत्र कचकड्याचे खेळणे म्हणून कालबाह्य झालंय.

होणारे आणि होऊ शकणारे बदल तुम्हाला झपाट्याने समजावून घ्यावयास हवेत. हे करायचे तर संगणकावर तुमची

हुकमत हवी. संगणक खऱ्या अर्थाने समजला असेल तर भोवतालचे अफाट विश्व तुमच्या छोट्या मुठीत बंदिस्त होते. त्याचवेळी संगणकावर बसून कोणतेही ज्ञान मिळवणे सहजसाध्य आहे हे तुम्हाला समजेल. कला वा विज्ञान शाखेतील कोणत्याही विषयाला, अर्थशास्त्रापासून रसायनापर्यंत शंभरएक नवे शब्द, त्यांच्या व्याख्या आणि जवळजवळ तेवढ्याच संकल्पनावर समजावून घेतल्यात, त्या सुद्धा संगणकासमोर बसून, तर पुन्हा त्याच संगणकावर त्या त्या विषयातील नवे ज्ञान तुम्हाला कायम समजत राहते.

फक्त संगणक नीट वापरलात तर तुम्ही खेड्यापासून जगाकडे आणि जगापासून खेड्याकडे लगेच, अगदी क्षणार्धात येता तुमच्या भोवतालची साधनसंपत्ती आणि भोवतालचे अफाट जग याची तुम्ही सांगड घालता. काय होते ते नीटपणे लक्षात घ्या. रांचीला आपले 'बोकारो स्टील प्लँट' आहे. त्यांची तेथे सुंदर वसाहत आहे. वसाहतीत अनेक बंगले आणि सदनिका आहेत. बंगल्यांच्या व सदनिकांच्या बाहेर फुलझाडे, इतरत्र छान हिरवळ. एक मोठा प्रश्न होता. पावसाळ्यात हजारो गोगलगाई निर्माण व्हायच्या. सर्व हिरवळीचा सत्यानाश करायच्या. गोगलगाई मरून पडल्यावर आणखी घाण, वास, प्रचंड खर्च, पुन्हा संपूर्ण बाग नव्याने लावावयास पाहिजे. दहावी पास, नापास असा एक मुलगा संगणकावर बसला होता. त्याच्या लक्षात आले. जगात काही देशात गोगलगायी हा फार चविष्ट म्हणून महाग असा अन्नपदार्थ आहे. तो संगणकावर आणखीही खूप काही शिकला होता. त्याने घरी बसून तिकडच्या गोगलगायींचे पृथक्करण मागवले. येथील गोगलगायींचे पृथक्करण मिळवले. परदेश व्यापारात घ्यावयाचे नियम समजावून घेतले. बोकारो स्टील प्लँटच्या व्यवस्थापकांना भेटून, सर्व गोगलगायी नाहीशा करण्यासाठी त्याने पैसे घेतले. लोक नेमून त्या गोगलगायी गोळा केल्या. परदेशात त्या विकून पुन्हा भरपूर पैसा मिळविला.

अशीच आणखी एक गोष्ट आहे. सारा ब्लेकली या तिशीतील अमेरिकन मुलीची. तिच्या घरात व्यवसाय अजिबात नव्हता. म्हणजे व्यवसाय करणारी त्या शेतकरी आणि चाकरमान्यांच्या खानदानातील ती पहिली ! गेल्या वर्षी तिने इतिहास घडवला. पहिल्याच वर्षी एक अब्ज म्हणजे शंभर कोटी डॉलर्सचा म्हणजे सहा हजार कोटी रुपयांचा तिने व्यवसाय केला. अमेरिकेच्या इतिहासातील ही अशी पहिली घटना, म्हणून तिचा फार मोठा सन्मान झाला. साराने खरं तर फार काही केले नव्हते. स्त्रियांची अंगवस्त्रे फार सुखकारक नसतात. तिने अनेक कापडांचे थर देऊन नवी अंगवस्त्रे बनवली. स्वत: संगणकावर बसून पेटंट घेणे हा काय प्रकार असतो हे समजावून घेतले. आपण बनविलेल्या अंगवस्त्राचे पेटंट स्वत:च लिहिले व त्याचे पेटंट मिळवले. ती अंगवस्त्रे तिने बाजारात टाकली – आणि मग फक्त पैसे मोजत बसली.

'खाऊजा' आणि झपाट्याने प्रगत होणारे तंत्रज्ञान यामुळे तुमच्या समोरचे जग कायमच बदललंय. तुम्हाला कल्पवृक्षाखाली बसलेल्या त्या माणसाची गोष्ट माहीत असणार. मला पंचपक्वान्नाचे ताट पाहिजे असे तो म्हणाला तर त्याच्यासमोर पंचपक्वान्नाचे ताट आले. राक्षस येऊन मला खाऊन तर जाणार नाही असे तो म्हणाला आणि राक्षस येऊन त्याला खाऊनही गेला. आज तुमच्यासमोर कल्पनेतही बसणार नाही अशी अनेक नवी क्षेत्रे आहेत. प्रत्येक क्षेत्रात संधी भरभरून वाहते आहे. आणि त्याचवेळी तुमच्या आई-वडिलांच्या कल्पनेतही नव्हत्या अशा अनेक अडचणी तुमच्या समोर आहेत. तुम्ही भांबावून बदल न करता आदीवासींच्याप्रमाणे प्रगतीच्या या टप्प्यावर स्वत:ला कायमचे गोठवून घेणार की, बोकारोमधील तो मुलगा आणि सारा ब्लेकलीप्रमाणे पुढे जाणार हे फक्त तुम्ही ठरवायचंय.

*****

# भारताच्या मंगळ मोहिमेचे शिल्पकार – डॉ. के. राधाकृष्णन

श्री. उदयकुमार पाटील
सहशिक्षक,
श्री दि. जैन गुरुकुल प्रशाला, सोलापूर
मोबाईल : ९४२१२२३५७३

भारताच्या यशस्वी मंगळ मोहिमेचे शिल्पकार डॉ. के. राधाकृष्णन हे भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात इस्रोमधील आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर इस्रोच्या अध्यक्षपदावरून ३१ डिसेंबर, २०१४ रोजी सेवानिवृत्त झाले. इस्रोसारख्या प्रतिष्ठित संशोधन संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळताना त्यांनी आपल्या आचार-विचाराने व कर्तृत्वाने त्या पदास एक वेगळी उंची प्राप्त करून दिली. आपल्या पदाचा कसलाही तोरा न मिरविता सर्वांना सोबत घेऊन समरसून कार्य करणाऱ्या डॉ. राधाकृष्णन यांनी विज्ञान संशोधन क्षेत्रात एका आगळ्यावेगळ्या कार्यशैलीचा नवा अध्याय सुरू केला.

डॉ. राधाकृष्णन यांच्या नेतृत्वाखाली इस्रोद्वारे राबविण्यात आलेल्या मंगळ मोहिमेने अवकाश संशोधन क्षेत्रात भारतासाठी अनेक नवे आयाम निर्माण केले. फक्त दीड वर्षाची पूर्वतयारी आणि अवघ्या ४५० कोटी रुपयांच्या खर्चामध्ये यशस्वी झालेल्या या मोहिमेमुळे अनेक जाणकारांची बोटे तोंडात गेली होती. अशा सुंदर आंतरग्रहीय अवकाश संशोधन मोहिमांसाठी आवश्यक असणाऱ्या कितीतरी बाबी भारतीय तंत्रज्ञांनी पहिल्यांदाच त्याही अक्षरश: शून्यातून निर्माण केलेल्या होत्या. यातील कोणत्याही एका टप्प्यातील अपयशाने संपूर्ण मोहिमेच्या तयारीवर पाणी फेरले गेले असते. मात्र डॉ. के. राधाकृष्णन यांनी आपल्या तंत्रज्ञांमधील आत्मविश्वास जागविला, त्यांच्या कर्तृत्त्वाला योग्य असा वाव दिला आणि .. आणि इतिहास घडला. आपल्या पहिल्याच प्रयत्नात मंगळ मोहिमेसारखी खडतर व आव्हानात्मक अवकाश मोहीम यशस्वी करणारा भारत हा जगातील पहिला व एकमेव देश बनला.

मंगळयानाच्या सफल कामगिरीने आनंदी झालेल्या भारतीयांनी इस्रो आणि इस्रोतील वैज्ञानिक व तंत्रज्ञ यांचे मनापासून कौतुक केले. मात्र अशा मोहिमांच्या यशाचे मोजमाप करणाऱ्या व्यक्ती वा संस्था तेवढ्याच तोलामोलाच्या असतील तर ते मूल्यमापन यथार्थ ठरू शकते. यासंबंधीचे दोन दाखले याठिकाणी द्यावेसे वाटतात. जगप्रसिद्ध 'टाईम' या नियतकालिकाने सर्वश्रेष्ठ अशा पंचवीस वैज्ञानिक संशोधन कार्यांमध्ये भारताच्या मंगळ मोहिमेस स्थान दिले आहे. तसेच 'नेचर' या सुप्रसिद्ध नियतकालिकानेही भारताच्या मंगळ मोहिमेची दखल घेऊन जगातील पहिल्या दहा कर्तृत्ववान शास्त्रज्ञांमध्ये डॉ. के. राधाकृष्णन यांचा समावेश केला आहे. 'टाईम' आणि 'नेचर' अशा नामांकित संस्थांकडून कौतुकाची थाप मिळत असतानाही डॉ. राधाकृष्णन यांची प्रतिक्रिया नेहमीप्रमाणेच अत्यंत संयमी अशीच होती. 'नेचर' ला दिलेल्या प्रतिक्रियेत ते म्हणतात, ''मी फक्त ऑर्केस्ट्राचा कंडक्टर होतो.'' कोणत्याही पातळीवरील यशाचे श्रेय लाटण्यासाठी अहमहमिका सुरू होण्याच्या आजच्या युगात एवढ्या मोठ्या यशाचे श्रेय आपल्या सहकाऱ्यांना देण्यासाठी लागणारी विनम्रता डॉ. राधाकृष्णन यांचेकडे आहे. आपल्या नम्र प्रतिक्रियेतून त्यांनी भारताच्या उदात्त संस्कृतीचेच दर्शन सर्वांना घडविले.

२००८ मध्ये भारतीय अवकाश संशोधन संस्थेने आपली पहिली चांद्रमोहीम यशस्वीपणे पार पाडली. त्यानंतर इस्रोद्वारे नजिकच्या भविष्यात आयोजिण्यात येणाऱ्या चांद्रयान-२, मंगळयान, समानव अवकाश मोहीम अशा भव्य

प्रकल्पांची घोषणाही करण्यात आली होती. मात्र काही तात्कालिक कारणांमुळे तेव्हाचे इस्रोचे अध्यक्ष डॉ. माधवन नायर यांना पदावरून पायउतार व्हावे लागले. त्यांच्यानंतर या जबाबदारीच्या पदावर डॉ. के. राधाकृष्णन यांची नियुक्ती करण्यात आली. एस. बँड घोटाळ्यातील उल्लेखामुळे इस्रोच्या प्रतिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकण्याचा तो काळ होता. त्यातून इस्रोची प्रतिमा सावरणे, मंदावलेला आर्थिक ओघ पूर्ववत करणे आणि आधी घोषित केलेल्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना चालना देणे इ. आघाड्यांवर एकाचवेळी काम करणे, ही तसे म्हटले तर डॉ. राधाकृष्णन यांच्या नेतृत्वाची कसोटीच होती. परंतु 'बोलणे कमी-काम जास्त' हे सूत्र अंगिकारून विलक्षण धैर्याने अविचलपणे त्यांनी आपले कार्य सुरू ठेवले. मोठ्या प्रकल्पांसाठी येणाऱ्या खर्चाची व्यवहार्यता राष्ट्रीय नेत्यांना तसेच नागरिकांना पटवून देण्याची हातोटी त्यांनी दाखवली. आपले संशोधन केवळ प्रयोगापुरते मर्यादित नसून ते संपत्ती निर्माण करणारे आहे. राष्ट्रास वैभवाच्या मार्गावर नेणारे आहे याचा त्यांनी वारंवार उल्लेख केला. याच तत्त्वाने कार्य करणाऱ्या इस्रोच्या वैज्ञानिकांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या नेतृत्वाखाली समर्पितपणे कार्य केले. दूरसंवेदन क्षेत्रातील भारताच्या महत्त्वाकांक्षी योजनेचा भाग असलेला उपग्रह अवकाशात स्थापित करणे, मंगळ मोहीम प्रत्येक टप्प्यावर यशस्वी करणे तसेच भूस्थिर उपग्रह प्रक्षेपक वाहक GSLVMR3ची चाचणी यशस्वी होणे हे त्यांच्या समर्थ नेतृत्वाखाली इस्रोने गाठलेले मैलाचे दगड आहेत.

डॉ. राधाकृष्णन यांचा जन्म २९ ऑगस्ट १९४९ रोजी केरळमधील त्रिसूर जिल्ह्यातील इरिंजलकुडा या गावी झाला. त्रिसूरच्या सरकारी अभियांत्रिकी कॉलेजमधून शिक्षण घेत त्यांनी १९७० मध्ये विद्युत अभियांत्रिकी शाखेतून केवळ विद्यापीठाची पदवी संपादन केली. पुढल्याच वर्षी ते इस्रोच्या तिरुअनंतपूरम येथील विक्रम साराभाई अवकाश केंद्रात 'एव्हिऑनिक्स इंजिनियर' म्हणून रुजू झाले. इस्रोच्या विविध विभागांमध्ये महत्त्वाच्या पदांवरून कार्य करीत असताना त्यांनी आपला अभ्यासही सुरू ठेवला. १९७६ मध्ये त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (IIM) बंगळूर येथून व्यवस्थापनाची एम.बी.ए. पदवी प्राप्त केली. पुढे २००० साली इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, खरगपूर या संस्थेतून त्यांनी डॉक्टरेट संपादन केली.

इस्रोमधील आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीत डॉ. राधाकृष्णन यांनी बऱ्याच महत्त्वाच्या पदांवर कार्य केले. प्रादेशिक दूरसंवेदक केंद्रांच्या स्थापनेमध्ये प्रकल्प संचालक, संपूर्ण इस्रोच्या अर्थसंकल्प नियंत्रण आणि देखरेख कार्याचे प्रमुख, राष्ट्रीय नैसर्गिक साधनसंपत्तीच्या व्यवस्थापन प्रणालीचे संचालक, शाश्वत विकासासाठीच्या एकात्मिक योजनेचे प्रकल्प संचालक, नॅशनल रिमोट सेन्सिंग एजन्सीचे संचालक, विक्रम साराभाई अवकाश केंद्राचे संचालक आदी पदांवर त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. प्रत्येक पदावर काम करताना त्यांनी आपल्या कार्याचा अवीट असा ठसा तेथे उमटविला. त्याचाच परिणाम म्हणून त्यांचेकडे वेळोवेळी अधिक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या. विक्रम साराभाई अवकाश केंद्राचे संचालक म्हणून कार्य करीत असताना त्यांनी 'चांद्रयान- I ' या भारताच्या पहिल्या चांद्रमोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावली. त्या मोहिमेचा आराखडा तयार करणे, स्ट्रॅपऑन मोटारींच्या नव्या संचासह प्रक्षेपक वाहन (PSLVC-11) बनविणे तसेच चंद्रावर सोडण्यात येणारी कुपी (मून इम्पॅक्टर प्रोब -MIP) बनविणे इ. कार्यांमध्ये त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. चांद्रयान-मोहिमेनंतरच त्यांची इस्रोच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

२००४ च्या डिसेंबरमध्ये हिंदी महासागरात आलेल्या त्सुनामीचा फार मोठ्या तडाखा भारतास बसला. यानंतर अशा त्सुनामीची आगाऊ सूचना मिळण्याची यंत्रणा विकसित करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या अभ्यास प्रकल्पाचे संचालकपदही डॉ. राधाकृष्णन यांनाच देण्यात आलेले होते.

अभियंता, तंत्रज्ञ-वैज्ञानिक, व्यवस्थापक, संचालक अशा भूमिका पार पाडत असतानाच डॉ. राधाकृष्णन यांनी विपूल असे वैज्ञानिक लेखनही केले. स्पेस फोरम, करंट सायन्स, अ‍ॅक्टा अ‍ॅस्ट्रोनॉटिका अशा मान्यताप्राप्त नियतकालिकांमधील लेखांसह ५५ हून अधिक प्रकाशनांमध्ये त्यांनी लेखक-सहलेखक म्हणून कार्य केले. विज्ञानविषयक अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर त्यांना व्याख्यानांसाठी आमंत्रित करण्यात आले. त्यांना श्री. वेंकटेश्वर विद्यापीठ, तिरुपती, राजस्थान टेक्निकल युनिव्हर्सिटी कोटा, GITAM विद्यापीठ विशाखापट्टणम्, तुमकूर विद्यापीठ तसेच एसआरएम विद्यापीठ, चेन्नई आदी विद्यापीठांद्वारे मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित करण्यात आले आहे.

विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनीही त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. यामध्ये इंडियन सायन्स कॉंग्रेसचा विक्रम साराभाई स्मृती पुरस्कार, इंटरनॅशनल अ‍ॅकेडेमी ऑफ अ‍ॅस्ट्रोनॉटिक्सचा सोशल सायन्सेस अ‍ॅवार्ड, इंडियन सोसायटी ऑफ रिमोट सेन्सिंगचा भास्कर पुरस्कार, मिनिस्ट्री ऑफ अर्थ सायन्सेसचा रौप्य महोत्सवी पुरस्कार, इंडियन जिओफिजिकल युनियनचे रामनाथन स्मृती सुवर्णपदक आदी पुरस्कारांचा समावेश आहे.

आपल्या मंगळ मोहिमेतील यशाने डॉ. राधाकृष्णन यांनी अवकाश संशोधन क्षेत्रात मंगळ युगाचा प्रारंभ केलेलाच आहे. त्यांच्याच कारकिर्दीत समानव अवकाश मोहिमांसाठीच्या चाचण्यांमध्येही इस्रोने यश प्राप्त केले आहे. लवकरच भारतीय अंतराळवीर भारताच्या यानातून अवकाशात जातील आणि खऱ्या अर्थाने अवकाश संशोधन क्षेत्रामध्ये भारतीयांची मुक्त भरारी सुरू होईल अशी आपण आशा करूया. कथ्थकली आणि कर्नाटक संगीताची आवड असणाऱ्या डॉ. राधाकृष्णन यांना सेवानिवृत्तीनंतरच्या निरोगी व मंगलमय आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा !

*****

## आवाहन

'शिक्षण-संक्रमण' हे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भातील विषयांसंबंधित सुसंवाद साधणारं मासिक आहे हे आपण जाणताच. शिक्षकांनी, मुख्याध्यापकांनी केलेल्या यशस्वी शैक्षणिक उपक्रमांची माहिती 'शिक्षण संक्रमण' च्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील शाळांपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने शिक्षण संक्रमणकडे पाठविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

आपल्या शैक्षणिक समस्यांची उकल करण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी, आपले दैनंदिन अध्यापन अधिक प्रभावी होण्यासाठी, आपल्या विषयातील एखाद्या घटकाचे आकलन उत्तम होण्यासाठी, अध्यापक अनेक शैक्षणिक उपक्रम करीत असतात, त्यांची माहिती सर्वांनाच निश्चितच उपयुक्त ठरते.

आपल्या उपक्रमांची उद्दिष्टे-पार्श्वभूमी, समस्येचे स्वरूप आपल्या उपक्रमाच्या कार्यवाहीचे नियोजन, प्रत्यक्ष कार्यवाही, कार्यवाही करताना आलेले अडथळे, त्यांवर मात करण्यासाठी केलेल्या उपाययोजना, फलश्रुती, आपल्या उपक्रमासाठी लागलेला कालावधी इत्यादी सर्वसाधारण मुद्दे असावेत, तसेच आपला उपक्रम कोणत्याही वर्गासाठी आहे, पालक, शिक्षक, विद्यार्थी यांना तो कसा उपकारक ठरला याचेही विवेचन असावे, काहीतरी नावीन्यपूर्ण, शिक्षणातील आनंद वाढविणारे, प्रेरणादायक, कृतिप्रधान, सामाजिक, जाणिवांची जोपासना करणारे, शिक्षणाची प्रतिष्ठा वाढविणारे असे हे उपक्रम असावेत. लेखनाचे स्वरूप, आटोपशीर, वस्तुनिष्ठ असावे. माहितीचा तपशील बिनचूक असावा. सुमारे २००० शब्दांपर्यंत आपला लेख असावा. योग्य लेखास 'शिक्षण-संक्रमण' मध्ये निश्चितच स्थान देण्यात येईल. मुख्याध्यापकांनी हे आवाहन आपल्या अध्यापकांच्या निदर्शनास आणून द्यावे व त्यांना लिहिण्यास प्रोत्साहित करावे.

सचिव

राज्यमंडळ, पुणे.

# विद्यार्थ्यांना नापासच करू नये

**सौ. माधुरी लक्ष्मीकांत धोंड**
महाराष्ट्र पब्लिक स्कूल,
जालना रोड, महेशनगर, औरंगाबाद
*(निबंध स्पर्धा उत्तेजनार्थ)*

## १. विद्यार्थी शब्दाची व्यापकता

विद्यार्थी हा शब्दच खूप व्यापक आहे. त्याचा शब्दश: अर्थ आणि लक्ष्यार्थ दोन्हीचा विचार केला तर आपल्या लक्षात येईल की, 'विद्येचा उपासक, अभ्यासक, 'विद्या' मिळविण्यासाठी प्रयत्नशील अशा विविध अर्थाने 'विद्यार्थी' हा शब्द सिद्ध होतो. प्रत्येक 'प्राणी' हा आयुष्यभर विद्यार्थीच असतो. हे आपल्या मान्य करावे लागेल. पण सृष्टीतील सर्व प्राण्यांपैकी मानव हा प्राणी बुद्धिमान असल्यामुळे त्याची शिकण्याची गती ही विलक्षण असते, त्यामुळेच निसर्ग आणि त्याच्याशी संबंधित अनेकविध ज्ञानशाचाचे त्याने अध्ययन केले आणि स्वत:चे जीवन सुखकर बनवले. प्रसिद्ध शिक्षण तज्ज्ञ गेटस् यालाच शिक्षण म्हणतात. 'Progressive change in behaviour' लाखो वर्षांपासून बुद्धिचा सातत्याने उपयोग केल्यामुळे आज मानव आणि इतर प्राणी यांच्या महदंतर निर्माण झाले आहे.

### अभिव्यक्ती क्षमता

सर्वसामान्यपणे इंद्रियांच्या माध्यमातून मिळणाऱ्या अनुभवाचे ज्ञानात रूपांतर करण्याची क्षमता बुद्धीत असते. हेच जॉन कॉमेनिअस या इंद्रियनिष्ठ वास्तववादी विचारवंताने आपल्या शिक्षणविषयक भूमिकेत मांडलेले आहे. ज्ञानप्राप्तीचे प्राथमिक साधन म्हणजे इंद्रियानुभव आणि या अनुभवांचे बुद्धी वर्गीकरण करून ज्ञान प्राप्त करते. प्रत्येकाच्या क्षमतेत फरक असतो. हा फरक असण्याची अनेक कारणे असतात. शारीरिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक या घटकांशिवाय बाह्य वातावरण, परिसर, आसपासच्या व्यक्ती, त्यांची वैचारिक धारणा, या सर्वांचा असणारा प्रभाव अशा अनेकविध घटकांवर व्यक्तीची अनुभवाचे ज्ञानात रूपांतर करण्याची क्षमता अवलंबून असते आणि म्हणून एखादी घटना, प्रसंग, परिसर, एखादं पुस्तक, नाटक, चित्रपट, व्याख्यान हे सगळ्यांनी एकत्र अनुभवले तरी प्रत्येक व्यक्तिपरत्वे त्याचे आकलन हे भिन्न असते. अनुभव येणे, अनुभव घेणे, त्याचे चिंतन, मनन करून ते अभिव्यक्त करणे ही प्रक्रिया प्रत्येक व्यक्तिपरत्वे भिन्न असते. अनुभव 'घेत' असताना प्रत्येक माणसाची मानसिक, भावनिक, बौद्धिक आकलनक्षमता जेवढी महत्त्वपूर्ण असते त्याहीपेक्षा जास्त ती अभिव्यक्त होताना अपेक्षित असते. कारण घेतलेले व्यक्त होत असताना त्यात निरीक्षण, चिंतन, मन, बुद्धी, भाव यांची जडणघडण यांच्याबरोबरच व्यक्त होण्याच्या

**शारीरिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक या घटकांशिवाय बाह्य वातावरण, परिसर, आसपासच्या व्यक्ती, त्यांची वैचारिक धारणा, या सर्वांचा असणारा प्रभाव अशा अनेकविध घटकांवर व्यक्तीची अनुभवाचे ज्ञानात रूपांतर करण्याची क्षमता अवलंबून असते**

माध्यमाबद्‌दलचा अभ्यास म्हणजेच शब्द किंवा चित्र किंवा शिल्प यांच्याबद्‌दलचा अभ्यासही महत्त्वपूर्ण असतो आणि या सर्व प्रक्रिया अनुभव घेणे ते व्यक्त करणे पर्यंतच्या प्रवासात आवश्यक योगदान देत असतात.

अनुभव घेणे याबाबत जे घडत असते तेच माहिती घेणे याही बाबतीत घडत असते. मुलांना आपण शिकवतो, म्हणजे त्यांना आत्तापर्यंत माहिती नसलेले सांगत असतो. 'ती माहिती घेणे' ही प्रक्रिया पुन्हा त्या मुलांच्या मानसिक, भावनिक, बौद्‌धिक क्षमतेवर अवलंबून असते. या सर्व क्षमता ते मूल ज्या वातावरणात घडत आहे त्यावरही अवलंबून असतात. एकूणच प्रत्येक मुलाची आकलनक्षमता आणि अभिव्यक्त क्षमता ही आंतरिक आणि बाह्य कारकांवर अवलंबून असते म्हणूनच ती प्रत्येक विद्यार्थी परत्वे भिन्न असते.

## शिक्षण म्हणजे काय

मुलाला, पालकाला आपण जी माहिती देतो, ज्ञान देतो, विद्या देतो किंवा शिक्षण देतो ते शिक्षण म्हणजे नेमके काय ? जागतिक पातळीवर या संदर्भात दोन विचारप्रणाली आपल्यासमोर येतात. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य. पौर्वात्य शिक्षणप्रणालीचे प्रतिनिधित्व अर्थातच भारताकडे येते. कारण लोकमान्य टिळकांच्या मते वेदनिर्मितीचा कालखंड हा इ.स. पूर्ण ७००० वर्ष असा आहे आणि वेद हेच पौर्वात्य शिक्षण पद्‌धतीचे मूळ आहे. वेद, ब्राह्मण, आरण्यक, उपनिषद हे सर्व ग्रंथ मौखिक पद्‌धतीने गुरुकुलात रुजले, विकसित झाले. निसर्ग शिक्षण आणि वैश्विक मूल्यांचे बीजारोपण ही मूलभूत ध्येये तत्कालीन ऋषींनी अंगिकारली. निसर्ग शिक्षणाचं दैनंदिन जीवनात उपयोजन आणि वैश्विक मूल्यांच्या आधाराने मानवाचं मानसिक, भावनिक, बौद्‌धिक उन्नयन – यापेक्षा शिक्षणाचे उद्‌दिष्ट आणखी वेगळे काय असू शकते ? या विधानाची पुष्टी – वेद आणि त्यानंतरच्या ग्रंथातून आपल्यासमोर आलेल्या विविध ज्ञानशाखांमधून होते. शिक्षणाचा हा मूलभूत विचार भारतामध्ये जवळजवळ १० हजार वर्षांपूर्वी रुजला. तसा पाश्चिमात्य संस्कृतीत रुजण्यासाठी सॉक्रेटिसचा जन्म व्हावा लागला. पाश्चिमात्य संस्कृतीचं प्रतिनिधित्व ग्रीक धुरीणांनी केले आहे. सॉक्रेटिसच्याही आधी 'सोफिस्ट' हा विचार संप्रदाय होता. थेलस, पायथागोरस, हेरॅक्लीटस्‌सारखे विचारवंत होऊन गेले. पण सॉक्रेटिस आणि त्याचा शिष्य प्लेटो यांनी समाज जीवनाला तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. व्यक्तिनिष्ठेच्या जागी विश्वात्मक मूल्ये समाजात रुजवली. प्लेटोने आपल्या 'रिपब्लिक' या ग्रंथात शिक्षणविषयक सविस्तर विचार मांडलेले आहेत. 'मुलांच्या जन्मजात शक्तींना संस्कारित करून त्यांना अनुरूप अशा सद्‌गुणांचा विकास म्हणजे शिक्षण' – प्लेटो. 'I meant by education that training which is given to the first instincts of virtue in children' - Pleto (इ.स. पूर्व ४२० ते ३४८)

## जागतिक विचारवंत व शिक्षण

भारतीय ऋषीमुनींनी सांगितलेले 'मानवी उन्नयन' वेगळ्या शब्दात प्लेटोनी मांडले आहे, पण मूळ गाभा तोच आहे. जसजसा काळ बदलत गेला तसतसे अनेक विचारवंत शिक्षण विषयावर प्रयोग आणि भाष्य करत होते. त्यापैकी काहींचा विचार आपण इथे करूया –

## जीन जेकस रुसो –

धकाधकीचं आणि अस्थिर जीवन जगणारा जीन जेकस रुसो यांनी 'Emile' या ग्रंथात शिक्षणविषयक मूलभूत विचार मांडले आहेत. सर्व अवयवांचा व शक्तींचा नैसर्गिक विकास म्हणजे शिक्षण – रुसो (१७११ ते १७७८)

'The spontineous development of our organs and faculties constitutes the education of nature' - Ruso.

बालकांचा नैसर्गिक विकास ही संकल्पना याही पूर्वी अनेकांनी मांडली होती. पण रुसोने निसर्गदत्त स्वभाव, मानवी समाज आणि बाह्य सृष्टी म्हणजेच निसर्ग या गोष्टींपासून शिक्षण मिळते हे स्पष्ट करत तत्कालीन पारंपरिक शिक्षण व्यवस्थेला धक्का देत शिक्षणक्षेत्रात क्रांती घडवून आणली. 'एमिल' या ग्रंथात त्याच नावाचा मानसपुत्र निर्माण करून त्याला कसे शिकवावे हे कथात्मक पद्धतीने वर्णन केले आहे.

**मेरिया मॉन्टेसरी –**

१८७० मध्ये इटलीत जन्मलेल्या मॉन्टेसरीने बालकांच्या शिक्षणासाठी स्वप्रयोगांनी सैद्धांतिक मांडणी करून आधुनिक पूर्व प्राथमिक शिक्षणाचा पाया घातला आणि जगभर तो सर्वमान्य झाला आहे. 'इंद्रिय शिक्षणामुळे मुले अधिक संवेदनशील होतात, त्यांचे अवलोकन मार्मिक होते आणि बुद्धीचाही विकास होतो.'

'This education prepares directly for intellectual education by perfecting the organs of the sense and never paths of projection and association. Meria Montesory. (१८७० ते १९५२)

आज प्रचलित असलेल्या भारतभर पसरलेल्या 'बालवाड्या' हे मॉन्टेसरीचे फलीत आहे. जॉन ॲडम्स् यांनी (१८७० ते १९५२) 'The evaluation of education theory' या ग्रंथात शिक्षणक्षेत्रात वैयक्तिक शिक्षणाच्या तत्त्वाचा पाया घातला. 'She has sounded the knell of class teaching' वर्ग पद्धतीला सुरूंग लावला. असे म्हटले आहे.

**स्वामी विवेकानंद –**

भारतीय तत्त्वज्ञानाचा विश्वात प्रसार करणारे स्वामी विवेकानंद यांनी शिक्षण विषयावर भाष्य करणे हे क्रमप्राप्तच आहे. त्यांनी फक्त अध्यात्मिक दृष्टिकोनातूनच नव्हे तर माणसाच्या परिपूर्ण विकासाच्या दृष्टीने शिक्षणाची व्याख्या केली आहे. 'शिक्षण म्हणजे माणसातील पूर्णत्वाचा अविष्कार.' – स्वामी विवेकानंद

'Education is the manifestation of the perfection in man' - Swami Vevekanand

आणखी एक व्यापक व्याख्या स्वामीजींनी केलेली आहे. 'इच्छाशक्तीचा विकास करणे, तिचे नियंत्रण करून आत्मविकासाच्या कामी तिचा विनियोग करण्याचे सामर्थ्य म्हणजे शिक्षण' – स्वामी विवेकानंद.

'The training by which the current and expression of 'will' are brought under control and become fruitful is called education' - Swami Vevekanand

**महात्मा गांधी –**

गांधीवादाने केवळ भारतच नव्हे तर पूर्ण विश्वाला मानवी बंधुत्वाचे शिकवण देणारे महात्मा गांधी यांनी सुद्धा मूलभत विचार मांडताना शिक्षणाचे ध्येय सांगितलेले आहे. 'आत्मा व मन यांचा परिपूर्ण विकास करून व्यक्तिमधील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती करणे हे शिक्षणाचे खरे ध्येय.' – महात्मा गांधी

'By education, I mean, drawing out of the best in man, body, mind and spirit. - M. Gandhi

विद्यार्थ्यांना नापास करण्याचे काम विद्यालयात केले जाते. त्यामुळे विद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याच संदर्भात आपण विचार करूया –

**प्लेटोपासून विनोबा भावेपर्यंत ज्या तत्त्ववेत्त्यांनी शिक्षणविषयक विचार मांडले त्याचे ढोबळ मानाने सार काढले तर ते असे असेल. 'इंद्रियाधिष्ठित अनुभवातून नैसर्गिक विकास' ही विद्यार्थी पातळीवरील प्रक्रिया आणि या विकासाला गती मिळावी असे पोषक वातावरण निर्माण करणे आणि गतीतील अडथळ्यांना दूर करणे ही शिक्षक पातळीवरील प्रक्रिया आहे.**

सध्याची शिक्षणपद्धती बघता या दोन पातळ्यांमध्ये खूप अंतर आहे असे लक्षात येते. विद्यार्थ्यांच्या पातळीवर येऊन त्यांच्या अनुभवविश्वाशी तादात्म्य पावून मग त्यांना पोषक वातावरण देणे आणि त्यातील अडथळे दूर करणे ही प्रक्रिया 'शिक्षक' पातळीवर किती प्रमाणात आणि किती टक्के होत आहे. याची कुठेही नोंद नाही - सध्याच्या शिक्षणप्रणालीत जॉन कॉमेनिअसने ग्रथीत केल्याप्रमाणे 'सोप्याकडून काठिण्याकडे' या सूत्रानुसार वेगवेगळ्या वर्गासाठी वेगवेगळे अभ्यासक्रम आपण तयार केलेले आहेत. तसेच काही कौशल्ये निर्धारित केली आहेत. विद्यार्थ्यांनी ती कौशल्ये आत्मसात नाही केली किंवा अभ्यासक्रमात तो कमी पडला की आपण त्याला नापास करतो -

मूल्यमापनाची ही पद्धत अभिव्यक्तीवर अवलंबून असते. शिक्षणाचा मूळ गाभा आहे. 'इंद्रियाधिष्ठित अनुभव' पण हा अनुभव, अभिव्यक्तीत रूपांतरीत झाल्याशिवाय आपण मूल्यमापन करूच शकत नाही. आणि प्रत्येक विद्यार्थी हा अभिव्यक्तीत कौशल्यपूर्ण असेलच असे नाही. पण याचा अर्थ तो अनुभव घेऊन समृद्ध झाला नाही असाही होत नाही. दुसरीकडे एखादा विद्यार्थी अनुभव घेण्यात कमी असला तरी अभिव्यक्तीत सरस असेल तो मूल्यमापनात श्रेष्ठ ठरतो. इथेच विद्यार्थी आणि परीक्षार्थी असे दोन प्रवाह दिसतात. आणि अभिव्यक्तिधिष्ठित मूल्यमापनाचे मापदंड थिटे पडतात - अभिव्यक्ती तंत्राला महत्त्व प्राप्त होते आणि ज्ञानापासून तो कोसो दूर जाण्याची शक्यता निर्माण होते.

**मूल्यमापन फक्त विद्यार्थ्यांचेच का ?**

विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धती आपण अवलंबिलेली आहे. यात विद्यार्थ्यांना अनुभव घेताना पोषक वातावरण निर्माण करणे आणि या प्रक्रियेतील अडथळे दूर करणे हे शिक्षकाचं काम आहे. (अध्ययन आणि अध्यापन असे शब्द हेतूपुरस्सर टाळले आहेत. कारण अनेक शिक्षण तज्ज्ञांनी त्यावर आक्षेप घेतलेला आहे.) विद्यार्थ्यांसाठी अभिव्यक्तीवर आधारित मूल्यमापन पद्धती अस्तित्वात आहे. पण शिक्षकांसाठी मूल्यमापनपद्धती अस्तित्वात नाही. म्हणजे जो घटक ज्ञान देण्याचं किंवा पोषक वातावरण तयार करण्याचं कार्य करतो त्याचं मूल्यमापन होत नाही - हा शिक्षक घटक योग्य ते ज्ञान देणे किंवा योग्य ते पोषक वातावरण निर्माण करणे हे कार्य प्रामाणिकपणे आणि पूर्ण क्षमतेने करतो हे गृहितक आहे. पण आपण हे विसरतो की या ज्ञान देण्यावर किंवा पोषक वातावरणावरच विद्यार्थ्यांचं अनुभव घेणे अवलंबून आहे. मग या शिक्षकांचे मूल्यमापन न करता विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्याचा नैतिक अधिकार आपल्याला आहे का ? एकीकडे बालक केंद्री शिक्षणप्रणाली असे आपण म्हणतो पण प्रत्यक्षात मात्र ती शिक्षककेंद्री नाही का ?

म्हणूनच फक्त अभिव्यक्तीधिष्ठित मूल्यमापन पद्धती आणि शिक्षकांचे न होणारे मूल्यमापन या दोन महत्त्वपूर्ण मुद्द्यांच्या आधारे असे म्हणता येईल की, विद्यार्थ्यांना नापास करण्याचा आपल्याला नैतिक अधिकारच नाही. त्यामुळे त्यांना नापासच करू नये.

**आकलनक्षमता -**

दुसरा महत्त्वपूर्ण भाग असा की, प्रत्येक विद्यार्थी हा अनुभव घेतच असतो. पण प्रत्येक विद्यार्थ्यांची आकलनक्षमता

लक्षात न घेता अभ्यासक्रम ठरवलेला असल्यामुळे सरसकट एकच फूटपट्टी सगळ्यांना लागू करणे हे अन्यायकारक आहे. याही मुद्द्याच्या आधारे विद्यार्थ्याला नापास करण्याचा नैतिक अधिकार आपण गमावलेला आहे.

मन या संकल्पनेबद्दल अनेकांनी अनेक प्रकारे लिहून ठेवलेले आहे. मन चंचल आहे हे निश्चित. चंचलपणा ही मनाची प्रकृती नव्हे. मन हे मुळात सत्वगुणात्मक आहे. चंचलपणा रजोगुणामुळे येतो व तो मनाचा दोष आहे. म्हणून प्रत्येकाने साधनेने, निष्ठेने तो काढून टाकणे शक्य आहे. - समर्थ रामदास.

बालकाच्याही मनाची अवस्था चंचल असतेच पण ती चंचलता जिज्ञासा, चिकित्सक वृत्ती यातून निर्माण होते. आणि त्यांच्या या शोधक वृत्तीला योग्य खतपाणी आणि योग्य दिशा दिली नाही तर तो पुढे चालून दोष निर्माण होऊ शकतो. तसेच ताणतणाव हे सुद्धा लहानपणापासून असतातच आणि त्याचं व्यवस्थापनसुद्धा मुलं करतच असतात. त्यात त्यांना साथ मिळते ती मोठ्या व्यक्तींच्या आचरणाच्या निरीक्षणातून आणि या ताणतणावांना तोंड देण्याची त्यांची भावनिक आणि मानसिक शक्ती दृढ होते.

**या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना नापास केल्यामुळे जे दूरगामी दुष्परिणाम होतात हे आपण बघूया.**

१) विद्यार्थ्यांच्या आकलनाच्या पातळीवर किंवा अनुभव घेण्याच्या पातळीवर जाऊन आपण अध्यापन करतोच असे नाही. कारण प्रत्येक विद्यार्थ्याची ही क्षमता भिन्न असते. आणि शिक्षक एकाच वेळेस किमान ४० मुलांना शिकवत असतात. अशा परिस्थितीत त्यांना नापास केले तर शाळेत विद्यार्थी आणि शिक्षक तसंच घरात पाल्य आणि पालक यांच्यात विद्यार्थ्यांच्या मुलांच्या पातळीवर एक सूक्ष्म दरी निर्माण होतो. जी कालांतराने वाढण्याचा धोका असतो आणि अशी दरी असणे हे कुटुंबासाठी, समाजासाठी आणि राष्ट्रासाठी कदापीही योग्य नाही. म्हणूनच विद्यार्थ्यांना नापासच करू नये

२) अभिव्यक्तिधिष्ठित मूल्यमापनाच्या पातळीवर मुलांना नापास केले तर ज्ञान मिळविण्याची सहज सुलभ नैसर्गिक इच्छा कमी होते - नाहीशी होते. या पद्धतीने जर आपण परीक्षा घेतली तर विद्यार्थ्यांचे पूर्ण वर्ष वाया जाणार नाही आणि त्यामुळे शिक्षण हे उपयुक्ततेवर आधारित असेल नव्हे की केवळ तत्त्वप्रणालीवर. ज्यांना आपण राष्ट्राचे आधारस्तंभ मानतो त्या विद्यार्थ्यांच्या मनात प्राथमिक पातळीवरच अशी नकारात्मक भावना निर्माण होणे हे कुठल्याही राष्ट्राच्या हिताचे नाही.

३) मूल लहान असले तरी त्यालाही ताणतणाव असतातच असं अनेकानेक बालमानसशास्त्रज्ञांनी सांगितलेले आहे. त्या ताणांचं व्यवस्थापन करण्याची त्यांची क्षमताही असते. पण विद्यार्थ्याला नापास केल्यानंतर निर्माण होणारे ताण हे व्यवस्थित हाताळले गेले नाही तर दुर्दैवाने नैराश्य ते आत्महत्या असा प्रवास होऊ शकतो. आणि अनेक ठिकाणी झाल्याचेही निदर्शनास आले आहे. आपली भविष्यातील पिढी शारीरिक, बौद्धिक, मानसिक आणि भावनिक पातळीवर सुदृढ असावी असं वाटत असेल तर विद्यार्थ्यांना नापास करू नये.

अर्थात हे पथ्य मुलांच्या १४-१५ वर्षांपर्यंत सांभाळणे आवश्यक आहे. त्यानंतरच्या वयात मानसिक दरी निर्माण होण्याची, नकारात्मक भावना निर्माण होण्याची शक्यता कमी असते. आणि ताणतणावाला तोंड देण्याची भावनिक क्षमता वाढलेली असते.

या परिस्थितीत शिक्षकांची भूमिका कशी असावी हे समर्थ रामदासांच्या शब्दात सांगता येईल.

जया वर्णिती वेदशास्त्रे पुराणे ।
जयाचेनि योगे समाधान बाणे ।।
तयालागि हे सर्व चांचल्य दीजे ।
मनासज्जना राघवी वस्तिकीजे ।। (मनाचे श्लोक - ३९)

या श्लोकातील प्रभुरामचंद्राचा उल्लेख टाळून आपल्याला असं म्हणता येईल की, 'सर्व चांचल्य दीजे' मुलांच्या मनाचे चांचल्य योग्य दिशेने वळवण्यासाठी शिक्षकांची निष्ठा, साधना आणि कृतीतील सातत्य आवश्यक आहे. शिक्षकांनी हे साध्य केले तर विद्यार्थी उन्नत होतो.

माझ्या अध्यापन आयुष्यातील अनेक अनुभवांपैकी काही अनुभव/प्रयोग मी येथे संक्षिप्तमध्ये प्रस्तुत करत आहे.

### १) प्रयोग क्रमांक १

पार्श्वभूमी - वर्ष १९९५-१९९६, इयत्ता ८वी चा विद्यार्थी, वडील वैद्यकीय व्यवसायातील तज्ज्ञ, आई गृहिणी, दोन मुलींनंतर झालेला मुलगा, थोडासा लाडावलेला, आईवडिलांना दुरुत्तरे करण्याची सवय लागली, घरी सगळे अस्वस्थ, पालकांनी विनंती केली तुम्ही जरा सांगून बघा, तुमचं ऐकेल.

### निरीक्षण

मुलाचे लाड जास्त झाले होते असे वाटते (कारण त्याच्या डब्यातील वेगवेगळे पदार्थ), त्याला शिक्षणाबद्दल अनास्था व खोड्या, खेळ, टीव्ही यांचं आकर्षण, परिणामत: साधारण गुण, अनेक विषय कच्चे, त्यामुळे आत्मविश्वासाची कमी. म्हणून इतरांवर राग काढणे, खोड्या करणे.

### प्रत्यक्ष प्रयोग

समुपदेशनाद्वारे विद्यार्थ्याला विश्वासात घेतले - त्याचा विश्वास प्राप्त केला. डब्यातील पदार्थांत बदल केला - फक्त भाजी पोळी आणि पहिला घास मी (शिक्षक) खाणार आणि भाजी-पोळी नसेल तर मी त्या दिवशी स्वत:चा डबा खाणार नाही अशी प्रेमाची सूचना दिली. माझा धाक असेल म्हणून किंवा आदर असेल म्हणून त्याने वर्षभर ती सूचना पाळली व नंतर त्याला सवय झाली व माझ्या उपवासाच्या दिवशी तो उपवासाचा डबा देखील घेऊन यायला लागला.

त्याची बसण्याची जागा बदलली. आजूबाजूचे विद्यार्थी त्याच्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे होते. त्याची सोबत त्यांना दिली व येणाऱ्या प्रत्येक शंकाचं केव्हाही निरसन करण्याची मुभा दिली व त्याच्या शंकांचे व प्रत्येक समस्यांचे निरसन केले तसेच आत्मविश्वास वाढीसाठी त्याला ज्या विषयात रस आहे असे जाणवले अशा अभ्यासोत्तर उपक्रमात त्याचा सहभाग यशस्वी होईल अशा व्यक्तिश: तयारी करून घेतली.

या तीन गोष्टी मी केल्या. एकाच शैक्षणिक वर्षात त्याचा आत्मविश्वास इतका वाढला की मूल्यांकनाच्या भाषेत तो ३० टक्क्यांवरून ६५ टक्क्यांपर्यंत पाहोचला. त्यानंतर मला त्याच्याकडे वैयक्तिक लक्ष द्यावे लागले नाही. आज हा विद्यार्थी डेंटलमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन करून स्वतंत्र प्रॅक्टिस करत आहे.

## २) प्रयोग क्र. २

वर्ष २००५, विद्यार्थीनी - इयत्ता ९वी, वडील व आई अभियांत्रिकी क्षेत्रातील पदवीधर व व्यावसायिक व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्राप्त, आजी निवृत्त प्राध्यापिका अशा भक्कम शैक्षणिक पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातील ती एकुलती एक मुलगी अभ्यासात जेमतेम. आईची काळजी, दहावी तरी होईल का ? साधी पदवीधर झाली तरी चालेल.

### निरीक्षण

मुलीच्या वहीत रेखाटने आढळली. तिचा कल चित्र आणि फॅशन डिझायनिंगकडे जाणवला पण घरून अभ्यासाची सक्ती त्यामुळे मानसिक दबाव व हमखास परीक्षेत आत्मविश्वास जाऊन कमी गुण.

### प्रत्यक्ष प्रयोग

आईला बोलावून तिचा छंद सांगितला, तो छंद जोपासून तिला प्रोत्साहन द्यायला सांगितले. क्रमिक अभ्यासाची सक्ती न करता तिच्यातील इतर गुणांना प्रोत्साहन देऊन तिचे सुप्त गुण विकसित होतील या दृष्टीने प्रयत्न केला. शाळेच्या स्नेहसंमेलनामध्ये विद्यार्थ्यांचे पोशाख डिझाईन करण्याचे काम व रंगमंचावरील देखाव्याच्या निर्मितीचे काम तिने उत्कृष्टरीत्या करून दाखवले. मनासारखे करू दिल्यामुळे तिची अभ्यासातीलही रुची वाढली व ५५ ते ६०% पर्यंत वाढ झाली. दहावी पास झाल्यावर शिष्यवृत्ती मिळवून ती एक वर्षासाठी पॅरिसला गेली. भारतात परत येऊन पदवी मिळवली. आज ती परदेशात व्यावसायिक शिक्षण घेत आहे.

उपरोक्त दोन प्रयोगात विद्यार्थ्यांच्या पातळीवर जाऊन त्यांना समजून घेणे, त्यांच्यातील आत्मविश्वास जागा करणे, पोषक वातावरण उपलब्ध करून देणे, त्यांची आवड कल लक्षात घेऊन प्रोत्साहन दिले तर क्रमिक अभ्यासातला उत्साह वाढतो. एवढे केले तरीही स्वयंविकासाचा वेग निश्चित वाढतो. निसर्गत: जीवसृष्टीचा मूलभूत नियम आहे विकास. त्याला रोखण्याचा आपल्याला अधिकार नाही. रोपटे लहान असते तेव्हा त्याला काही काळच पाणी द्यावे लागते. मोठे झाल्यावर त्याची मुळे आपोआप भूगर्भातील पाणी शोधतात आणि ओढून घेतात व संपृक्त होऊन त्याचे वृक्षात रूपांतर होते. रोपटे असतानाच त्याच्या मुळ्या आपण छाटू लागलो तर ते वृक्ष न होता वामनवृक्ष म्हणजेच बोन्साय होतात. विद्यार्थ्यांना नापास करून आपण त्यांचे बोन्साय करणार आहोत का ? निश्चितच नाही.

आणि म्हणूनच शासनाने २०१०-२०११ पासून इ. १ली ते ८वी पर्यंत 'सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धत' लागू करण्याची आदेश दिले आहेत. समाजहित, राष्ट्रहित आणि बालकाचे मूलभूत हक्क या सर्वांचा सामाजिक, मानसशास्त्रीय अभ्यास करून शासनाने ही मूल्यमापन कार्यपद्धती निर्देशित केली आहे. पारंपरिक संकलित मूल्यमापनाचे प्रमाण कमी करून आकारिक मूल्यमापनावर भर दिला आहे. ज्यायोगे विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौद्धिक आणि भावनिक विकास होऊन त्यांचे व्यक्तिमत्त्व आकाराला येईल.

एकूणच कुटुंबाच्या, समाजाच्या, राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विचार केल्यास हेच योग्य आहे की विद्यार्थ्यांना नापासच करू नये. अशी आपण शपथ घेऊया.

*****

# नोबेल सन्मान भाषण : कैलाश सत्यार्थी

***ओस्लो, १० डिसेंबर, २०१४***

*नोबेल प्राइज् समारंभ प्रसंगी केलेल्या भाषणाचा स्वैर मराठी अनुवाद*

डॉ. व्ही. टी. पाटील
महात्मा ज्योतिबा फुले उच्च माध्य. प्रशाला,
कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर
संपर्क : ९९६०९०५५९८



**श्री. कैलाश सत्यार्थी**

**माझ्या जीवनाचे एकमेव ध्येय म्हणजे, प्रत्येक मूल, मूल म्हणून मुक्त असेल, स्वत:ची वाढ व विकास करण्यास स्वतंत्रच असेल, खाणे, झोपणे व सूर्यप्रकाश बघण्याचे स्वातंत्र्य असेल, हसण्या आणि रडण्याची मुभा असेल, खेळण्याचे स्वातंत्र्य असेल, शाळेत जाण्याचे, शिकण्याचे व स्वप्न पाहण्याचे प्रत्येक मुलाला स्वातंत्र्य असेल.**

जगभरातील माझ्या प्रिय मुलांनो, सन्माननीय राजे/राणी साहेब, राजघराण्यातील उच्चपदस्थ, सनदी अधिकारी, नार्वेच्या नोबेल समितीचे सन्माननीय सदस्य, प्रिय बंधू टॉम हारकिन, बंधू-भगिनी आणि माझी प्रिय कन्या मलाला, शांतता आणि मानवतेच्या या पवित्र व्यासपीठावरून प्राचीन वेदातील पवित्र मंत्रांचा उच्चार करताना मला खूप सन्मानित झाल्याचे वाटत आहे. या मंत्रांमध्ये एक अशी प्रार्थना, आकांक्षा आणि संकल्प आहे की, ज्यात संपूर्ण मानवनिर्मित समस्यांपासून मुक्ती देण्याचे सामर्थ्य आहे.

आपण एकत्र येऊन वाटचाल करूया. वैश्विक प्रगतीच्या आपल्या या वाटचालीत जगातल्या पूर्व-पश्चिम, दक्षिण-उत्तर अशा प्रत्येक कानाकोपऱ्यातील कोणीही आपल्यापासून मागे राहू नये किंवा दुरावला जाऊ नये. आपण एकत्र येऊन संवाद साधूया. मनाने एकत्र येऊन चिंतन करूया. आपल्या पूर्वजांच्या अनुभवातून शिकवण घेऊन सर्वांचे कल्याण होईल अशा ज्ञानाची नवनिर्मिती करूया.

मी, माझे स्वर्गवासी आई-वडील, माझी मातृभूमी भारतमाता आणि पृथ्वीमातेस नतमस्तक अभिवादन करतो. मी अशा हजारो मुला-मुलींचे मनापासून स्मरण करतो की ज्यांची गुलामगिरीतून मुक्तता करता असताना मी स्वत:च मुक्त होत राहिलो. त्यांच्या सुंदर चेहऱ्यावरील मुक्ततेच्या पहिल्याच स्मितहास्यात, मी परमेश्वराचे स्मितहास्य पाहिले.

माझ्या आंदोलनातील भारतातील कालू कुमार, धुमदास व आदर्श किशोर आणि पाकिस्तानातील युवक इकबाल मसीह यांना मी माझ्या या सन्मानाचे सर्वाधिक श्रेय देतो. कारण मुलांचे स्वातंत्र्य व प्रतिष्ठा अबाधित राखण्यासाठी त्यांनी अद्‌वितीय त्याग केलेला आहे. असे हे हुतात्मे, जगभरातील माझे सहकारी कार्यकर्ते आणि माझ्या देशबांधवांच्या वतीने मी विनम्रपणे हा पुरस्कार स्वीकारत आहे.

भगवान बुद्‌ध, गुरुनानक आणि महात्मा गांधी यांची पवित्र धरती भारतापासून नॉर्वेपर्यंतचा माझा हा जीवनप्रवास प्राचीन तसेच अर्वाचीन वैश्विक शांतता व बंधूभाव यांना एकत्र जोडणारा दुवा आहे.

मित्रहो, नोबेल समितीने, उदार अंत:करणाने मला येथे व्याख्यान देण्यासाठी निमंत्रित केले. परंतु मी आदरपूर्वक नमूद करतो की मी ते करू शकत नाही. याठिकाणी मी निरव शांततेच्या हुंकाराचा, निष्पापतेच्या रुदनाचा आणि काळोखाच्या चेहऱ्याचा प्रतिनिधी आहे. येथे मी आपल्या मुलांच्या आवाजात आणि स्वप्नामध्ये सहभागी होण्यासाठी आलो आहे. कारण ती सर्व आपलीच मुले आहेत.

मित्रहो, मी मुलांच्या भयग्रस्त आणि निस्तेज डोळ्यात डोकावून पाहिले आहे आणि त्यांचे ज्वलंत प्रश्न ऐकलेले आहेत. वीस वर्षांपूर्वी, हिमालय पर्वताच्या पायथ्याशी मी एका लहान दुर्बल शरीराच्या एका मुलाला भेटलो होतो. त्याने मला विचारले, ''जबरदस्तीने माझ्या हातात हत्यार किंवा बंदूक लादण्याऐवजी एखादे खेळणे किंवा पुस्तक माझ्या हातात न देण्याएवढे जगातील लोक गरीब आहे काय?''

लष्करी प्रशिक्षण घेतलेल्या अतिरेक्यांनी अपहरण करून जबरदस्तीने अतिरेकी बनविलेल्या सुदानमधील एका बालअतिरेक्याला मी भेटलो. प्रशिक्षणाच्या सुरुवातीलाच त्याला त्याच्या आईवडिलांना व मित्रांना जबरदस्तीने ठार मारायला लावले होते. त्याने मला विचारले, ''यात माझा काय दोष ?''

वीस वर्षांपूर्वी अतिरेक्यांनी अपहरण करून बंदिवासात ठेवलेल्या व त्यांच्या बलात्काराची शिकार झालेल्या एका कुमारी मातेशी, कोलंबियाच्या रस्त्यावर माझी भेट झाली. तिने मला विचारले, ''मी जीवनाचे कधीच कोणतेही सुंदर स्वप्न पाहिले नाही, पण माझ्या बाळाला एखादे सुंदर स्वप्न पाहता येईल काय ?''

आपल्या मुलांना स्वप्न बघणेसुद्धा नाकारणे याशिवाय दुसरी खडतर हिंसा खचितच नाही. मुलांची स्वप्ने मोडणे ही एक प्रकारची हिंसाच. माझ्या जीवनाचे एकमेव ध्येय म्हणजे, प्रत्येक मूल, मूल म्हणून मुक्त असेल, स्वत:ची वाढ व विकास करण्यास स्वतंत्रच असेल, खाणे, झोपणे व सूर्यप्रकाश बघण्याचे स्वातंत्र्य असेल, हसण्या आणि रडण्याची मुभा असेल, खेळण्याचे स्वातंत्र्य असेल, शाळेत जाण्याचे, शिकण्याचे व स्वप्न पाहण्याचे प्रत्येक मुलाला स्वातंत्र्य असेल.

सर्व महान धर्म आपणास लहान बालकांची काळजी घेण्यास सांगतात, भगवान येशू ख्रिस्त म्हणतात, ''मुलांना माझ्यापाशी येऊद्या. त्यांना अडवू नका. कारण देवाचे साम्राज्य त्या मुलांसाठी आहे. पवित्र कुराण ग्रंथात म्हटले आहे, दारिद्र्यामुळे तुम्ही तुमच्या मुलांना ठार मारू नका.'' मला ही गोष्ट मान्य नाही की कोणत्याही मंदिरात, मशिदीत, चर्चमध्ये किंवा प्रार्थनास्थळात मुलांच्या स्वप्नांसाठी स्थान नाही. जगातील लोक फार गरीब आहेत ही गोष्ट मला मान्य नाही.

जगातील लष्करावरील एका आठवड्याच्या खर्चाची रक्कम जरी वाचविली तरी त्या रकमेत जगातल्या सर्व मुलांना शाळेत जाऊन शिकता येईल. सर्व कायदे, राज्यघटना, सर्व न्यायाधीश व पोलीस आपल्या मुलांना संरक्षण देऊ शकत नाहीत ही गोष्ट मला मान्य नाही. स्वातंत्र्य मिळविण्यापेक्षा गुलामगिरीच्या शृंखला अधिक बळकट असतात ही गोष्ट मला मान्य नाही. ह्या सर्व गोष्टी मला अमान्य आहेत.

अन्याय्य गोष्टींचा प्रतिकार करणाऱ्या अनेक निडर व्यक्तिंबरोबर काम करण्याची भाग्य मला लाभले आहे. कोणतीही धमकी आणि अतिरेकी हल्ल्याला आम्ही शरण गेलो नाहीत आणि कदापिही शरण जाणार नाहीत. नि:संशयपणे मागील दोन दशकात नक्कीच प्रगती झालेली आहे. शालाबाह्य मुलांची संख्या निम्म्याने कमी झाली आहे. बालमृत्युचेआणि कुपोषणाचे प्रमाण कमी झालेले आहे. लक्षावधी बालमृत्यू टाळले गेले आहेत. जगातील बालमजुरांची संख्या १/३ कमी झाली आहे. कुठलीही चूक करू नका. मोठी आव्हाने अजूनही उभी ठाकली आहेत.

मित्रहो, मानवतेचा दरवाजा ठोठावणारी सर्वात मोठी समस्या म्हणजे असहिष्णूता. आपल्या मुलांना शिक्षण देण्यात आपण पूर्णपणे अपयशी ठरलो आहोत. शिक्षणच आपल्या मुलांच्या जीवनाला अर्थ आणि ध्येय तसेच सुरक्षित भवितव्य देऊ शकते. शिक्षणच केवळ युवकांमध्ये वैश्विक बंधुत्वाची भावना निर्माण करू शकते. मला भीती या गोष्टीची आहे की तो दिवस

फार दूर नाही. जेव्हा या अपयशाचा एकत्रित परिणाम बेलगाम हिंसाचारात होईल आणि ती गोष्ट मानवजातीला आत्मघातकी ठरेल.

तथापि, मलालासारखे युवक व युवती सर्वदूर तयार होत आहेत आणि हिंसेऐवजी शांतता, अतिरेकी वृत्तीपेक्षा सहिष्णुता आणि भीतीऐवजी साहसाची निवड करीत आहे. समस्येवरील उपाय केवळ दूरवर भरविलेल्या परिषदातील चर्चांमध्ये किंवा केलेल्या सूचनांमध्येच सापडतात असे नाही तर ते लहान गट, स्थानिक संघटना व व्यक्तिंमध्येच दडलेले असतात. कारण त्यांना दररोज त्या समस्यांना तोंड द्यावे लागते. जरी हे सर्वजण जगाला अनोळखी अथवा बेदखल असले तरी.

अठरा वर्षांपूर्वी, १०३ देशातील लक्षावधी बंधू व भगिनींनी ८०००० चौरस किलोमीटर परिसरात लढा दिला आणि बालमजुरी प्रतिबंधक नवा आंतरराष्ट्रीय कायदा अस्तित्वात आणला. आपण हे काम केलेले आहे.

एक व्यक्ती काय करू शकेल असे आपण सहज विचाराल, मला आठवलेली माझ्या बालपणीची एक गोष्ट मी तुम्हाला सांगतो. एकदा एका जंगलात भयानक आग लागली. जंगलाचा राजा सिंहासहित सर्व प्राणी पळून जाऊ लागले. अचानक एक चिमुकला पक्षी आगीकडे झेपावताना सिंहाने पाहिला आणि त्याला विचारले, ''तू काय करीत आहेस?'' सिंहाला आश्चर्यात टाकणारे उत्तर पक्षाने दिले, ''आग विझविण्यासाठी मी जात आहे'', सिंह हसला आणि म्हणाला, ''तुझ्या चोचीतल्या केवळ एका थेंबभर पाण्याने तू आग कशी काय विझविणार ?'' तो पक्षी ठामपणे म्हणाला, ''पण मी माझ्या कुवतीएवढे योगदान देतो आहे.''

आपण आणि मी गतिमान जागतिकीकरणाच्या युगात राहतो आहोत. अतिवेगवान इंटरनेटने आपण जोडलेलो आहोत. एकाच जागतिक बाजारातील वस्तू आणि सेवांची आदानप्रदान करतो. दररोज हजारो विमान उड्डाणांनी आपण जगातल्या कानाकोपऱ्यात पोहोचतो. परंतु तेथेच एक गंभीर असा दुरावा आहे. तो म्हणजे आपल्यातील जिव्हाळ्याचा अभाव. वैयक्तिक प्रेम व जिव्हाळा यांचा प्रसार आपण वैश्विक आंदोलनात करूया. आपण करुणेचे वैश्विकीकरण करूया. केवळ निष्क्रिय करुणा नव्हे तर परिवर्तनात्मक करुणा की जी आपणास न्याय, समता व स्वातंत्र्याकडे नेईल. महात्मा गांधीजी नेहमी म्हणत, ''जर आपणास जगाला खऱ्या शांततेची शिकवण द्यायची असेल तर आपणास मुलांपासूनच सुरुवात करायला हवी.'' मी विनम्रपणे त्यात भर घालू इच्छितो की आपण मुलांविषयीच्या करुणेद्वारा जग एकात्म करूया. फुटबॉल बनविताना त्याला टाके घालणारे, परंतु कधीही तो खेळ न खेळणारी मुले कोणाची आहेत ? ती आपली मुले आहेत. खाणीतील दगड व खनिजे खोदणारी मुले कोणाची आहेत ? ती आपली मुले आहेत. कोकोची चव देखील न चाखणारी परंतु कोकोचे पिक काढण्यास मदत करणारी मुले कोणाची आहेत? ती मुले आपली आहेत.

भारतातील चक्रवाढ व्याजाने वाढणारे कर्ज व वेठबिगारीच्या रूपात सैतानाने जन्म घेतला होता. वेठबिगारीतून नुकतीच सुटका झालेल्या, माझ्या गाडीत बसलेल्या एका आठ वर्षे वयाच्या मुलीने मला विचारले, ''माझ्या मुक्ततेसाठी आपण याआधीच आला नाहीत ?'' तिच्या त्या संतप्त प्रश्नाने अजूनही माझा थरकाप होतो. जगाला हादरवून सोडणारी शक्ती त्या प्रश्नात आहे. तिचा तो प्रश्न आपणा सर्वांसाठी आहे. आम्ही आधी लवकर का पोहोचलो नाहीत ? आपण कशाची प्रतिक्षा करीत आहोत? या मुलांची मुक्तता न करता किती सैतानांना आपण अभय देणार ? आपण अजून किती मुलींचे अपहरण होऊ देणार, त्यांना अंधारकोठडीत डांबू देणार व किती मुलींवर अत्याचार होऊ देणार ? सैतानांप्रमाणेच जगभरातील मुले आपणास आपल्या निष्क्रियतेबद्दल जाब विचारत आहेत आणि आपल्या कृतींवर नजर ठेवून आहेत.

आपणास तातडीने सामूहिक कृती करण्याची गरज आहे. प्रत्येक मिनिट महत्त्वाचे आहे. प्रत्येक मूल महत्त्वाचे आहे. प्रत्येक बालपण महत्त्वाचे आहे. आपल्या मुलांना वेढणाऱ्या निष्क्रियता व निराशावादाला माझे आव्हान आहे. मूग गिळून बसण्याच्या आणि तटस्थतेच्या संस्कृतीला माझे आव्हान आहे. सर्व शासकीय, निमशासकीय संस्थांना सर्व व्यावसायिकांना,

धार्मिक नेत्यांना, सर्व नागरिकांना आणि आपणा प्रत्येकाला मी मुलांवर होत असलेल्या सर्व प्रकारच्या हिंसेचा/छळाचा नायनाट करण्यासाठी विनम्र आवाहन करीत आहे. गुलामगिरी, मुलांशी केलेली बेकायदेशीर वर्तणूक, बालविवाह, बालमजुरी, लैंगिक अत्याचार आणि निरक्षरता यांना आपल्या सभय समाजात अजिबात स्थान उरणार नाही.

मित्रहो, आपण ही गोष्ट करू शकतो. शासनाने मुलांच्या सोईची धोरणे बनविली पाहिजेत आणि युवकांच्या शिक्षणात गुंतवणूक केली पाहिजे. नावीन्यपूर्ण भागिदारीसाठी व्यापार, मुक्त पाहिजे व अधिक जबाबदारीयुक्त असला पाहिजे. आंतरशासकीय संस्थांनी एकत्र येऊन धडक वेगवान कृतिकार्यक्रम कार्यान्वित केला पाहिजे. वैश्विक नागरी समाज पारंपरिक व्यापार उदिम व विस्कळीत बाबींपेक्षा अधिक उन्नत झाला पाहिजे. धार्मिक नेते आणि संस्था आणि आपण सर्वजण ठामपणे मुलांच्या पाठीशी उभे ठाकले पाहिजे.

आपण धाडशी व महत्त्वाकांक्षी बनले पाहिजे. त्यासाठी आपल्यात दृढ इच्छाशक्ती हवी. आपण दिलेली वचने पाळली पाहिजेत. पन्नास वर्षांपूर्वी, शाळेच्या माझ्या पहिल्याच दिवशी, शाळेच्या प्रवेशद्वारापाशी बसलेल्या माझ्याच वयाच्या बुटपॉलीश करणाऱ्या एका मुलाशी माझी भेट झाली. मी माझ्या शिक्षकांना विचारले, ''तो मुलगा शाळेबाहेर का काम करीत आहे ? तो माझ्या बरोबर शाळेत का येत नाही ? परंतु त्याच्याकडे उत्तर नव्हते. एके दिवशी धाडसानेच मी त्या मुलाच्या वडिलांना विचारले, ते म्हणाले, बाळ, मी त्याविषयी विचारच केला नाही. आम्ही काम करण्यासाठीच जन्मलो आहोत.'' उत्तर ऐकून मी उद्‌विग्न झालो. त्यांचा मला आजही राग येतो. पण त्यावेळी मी त्या गोष्टीचा जाब विचारला आणि आजदेखील मी त्या गोष्टीला आव्हान देतो.

लहानपणी मला 'उद्या' चा विचार होता. तो मुलगा तेव्हा माझ्यासोबत माझ्या वर्गात शिकत होता. तो तेव्हाचा उद्या आता आज बनला आहे. आणि तुम्ही उद्या बनला आहात. आज प्रत्येक मुलाला जीवन जगण्याचा, स्वातंत्र्याचा उत्तम आरोग्यसंपादनाचा, शिक्षणाचा, सुरक्षिततेचा, प्रतिष्ठेचा, समानतेचा आणि शांततेचा हक्क आहे. आज अंधाराच्या दूर पलीकडे, लुकलुकणाऱ्या ताऱ्यांमध्ये मला आपल्या मुलांचे हसरे चेहरे दिसतात. आज, प्रत्येक महासागराच्या प्रत्येक उसळत्या लाटेबरोबर मला आपली मुले खेळताना, नृत्य करताना दिसतात. आज प्रत्येक रोपात, झाडात आणि पर्वतात, माझ्या वर्गात, माझ्यासोबत बसलेला तो मुलगा मला दिसतो. हा आज तुमच्या जाणिवेत आलेला मला पहायचा आहे. माझ्या प्रिय भगिनी आणि बंधूंनो, तुम्ही तुमचे डोळे बंद करून क्षणभर तुमचे हात तुमच्या हृदयावर ठेवाल काय ? तुमच्यामध्ये दडलेले एक लहान बालक तुम्हाला जाणवते काय ? त्या बालकाचे लक्षपूर्वक ऐका. तुम्ही ही गोष्ट नक्कीच करू शकता.

आज मी पाहतो की हजारो महात्मा गांधी, मार्टिन ल्युथर किंग आणि नेल्सन मंडेला मुलांसाठी लढा देत पुढील वाटचाल करीत आहेत आणि आपणा सर्वांना त्यांच्यात सहभागी होण्यासाठी हाक मारीत आहेत. अनेक मुले-मुली त्यांच्याबरोबर सहभागी झाले आहेत. मी सुद्धा त्यांच्यात सामील झालो आहे. मला वाटते तुम्ही सुद्धा त्यात सहभागी व्हायला हवे. आपण ज्ञान लोकशाहीयुक्त करूया. आपण न्यायाला वैश्विक बनवूया. आपण एकत्र येऊन, आपल्या मुलांसाठी करुणेला वैश्विक करूया. मी ह्या दालनात, आपणास आणि जगभरातील लोकांना विनम्र आवाहन करीत आहे. छळापासून शिक्षणाकडे, दारिद्र्यापासून सामुदायिक प्रगतीकडे, गुलामगिरीपासून स्वातंत्र्याकडे आणि हिंसाचारापासून शांततेकडे मार्गक्रमण करण्याचे मी आवाहन करतो.

*तिमिरातून तेजाकडे जाऊया.*
*मर्त्याकडून अमर्त्याकडे वाटचाल करूया.*
*आपण पुढील मार्गक्रमण करूया.*

*****

# नोबेल सन्मान भाषण : युसूफझाई मलाला


**ओस्लो, १० डिसेंबर २०१४**

*नोबेल प्राइज् समारंभ प्रसंगी केलेल्या भाषणाचा स्वैर मराठी अनुवाद*

**डॉ. व्ही. टी. पाटील**

महात्मा ज्योतिबा फुले उच्च माध्य. प्रशाला,
कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर
संपर्क : ९९६०९०५५९८




**कु. युसूफझाई मलाला**

*प्रथमतः अत्यंत क्षमाशील व उपकारक परमेश्वराचे मी स्मरण करते. उपस्थित सन्माननीय राजे/राणी साहेब, राजघराण्यातील उच्च पदस्थ, नॉर्वेच्या नोबेल समितीचे सन्माननीय सदस्य व प्रिय भगिनी आणि बंधूंनो,*

*आजचा दिवस माझ्यासाठी खूप आनंददायी आहे. नोबेल समितीने ह्या बहुमोल पुरस्कारासाठी माझी निवड केली. त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. आपला सातत्यपूर्ण पाठींबा व प्रेमामुळे मी आपणा सर्वांची आभारी आहे. जगभरातील सर्वदूरवरून अद्यापही मला आपली पत्रे व शुभेच्छा संदेश येतात, त्याबद्दल मी आपली आभारी आहे. आपले कृपावंत व उत्तेजनपूर्वक शब्द मला बळ व प्रेरणा देतात.*

**‘मलाला’चा अर्थ जगातील सर्वात जास्त आनंदित मुलगी असा आहे.**

*माझ्यावरील असलेल्या निर्व्याज प्रेमाबद्दल मी माझ्या आई-वडिलांचे आभार मानते. माझे पंख न छाटता, मला माझ्या स्वेच्छेने आकाशात भरारी मारू देणाऱ्या माझ्या वडिलांची मी आभारी आहे. मी माझ्या आईचेही आभार मानते कारण तिने मला संयम बाळगण्याची व नेहमी खरे बोलण्याची प्रेरणा दिली. आणि हीच खरी इस्लामची शिकवण आहे. यावर आपला दृढ विश्वास आहे. मी आणखी आभारी आहे माझ्या अलौकिक गुरुजनांची ज्यांनी मला स्वतःवर विश्वास ठेवण्याची व धाडसी होण्याची प्रेरणा दिली. खरे पाहता, मला अभिमान आहे की हा पुरस्कार स्वीकारणारी मी पहिलीच पाकिस्तानी व सर्वात कमी वयाची विजेती आहे. त्याहीपेक्षा मला निश्चित खात्री आहे की अजूनही लहान भावंडांशी खोडकरपणे भांडणारी परंतु शांततेचे नोबेल पारितोषिक स्वीकारणारी मी पहिलीच मुलगी आहे. मला सर्वत्र शांतता हवी आहे आणि त्यासाठी माझे बंधू आणि मी अद्यापही अविरत लढा देत आहोत.*

*प्रदीर्घ काळापासून मुलांच्या हक्कांसाठी लढा देणाऱ्या कैलाश सत्यार्थी यांच्यासोबत हा पुरस्कार मिळाल्याचा मला सार्थ अभिमान आहे. माझ्या वयाच्याही दुप्पट इतकी वर्षे त्यांनी लढा दिलेला आहे. आम्ही एकत्र लढा देऊ शकतो याचा मला अभिमान आहे. आम्ही जगाला दर्शवू शकतो की एक भारतीय व एक पाकिस्तानी व्यक्ती एकत्रितपणे लढा देऊन मुलांचे हक्क मिळवून देण्याचे ध्येय साध्य करू शकतो.*

प्रिय बंधू आणि भगिनींनो, पाकिस्तानातील जोन ऑफ आर्क समजल्या जाणाऱ्या माईवांड येथील प्रेरणादायी मलालाई यांच्या नावावरून माझे नाव ठेवण्यात आले. मलालाई शब्दाचा अर्थ शोकमग्न किंवा दु:खी असा आहे. परंतु त्या शब्दाला आनंददायी करावे म्हणून माझे आजोबा मला नेहमीच 'मलाला' या नावाने हाक मारीत. 'मलाला'चा अर्थ जगातील सर्वात जास्त आनंदित मुलगी असा आहे. आणि आज मला आनंद होतो आहे की आपण सर्वजण महत्त्वाच्या कार्यासाठी एकत्रितपणे लढा देत आहोत.

हा पुरस्कार माझ्या एकटीचा नाही. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुला-मुलींचा हा पुरस्कार आहे. शांतता हवी असणाऱ्या भयकंपित मुलांचा हा पुरस्कार आहे. बदलाची आशा असणाऱ्या आवाज दडपून टाकलेल्या मुलांचा हा पुरस्कार आहे. मुलांच्या हक्कांसाठी व त्यांचा आवाज बुलंद करण्यासाठी मी येथे उभी आहे. त्यांच्यावर दया दाखविण्याची ही वेळ नसून बेधडक कृती करण्याची ही अंतिम वेळ आहे. शिक्षणापासून वंचित झालेल्या मुलांना पाहण्याचा हा शेवटचाच क्षण आहे.

मला माहीत आहे की लोक विविध प्रकारे माझे वर्णन करताना तालिबान्यांचा हल्ला झालेली ही मुलगी आहे असे काही लोक माझ्याविषयी बोलतात. स्वत:च्या हक्कांसाठी लढा देणारी ही मुलगी आहे असेही काही लोक म्हणतात. आता काही लोक मला नोबेल पुरस्कारविजेती म्हणतात. तथापि, अजूनही माझे भाऊ मला कठोर व हुकूमत गाजविणारी बहिण म्हणतात. माझ्या माहितीप्रमाणे, प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे. स्त्रियांना त्यांचे हक्क मिळाले पाहिजेत आणि जगातल्या प्रत्येक कानाकोपऱ्यात शांतता नांदली पाहिजे. अशी बांधिलकी असणारी मी एक निग्रही मुलगी आहे.

शिक्षण हे जीवनातील वरदान आहे आणि ते जीवनासाठी आवश्यकही आहे. माझ्या सतरा वर्षांच्या आयुष्यातील तो एक अनुभव आहे. स्वात येथील माझ्या नंदनवनरूपी घरात शिक्षणाची आणि नावीन्याचा शोध घेण्याची मला सदैव आवड आहे. मला आठवते की माझ्या मैत्रिणी आणि मी विशेष समारंभ प्रसंगी आमचे हात मेंदीने रंगवायचो. परंतु फुले आणि इतर नक्षी मेंदीने काढण्याऐवजी आम्ही आमच्या हातांवर गणितीय सूत्रे आणि समीकरणांची मेंदी काढायचो.

आम्हाला शिक्षणाची ओढ होती. आमचे भविष्य त्या आमच्या वर्गखोल्यांमध्ये सुरक्षित होते. आम्ही एकत्र बसून तेथे शिकायचो, वाचायचो, नीटनेटके व स्वच्छ शालेय गणवेष परिधान करायचो आणि आमच्या डोळ्यात भावी जीवनाची मोठी स्वप्ने साठवायचो. आम्हाला आमच्या पालकांमध्ये आमच्याविषयीचा सार्थ अभिमान निर्माण करायचा होता. आम्हीसुद्धा अभ्यासात प्रगती करून ध्येय साध्य करू शकतो असा विश्वास संपादन करायचा होता. फक्त मुलेच प्रगती करू शकतात हे मत खोडून काढायचे होते.

परंतु सर्व काही बदलले. मी राहत असलेले सुदंर पर्यटन केंद्र, दहशतवाद्यांचा अड्डा बनले. मी दहा वर्षांची असतानाच ४०० पेक्षा जास्त शाळा उद्ध्वस्त करण्यात आल्या. स्त्रियांना चाबकाच्या फटक्यांची शिक्षा देण्यात आली. लोकांना ठार मारण्यात आले आणि जीवनाविषयीच्या आमच्या सुंदर स्वप्नांचे भीतीदायक भयानक स्वप्नात रूपांतर झाले. शिक्षण घेणे हक्क न बनता गुन्हा ठरवला गेला. मुलींना शाळेत जाण्यास बंदी घालण्यात

**शिक्षण हे जीवनातील वरदान आहे आणि ते जीवनासाठी आवश्यकही आहे.**

> **''मुलींनी शाळेत का जावे ? ते त्यांना महत्त्वाचे आहे काय ? परंतु माझ्या मते अधिक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, मुलींना शाळेत जाण्याचा हक्क का नसावा ?''**

आली. माझे जग अचानक बदलले गेले. माझ्या जीवनात वेगळ्याच गोष्टींना प्राधान्य मिळाले. माझ्यासमोर दोन पर्याय होते.एक म्हणजे मारले जाण्याची शांतपणे प्रतिक्षा करणे आणि दुसरा पर्याय म्हणजे अन्यायाचा विरोध करतानाच मारले जाणे. मी दुसरा पर्याय निवडला आणि अन्यायाचा विरोध करण्याचा निर्णय घेतला. आमच्या हक्कांना डावलणे, निर्दयीपणे लोकांना ठार करणे आणि इस्लामचा गैरवापर करणे यासारख्या दहशतवादी कृत्यांना आम्ही निमूटपणे पाहू शकत नव्हतो.

आम्ही आमचा आवाज बुलंद करून, दहशतवाद्यांना सडेतोडपणे जाब विचारण्याचा निर्णय घेतला. 'पवित्र कुराणात अल्लाने दिलेली शिकवण आपणास माहीत नाही काय?' अल्ला म्हणतात, ''तुम्ही एका व्यक्तीची हत्या केली तर ती संपूर्ण मानवजातीचीच हत्या केल्यासारखे नाही काय ?'' शांततेचे दूत करुणेचे प्रेषित मोहम्मद यांची शिकवण आपणास माहीत नाही काय? आपणास हे सुद्‌धा माहीत नाही काय की पवित्र कुराणाचा पहिला शब्द 'इकरा' म्हणजे 'वाचणे' होय ?

दहशतवाद्यांनी आम्हाला थोपविण्याचा प्रयत्न केला. माझ्यावर आणि माझ्या मैत्रिणींवर ज्या आज येथे उपस्थित आहेत, त्यांच्यावर तसेच आमच्या शाळेच्या बसवर २०१२ मध्ये दहशतवादी हल्ला झाला. परंतु त्यांचे विचार व त्यांच्या बंदुकांच्या गोळ्या विजयी होऊ शकल्या नाहीत. आम्ही बचावलो आणि त्या दिवसापासून आमचा आवाज अधिकाधिक बुलंद होऊ लागला. मी माझी गोष्ट सांगितली. ती माझी एकटीची आहे म्हणून नव्हे, ती तर आपणा सर्व मुलींचीच गोष्ट आहे. आज मी त्या सर्व मुलींचीच गोष्ट सांगते.

माझीच गोष्ट जगणाऱ्या पाकिस्तान, नायजेरिया व सैरिया येथील माझ्या भगिनींना मी माझ्यासोबत आणलेले आहे. त्या दिवशी आमच्या शाळेच्या बसवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यातून वाचलेल्या माझ्या शूर भगिनी शाजिया व कायिनात ह्यासुद्‌धा माझ्यासोबत आहेत. पण त्यांनी शिक्षण घेणे बंद केले नाही. माझी धाडशी भगिनी कायीनात सुमरो हिला तर अत्याचार व तीव्र हिंसाचाराला सामोरे जावे लागते. तिचा तर भाऊसुद्‌धा त्यात मारला गेला. पण ती त्या दहशतवाद्यांना शरण गेली नाही.

माझ्या येथील भगिनींना मी 'मलाला निधी' मोहिमेदरम्यान भेटले. माझी सोळा वर्षीय धाडसी बहिण सैरियातील मेझॉन, जी आता जॉर्डनच्या आश्रयशिबिरात राहते आणि तेथील प्रत्येक राहुटीत जाऊन तेथील मुला-मुलींना शिक्षण घेण्याविषयीचे प्रोत्साहन देते. नायजेरियातील बोकोहराम हे दहशतवादी तेथील मुलींना धमक्या देऊन त्यांना शाळेत जाण्यास प्रतिबंध करतात. प्रसंगी त्यांचे अपहरण करतात. कारण केवळ ते शाळेत जातात म्हणून. तेथील माझी भगिनी अमिना सुद्‌धा मुलींना शाळेत जाण्याविषयी प्रोत्साहन देते.

जरी मी ५ फूट २ इंच उंचीची एकटी मुलगी असले तरी (चपलांच्या टाचांची उंची वगळून ५ फूट) माझा आवाज हा माझ्या एकटीचा नसून माझ्या लाखो भगिनींचा आहे. मी मलाला आहे. परंतु शाझिया सुद्‌धा आहे. मी कायीनात आहे. मी कायीनात सुमरो आहे. मी मेझॉन आहे. मी अमिना आहे. शिक्षणापासून वंचित असलेल्या ६६ दशलक्ष मुलींची मी प्रतिनिधी आहे. आज केवळ माझाच आवाज बुलंद नाही, तर ६६ दशलक्ष मुलींचा आवाज बुलंद झालेला

आहे. काही वेळा लोक मला विचारतात की, ''मुलींनी शाळेत का जावे ? ते त्यांना महत्त्वाचे आहे काय ? परंतु माझ्या मते अधिक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, मुलींना शाळेत जाण्याचा हक्क का नसावा ?''

प्रिय भगिनी आणि बंधूंनो, आज जगाच्या अर्ध्या भागाचा झपाट्याने विकास झालेला दिसतो. परंतु असे अनेक देश आहेत की जेथे युद्ध, दारिद्र्य आणि अन्याय अशा जुन्याच समस्यांनी लक्षावधी लोक ग्रस्त आहेत. अद्यापही दहशतवाद्यांच्या हिंसाचारात अनेक निष्पाप लोकांना आपले प्राण गमवावे लागतात आणि त्यांची मुले अनाथ बनतात. बरेचसे लोक सैरिया, गाझा आणि इराक येथील छावण्यांमध्ये आश्रयित बनतात. अफगाणिस्तानातील बरीचशी कुटुंबे तेथील आत्मघातकी हल्ले व बॉम्बस्फोटामध्ये बळी पडतात.

आफ्रिकेमधील बऱ्याचशा मुला-मुलींना गरिबीमुळे शिक्षण घेता येत नाही. आपण अजूनही पाहतो की, उत्तर नायजेरियामधील मुलींना शाळेत जाण्याचे स्वातंत्र्य नाही. कैलाश सत्यार्थी यांनी उल्लेख केल्याप्रमाणे प्रामुख्याने पाकिस्तान आणि भारतामधील सामाजिक बंधने, जबरदस्तीने केलेले बालविवाह व लादलेल्या बालमजुरीमुळे अनेक मुले-मुली शिक्षणापासून वंचित आहेत.

माझ्या शाळेतील मैत्रिणींपैकी माझ्याच वयाच्या धाडस आणि आत्मविश्वास असलेल्या एका मैत्रिणीचे डॉक्टर बनण्याचे स्वप्न होते. पण तिचे स्वप्न केवळ स्वप्नच उरले. वयाच्या १२व्या वर्षी तिचा विवाह करण्यात आला. ती स्वतःच १४ वर्षांची मुलगी असताना ती एका मुलाची आई बनली. माझ्या मते ती खूप चांगली आदर्श डॉक्टर बनू शकली असती. परंतु ती डॉक्टर बनू शकली नाही. कारण ती मुलगी होती. तिच्या या व्यथेने प्रेरित होऊन जगातल्या सर्वदूर ठिकाणच्या मुलींना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळवून देण्यासाठी आणि त्यांचा आवाज बुलंद करण्यासाठी मी शांततेच्या नोबेल पुरस्काराची रक्कम 'मलाला निधी' ला अर्पण करीत आहे. प्रथमतः मी जेथील मूळ रहिवासी आहे त्या पाकिस्तानातील स्वात आणि शांगला येथील शाळांच्या इमारती उभारण्यासाठी हा निधी वापरला जाईल. माझ्या स्वतःच्या गावात मुलींसाठी एकही माध्यमिक शाळा नाही. म्हणून माझ्या मैत्रिणी व भगिनी शाळेत जाऊ शकतील, गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊ शकतील आणि आपले स्वप्न पूर्ण करण्याची संधी त्यांना मिळेल अशी शाळा उभारणे हे माझ्यापुढील आव्हान आहे. हीच माझी इच्छा आहे व सामाजिक बांधिलकी आहे. हीच माझ्या लढ्याची सुरुवात असेल, पण मी तिथेच थांबणार नाही. प्रत्येक बालकाला शालेय शिक्षण मिळेपर्यंत माझा लढा सुरू राहील.

प्रिय बंधू आणि भगिनींनो, ज्यांनी सामाजिक क्रांती घडवून आणली असे महामानव, मार्टिन ल्युथर किंग, नेल्सन मंडेला, मदर तेरेसा आणि आंग सॅन स्यु की यांचा याच पवित्र व्यासपीठावर पदस्पर्श झाला होता. मला आशा आहे की कैलाश सत्यार्थी आणि मी आतापर्यंत जो लढा दिलेला आहे तो पुढेही चालूच राहील. त्यामुळे नक्कीच चिरकाल टिकणारा बदल घडून येईल. बदल घडवून आणण्यासाठीचा हा अंतिम क्षण असेल अशी मला दुर्दम्य आशा आहे. शिक्षणासाठी लढा देण्याची ही शेवटचीच वेळ असेल.

आपण सर्वजण मिळून एकदा आणि कायमचीच ही समस्या सोडवू. आपण आत्तापर्यंत प्रदीर्घ लढा दिलेला आहे. आता भरारी घेण्याचीच वेळ येऊन ठेपली आहे. जगातल्या नेत्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याची ही वेळ नाही. त्यांना याआधीच त्याची कल्पना आहे. त्यांची स्वतःची मुले-मुली चांगल्या शाळेत शिकत आहेत. आणि आता

जगातल्या उर्वरित मुलांना शिक्षण देणारा कृती कार्यक्रम राबविण्यासाठी त्या नेत्यांना हाक देण्याची वेळ आली आहे. जगातल्या नेत्यांनी एकत्र येऊन शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे असे त्यांना सांगण्याची ही वेळ आहे.

पंधरा वर्षांपूर्वी जागतिक नेत्यांनी पुढील सहस्त्रकासाठी वैश्विक विकासाची ध्येये निर्धारित केली. गतवर्षात काही प्रगती दृष्टिपथात आली. कैलाश सत्यार्थी यांनी म्हटल्याप्रमाणे, शालाबाह्य मुलांची संख्या निम्म्याने कमी झाली. तथापि जगाने फक्त प्राथमिक शिक्षणावरच लक्ष केंद्रित केले. त्यामुळे सर्वांगीण व सर्वदूर प्रगती होऊ शकली नाही. सन २०१५ मध्ये कायमस्वरूपी टिकतील असे विकसनात्मक ध्येय निश्चित करण्यासाठी विविध देशांचे प्रतिनिधी राष्ट्रसंघाच्या परिषदेस एकत्र येतील. ह्यामुळे जगातल्या पुढील पिढ्यांच्या शैक्षणिक आकांक्षेची दिशा निश्चित केली जाईल.

केवळ मूलभत शिक्षण पुरेसे आहे या गोष्टीचा जगातील कोणीही स्वीकार करू शकत नाही. जेव्हा नेत्यांची स्वत:ची मुले भूमिती, गणित, विज्ञान, भौतिकशास्त्र या विषयांच्या उच्चस्तरीय अभ्यास करतात तेव्हा विकसनशील देशातील मुलांना केवळ मूलभूत साक्षरता पुरेशी आहे ही गोष्ट जागतिक नेते स्वीकारतात तरी कशी ? प्रत्येक बालकाला मोफत, गुणवत्तापूर्ण, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण देण्याची हमी असलेल्या संधीचा नेत्यांनी लाभ उठविला पाहिजे. काही लोकांना ही गोष्ट अप्रायोगिक, खूप महागडी, खूप कठीण किंवा कदाचित अशक्यप्राय वाटेल. परंतु जगातल्या लोकांनी अधिक व्यापक विचार करण्याची ही वेळ आहे.

प्रिय बंधूंनो व भगिनींनो, जगातील तथाकथित प्रौढ हा नकारात्मक विचार कदाचित स्वीकारतील, पण आपण मुलं मात्र कदापि स्वीकारणार नाही. आपण ज्यांना शक्तीशाली देश म्हणतो ते खरेच युद्ध पुकारण्याइतके सक्षम असतात. परंतु आपण शांतात प्रस्थापिक करण्यास हतबल ठरतो. असे का व्हावे ? मुलांच्या हाती बंदुका देण्यापेक्षा पुस्तके त्यांच्या हाती देणे अधिक कठीण का वाटावे ? रणगाडे बनविणे सोपे वाटावे, परंतु शाळा उभारणे अधिक कठीण का असावे ? आपण आधुनिक जगात राहतो आणि कोणतीही गोष्ट अशक्य नाही यावर आपला विश्वास आहे. ४५ वर्षांपूर्वी आपण चंद्रावर पोहोचलो आणि कदाचित लवकरच आपण मंगळावर पोहोचू. आता या २१व्या शतकात प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्वक शिक्षण देण्यासाठी आपण नक्कीच सक्षम झाले पाहिजे.

प्रिय बंधूंनो, भगिनींनो आणि प्रिय मुला-मुलींनो, आता आपण अविरत अथक परिश्रम करूया. राजकीय लोक व जागतिक नेते यांच्याबरोबरच आपणा सर्वांच्या योगदानाची गरज आहे. मी, तुम्ही, आपण हे आपले सर्वांचेच कर्तव्य आहे. रिकाम्या वर्गखोल्या, हरवलेले बालपण, आणि संधी न मिळालेले उपजत गुण व अनुभवणारी आपली पहिली आणि शेवटचीच पिढी असेल असा निर्धार करूया. कोणाही मुला-मुलीने कारखान्यात आपले बालपण वाया घालविण्याची ही शेवटचीच वेळ ठरावी. जबरदस्तीने विवाह करून देण्याची ही शेवटचीच वेळ ठरावी. युद्धात एखाद्या मुलाने प्राण गमाविण्याची ही शेवटचीच वेळ ठरावी. शालाबाह्य बालकाला पाहण्याची ही शेवटचीच वेळ असावी.

आपणा सर्वांसमोरच या गोष्टींचा शेवट व्हावा. आपण एकत्रितरीत्या ह्या गोष्टी समूळ नष्ट करण्याची सुरुवात करूया. आज येथेच आणि आत्ताच ह्या गोष्टींचा शेवट करण्याची सुरुवात करूया. मी आपली अत्यंत आभारी आहे.

धन्यवाद !

*****

# गैरमार्गाविरुद्ध लढा, अविस्मरणीय अभियान
# "कॉपीमुक्त अभियान"

एस. डी. दामोदरे
मुख्याध्यापक
महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण
मंडळ, विभागीय शिक्षण मंडळ अमरावती

**कॉपी ही समाजाला व विद्यार्थ्याला लागलेली कीड / आजार आहे.**

काही वर्षांपूर्वी परीक्षेत कॉपी/गैरप्रकार या आजाराने इ. १०वी ते १२ पर्यंत शिक्षण घेणाऱ्या काही विद्यार्थ्यांना पछाडले होते. ग्रामीण भागात तर काही विद्यार्थ्यांना कॉपी या आजाराची लागण लागल्याची दिसून येते. कॉपी करून पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना भविष्यात काहीही उमेद नाही. फक्त कसेतरी पुढे जायचे हा प्रयत्न सफल होतो. कॉपी म्हणजे विद्यार्थ्यांना ऐतखाऊ फुकट खाण्याची सवय लागते. एक वेळा फुकट बिना मेहनतीने खाण्याची सवय लागली की ती पुढे गंभीर समस्या धारण करते. तन-मन विसरून धनाकडे धाव घेतो व आळशी वृत्ती धारण करतो. मेहनत ही त्याच्या जीवनातून निघून जाते व श्रम त्यांच्या आनंदाच्या जीवनातून बाद होते. पदवी शिक्षणापर्यंत तो कॉपीची धाव करतो व गैरमार्गाने मिळविलेले यश त्याला बेरोजगारीच्या खाईत लोटते व आळशी बनविते.

कॉपी ही फक्त १० किंवा १२वी च्या परीक्षेमध्ये केली जाते असे नाही तर पदवी, कृषी, अभियांत्रिकी परीक्षांमध्ये सुद्धा काही प्रमाणात गैरमार्गाचा अवलंब करून यशस्वी होतात. पण त्या गैरमार्गाचे प्रमाण हे इ.१०, १२वी च्या परीक्षांपेक्षा खूप कमी म्हणजे २० टक्के आहे. हुशार किंवा गुणवत्तेमध्ये येणारे विद्यार्थीसुद्धा काही प्रमाणात कॉपी करत होते कारण सभोवती वातावरण कॉपीचे झाले असते त्यांचेही मन हेलावून निघते. ते तयार साहित्याला स्वीकारतात कारण डोक्यावरील ताण कमी होतो.

२० ते २५ वर्षांपूर्वी विद्यार्थ्यांना कॉपी/गैरमार्ग समजत नव्हता. कडक शिस्तबद्ध वातावरणात तालुक्याचे अथवा ठरावीक २०-२५ कि.मी. अंतरावरील शाळा केंद्रावर परीक्षा होत होत्या. अतिशय प्रामाणिक वातावरणात विद्यार्थी अभ्यास करून प्रामाणिक परीक्षा देत होते. काही विद्यार्थ्यांना गैरमार्ग समजत नव्हता तर काहींना परीक्षा केंद्र संचालक व पर्यवेक्षक यांची भीती व आदर वाटत होता. पण नंतर या बाबतीत चित्र सर्व बदलले होते. याविषयी चिंतन करणे गरजेचे आहे.

साधारण १९८४-८५ पासून माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचा विकास व विस्तार होऊन संख्या वाढली तसतशी शिक्षणाविषयी ओढ निर्माण झाली. विद्यार्थी संख्यासुद्धा वाढायला लागली. परीक्षा केंद्राचीसुद्धा शिक्षण संस्थाचालक व मुख्याध्यापकांना गरज आवश्यकता वाटू लागली. विद्यार्थ्यांना बाहेर दूर तालुक्याचे ठिकाणी अथवा २०/२५ कि.मी. अंतरावर १०/१२ वी ची परीक्षा देणे ग्रामीण दुर्गम भागातील पालकांना कठीण त्रासाचे वाटू लागले आणि या विचारातून शाळांची व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची सोय व्हावी म्हणून शासनाला वाटू लागले आणि परीक्षा

केद्रांचा सुद्धा विस्तार झाला. जवळपास २/३ शाळा मिळून ८/१० कि.मी. अंतरावर विशेषत: १०वी चे परीक्षा केंद्र मिळाले. ग्रामीण आदिवासी भागातील गरीब विद्यार्थ्यांची सोय झाली. यामधूनच शाळा/उच्च माध्यमिक शाळांना निकालाची टक्केवारी ही महत्त्वाची अट टाकून निकालाचे महत्त्व वाढले व पुढील कार्य सुरू झाले.

परीक्षा केंद्र शाळेत/जवळपास परिसरात/जवळच्या परिचित शाळेत असल्यामुळे विद्यार्थ्यांमधील परीक्षा केंद्र व परीक्षा याविषयीची भीती हळूहळू कमी होत गेली. पण आता हे कुठेतरी थांबले पाहिजे, ती वेळ आता आली आहे. कारण गैरमार्गामुळे अनेक वाईट प्रकार विद्यार्थ्यांचे मनावर बिंबवणारे आहेत. यामधूनच त्यांचेमध्ये गुंडप्रवृत्ती बळावली आहे. केंद्रावर परीक्षेला अनेक वाईट प्रकार विद्यार्थी आपल्या स्वत:चे शिक्षकांशी करतात. याविषयी अनेक प्रसंग आपणाला ऐकायला, पहायला मिळतात. मागील ३ वर्षापूर्वीपासून गैरमार्गाशी लढा हा कॉपीमुक्त अभियान कार्यक्रम शिक्षण मंडळाने राबविला आहे. प्रथमत: शिक्षण मंडळाचे मन:पूर्वक आभार मानतो. कारण ही काळाची गरज आहे. माझ्या मताप्रमाणे हा प्रयोग फक्त १०वी, १२वी ते पदवीपर्यंत अंमलात आणून कायमस्वरूपी सर्वच सर्वांच्या परीक्षामध्ये कॉपी विद्यार्थी करणार नाहीत असा निर्णय घ्यावा. कारण ९वी ते ११वी च्या परीक्षा अत्यंत कडक वातावरणात कॉपीमुक्त प्रामाणिकपणे शाळामध्ये पार पडतात यात शंका नाही. आणि ज्या शाळेत परीक्षा केंद्र १०/१२ वी (इयत्ता) आहे तेथील वर्ग ९वी व ११वी चे विद्यार्थी गैरमार्गाचे वातावरण पाहतात. ऐकायला मिळते तेव्हा त्यांचा दृष्टिकोन बदलतो आणि ते विद्यार्थी सुद्धा अभ्यास करणे, कमी करतात. पर्यायाने ११ वी चे विद्यार्थीसुद्धा वातावरण पाहतात.

शिक्षण मंडळाने यासंबंधित केलेल्या योजना शाळा स्तर/केंद्रस्तर समिती/प्रतिज्ञा समिती इ. बाबी आवश्यक व स्वागतार्ह आहेत. कॉपी मुक्त/गैरमार्गाविरुद्ध लढा या कृती अभियानाची सुरुवात मार्च २०११ च्या १२, १०वी च्या परीक्षांपासून केली आहे. उपक्रम/अभियान अतिशय अविस्मरणीय आहे. कारण ही परिस्थिती दहा वर्षापूर्वी (अभियान) राबवायला पाहिजे होती. आज विद्यार्थी व पालक यांनासुद्धा आवडला आहे. कॉपी हा आजार झाला होता. शेवटच्या स्तरावर गेला होता. सर्वसाधारण किंवा कमी उपचाराने हा आजार बरा झाला तर कॉपी/गैरमार्ग विरुद्ध सतत ५ वर्षे उपचार करावा लागणार आहे. तेव्हा हा आजार समूळ पूर्णत: मूळासकट नष्ट होईल असे माझे मत आहे. हे अभियान नियमितपणे पाच वर्ष सुरू ठेवल्यास निश्चितच भविष्यकालीन विद्यार्थ्यांना सोनेरी दिवस येतील. तसेच इ. ९, ११वीत सुद्धा शाळास्तरावर प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे. इ. १ली ते ८वी पर्यंतची Open text book परीक्षा यावरसुद्धा विचार करून चिंतन करणे गरजेचे आहे. हे सुद्धा विसरता येणार नाही.

### १. शिक्षण मंडळाचे नियोजनबद्ध व अविस्मरणीय आयोजन

गैरमार्गाविरुद्ध लढा या कृती अभियानाचे शासन शिक्षण मंडळ स्तरावर आयोजन प्रभावी होते.

मुख्याध्यापकांची सभा, शाळा समिती सभा, शिक्षक सभा, पालक शिक्षक संघ सभा, गावातून प्रभातफेरी, विद्यार्थ्यांना २६ जानेवारीला प्रतिज्ञा इत्यादीचे आयोजन संपूर्ण वर्षभरात वेळापत्रकानुसार, त्यामुळे पोषक वातावरण निर्माण झाले. संपूर्ण शिक्षण व्यवस्था यामध्ये सहभागी झाली. मुख्याध्यापकांची सभा, लगेच शाळा समितीच्या पदाधिकाऱ्यांना याबाबत माहिती देणे. शिक्षकांची सभा घेऊन जबाबदारी व कर्तव्य व परिणामाची दखल घ्यावयास सूचना देणे. पालक संघामार्फत पालकांना माहिती व जागृती निर्माण करणे अशी साखळी निर्माण करून प्रभावीपणे अंमलबजावणी केली. नियोजन अविस्मरणीय होते. दक्षता समिती व केंद्रस्तर समिती गठित करणे सर्वांवर पर्यायाने

पालकांवर जबाबदारी टाकणे इ. बालकांच्या भविष्यातील सोनेरी वेध घेणारा आहे. हे निश्चितच अभिनंदनास पात्र आहे.

### २. शाळा समिती व दक्षता समितीचे कार्य महत्त्वाचे

गैरमार्गाविरुद्ध लढा या कृती अभियानासाठी स्थानिक शाळा समितीच्या पदाधिकाऱ्यांनीसुद्धा सकारात्मक विचार करून याला संपूर्णपणे सहकार्य केले. वेळोवेळी सभेच्या माध्यमातून मुख्याध्यापकाद्वारे शिक्षकांना सूचना कार्यसुद्धा प्रभावी अंमलबजावणीसाठी उपयुक्त व मोलाचे ठरले. तसेच स्थानिक दक्षता समिती व केंद्र स्तर समितीने सुद्धा महत्त्वाची भूमिका पार पाडली. संपूर्ण परीक्षा कालावधीत उल्लेखनीय कार्य केले. पूर्ण परीक्षा दरम्यान उल्लेखनीय उपस्थिती होती.

### ३. मुख्याध्यापक व शिक्षकांची कर्तव्यपूर्ण भूमिका

परीक्षा दरम्यान मुख्याध्यापकांनी केंद्र संचालक, अतिरिक्त केंद्र संचालक नात्याने कर्तव्य म्हणून प्रभावी भूमिका बजावली. आपली जबाबदारी व शासनाचा कृती अभियानाला मुख्याध्यापकांनी व पर्यवेक्षक या संबंधाने शिक्षकांनी महत्त्वाचे व गांभीर्य समजून विद्यार्थ्यांचे सोनेरी भविष्याची जाणीव ठेवून कॉपीमुक्त वातावरणात परीक्षेचे संचलनाचे कार्य मुख्याध्यापक व शिक्षकांनी चांगल्या तऱ्हेने पार पाडले. उल्लेखनीय कार्य केले.

### ४. महसूल विभाग, कृषी विभाग, शिक्षण विभाग यांचे कार्य प्रशंसनीय

गैरमार्गाविरुद्ध लढा या अभियानासाठी इ. १२, १० वी च्या परीक्षेसाठी बैठे पथकाचे कार्य प्रशंसनीय होते. प्रामाणिकपणे आपले कर्तव्य कार्य बाजूला ठेवून वरिष्ठांचा व अधिकाऱ्यांचा आदेश स्वीकारून प्रामाणिकपणे वेळेपूर्वी व परीक्षानंतर सुद्धा केंद्रावर आपल्यावर टाकलेली जबाबदारी चोखपणे पार पाडली. महसूल विभागाचे तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसिलदार, प्राथमिक शिक्षक यांनी मोलाचे सहकार्य केले. कॉपी होणार नाही, मुलांची मानसिकता ओळखून गैरमार्गाचा अवलंब विद्यार्थी करणार नाही याची जाणीव ठेवून महसूल, प्राथमिक शिक्षण विभागाने प्रामाणिकपणे प्रयत्न केले.

ग्रामसेवक यांनी सुद्धा सहकार्याची व कर्तव्याची जाणीव ठेवून गैरमार्गाविरुद्ध लढा याला सहकार्य केले. तसेच जि.प. शिक्षक यांनी महत्त्वाचे प्रामाणिक प्रयत्न करून परीक्षेदरम्यान अभियानाला साथ दिली.

### ५. पालक, समाज, विद्यार्थ्यांचा सहभाग

गैरमार्गाविरुद्ध (कॉपीमुक्त) लढा या अभियानाला समाजाने सुद्धा मनापासून स्वीकारले आहे हे उल्लेखनीय. पालकांना व समाजातील सर्व घटकांना सुद्धा वाटत होते की, कॉपी ही समाजाला व विद्यार्थ्याला लागलेली कीड/आजार आहे. कॉपी करणे बरोबर नाही अशी प्रतिक्रिया पालक, पालकसंघाच्या सभेमध्ये करीत होते. समाजातील अन्य घटकसुद्धा कॉपीच्या विरुद्ध बोलत होते व शिक्षण मंडळ व शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत करीत होते. समर्थन करीत होते. दहा वर्षापूर्वी हे कॉपी नष्ट करायला पाहिजे होते अशा बोलक्या प्रतिक्रिया पालक व समाज प्रत्यक्षदर्शी करीत होते. चांगला उपक्रम आहे असे सर्वसामान्य विद्यार्थी व इतर मंडळी बोलत होते. परीक्षेदरम्यान केंद्रावर पालकांचा सहभाग नव्हता. पालक परीक्षा केंद्रावर फारसे भरकटले नाही. त्रास दिला नाही याचा अर्थ पालकांना सुद्धा या चांगल्या गोष्टी आवडल्या हे सिद्ध होते. विद्यार्थ्यांनी सुद्धा सहा महिन्यापूर्वी या अभियानाविषयी मानसिकता तयार केली होती. कारण गैरमार्गाचे वाईट परिणाम व भविष्यातील आपली अवस्था वाईट गंभीर परिणाम

याविषयी विद्यार्थ्यांना सुद्धा काही गोष्टी अवगत, करून भविष्याचे वेध व शिक्षणाचे महत्त्व याची जाणीव होऊन परीक्षा दरम्यान कॉपी करू नये या अभियानाला त्यांनी सुद्धा समजून घेऊन सहकार्य केले. विद्यार्थ्यांना सुद्धा वाटू लागले की कॉपी करणे बरोबर नाही, भविष्य नाही. अशा बोलक्या प्रतिक्रिया प्रत्यक्ष शाळेत व परीक्षा सुरू होण्यापूर्वी अनुभवास आल्या हे सत्य आहे.

गैरमार्गाविरुद्ध लढा अभियान किंवा कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा या कृतीची अंमलबजावणी करायची झाल्यास किंवा भविष्यातील वाईट परिणामांची दखल याबाबतची महत्त्वाची भूमिका व मानसिकता ही मुख्याध्यापक व शिक्षकांची महत्त्वाची आहे. जोपर्यंत सर्व मुख्याध्यापक व शिक्षक मनाशी खूणगाठ बांधत नाही तोपर्यंत हे सुरूच राहणार आहे. पण मुख्याध्यापक व शिक्षक मनापासून परीक्षा दरम्यान कॉपीला हद्दपार करतील तेव्हा संपूर्ण चित्र बदलून जाईल. हे बदलण्यासाठी काही कोणाची गरज भासणार नाही. फक्त मुख्याध्यापक शिक्षकंच हे करू शकतात असे मला वाटते. हे तेवढेच खरे म्हणताना, विद्यालयाची ज्याचे हाती दोरी, तो विद्यार्थ्याचे भाग्य उद्धारी. या म्हणीप्रमाणे शिक्षकंच घडवित असतो. या कोवळ्या कळ्यामाजी, लपले ज्ञानेश्वर, शिवाजी, या म्हणीप्रमाणे सर्वच चांगले संस्कार घडविण्याचे कार्य गुरुजी करतात, मग हे सुद्धा गुरुजींनी मनावर घेतल्यास गैरमार्गाविरुद्ध लढा पूर्णत: यशस्वी करून दाखवू शकतात हे निर्विवाद सत्य राहील आणि यातूनच उद्याचा बलशाली भारत भविष्यातील सोनेरी जीवनाचा वेध घेणारा शक्तिशाली नीतिवान बालक, युवक असेल यात तिळमात्र शंका नाही.

***

## पालकांशी हितगुज

'शिक्षण-संक्रमण' च्या माध्यमातून आपल्याशी संवाद साधताना आनंद होत आहे. 'शिक्षण-संक्रमण' मधून अनेक विषयांवर लेख प्रकाशित होत असतात. त्यामध्ये 'पालकांशी हितगुज' असाही एक विषय महत्त्वाचा आहे. आपल्या शालेय व्यवहारात पालक-सुसंवाद, पालक-संपर्क यांना महत्त्व आहे. हे आपण जाणताच, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्याध्यापक-शिक्षक-पालक यांनी एकत्र येणे, विचार-विनिमय करणे अगत्याचे आहे. त्यासाठी मार्गदर्शक ठरतील असे लेख 'शिक्षण-संक्रमण' मधून प्रकाशित होतात. त्यांचा उपयोग आपण पालकांसाठीही करावा.

पालकांच्या सभेमध्ये अशा लेखांचा संदर्भ द्यावा, त्यावर चर्चा घडवून आणावी. शिक्षक-पालक संघाच्या बैठकीत पदाधिकाऱ्यांच्या निदर्शनास हे लेख आणावेत, तसेच, शाळेमध्ये एखाद्या काचफलकात हे लेख नियमितपणे प्रदर्शित करावेत, पालक प्रबोधनासाठी हे आवश्यक आहे.

पालकांशी संबंधित लेखांवर झालेल्या चर्चा-प्रश्नोत्तरांचा वृत्तान्त 'शिक्षण-संक्रमण' कडे अवश्यक पाठवावा, जर त्याबद्दल पालकांच्या काही प्रतिक्रिया असतील, तर त्याही पाठवाव्यात, जर काही महत्त्वपूर्ण शैक्षणिक विषयांवर चर्चा घडवावी असे वाटत असेल, तर तसे विषयही सुचवावेत, त्यांचा विचार करणे शक्य होईल.

'शिक्षण-संक्रमण' च्या माध्यमातून शाळा व पालक संबंध दृढ झाले, त्यातून पालक-प्रबोधन झाले तर एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक कार्य होईल, मुख्याध्यापकांनी त्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे..

सचिव

राज्यमंडळ, पुणे

# माझ्या कल्पनेतील अभिनव शिक्षण पद्धती

**डॉ. निरंजन महादेव अंजनकर**
लाखोटिया भुतडा ज्युनिअर कॉलेज, कोंढाळी,
ता. काटोल, जि. नागपूर ४४१ १०३
*(निबंध स्पर्धा उत्तेजनार्थ)*

दिवस उगवता माळण्याआधि
साह्यभूत व्हावे सम जीवन
स्पर्शामधुनी अन् लाभावे
असंख्य जिवांना संजीवन
अखेर सूर्यास्तापावेतो
खुणा ठेवूनी भल्या बुऱ्यांचा
जमाखर्च हा मांडून जाईन
अल्प काहिशा कर्तृत्वाचा
अशीच माझी अतीव तळमळ
एकमेव इच्छा नि प्रार्थना
साह्यभूत व्हावे मम जीवन
मार्गामध्ये येणाऱ्यांना

– *स्ट्रिकलॅन्ड गिलियन*

## १. प्रास्ताविक

आजचा विद्यार्थी हा संगणक प्रेमी, मोबाइलधारक, विज्ञान तंत्रज्ञानाशी मैत्री करणारा, दैनंदिन जीवनात इंटरनेटचा वापर सहजपणे करणारा असा आहे. दूरदर्शन, संगणक, मोबाईल इ. च्या माध्यमातून संपूर्ण जगाशी तो जोडला गेलेला आहे. अशा वातावरणात लहानाचा मोठा होत असलेल्या आजच्या विद्यार्थ्याला आपली शाळा, तेथील अध्यापन पद्धती आवडते का ? त्याचे अध्ययन आनंददायी होते का हा एक चिंतनाचा विषय आहे.

शाळा आणि त्याच्या आजूबाजूच्या परिस्थितीत कमालीचे अंतर आहे. घरी एकुलत्या एक असणाऱ्या मुलाचे होणारे लाड आणि शाळेत त्याला मिळत असलेले महत्त्व यामध्ये जमीन–अस्मानाचा फरक आहे.

शाळेतील अध्यापन पद्धती त्याला आवडावी, शाळेत त्याची जिज्ञासू, अभ्यासू वृत्ती वाढावी, त्याच्या मनातील प्रश्नांना शाळेत उत्तरे मिळावी, त्याला येणाऱ्या शंकांचे निरसन व्हावे, त्याच्यामध्ये असणाऱ्या सुप्त गुणांना बाहेर पडण्यास

वाव मिळावा अशी नावीन्यपूर्ण अध्यापन पद्धती असेल तर आणि तरच उद्याचा सक्षम, सुसंस्कारित, वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारा विद्यार्थी स्वत:चे आणि पर्यायाने देशाचे उज्ज्वल भवितव्य घडवेल.

## २. माझे समाजनिरीक्षण

समाजात डोळे उघडे ठेवून पाहताना एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते ती म्हणजे आजच्या या विद्यार्थ्याला अभ्यासात रस नाही, शाळेची म्हणावी तशी ओढ नाही. 'शाळेत जाणे' हे पालकांनी लादलेले काम की जे टाळण्याचे त्यांना स्वातंत्र्य नाही. विद्यार्थ्याला शिक्षकांविषयी आदराची भावना नाही. अध्ययनात आनंद नाही. शाळेतसुद्धा अभ्यास नको, स्वाध्याय, गृहपाठ नको, वाचन नको, परीक्षा नको अशी त्यांची मानसिकता. स्वयंशिस्त पाळणारे, आवडीने अध्ययन करणारे विद्यार्थी हाताच्या बोटावर मोजण्याएवढे !

आजच्या विद्यार्थ्यावर प्रसारमाध्यमांचा प्रचंड प्रभाव आहे. चांगले आणि वाईट यांमधील फरक ओळखण्यास विद्यार्थ्याला मदत करण्यासाठी आजची शिक्षणपद्धती कमी पडते.

विद्यार्थ्यांना शाळेत येण्याची ओढ लावणे, त्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण व्हावेत अशी परिस्थिती निर्माण करणे, त्यांना अध्ययनाची रुची लावणे, ते जसे आहेत तसे त्यांना जगू देणे, परिपूर्ण गुलाबपुष्पाचा स्वीकार करताना त्याच्या पाकळ्या, त्याचे काटे, त्याचे सर्वांग आपले मानले तर गुलाबाचे गुलाबपण कळून येणार आहे. हा विचार करून त्याला आपलेसे करणे या गोष्टींना जेथे महत्त्व आहे तेथे विद्यार्थी आनंददायी शिक्षण घेत आहेत असे दिसते. लीलाताई पाटील याचे 'सृजन आनंद' विद्यालय, डॉ. रेणू दांडेकर यांची चिखलगावमधील शाळा, रमेश पानसे सर यांची वाईमधील शाळा विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने शिक्षणातला आनंद देत आहेत.

## ३. सद्यपरिस्थितीतील दाखले

समाजाचे प्रतिबिंबच असलेल्या वर्तमानपत्रातील, साप्ताहिकातील हे दाखले -

१. लोकसत्ता दि. १०.६.२०१३

अमेरिकेतील जीवनकेंद्री शिक्षण

मुलांच्या नृत्याच्या तासाला मुलांबरोबर मुख्याध्यापकसुद्धा नृत्य करत होते.

शाळेच्या छोट्याशा शेतावर मुलांनी फुलझाडांची, भाज्यांची लागवड केली होती.

शाळेत होणाऱ्या विविध उपक्रमांचे विद्यार्थ्यांनी व्हिडिओ शुटींग करून त्याचे पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन केले होते.

२. लोकप्रभा दि. १६.८.२०१३

बदलत्या महाराष्ट्राची बदलती बाराखडी

ज्ञानरचनावाद ही २१व्या शतकात गुणवत्तेच्या दिशेने नेणारी पहिली पायरी आहे.

विद्यार्थी इनोव्हेटिव्ह आणि सर्जनशील होण्यासाठी शिक्षकांना तसे वातावरण निर्माण करावे लागेल.

आजच्या शिक्षणातून विद्यार्थ्यात कृतिशीलता निर्माण व्हायची गरज आहे.

आपल्याकडची पारंपरिक वर्ग, बेंच, फळा ही रचना बदलण्याची गरज आहे.

३. लोकप्रभा दि. २७.०९.२०१३

माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी ज्याप्रमाणे प्रयोगशील पद्धती अवलंबण्यात आली त्याचप्रमाणे वेगाने

विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानाचे पडसादही शिक्षणक्षेत्रात दिसून येतात.

वर्गात शिकवणाऱ्या शिक्षकाच्या तुलनेत जगभरातील माहिती एका क्लिकसरशी उपलब्ध करून देणारा टॅबलेट अधिक प्रभावशाली आहे.

इ-पुस्तकांचा शिक्षणक्षेत्रात चंचुप्रवेश होत आहे. ऑनलाइन शिक्षणाचे एक मोठे दालन जगभरात खुले होत आहे. 'कोर्सेरा' या ओपन ऑनलाइनचा फायदा विद्यार्थी करून घेत आहेत.

## ४. आजपर्यंतची शिक्षणपद्धती

आजपर्यंत गुरुजींनाच सर्व ज्ञान आणि समोरच्या मातीच्या गोळ्याला आकार देण्याचे कामही गुरुजींचे अशी भूमिका होती, गुरुजी सांगणार, गुरुजी बोलणार, गुरुजी निर्णय घेणार. समोरच्या विद्यार्थ्याने फक्त ऐकायचे, गुरुजींच्या आज्ञेचे पालन करायचे. त्याला स्वत:चे मत मांडण्याची मुभा नव्हती. निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नव्हते. शिक्षक सांगेल ती पूर्व दिशा! जणू शिक्षकाचा गुलामच तो !

'घोका आणि ओका' ही परीक्षा, मूल्यमापन पद्धती. ज्याचे पाठांतर जास्त त्याला गुण अधिक. विद्यार्थ्यांची हुशार, ढ अशी वर्गवारी. 'शैक्षणिक गुणवत्ता' एवढा एकच निकष. त्याच्यातील इतर बुद्धिमत्ता नाकारल्या जायच्या. परिणाम असा झाला की नापासांची संख्या वाढली, विद्यार्थी शिक्षणापासून लांब गेला. शिक्षण पूर्ण झालेला विद्यार्थी व्यावहारिक ज्ञानाच्या अभावामुळे स्वत:च्या पायावर उभा राहण्यास अयशस्वी ठरला. त्याची शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक वाढ खुंटली. तो एकलकोंडा झाला.

पालक नोकरीच्या वेळात बांधलेले, शाळेत शिक्षक आपल्या कामांच्या पूर्ततेत व्यग्र. विद्यार्थ्यांच्या मनात कोंडमारा. त्याला देण्यासाठी ना पालकांकडे वेळ ना शिक्षकांकडे. असे असूनही आपल्या एकुलत्या एक पाल्याकडून पालकांच्या अवास्तव अपेक्षा आणि त्या ओझ्याखाली दडपून गेलेलं विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्त्व.

आणि मग हाच विद्यार्थी मानसिक कोंडीतून दूरदर्शन, संगणक, मोबाइल इ. च्या प्रेमात न पडेल तरच नवल. त्याच्यातील सहजसुलभ उत्सुकतेला संगणक, इंटरनेटमार्फत पर्याय मिळत गेला आणि त्याच्याही नकळत या माध्यमांचा फास त्याच्या गळ्याभोवती घट्ट आवळत गेला. एकटेपणामुळे व्यसनांच्या आहारी गेला. पालक, शिक्षक, शिक्षणपद्धती त्याला समजावून घ्यायला कमी पडली. प्रचंड स्पर्धेला सामोरे जाताना, पालकांच्या अपेक्षांखाली दबलेल्या, अभ्यासाचा ताण असह्य झालेल्या अवस्थेतील विद्यार्थी म्हणू लागला.

आदरणीय शिक्षक मंडळींनो,

आमचं बोट धरून
तुमच्या वाटेवरून नेण्याचा आग्रह धरू नका.
खरं म्हणजे प्रत्येकाची वाट
ही स्वतंत्र, वेगवेगळी असते.
म्हणून तुमची वाट तुमचीच असते
आमची नसते.
आमच्या वाटा आम्हालाच शोधू द्या.

आमच्या वाटा आम्हालाच तुडवू द्या.
चालणाऱ्यानेच चालायचे असते
चालणाऱ्यानेच चालवाचे नसते.
ज्याची त्याची वाट वेगवेगळी असते.

## ५. अभिनव शिक्षणपद्धतीची आवश्यकता

'शिक्षण हे आपलं सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक सौहार्द्र राखेल आणि वाढवेल अशी पिढी निर्माण करणारं असावं' असे लोकमान्य टिळक म्हणाले होते. आमच्या शिक्षणातून विद्यार्थ्यात कृतिशीलता निर्माण व्हायची गरज आहे. शिक्षणातून विद्यार्थ्यात उद्यमशीलता वाढायला हवी. त्याची जीवननिष्ठा वाढली पाहिजे. एवढेच नाही तर या सगळ्याबरोबरच विद्यार्थी राष्ट्रभक्त बनण्याची गरज आहे. गिजुभाई म्हणतात त्याप्रमाणे सर्वात महत्त्वाचं शिक्षण हे हृदयाचं शिक्षण. शुभभावनांचं शिक्षण. अनुकंपा, सहानुभूती, प्रेम या चांगल्या भावना त्यांना शिकवायलाच पाहिजेत. कारण आजचा विद्यार्थी या भावनांपासून खूप लांब गेलाय. क्रोध, द्वेष, ईर्षा, भय या अशुभ भावनांपासून त्याला लांब ठेवला पाहिजे.

आजूबाजूच्या अवकाशाचं ज्ञान, प्रतिकात्मक विचार, गुंतागुंतीचे विचार, अंत:प्रज्ञेचा विकास, अध्यात्मिक विचार, क्लिष्ट आकृतीचं आकलन, संश्लेषण, अबोध मनाचा व्यापार, संशोधन करणं, कूट प्रश्न सोडवणं, चित्रकला, संगीत यांसारख्या कलांचं ज्ञान आणि त्याच्या सर्जनशक्तीचा विकास होईल अशा अभिनव शिक्षण पद्धतीची आजच्या मुलांना गरज आहे.

विनोबाजी भावे यांनी 'गीताईत' म्हणलेच आहे.
गुरू देवादिकी पूजा स्वच्छता वीर्यसंग्रह
अहिंसा ऋजुता अंगी देहाचे तप बोलिले ।
हितार्थ बोलणे सत्य प्रेमाने न खुपेलसे ।
स्वाध्याय करणे नित्य वाणीचे तप बोलिले ।
प्रसन्न वृत्ती सौम्यत्व आत्मचिंतन संयम
भावना राखणे शुद्ध मनाचे तप बोलिले ।

हितार्थ बोलायचं पण ते न खुपेल असं. भावना शुद्ध राखायची, अहिंसा आणि ऋजुता अंगी बाणवायची, वृत्ती सौम्य तशीच प्रसन्न राखायची, आत्मचिंतन करायचं आणि संयम राखायचा.

आजूबाजूला शिक्षणाची भपकेदार 'दुकानं' दिसली तरी नाना प्रकारचे विवेक बाळगून शिक्षणाची तपश्चर्या जिथे चालते अशी केंद्रे दिसत नाहीत. म्हणून अशा शिक्षणपद्धतीचा अवलंब करून ती केंद्रे अनुभवायला मिळाली पाहिजेत.

या वयात मुलांना निरोगी शरीर, निर्मळ मन, स्वच्छ बुद्धी आणि कधी कमी न होणारी कार्यशक्ती यांची गरज आहे. त्यांना सगळीकडून बळकट बनवणं ही खरी गरज आहे. मुलांची जिज्ञासा वाढावी, ज्ञान वाढावं, त्यांचा चौफेर विकास व्हावा हा तर सगळ्या अभ्यासक्रमाचा पाया आहे.

परीक्षा हुशार विद्यार्थ्यांची प्रगती मोजण्यासाठी नसावी, तर कच्च्या आणि मागे पडलेल्या मुलांना जागं करायला, ती कुठे कमी पडतात ते शोधायला असावी. मुलांकडून संवाद पाठ करून घेण्याचा काळ आता मागे पडला. असं कृत्रिम

पाठांतर करून घेणं क्रूरपणाचं आहे. तो असभ्यपणा आहे. त्यानं मुलांचा आत्मा मारला जातो.

मुलांच्या बहुआयामी विकासाची नोंद करण्यासाठी मूल्यमापनाची विविध साधने आवश्यक आहेत. परीक्षेतील यशापयशाबरोबर विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्ध्यांकाच्या विकासाचा मागोवा घेता आला पाहिजे. मूल्यमापनाचा संबंध फक्त चाचण्या व परीक्षा यांच्या प्रश्नपत्रिकांशी नसून शाळेत घडणाऱ्या अथवा घडविल्या जाणाऱ्या प्रत्येक घटनेशी तो संबंध आहे. तोंडी परीक्षेत पाठांतराची चाचपणी न होता एखादी गोष्ट व्यक्त करण्याची क्षमता अजमावली गेली पाहिजे.

'Deeper successes are not made of gold and silver but of better hearts and finer souls.'

## ६. अभिनव शिक्षण पद्धतीत शिक्षकाची भूमिका

अध्यापन हा व्यवसाय नसून ते एक व्रत आहे. राष्ट्राचे नागरिक निर्माण करणे, त्यांची जडणघडण करणे ही प्रत्येक शिक्षकाची जबाबदारी आहे. शिक्षकापाशी जगाला देण्याजोगी सर्वात मोठी व एकमेव परिपूर्ण अशी देणगी एकच आहे. आपल्यातील सर्वोत्कृष्ट असे जे काही आहे ते देणे ! केवळ आपले हस्तकौशल्य व बुद्धिचापल्य यांच्यावर ते अवलंबून नाही तर त्यासाठी आपल्याला स्वत:ची म्हणून काही स्वप्ने रंगवावी लागतील. आणि मुख्य म्हणजे स्वत:शीच एका गंभीर वचनपूर्तीने बांधून घ्यावे लागेल.

अध्यापन म्हणजे विद्यार्थ्यांचे व्यक्तित्त्व संपन्न करण्यासाठी त्याच्याशी केलेली जवळीक ! ज्या भविष्यातील जगात आपण जगायची इच्छा बाळगतो त्या जगाची निर्मिती आज आपण आपल्या मुलांना देत असलेल्या शिक्षणाच्या प्रकारावर व गुणवत्तेवर अंशत: नव्हे तर पूर्णत: अवलंबून आहे.

'नित्य जागृत मानव चित्ताबरोबर संग' हा आश्रमीय शिक्षणाचा मूळ गाभा. शिष्याला देण्यासाठी सतत आपण नवीन नवीन काहीतरी मिळवीत राहणं हेच अध्यापकाच्या जीवनाचं मूळ उद्दिष्ट. 'पण्य वस्तू प्राणावान नोय' यंत्रातून बनविलेल्या किल्लीच्या वस्तू जिवंत नसतात. दुकानासारख्या शाळा म्हणूनच जिवंत नसतात.

अभिनव शिक्षण पद्धतीमधील शिक्षक प्रचंड उत्साही, नवनव्या योजना राबवणारा, विद्यार्थ्यांवर स्वत:च्या मुलाप्रमाणे प्रेम करणारा, त्यांना समजून घेणारा, त्यांना वेगवेगळे अनुभव देणारा, धाडसी प्रयोग करणारा, व्यवस्थेला दोष न देता स्वत:पासून, स्वत:च्या वर्गापासून शिक्षणांच्या बदलांची सुरुवात करणारा, विद्यार्थ्यांच्या मुक्त अभिव्यक्तीचा आदर व स्वीकार करणारा, विद्यार्थ्यांसाठी सतत उपलब्ध असणारा, सर्जनशीलतेला वाव देणारा, त्यांच्याकडूनही शिकण्याची मानसिकता बाळगणारा, जीवन पुस्तकाचे आवरण प्रेमप्रधान असणारा, अध्यापनाला व्यवसाय न मानता व्रत मानणारा, मुक्त शिक्षणपद्धतीचा पुरस्कर्ता असणारा असेल.

मुलांच्या चालीने चालावे<br>
मुलांच्या मनोगते बोलावे<br>
तैसे जनास शिकवावे<br>
हळूहळू ।

शिक्षक रामदास स्वामींचा हा उपदेश आचरणास आणणारा असावा.

अध्यापनातील विविध तंत्रांचा, कौशल्यांचा, प्रयोगांचा वापर शिक्षकाने केला पाहिजे. स्वाध्याय पद्धत, सेमिनार पद्धत, थिंक टॅन्क (एकत्रित विचार करणे), रिफ्लेक्शन सेशन (प्रतिक्रिया व्यक्त करणे), वर्कशॉप वे, संगणकाचा वापर,

एल.सी.डी. प्रोजेक्टरचा वापर मुक्त मनाने केला पाहिजे. भरपूर प्रश्न विचारून विद्यार्थ्यांशी मनमोकळी चर्चा करून, विद्यार्थ्याला बोलण्याची त्याचा विचार मांडण्याची, निर्णय घेण्याची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे.

विद्यार्थ्यांमध्ये समरसतेची, सहभागाची, अधिक पुढाकार घेण्याच्या दृष्टीने स्वतंत्र विचार करण्याची व शेवटी शिक्षणातील अद्‌भुतता, सहानुभवातील आनंद आणि अन्योन्य क्रियेतील अत्यानंद या भावना उद्‌दिपित होऊन आपले अध्यापन कार्य सार्थकी लावले पाहिजे. शिक्षकाचे प्रेम आणि स्वीकृती मुलांपर्यंत किती प्रमाणात पोहोचते यावर मुलांचा आनंद व स्वास्थ्य अवलंबून असतं.

**शिक्षकाने**

१. अधिकारी वृत्तीचा त्याग करावा.
२. मुलाला त्याच्या प्रकृतिधर्मानुसार वागू द्यावे
३. त्याला धारेवर धरू नये.
४. त्याला भाषण देऊ नये.
५. किंवा डोक्यावरही बसवू नये.
६. कोणत्याही गोष्टीची जबरदस्ती करू नये.
७. त्याला त्याचे मत मांडण्याचे स्वातंत्र्य द्यावे.
८. अध्ययनातील विविध अनुभव द्यावेत.

शिक्षक दोन प्रकारचे असतात. एक जण विद्यार्थ्यांना ज्ञानाचे असे भरगच्च डोस पाजेल की विद्यार्थी जागेवरून हलूही शकणार नाही. दुसरा विद्यार्थ्याला असा छोटा चिमटा काढेल की तो थेट आकाशात उड्डाण करेल. अभिनव शिक्षण पद्‌धतीमधील शिक्षक नक्कीच दुसऱ्या प्रकारात मोडणारा असेल.

| | | |
|---|---|---|
| शिक्षक हा | **कर्तव्यनिष्ठ** | |
| अचूक नियोजन करणारा | **उपक्रमशील** | निश्चित दिशा असणारा |
| कल्पकता असणारा | **प्रोत्साहन देणारा** | प्रेरणा देणारा |
| अचूक नियोजन करणारा | **स्वत:चे ज्ञान अद्ययावत ठेवणारा** | नावीन्याची आस असणारा |
| जबाबदारीची जाण असणारा | **विज्ञान तंत्रज्ञानाशी मैत्री करणारा** | धाडसी निर्णय घेणारा |

असला पाहिजे.

*ॐ सहनाववतु । सह नौ भुनक्तु ।*
*सहवीर्यं करवावहै । तेजस्वि नावधीतमस्तु ।*
*मा विद्‌विषावहै ।*

गुरू आणि शिष्य यांनी एकत्र अध्ययन करावे व एकाने दुसऱ्याचा मत्सर करू नये यासाठी देवाने आशीर्वाद द्यावा. म्हणजेच या श्लोकात अध्ययनात दोघांनी सहभागी असणे स्पष्ट केले असून गुरूला ज्ञानाचे भांडार मानलेले नाही तर फक्त अग्रस्थानी असलेला विद्यार्थी मानलेले आहे.

माझ्या कल्पनेतील अभिनव शिक्षण पद्धतीची काही सूत्रे असतील.


१. विद्यार्थ्याला वर्तनाकडून रचनावादाकडे नेणे.

२. मुलांना फक्त माहितीचा साठा न करण्यास सांगून त्यांना ज्ञाननिर्मितीकडे वळविण्याचे कौशल्य पार पाडणे.

३. ऐकून शिकणे याकडून करून शिकणे याकडे विद्यार्थ्याला वळवणे.

४. शिक्षकाच्या मूळ दृष्टिकोनात बदल सुचवून शिक्षकाची शिक्षण व्यवहारातील भूमिका बदलणे.

५. विद्यार्थ्याचा पुढील पायऱ्यातून विकास होण्यास त्याला मदत करणे.




त्याला लिहिता वाचण्याइतके शिक्षित करणे. त्याला चांगल्या-वाईटमधील फरक कळण्याइतके सुशिक्षित करणे, त्याला स्वत:शी, इतरांशी वागण्यासाठी व वागवण्यासाठी सुसंस्कृत करणे आणि त्याच्यामधील सुप्त गुणांचा उत्तमोत्तम विकास करणे.

६. अध्यापन पद्धती शिक्षककेंद्री व्यवस्थेकडून विद्यार्थीकेंद्री व्यवस्थेकडे नेणे.

७. अध्यापन म्हणजे विद्यार्थ्यांचे व्यक्तित्व संपन्न करण्यासाठी त्याच्याशी केलेली जवळीक असेल.

८. कवीवर्य मंगेश पाडगावकर म्हणतात त्याप्रमाणे प्रत्येक मुलाच्या मनात एक जिप्सी (भटक्या) दडलेला असतो. दडपलेला जिप्सी कसा बाहेर येईल आणि त्या मुलाला कसा सगळीकडे भटकवायला लावेल अशी व्यवस्था या शिक्षणपद्धतीत असेल.

९. 'स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे तर स्वातंत्र्य म्हणजे जबाबदारी' हे सांगणारी, मुलांना मुलासारखं वागण्याची मुभा देणारी, त्याच्या सुप्त सर्जनशीलतेला आणि प्रतिभेला खतपाणी देण्यासाठी आवश्यक ती साधनं तयार करणारी सृजनात्मक शिक्षणपद्धती असेल.


१०. मुलांची जिज्ञासा वाढावी, ज्ञान वाढावं, त्याचा विकास व्हावा हा शिक्षणपद्धतीचा मूळ उद्देश असेल.

११. 'विचार करायला शिकूया, जगणं आपलं शोधूया' असं मानणारी शिक्षण पद्धती असेल.

१२. व्यापक दृष्टी, सर्वसमावेशक बुद्धी, सूक्ष्म अवलोकन, सूक्ष्म निरीक्षण समस्या दिग्दर्शनाची ताकद आणि चांगला नागरिक बनण्याची क्षमता असलेला चांगला विद्यार्थी यातून घडेल अशी पद्धती असेल.

१३. शाळेमध्ये पिनड्रॉप सायलेन्स हवा ही अपेक्षा बाजूला ठेवून आता तिथे चर्चा, वादविवाद यांचा आवाज असेल.

१४. संगणकाचा, इंटरनेटचा वापर करून विद्यार्थ्याचे ज्ञान अद्ययावत ठेवणे.



१.	Problem solving - समस्या निराकरण म्हणजे आपण शिकतो त्याचा अर्थ लावणं, अडचणीवर उपाय शोधणं.

२.	Connecting - विविध विषयांचा एकमेकांशी संबंध जोडायला शिकणं. शिक्षणाचा जीवनाशी संबंध जोडायला शिकणं.

३.	Communication - मूल जे शिकतं त्याचं संवादन करायला शिकणं.

४.	Team-work - समूहाने कृती करायला शिकणं.

५.	Life value - जीवन शिक्षण.

या सगळ्यामधून पुढची पिढी अधिक सक्षम, अधिक सजग होणे अपेक्षित आहे.

१५.	शिक्षकाने विद्यार्थ्याचा चांगला मित्र, मार्गदर्शक, समुपदेशक बनून त्याला सुसंस्कारी बनवले, तर देशाचा उज्ज्वल भविष्यकाळ ठरलेलाच असेल.

१६.	आचार्य रजनीश प्रत्येक विद्यार्थ्याला संदेश देतात.

‘आकाश को खिडकियों से मत देखो ।
क्योंकी खिडकियाँ असीम आकाश को भी
सीमाऐं दे देती है ।
आकाश को जानना हो,
तो खुले आकाश के
नीचे आ जाओ ।
अपनी अपनी खिडकियों को
छलांगकर ।’

हा संदेश देणारी शिक्षणपद्धती असेल.

| | | | |
|---|---|---|---|
| अ | | | |
| भि | | १. | ज्ञान |
| न | न | २. | प्रशिक्षण |
| व | वी | ३. | कौशल्य |
| शि | न | ४. | व्यावसायिकता |
| क्ष | बा | ५. | मनसोक्त निकेतन |
| ण | रा | ६. | नावीन्य |
| प | ख | ७. | सर्जन |
| द्ध | डी | ८. | इनोव्हेशन |
| ती | | ९. | एक्सलन्स |
| ची | | १०. | नॉलेज इकॉनॉमी |

**ज्ञानक्रांती**

## ७. अध्यापकाचे प्रत्यक्ष अनुभव, प्रयोग व उपक्रम :

विषय शिकवताना व्याख्यान पद्धतीचा वापर केला तर विद्यार्थी लगेच कंटाळतात. त्यांना सतत फक्त ऐकत राहणे आवडत नाही. त्यांना वर्गात मोठ्याने वाचायला आवडते, बोलायला आवडते, मतं मांडायला आवडते, चर्चा करायला आवडते. विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग घेऊन केलेले अध्यापन त्यांना आवडते. त्यांच्याकडून पाठ वाचून घेणे, प्रत्येक परिच्छेदावर छोटे छोटे प्रश्न तयार करायला सांगणे, अवघड शब्दांचे डिक्शनरीमधून अर्थ शोधायला लावणे, इंग्रजी शब्दांच्या भेंड्या खेळणे हे सर्व ते मनापासून करतात. एखाद्या विषयाची माहिती इंटरनेटवरून मिळविणे हे त्यांचे अगदी आवडीचे काम. काढलेली माहिती ते वाचतातच असे नाही. पण चित्रे आवडीने बघतात, त्यांचे निरीक्षण करतात. एल.सी.डी. वर सीडी बघायला, छोट्या फिल्म बघायला प्राणी, पक्षी, साप, फुले इ. बघायला, त्यांची माहिती जाणून घ्यायला त्यांना फार आवडते.

विद्यार्थ्याला सतत कार्यरत ठेवणे यासाठी शिक्षकाचे नियोजन असणे महत्त्वाचे ठरते. प्रत्येक पाठाचे नियोजन करताना वेगवेगळ्या पद्धतींची चर्चा आम्ही वर्गात करतो. सर्वानुमते एक पद्धत त्या पाठासाठी नश्चित करतो. सेमी इंग्रजीच्या आठवीच्या तुकडीत आम्ही अनेक उपक्रम राबवतो.

१. अभ्यासक्रमातील 'Agriculture' हा धडा मी कधीच त्यांना वर्गात बसून शिकवला नाही. वर्गामधीलच एका मुलाच्या शेतावर आम्ही एक दिवसाची अभ्यास सहल आयोजित करतो. या सहलीत शाळेतील सर्व पदाधिकारी, पालक यांचे सहकार्य मिळते. मुले तिथे प्रत्यक्ष धड्यातील बाबींचा अनुभव घेतात. शेतीची अवजारे बघतात, त्यांचे उपयोग जाणून घेतात. गुरे, म्हशी, त्यांच्या जाती, त्यांचे दूध काढण्यासाठी वापरत असलेली आधुनिक उपकरणे जाणून घेतात. गांडूळ खत प्रकल्प बघतात. चारा कापणीचे यंत्रावर काम करून बघतात. ग्रीन हाऊस बघतात. त्यात येणाऱ्या फुलांचे प्रकार अभ्यासतात. शेताला पाणी घालण्याच्या पद्धती – ठिबक सिंचन, फवारा पद्धत बघतात. गोबर गॅस, त्यांचे महत्त्व जाणून घेतात. शेततळे बघतात. त्यात पाळल्या जाणाऱ्या माशांच्या जातींच्या अभ्यास करतात. शेती पूरक व्यवसायांची नोंद घेतात. शेतात होणारी पिके, त्यांना लागणारी माती, पाण्याचे प्रमाण, खतांची मात्रा इ. मार्गदर्शन प्रत्यक्ष शेतकऱ्याकडून मिळते. यावर्षी तर आमचा सगळा वर्ग आमचे मा. मुख्याध्यापक यांच्या प्रेरणेने भात लागवडीसाठी शेताच्या चिखलात उतरला. एका शेतात भाताची लागवड करण्याचा अनोखा अनुभव आमच्या विद्यार्थ्यांना मिळाला. वरून पाऊस, शेतात घोटाभर चिखल, वर्गातील बावन्न मुले, मी, बरोबर असलेले शिक्षक, शिक्षिका आणि शालाप्रमुख यांनी भात लागवड केली. मुलांसाठी अविस्मरणीय असा तो अनुभव होता.

२. विद्यार्थ्यांना शब्दांपेक्षा चित्रांचे वाचन आवडते. पाठाच्या घटकानुसार आम्ही विविध चित्रांचा संग्रह करतो. 'Biodiversity', धड्यासाठी आम्ही अनेक झाडे, फुले, फळे, औषधी वनस्पती, प्राणी, पक्षी, किडे, कीटक, साप, मासे इ. ची शेकडो चित्रे गोळा केली. ज्यांची नावे माहिती नव्हती ती शोधण्याचा प्रयत्न केला. विषयानुसार त्यांची वर्गवारी केली. आपल्या देशातील, परदेशातील पक्ष्यांच्या, प्राण्यांच्या फिल्म लॅपटॉपवर वर्गात बघितल्या. इंटरनेटवरून अनेक प्राणी, फुले, पक्षी डाऊनलोड केले. पर्यावरण, प्रदूषण यामधील संबंध, आजच्या काळात वृक्ष लागवडीची असलेली गरज, प्रदूषण टाळण्याचे उपाय इ. सर्व विषयांवर वर्गात चर्चा घडवून आणली.

३. ‘Diseases’ धडा वर्गात मुलांनी नाट्यरूपात सादर केला. डॉक्टर, रुग्ण, घरातील व्यक्ती इ. भूमिका साकारून रोगाची लक्षणे, त्यावरील उपाय, रोग होऊच नये म्हणून घ्यावयाची काळजी विद्यार्थ्यांनी नाटकरूपात सादर केली. प्रत्येक रोगासाठी वेगळे डॉक्टर, वेगळे कुटुंब यांची निवड केल्याने बहुसंख्य विद्यार्थ्यांना सादरीकरण करण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांनी सर्व संवाद इंग्रजीमध्ये स्वत: लिहिले होते.

४. एका पाठासाठी विद्यार्थ्यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन बनवून आणली. एल.सी.डी. प्रोजेक्टरवर त्यांचे सादरीकरण केले. तो सर्व पाठ विद्यार्थी स्वअध्ययनातून शिकले. फक्त पी.पी.टी. करताना त्यांना छोट्या-छोट्या सूचना देऊन त्यांच्या स्लाइड्स परिपूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन केले.

हजारो फुलं फुलू दे
विचारधारांचा संघर्ष होऊ दे
विश्वाला नवजीवन मिळू दे

४. माझ्या गणित विषयासाठी मी घेत असलेला ‘गणिताचा महायज्ञ’ हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या अतिशय आवडीचा. एक ते नऊ गणिताचेच तास. प्रत्येक तासाला वेगळा घटक. विविध गणिते, कोडी, गणितातील गमतीजमती, आकृत्या वाचन, भौमितिक रचना, गणिताच्या स्पर्धा, परीक्षांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान, गणित कोपरा, गणिताच्या पुस्तकांचे प्रदर्शन, पाढे, वर्ग, घन, सूत्रे, त्रिकोणाचे प्रकार, चौकोनाचे प्रकार इ. चे तक्ते असं गणितीय वातावरण निर्मिती करून गणिताचा महायज्ञ करायचा. भरपूर गणिते सोडवायची. गणिते स्वत: तयार करायची. निरनिराळ्या सूत्रांचा परस्परांशी सहसंबंध जोडायचा. वेगवेगळ्या आकृत्या काढायच्या. विशेष म्हणजे न कंटाळता विद्यार्थी निकोप स्पर्धेने गणिते सोडवतात. अशा आगळ्या उपक्रमांद्वारे मुलांमध्ये गणित विषयाची आवड निर्माण होते. गणिताला ‘रुक्ष विषय’ या संकल्पनेतून काढून टाकण्यास मदत होते.

६. विज्ञान दिनाला वैज्ञानिक आकृत्या रांगोळीरूपात विद्यार्थ्यांनी काढल्या होत्या. मानवी हृदय, डोळा, पचन संस्था, श्वसन संस्था इ. पन्नास आकृत्यांचे प्रदर्शन खूपच आगळेवेगळे ठरले.

७. पाचवीतील मुले वर्गातच सलाड बनवतात, पुष्पगुच्छ बनवतात. टाकाऊपासून टिकाऊ वस्तू बनवतात. विज्ञान प्रदर्शनातही खूप मुले सहभागी होतात. पाठाला अनुसरून विद्यार्थ्यांच्या पोस्ट, बँक, ब्लड बँक, दवाखाना, विशेष मुलांची शाळा, वृद्धाश्रम, बिस्किटांचा कारखाना, सभोवतालचे गड, किल्ले इ. ना भेटी घडवून आणल्या जातात. विज्ञान सेंटरला भेटी देऊन वैज्ञानिक प्रयोग करून बघण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जाते.

८. माझ्या वर्गापुरते मर्यादित असे अनेक उपक्रम राबवले. विद्यार्थ्यांकडून हस्तलिखित तयार करून घेणे, सुंदर हस्ताक्षरासाठी तासामधील पाच मिनिटे राखून ठेवणे. दुरेघी वहीत विद्यार्थी एकेक अक्षर सुंदर काढण्याचा सराव करतात. श्रावण महिन्यात मेंदी काढणे व मातीकामात मातीचा नाग व बैल बनवणे अशी स्पर्धा घेतली होती. प्रत्येक मुलीने स्वत:च्याच हातावर मेंदी काढायची. काही मुलांनीही मेंदी स्पर्धेत भाग घेतला. नाग बनवताना बहुसंख्य मुलांनी आधी शंकराची पिंड बनवली व त्यावर नाग बनवला. एका पेनच्या बक्षिसाने देखील मुले

आनंदून गेली. दर शनिवार मी सोमवार ते शनिवार असा डब्याचा मेनू फळ्यावर लिहून देते त्याचा तक्ता खालीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| सोमवार | हिरव्या रंगाची भाजी | कोणतेही फळ |
| मंगळवार | सलाड | खजूर / खारीक |
| बुधवार | मोडाची उसळ | राजगिरा लाडू |
| गुरूवार | लाल रंगाची भाजी | शेंगदाणे-गूळ |
| शुक्रवार | पिवळ्या रंगाची भाजी | नाचणी बिस्किट |
| शनिवार | गोड शिरा, खीर, कॉर्नफ्लेक्स | |

प्रत्येक ओळीला नेमून दिलेला मुलगा रोज डबा तपासून बघतो. माझ्या वर्गातील बहात्तर मुलांपैकी रोज साठ मुले तरी या प्रकारचा डबा आणतात. न आणणाऱ्या विद्यार्थ्याला रागावले जात नाही. महिन्यातील एका दिवशी मुलांना आवडीचा वडा-पाव, नूडल्स इ. घरगुती बनवून घेतो व मस्त पार्टी करतो. बहुतेकदा पालकच बनवून आणतात. विद्यार्थ्यांबरोबर पालकांना आवडलेला असा आमचा हा पौष्टिक डबा उपक्रम !

हे सर्व उपक्रम राबवत असताना सर्व पदाधिकारी, सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक या सर्वांचा सहभाग, प्रोत्साहन असते. शाळेच्या कामकाजात अडथळा न होऊ देता या उपक्रमांचे काटेकोर नियोजन करावे लागते.

नि - निर्धार

यो - योजकता

ज - जबाबदारीची जाणीव

न - नवीनतेची ओढ

'The people who risk nothing, do nothing, have nothing and are nothing. They may avoid suffering and sorrow but they can't learn, change, grow, love and live.'

९. विद्यार्थ्यांच्या बहुआयामी विकासाची नोंद करण्यासाठी मूल्यमापनाची विविध साधनं आवश्यक ठरतात. परीक्षातील यशापयशाबरोबर विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्ध्यांकाच्या विकासाचा मागोवा घेतला गेला पाहिजे. मूल्यमापनाचा संबंध फक्त चाचण्या व परीक्षा यांच्या प्रश्नपत्रिकांशी नसून शाळेत घडणाऱ्या अथवा घडविल्या जाणाऱ्या प्रत्येक घटनेशी तो संबंध आहे. तोंडी परीक्षेत पाठांतराची चाचपणी न होता एखादी गोष्ट व्यक्त करण्याची क्षमता अजमावली गेली पाहिजे.

'दिवास्वप्न' मध्ये गिजुभाई बधेका लिहितात, 'आपल्या वर्गात पास-नापास ठरवायची काही जरूरीच नाही. ज्याची कविता पाठ असेल त्यानं ती म्हणावी, ज्याची नसेल त्यानं ती पाठ करावी. कुणाला खेळायला येत नसेल तर बघून बघून त्यानं शिकावं. ज्यांना येतं त्यांनी खूप खूप खेळावं, मजा करावी. शुद्धलेखनात ज्याचं अक्षर सुंदर असेल, त्यानं लिहिलेलं पाहून इतरांनी आपलं अक्षरं सुधारावं.'

१०. औपचारिक शिक्षणाबरोबरच अनौपचारिकपणेही विद्यार्थ्याला सुशिक्षित व समजूतदार करण्याचे प्रयत्न होणे ही आजच्या काळाची गरज आहे. जुन्या शैक्षणिक विचारांना छेद देऊन शिक्षणक्षेत्रामध्ये नवविचारांची क्रांती झाली पाहिजे. राष्ट्राला सामर्थ्यशाली बनवायचे असेल तर प्रथमत: शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे.

११. शालेय अभ्यासक्रमाबरोबरच त्याचा शारीरिक, मानसिक विकास योग्य प्रकारे झाला पाहिजे. त्यासाठी त्याने मैदानावर मनमुराद खेळले पाहिजे. मनातील भावभावनांचा, शारीरिक शक्तीचा निचरा तेथे झाला पाहिजे. चित्रकला, गायन, वादन, मातीकाम इ. कलेत त्याने रमले पाहिजे आणि अशी परिस्थिती त्याला शिक्षण पद्धतीत उपलब्ध झाली पाहिजे. विद्यार्थ्यांना त्यांची नैसर्गिक विचार करण्याची क्षमता व सृजनशीलता यांना वाव मिळाला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या भावना, बुद्धी, इच्छा, अपेक्षा व जन्मजात वृत्ती यांचा विकास करत असताना त्याला अधिकाधिक निसर्गाच्या जवळ नेते ते खरे शिक्षण !

१२. अभिनव अशा या शिक्षण पद्धतीमुळे विद्यार्थी दूरदर्शन, संगणक, इंटरनेट, मोबाइल, टॅब्ज, फेसबुक, वॉट्स अप इ. चा वापर विचारपूर्वक, विधायकपणे करणारा घडला पाहिजे. स्वयंशिस्तीचा भोक्ता झाला पाहिजे. स्वत:चे हित समजण्याइतका समंजस झाला पाहिजे.

## ८. समारोप :

सकस व प्रयोगशील शिक्षणाचं मुख्य ध्येय माणूसपण जागवणं, शिकतेपणाच्या विविध अंगांना खतपाणी घालून अध्ययनोत्सुक मन तयार करणं हे असतं.

"We believe that it is of utmost importance to encourage the student to question and challange all the accepted 'wisdom' and pressures that shape an individual in society today. Thus here students are engaged in serious dialogue which allows them to understand & hopefully, go beyond these factors that are usually accepted unquestioningly."

बालकांच्या आत्म्यांना शिस्त लावून, त्यांच्या जीवनाला वळण देण्याच्या कार्यापेक्षा आणखी काही महान आहे काय जगात ? जी व्यक्ती अशा प्रकारे मुलांच्या आत्म्यांना आकार कसा द्यावा हे जाणू शकते ती व्यक्ती एखाद्या शिल्पकारापेक्षा, चित्रकारापेक्षा, निश्चितच खूप खूप श्रेष्ठ ठरते.

अशा अभिनव शिक्षण पद्धतीतून सुसंस्कारित झालेले बालक म्हणेल,

ज्ञानयोगी होऊन आम्ही,
विज्ञानाची कास धरू ।
आकाशाला गवसणी घालू,
सूर्यालाही थक्क करू ।
दाही दिशांना जिंकून घेऊ,
भव्य ही आस्था ।

*****

# खेळा आणि मस्त हुशार व्हा !

*शैक्षणिक विषयातील प्रगतीसाठी मैदानी खेळ आवश्यक आहेत. खेळाल तर हुशार बनाल.*

**श्री. अनंत मधुकरराव निंबोळे**
न्यू हायस्कूल मेन, अमरावती

खेळ ही आत्मप्रेरित जन्मजात स्वाभाविक प्रवृत्ती आहे. ह्यामध्ये अनुकरणाशी संघर्ष व रचनात्मक प्रवृत्ती इत्यादी प्रवृत्तीचे संमिश्रण आहे. ही जन्मजात प्रवृत्ती आहे. यासाठी शिक्षणाची आवश्यकता नसते. खेळक्रिया सदा स्वतंत्र स्वाभाविक आणि आनंदपूर्ण असतात. खेळ ही क्रिया आहे. जी खेळासाठी खेळली जाते. खेळ व कामामध्ये एक विशेष अंतर आहे. ते म्हणजे खेळात आनंद खेळताना होतो. तर कामात आनंद उद्‌देश प्राप्तीनंतर होतो.

**मुलांच्या शिक्षणामध्ये सामाजिक संबंधांच्या वाढीत व आरोग्य सुधारण्यामध्ये खेळण्याचा मोठा वाटा आहे. असे यात म्हटले आहे.**

खेळ बालकांच्या शिक्षणात फार महत्त्वपूर्ण आहे. याद्‌वारे बालकांचा शारीरिक विकास होतो. त्याचे स्वास्थ्य चांगले राहते. रक्तसंचलन नीट होते. तसेच खेळाद्‌वारे मानसिक विकास होतो. त्यामुळे अवधान, स्मृती, कल्पनाशक्ती, तर्कशक्ती आणि निर्णयशक्ती व विचारशक्तीचा विकास होतो.

खेळामध्ये इतर मुलांसोबत खेळात भाग घेऊन सहयोग, सहिष्णुता, नियमपालन, अनुशासन, नेतृत्व इत्यादी गुणांचा विकास होतो. ज्यामुळे मुलांमध्ये सामाजिकता विकसित होते. व्यक्तिमत्त्वाच्या सर्व गुणांचा स्वाभाविक व सर्वांगीण विकास होतो.

‘चल ना रे भाऊ
मी नाही येत
मला आहे काम
कसले रे काम
खेळायचे काम बाई खेळायचे काम’

असे छान गाणे लहानपणी सर्व आम्ही म्हणायचो. हे सर्वात अर्थपूर्ण गाणे आहे. असे मला आता पटले आहे.

‘खेळणे’ हे मुलांच्या आयुष्यातील महत्त्वाचे काम आहे. असे जीन पिआजे हे महान शिक्षणतज्ज्ञ म्हणतात. मुलांची हुशारी कशी वाढते ? बुद्‌धिमत्ता कशी वाढते ? यावरील मते जगात सर्वांना मान्य आहेत. न्यूयार्कच्या बॅरॉस व सहकाऱ्यांनी ८ ते ९ वर्षांच्या म्हणजे प्राथमिक शाळेतील १०,००० हून जास्त मुलांचा अभ्यास केला. बालआरोग्याचे शास्त्रीय मासिक पेडिआड्रिक्समध्ये तो प्रसिद्ध झाला. मुलांच्या शिक्षणामध्ये सामाजिक संबंधांच्या वाढीत व आरोग्य सुधारण्यामध्ये खेळण्याचा मोठा वाटा आहे. असे यात म्हटले आहे.

मित्र-मैत्रिणीमध्ये खेळणे व स्पर्धेसाठी धावणे, जिंकण्यासाठी खेळणे या अलग गोष्टी आहेत. मित्र-मित्रिणींमध्ये खेळताना मुले आनंदी असतात. चिंतामुक्त असतात. कुठलेही ध्येय ईर्षा ताण-तणाव, हार-जीत त्यात नसते. हे खेळणे ऐच्छिक व आनंदमय 'मस्त' असते.



जिंकण्यासाठी खेळले जाणारे स्पर्धात्मक खेळ अलग असतात. त्यात नियम पाळावे लागतात. हवे तसे करता येत नाही. मित्र-मैत्रिणींशी मोकळे खेळताना मुले सहजीवन शिकतात. दुसऱ्यांना सांभाळून घ्यायला शिकतात. एक दुसऱ्यापासून नवीन गुण, नवीन क्रिया शिकतात. देवघेव सुसंवाद शिकतात. याने मानसिक ताणतणाव, मानसिक आजार घटतात. नवनिर्माणाला चालना मिळते.

इंग्लंडच्या सेनानींनी मोठमोठ्या लढाया जिंकल्या. त्याचे डावपेच ते खेळाच्या मैदानात शिकले. स्वर्गीय डॉ. श्रीकांत जिचकार यांनी अभ्यास केला तेव्हा त्यांना असे दिसले की, दहावी-बारावीची गुणवत्ता यादी व आयुष्यात सफल होणाऱ्यांची यादी अलग-अलग आहे. जे खेळात यशस्वी होतात ते आयुष्यात यशस्वी होतात. खेळ खेळणारे व खेळ न खेळणारे यांच्या व्यक्तिमत्त्वात फरक दिसून येते. शाळेत त्यांचे मित्र-मैत्रिणीशी त्याचे सुसंवाद नसतात. तसेच नेतृत्व, उत्तरदायित्व अशा पदासाठी त्यांना योग्य समजले जात नाही. जे खेळत नाही त्यांच्या व्यवहारात नकारात्मक दृष्टिकोन असतो. तसेच ते मानसिकदृष्ट्या योग्य नसतात व समाजात ते सक्रिय सहभाग घेण्यास मागे असतात. त्यांच्यात शारीरिक व मानसिक तणाव जास्त असतो.

म्हणून मुलांनी रोज मित्र-मैत्रिणीसह खेळून मोठे व्हावे व मोठेपणी स्पर्धात्मक खेळ खेळून जीवनात यशस्वी व्हावे.

*खेलोंगे कुदोंगे बनोंगे नवाब*

हे खरंच आहे तेव्हा मुला-मुलींनी सुट्टीत व आयुष्यभर खेळा. खेळताना शिका. खेळण्याचा अभाव हा आपल्या मुलांचा मोठा आजार आहे. परंतु आज पालक खेळापेक्षा जास्त महत्त्व अभ्यासाला देतात. तसेच शाळेतील भरमसाठ विषय यामुळे पालक अभ्यासात पुढे असला पाहिजे. म्हणून सतत मुलांना शाळा, कोचिंग क्लासेस, विविध स्पर्धा परीक्षा यामध्ये गुंतवून ठेवतात. त्यामुळे मुले दिवसभर शाळा, ट्यूशन, कोचिंग क्लास यामध्ये व्यस्त असतात. कॉलनीमध्ये मुलांना शेजारी खेळायला सोबती नसतो. कारण एखाद्या मुलाला रिकामा वेळ असतो. तेव्हाच शेजारच्या मुलाचा तबला क्लास असतो. त्यामुळे तो घरी परत येतो. तसेच विभक्त कुटुंब पद्धतीमुळे त्याला आजीआजोबा, चुलतभाऊ नसतो. त्यामुळे टी.व्ही. पाहण्यात रिकाम्या वेळेचा उपयोग करतात. तसेच व्हिडिओ गेम त्यामुळे मुलांचा शारीरिक विकास होत नाही. तसेच डोळ्यावर ताण निर्माण होतो. नुसते बसून असल्यामुळे स्थूलता वाढते. पोटाचे आजार वाढतात. सतत बसल्यामुळे शरीराच्या पोश्चरवर ताण येतो. त्यामुळे शरीर समोर वाकणे, कुबड निघणे अशी लक्षणं दिसून येतात. तसेच टीव्हीवर कार्टून नेटवर्क, छोटा भीम असे कार्यक्म पाहतात. त्यामुळे चिडचिडे होतात. छोटा भीममध्ये भीम नेहमी जिंकताना दाखवतात. परंतु प्रत्यक्ष जीवनात तसे नसते हे मुले समजत नाही. तसेच टीव्ही पाहताना कोणते कार्यक्रम मुलांनी पाहावे. किती वेळ पाहावे हे पालकांनी ठरवून दिले पाहिजे. या सर्व गोष्टीपेक्षा मुलांनी दररोज एक ते दोन तास खेळलेच पाहिजे. आपला शारीरिक, मानसिक विकास साधला पाहिजे. कारण 'सुदृढ शरीरातच सुदृढ मन असते' त्यामुळे खूप खेळा आणि हुशार व्हा.

*****



# वेळ : अभ्यासातील महत्त्वाचा व मूलभूत घटक

डॉ. सौ. पुष्पा घळसासी
न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड, पुणे ३०.

शिक्षण संक्रमणचे जुने अंक चाळताना जाणवलेला प्रभावशाली, प्रतिभासंपन्न लेख पुन्हा अनुभवण्यासाठी प्रकाशित

'क्षणत्यागे कुतो विद्या, कणत्यागे कुतो धनम्' असे एक संस्कृत सुभाषित आहे. यावरून आढळून येते की आपल्या पूर्वजांनीही वेळेची व अभ्यासाची सांगड घातली आहे.

## यशाचे रहस्य :

वरील सुभाषित लक्षात घेता कणाकणाने धनसंचय करता येतो तर क्षणाक्षणाने विद्येची प्राप्ती करून घेता येते.

बेंजामिन फ्रँकलिन या शास्त्रज्ञानेसुद्धा वेळेच्या बाबतीमधील आपले विचार स्पष्ट केले आहेत. ते असे -

'Dost thou love life ? Then don't squander time,
for that's the stuff life is made of ....'

(तुमचे जीवनावर प्रेम आहे की नाही ? मग वेळ उधळू नका. कारण आयुष्य म्हणजे दुसरे तिसरे काही नसून वेळच आहे. आपण वेळ कसा घालवितो या गोष्टीमुळेच आयुष्याला अर्थ प्राप्त होतो.)

वरील दोन्ही विचारांवरून वेळेचे महत्त्व आपल्या लक्षात येते.

## वेळ का वाचवायचा ?

'Time is money' असे एक इंग्रजी सुभाषित आहे. परंतु वेळेचे महत्त्व पैशापेक्षाही जास्त आहे. कारण गेलेला पैसा कष्ट करून परत मिळविता येतो. परंतु एकदा गेलेली पाच मिनिटे आपल्याला परत मिळवता येत नाहीत. कोणत्याही सजीवाला एकदाच आयुष्य मिळते आणि ते ठरावीक कालमर्यादेपर्यंतच असते. मिळालेल्या आयुष्याची पाच-पाच मिनिटे वाया घालविली तर किती वेळ व पर्यायाने किती आयुष्य वाया जाईल ? अगदी सोप्या भाषेत सांगायचे तर आपण १०/१२ माणसे उगीचच कोणत्याही विषयावर गप्पा मारतो. त्यातून काही साध्य होत नाही. शिवाय गप्पांचा विषयही सुसंगत असा नसतो. अशा ५/१० मिनिटे गप्पा मारल्या तरी सर्वांचे मिळून १/२ तास आपण वाया घालवितो. 'वेळ ही राष्ट्रीय संपत्ती' वगैरे उदात्त विचार न ठेवतासुद्धा इतका वेळ दुसऱ्या एखाद्या कारणासाठी वापरला तर त्यातून निश्चितच सर्वांचा काही फायदा होईल. याचा अर्थ चर्चा करू नका किंवा गप्पा मारू नका असा नव्हे. पण त्यातून प्रत्येकालाच काही मिळाले पाहिजे असा उद्देश ठेवणे आवश्यक आहे.

## वेळ कुठे जातो ?

'थांब रे पाच मिनिटे ! पाच मिनिटांनी काय होते ?' अशी वाक्ये आपल्या कानांवर नेहमी पडतात किंवा 'अगदी कंटाळा आला म्हणून तुमच्याकडे गप्पा मारायला सहज आलो' हेही वाक्य आपण नेहमी ऐकतो. म्हणजे दिवसाकाठी

आपले १/२ तास आपण अशा फालतू कामासाठी सहज खर्च करतो, खूप वेळ आपण वाया घालवितो याची जाणीवही त्यावेळी आपल्याला होत नाही.

## वेळ कसा वाचवाल ?

दैनंदिनी लिहा.

वर वर्णन केल्याप्रमाणे दिवसभराचा एखादा तासही निष्कारण वाया जाऊ नये असे वाटत असेल तर काही सवयी आपल्या अंगी बाणवून घेण्याची गरज आहे. दिवसभरात आपण काय काय करतो त्याची नोंद ठेवा म्हणजेच दैनंदिनी लिहायला सुरुवात करा. त्याचा निश्चित फायदा होतो. यावरून एक गोष्ट सुचली ती अशी -

'एक उनाड मुलगा शिक्षकांचा मार खाई. एका शिक्षकांनी त्यासाठी नवीन प्रयोग केला - रोज काय केलंस ते एका वहीत लिही व माझी त्यावर स्वाक्षरी घे - प्रथम रोजच वही कोरी - नंतर त्याची लाज वाटू लागली - काही चांगल्या गोष्टींचा नोंदी - हळूहळू वर्तनात बदल - - वर्षाअखेर एक हुशार व चांगला विद्यार्थी म्हणून बक्षीस -'

अशा प्रकारे एक एक आठवडा दैनंदिनी लिहून ती वाचली की त्या त्या आठवड्यात आपण काय काय केले व वेळ कोठे घालवता त्याचा तपशील आपल्याला मिळेल. त्याची तीव्रता वाढली की तो वेळ वाचवून अभ्यासाचा एखादा विषय करण्याची / वाचण्याची इच्छा निर्माण होईल. परंतु ही गोष्ट सहजसाध्य नाही. कारण अभ्यासापेक्षा 'गप्पा मारण्याकडे' सर्वांचा स्वाभाविक कल असतो. म्हणूनच तुकोबारायाने म्हटले आहे की,

असाध्य ते साध्य, करीता सायास । म्हणून अभ्यास - तुका म्हणे ।।

अशा रीतीने अभ्यासातील एक एक विषय हळूहळू करायला सुरुवात करा. एकदा अभ्यासात गोडी लागली की त्या-त्या विषयात चांगले गुण मिळायला सुरुवात होते.

## वेळेचे नियोजन

दिवसभरामध्ये आपल्याला खास अभ्यासासाठी किती वेळ मिळू शकतो याचा हिशोब तोंडी करा. पुढील तक्त्यानुसार तो कागदावर मांडा. तोंडी हिशोब व कागदावरील हिशोब यांचा ताळमेळ जमतो का ते पहा.

## हिशोब एक दिवसाकरिता

| | | |
|---|---|---|
| १. | झोप | ७ तास. |
| २. | शाळा | ६ तास |
| ३. | नित्याचे व्यवहार | २ तास |
| ४. | शिकवणी | १ तास ३०मि. |
| ५. | घरकाम | २ तास |
| ६. | करमणूक | २ तास |
| ७. | इतर कामे | १ तास |
| ८. | एकूण वेळ | २१ तास ३० मि. |

एकूण दिवसांचे तास २४. त्यातून अंदाजे २२ तास वजा केले तरी २ तास आपल्याला मिळू शकतात. ते सर्वच मुलांना एकाच वेळी मिळू शकतील असे नाही. किंवा एकाच मुलालाही सलगपणे मिळणार नाही. पण मिळालेल्या १/२ तासातही बराच अभ्यास आपण करू शकतो. यासाठी पुढील गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे.

वेळापत्रक करून भिंतीला चिकटवून ठेवून भागत नाही. ते अंमलात आणणे अगत्याचे असते.

१. अभ्यासाचे एकूण विषय

२. विषयांचा अवघडपणा

३. विषयातील मागासलेपणा (कच्चा विषय)

४. आपला आवडता विषय

५. न आवडता विषय

आपले विषय, आपल्याला मिळणारा वेळ व त्यांचा अभ्यास यांची सांगड घालणे म्हणजेच वेळापत्रक.

कोणत्या वेळी कोणता अभ्यास करावा, हे त्या व्यक्तीवर अवलंबून आहे. पण रात्री अभ्यास करायचा झाल्यास लिखाणाचा करावा म्हणजे झोप येत नाही. सकाळी मेंदू व शरीर पूर्ण विश्रांतीनंतर ताजेतवाने असते. तेव्हा पाठांतराचा अभ्यास करावा. परंतु एखादा मुलगा पेपर टाकणे, दूध घालणे यासारखी कामे करीत असल्यास त्याला पहाटे अभ्यास करणे शक्य होणार नाही म्हणून अभ्यासाच्या निश्चित अशा वेळा सांगता येणार नाहीत. तरीही प्रथम १/१ दिवसाचे वेळापत्रक मांडा नंतर १ आठवड्याचे, नंतर १ महिन्याचे याप्रमाणे त्याची व्याप्ती वाढवा. अवघड विषयांना त्यात प्राधान्य द्या. आपल्याला न आवडणारे विषय प्रथम करा. कच्चे विषय रोज करा.

### नुसते वेळापत्रक नको

वेळापत्रक करून भिंतीला चिकटवून ठेवून भागत नाही. ते अंमलात आणणे अगत्याचे असते. यासाठी त्याचे काटेकोरपणे पालन करण्याचा कसोशीने प्रयत्न करा. यासाठी प्रथम करायला हवी कामाची यादी. (list)

### कामाची यादी

वेळापत्रक करणे सोपे पण प्रत्यक्षात वापरणे अवघड. हे काम निश्चितपणे करावे लागते. यासाठी काय काम करायचे ते आदल्या रात्री वहीत लिहून ठेवा. कामाच्या महत्त्वानुसार त्याला अग्रक्रम द्यावा. यादीनुसार कामे करण्याची मनाला व शरीराला सवय लावून घ्या. रात्री झोपताना झालेल्या कामावर लक्ष केंद्रित करा व राहिलेली कामे दुसऱ्या दिवशीसाठी वहीत लिहा. अशा रीतीने कामाच्या यादीबरहुकूम म्हणून वेळापत्रकानुसार अभ्यास करण्याची आपल्याला सवय लागेल. एक लक्षात ठेवा, काम कोणतेही करायचे असेल त्यासाठी 'वेळ' हा अत्यंत महत्त्वाचा व आवश्यक घटक आहे.

### सारांश

अभ्यासाला मुलांना वेळच मिळत नाही अशी हाकाटी नेहमी होते. हा वेळ का महत्त्वाचा तो मिळवायचा व मिळालेला वेळ योग्य रीतीने कसा उपयोगात आणायचा यादृष्टीने मार्गदर्शन केले आहे. त्यासाठी दैनंदिनी, वेळापत्रक व कामाची यादी म्हणजे काय, त्यांचा उपयोग व अंमलबजावणी विद्यार्थ्यांनी केल्यास वेळेचा सदुपयोग होऊ शकेल.

*****

# आजच्या शिक्षण पद्धतीतील उणीवा व उपाययोजना

**श्री. सिध्देश्वर चांदेकर**
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.

समाजातील व्यक्तींच्या विविध गरजांची, आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी समाजाने, शासनाने विविध सार्वजनिक, सामाजिक संस्थाची स्थापना केलेली आहे. त्या विविध संस्थाद्‌वारे व्यक्तींच्या गरजांची पूर्तता केली जाते. उदा. माणसाला प्रवास करणे सोईचे व्हावे यासाठी परिवहन महामंडळाची, रेल्वे बोर्डची स्थापना केली आहे. तर संदेशवहनासाठी पोस्ट, रक्कम सुरक्षित ठेवण्यासाठी तसेच कर्ज मिळण्यासाठी बँका, आरोग्यासाठी दवाखाने, शेती विकासासाठी कृषी विद्यापीठे अशी कित्येक उदाहरणे देता येईल.अर्थातच या प्रत्येक संस्थेची स्थापना वेगवेगळया गरजांच्या पूर्तता करण्यासाठी झाली असल्यामुळे त्या त्या संस्थेची कार्यप्रणाली देखील वेगळी असणार.

''शाळा या संस्थेची निर्मितीदेखील सामाजिक गरजेतून झाली आहे.'' समाजामध्ये विशिष्ट वयोगटातील मुलामुलींना औपचारिक शिक्षण मिळावे या गरजेच्या पूर्ततेसाठी शाळेची स्थापना झाली. साहजिकच शासनाने ठरवून दिलेल्या वयोगटातील सर्व मुलामुलींना शाळेत दाखल करणे व त्या सर्वांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे हे शाळा या संस्थेचे मुख्य उद्‌दिष्ट राहील. निश्‍चित केलेले उद्‌दिष्ट साध्य करण्यासाठी शाळा या संस्थेमार्फत उद्‌दिष्टानुरूप कृतीची अपेक्षा आहे.

''शैक्षणिक प्रगती ही मानवाच्या सर्व प्रगतीची जननी आहे'' हे ओळखून शासनाने देखील शिक्षणाला प्राधान्य देऊन शिक्षण क्षेत्रात विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी, शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी विविध प्रयोग केले, नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले. विद्यार्थी लाभाच्या विविध योजना राबविल्या व अजूनही राबविणे सुरूच आहे. समाजातील सर्वच स्तरातील ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलामुलींना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचा करणारा 'शिक्षण हक्क' RTE ACT कायदा अमलात आणून त्याची अंमलबजावणी सध्या सुरू आहे. समाजातील सर्वच मुलामुलींना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी मागील १२-१३ वर्षापासून सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य, शालेय भौतिक सुविधांची पूर्तता, शिक्षक/मुख्याध्यापकांचे प्रशिक्षण, विद्यार्थ्यांसाठी विविध योजना, गणवेश, पाठ्यपुस्तके इत्यादींसाठी फार मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्यात येत आहे. अशाप्रकारे शासन,समाज,शाळा यांचे या स्तरावरून दाखलपात्र मुलामुलींना शैक्षणिक प्रवाहात सामील करून घेणे व त्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी विविध प्रकारे प्रयत्न करण्यात आले. तरीही अपेक्षित बदल झाल्याचे दिसून येत नाही. सर्व शिक्षा अभियानांतर्गत मागील १२-१३ वर्षात विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला. मात्र त्यानंतर गुणवत्ता वाढीचा आढावा घेतला असता गुणवत्ता पूर्वी पेक्षा घसरल्याचे 'असर' या संस्थेनी केलेल्या सर्वेक्षण अहवालावरून दिसून आल्याचे कळते.

वरील सर्व विवेचनावरून विद्यार्थ्यांची गुणवत्ता पैशानी वाढत नाही, एवढे तरी मान्य करायला हरकत नाही. सर्व शिक्षा अभियानामार्फत तसेच शासन स्तरावरून विद्यार्थी हिताच्या योजना राबविण्यावर कोट्यवधी रूपये खर्च झाले परिणाम मात्र गुणवत्ता पूर्वी पेक्षा कमी झाली, यावरून विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांची दिशा कुठेतरी चुकलेली आहे, हे मान्य करावेच लागेल. शिक्षकांनी एखाद्या किंवा अनेक घटकांचे वर्गात अध्ययन केल्यानंतर वर्गातील बहुसंख्य विद्यार्थ्यांना काहीच समजले नसेल तर हा दोष विद्यार्थ्यांचा नसून अध्यापन करणाऱ्या शिक्षकाचा आहे. अशा वेळी शिक्षकांनी आत्मपरीक्षण करून स्वतःमध्ये योग्य तो बदल घडवून आणणे जरूरीचे असते असे शिक्षणशास्त्र सांगते. हाच नियम इतर घटकांना का लागू पडू नये? शासन स्तरावरून गुणवत्ता विकासासाठी जे काही धोरण, योजना, उपक्रम राबविण्यात येतात,त्याची परिणामकारकता तपासून पाहण्याची गरज आहे. स्थानिक पातळीवर विविध योजनांची अंमलबजावणी करत असताना शिक्षक/मुख्याध्यापक/पर्यवेक्षक यंत्रणा यांचा खर्च होणारा वेळ, कामाचा प्राधान्यक्रम त्याचा गुणवत्तेवर होणारा परिणाम हे तपासून न पाहता विविध योजना उपक्रमाची अंमलबजावणी अगदी परंपरेनुसार सुरू आहे.

शाळा या संस्थेची स्थापना समाजातील मुलामुलींना शिक्षण केवळ शिक्षण देण्याच्या उद्देशाने झाली असेल तर शालेय वेळेत शिक्षक, मुख्याध्यापकव पर्यवेक्षकीय यंत्रणा यांचा जास्तीत-जास्त वेळ अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत, शिक्षक-विद्यार्थी आंतरक्रियेत खर्च होणे अपेक्षित आहे. परंतु प्रत्यक्षात या महत्त्वाच्या कामात किती वेळ खर्च होतो. या कामाकडे दुर्लक्षच असते असा प्रत्यक्ष अनुभव आहे. मात्र विद्यार्थी गुणवत्ता विकासाचे नावाने शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या अंमलबजावणीकरिता शैक्षणिक कामाच्या नावाने अधिक वेळ खर्च केला जातो.

शासकीय योजना, विविध प्रकाचे उपक्रम याची दिवसेंदिवस यादी वाढत असल्यामुळे पर्यवेक्षकीय यंत्रणेच्या शाळा भेटीतील अभ्यासक्रम, अभ्यासक्रमाचे नियोजन, दैनिक पाठ टाचण, त्यातील उणिवा, अध्ययन-अध्यापन. कार्य, व त्याचे निरीक्षण, उणिवांच्या अनुषंगाने मार्गदर्शन, विद्यार्थी प्रगती, अभ्यासातील कमजोर विद्यार्थी, त्याची कारणे व उपाययोजना. विद्यार्थी अनुपस्थितीची कारणे व उपाययोजना, मूल्यमापनाच्या नोंदी इत्यादी प्रत्यक्ष विद्यार्थी गुणवत्तेशी संबंधित मुद्देच गायब झाले आहेत. हे महत्त्वाचे मुद्दे पाहण्यासाठी त्यांना वेळ कमी पडतो.

शिक्षण विभागात वरिष्ठ स्तरावरदेखील यापेक्षा वेगळी स्थिती नाही. शिक्षण विभागात जिल्हा, राज्य पातळीवर होणाऱ्या आढावा सभेच्या विषयांच्या यादीमध्ये प्रत्यक्ष विद्यार्थी गुणवत्तेशी संबंधित किती विषय असतात? चुकून एखाद-दोन विषयाची शेवटी नोंद असेल तर, तोपर्यंत सभेची वेळ संपून जाते. एकंदरीत प्रत्यक्ष विद्यार्थी गुणवत्तेशी संबंधित घटकाची कृती दिशाहीन असेल, तेच उदासीन असतील तर केवळ भौतिक सुविधांची पूर्तता करून किंवा विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबविण्यासाठी वारेमाप खर्च करून गुणवत्ता वाढीची अपेक्षा करणे चुकीचे ठरेल.

मला एक गोष्ट कळत नाही की, शाळा ही मुलांना शिक्षण देणारी संस्था आहे. तर शाळेत केवळ अध्ययन अध्यापनाचेच कार्य म्हणजे शिक्षण देण्याचेच काम का असू नये? बाकी इतर गोष्टींची आवश्यकता का? प्राचीन काळी ऋषीमुनींच्या काळात शिक्षण होत नव्हते का? उलट कोणत्याही भौतिक, शैक्षणिक सुविधा नसतांना दर्जेदार शिक्षण त्या काळात दिले जात असल्याचे पुरावे आपल्याला मिळतात. त्यामुळे दर्जेदार तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षणाकरिता भौतिक, शैक्षणिक सुविधांची उपलब्धता, विद्यार्थी लाभाच्या योजना, शिक्षकांसाठी प्रशिक्षण, सभा संमेलने यापेक्षा अगदी नियमित व आनंददायी पद्धतीने शिक्षक, विद्यार्थी आंतरक्रिया सुरू असावी लागते. परंतु दुर्दैवाने हेच होत नाही बाकी सर्व काही होते.

## गुणवत्ता विकासासाठी शासनाच्या योजना, उपक्रम व त्याचा परिणाम

समाजातील सर्वसामान्य, दुर्बल, वंचित घटकातील मुलामुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन स्तरावरून शाळांमार्फत उपस्थिती सभा, शालेय पोषण आहार, गणवेश, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक साहित्य, सायकली, विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती, मोफत बस प्रवास, लेखन साहित्य, इत्यादी विविध प्रकारच्या योजना राबवून सर्वसाधारण, दुर्बल व वंचित घटकातील मुलामुलींना मदतीचा हात देऊन शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्‌दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

याशिवाय शिक्षकाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षक प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाते. वर्षातून आवश्यकतेप्रमाणे या प्रशिक्षणाचा लाभ शिक्षकांना उपलब्ध करून देण्यात येतो. शिक्षण क्षेत्रातील नवीन बदलाची/प्रगतीची माहिती या प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षक/मुख्याध्यापकांना वेळोवेळी करून देऊन शिक्षकाची कार्यक्षमता वाढविणे हा त्यामागचा हेतू आहे. तसेच मुलांच्या गुणवता वाढीसाठी समाजाचा सहभाग असावा यासाठी स्थानिक पातळीवर विविध समित्यांची स्थापना करून समाजाचा देखील या कार्यात सहभाग घेण्यात येत आहे.

विद्यार्थी/शिक्षक, पालक, समाज या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्‌दिष्ट साध्य करण्याचा प्रामाणिक प्रयत्न शासन स्तरावरून होत असल्याचे दिसून येत असले तरी अपेक्षित यश प्राप्त झाले नाही ही वस्तुस्थिती आहे. शासनाचा उद्‌देश जरी चांगला असला तरी लक्ष्य प्राप्तीकरिता कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांची दिशा कुठेतरी चुकलेली आहे. त्यामुळेच परिणाम निराशाजनक आले.

सर्वसाधारण, दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना आवश्यक असणाऱ्या शैक्षणिक साहित्याची किंवा इतर गरजांची पूर्तता करू शकत नसल्यामुळे त्यांना नियमित शाळेत उपस्थित राहून शिक्षण घेण्यामध्ये अडचण निर्माण होते .ही त्यांची अडचण दूर करण्यासाठी शासनाने विविध योजना तयार करून त्याची अंमलबजावणी सुरू केली.

मात्र प्रत्यक्षात वर्गातील विद्यार्थ्यांची उपस्थिती म्हणजे नियमित शाळेत येणे व शाळेत टिकून राहणे ही बाब त्याला पुरविलेल्या शैक्षणिक साहित्यावर अवलंबून नसून शिक्षक-विद्यार्थी संबंध तसेच शिक्षक-विद्यार्थी यांची शालेय वेळेत होणारी नियमित व आनंददायी आंतरक्रिया यावर अवलंबून आहे. त्यामुळे शासनाकडून मिळणाऱ्या योजनांचा लाभ विद्यार्थी घेतो प्रसंगी याबाबत त्यांचे पालक झगडे, भांडण, तक्रारही करतात. मग चौकशी कामात शिक्षक, मुख्याध्यापक व पर्यवेक्षकीय यंत्रणा यांचा फार मोठा वेळ खर्च होतो. ज्या उद्‌देशासाठी या योजनांचा लाभ दिला जातो तो उद्‌देश तर सफल होत नाहीत उलट शिक्षण क्षेत्रातील अनेक घटकाचा वेळ खर्च होत असल्याने तोटाच अधिक होतो.

विद्यार्थी लाभाच्या विविध योजनांच्या परिणामाची जी स्थिती आहे. तीच स्थिती शिक्षक प्रशिक्षण, सभा, संमेलने व समाज सहभागासाठी स्थापन केलेल्या विविध समित्यांची आहे. शिक्षक प्रशिक्षणाचे आयोजन जरी चांगल्या उद्‌देशाने होत असले तरी प्रत्यक्षात त्याचा लाभ किती शिक्षक घेताात,हा संशोधनाचा विषय आहे. प्रशिक्षण, सभा, संमेलनाकरिता खर्च होणाऱ्या कालावधीत विद्यार्थी मात्र शिक्षक-विद्यार्थी आंतरक्रियेपासून वंचित राहतात अर्थातच त्याचा विपरित परिणाम विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होतो.

समाज सहभागासाठी स्थानिक पातळीवर स्थापन केलेल्या विविध समित्यांमध्ये राजकारण शिरल्यामुळे शाळा, विद्यार्थी,शिक्षक यांना सहकार्य करण्यापेक्षा झगडे, भांडणे, तक्रारीच अधिक होतात. तक्रारीच्या चौकशी करण्यामध्ये पर्यवेक्षकीय यंत्रणेचा अधिक वेळ खर्च होऊन मूळ शैक्षणिक कामाकडे दुर्लक्ष होते.

वरील विवेचनावरुन असे लक्षात येते की, शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी शासन स्तरावरून झालेल्या प्रयत्नांची दिशा कुठेतरी चुकलेली असल्यामुळे अपेक्षित लाभ झालेला नाही. हे प्रथम मान्य करून त्यात सुधारणात्मक बदल करणे गरजेचे आहे. तसेच शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची संख्या कमी करून शिक्षक, मुख्याध्यापक व पर्यवेक्षकीय यंत्रणेला या योजनाच्या अंमलबजावणीच्या जाचातून मुक्त करून त्यांचा संपूर्ण वेळ, परिश्रम अध्ययन अध्यापन प्रक्रियेकडे वळविता येईल. शिक्षक-मुख्याध्यापकाचे वारंवार होणारे प्रशिक्षण, सभा, संमेलने बंद करावे. जेणेकरून शिक्षक-मुख्याध्यापकांना सदैव शालेय वेळेत विद्यार्थ्यांसमवेत राहता येईल शिक्षक-मुख्याध्यापकांना प्रशिक्षण देणे जरूरीचे आहे असे वाटत असल्यास सुट्टीचे कालावधीत प्रशिक्षणाचे आयोजन करता येईल, किंवा तालुका स्तरावर शिक्षकांना त्यांच्या गरजेनुसार मार्गदर्शन करण्याची व्यवस्था करता येईल. असा प्रयोग मी स्वतः गटशिक्षणाधिकारी असताना केला होता. शिक्षकांसाठी स्थापन केलेल्या मार्गदर्शन केंद्रात शनिवारी, रविवारी सुट्टीचे दिवशी शैक्षणिक मार्गदर्शन घेण्यासाठी एकही शिक्षक उपस्थित झाला नाही. शेवटी सुट्टीचे दिवशी सुरू केलेले मार्गदर्शन केंद्र बंद करावे लागले. यावरून शिक्षकाला प्रशिक्षणाची किती गरज आहे हे लक्षात येते. त्यामुळे प्रशिक्षण सभा संमेलने यासाठी अनावश्यक खर्च होणारा वेळ व परिश्रम विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी वापरता येईल.

शिक्षण प्रक्रियेतील तिसरा घटक पालक/समाज सहभाग. विविध प्रकारच्या समित्या स्थापन करून झगडे, भांडण निर्माण करण्यापेक्षा गावातील सर्वच नागरिकांचे नियंत्रण व सहकार्य असावे. ज्या पालकाचे पाल्य शाळेत दाखल आहे त्या प्रत्येक पालकाला पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीबाबत विचारण्याचा अधिकार असावा यामुळे गावपातळीवरील आपसातील हेवेदावे संपुष्टात येऊन झगडे, भांडणं, तक्रारी कमी होऊन चौकशीसाठी व्यर्थ जाणारा वेळ व परिश्रम गुणवत्ता विकासासाठी उपयोगात आणता येईल.

शिक्षक-मुख्याध्यापक व पर्यवेक्षकीय यंत्रणा या घटकांचा अनावश्यक कामामध्ये (प्रत्यक्ष विद्यार्थी गुणवत्तेशी संबंधित नसलेल्या बाबींवर) खर्च होणारा वेळ व परिश्रमाची बचत झाल्यानंतर त्याचा नियोजनबद्ध पद्धतीने शैक्षणिक कामासाठी उपयोग केला तर शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणास गती मात्र निश्चितपणे देता येईल.

**कमी वेळेत व कमी परिश्रमात गुणवत्तेकडे जाण्याचा मार्ग**

शिक्षक, मुख्याध्यापक व पर्यवेक्षकीय यंत्रणा यांचा अनावश्यक कामामध्ये खर्च होणारा वेळ व परिश्रमाची बचत झाल्यानंतर लगेच 'अच्छे दिन' येणार नाहीत. तर बचत झालेल्या वेळेचा व परिश्रमाचा विचारपूर्वक व योग्य ठिकाणी उपयोग करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शिक्षण प्रक्रियेतील बालक, पालक, शिक्षक यामध्ये माझ्या मते अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक!

शिक्षण प्रक्रियेत इतर घटकांपेक्षा शिक्षकाचीच भूमिका महत्त्वाची आहे. शाळेतील शिक्षक बदलला की शाळांचे चित्र बदलते. हा बदल दोन्ही प्रकारचा असतो उत्कर्षाकडे नेणारा व अधोगतीकडे नेणारा, शाळेला उत्कर्षाकडे नेणाऱ्यांची संख्या कमी आहे. ती वाढविण्याची गरज आहे. यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे शिक्षकांचा अनावश्यक कामात खर्च होणारा वेळ व परिश्रमाची बचत झाल्यानंतर शाळेला अर्थात विद्यार्थ्यांना गुणवत्ता विकासाकडे नेणाऱ्यांची संख्या निश्चितच वाढेल अशी आशा बाळगण्यास हरकत नाही.

दर्जेदार शिक्षण, गुणवत्ता विकास असा शब्दप्रयोग आतापर्यंत वारंवार करण्यात आलेला आहे. पण दर्जेदार

शिक्षण,गुणवत्ता विकास म्हणजे नेमके काय? दर्जेदार शिक्षणाकडे, गुणवत्तापूर्ण शिक्षणाकडे आपण चाललो आहोत. म्हणजे आता आपण नेमके कुठे आहोत व गुणवत्ता शिक्षण किती दूर आहे, ते अंतर कधी पार करणार, त्यासाठी काय करावे लागणार? इत्यादी विचार साहजिकच आपल्या मनात निर्माण झाले असतील त्यातच कमी वेळेत व कमी परिश्रमात गुणवत्तेकडे जाण्याचा मी मार्ग सांगणार ! त्याची उत्सुकता वेगळीच.

कमी वेळेत व कमी परिश्रमात गुणवत्तेकडे जाण्यासाठी माझेजवळ वेगळा असा कोणताही मार्ग नाही किंवा एखादी जादूची काठी नाही. शिक्षण शास्त्रात गुणवत्ता विकासाचे जे मार्ग सांगितले आहेत, त्यापैकीच काही गोष्टींची मी आठवण करून देणार आहे शिक्षणशास्त्राव्यतिरिक्त कोणाला वेगळे काहीही सांगता येत नाही.

दर्जेदार शिक्षण किंवा विद्यार्थी गुणवत्ता विकास म्हणजे शासनाने प्रत्येक वर्गासाठी तयार केलेला अभ्यासक्रम, निर्धारित केलेले कौशल्य व क्षमता, त्या त्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांमध्ये पूर्णत्वाने विकसित करणे होय. शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे प्रत्येक शिक्षकांनी आपल्या वर्गाच्या अभ्यासक्रमाचा, निर्धारित केलेल्या कौशल्याचा, क्षमतांचा अभ्यास करून त्यानुसार आपल्या वर्गातील किती विद्यार्थी कोठे आहेत याचा जर तुलनात्मक अभ्यास केला तर अत्यंत विदारक परिस्थिती असल्याचे आपल्या लक्षात येईल.

वर्गातील आपल्या विद्यार्थ्यांमध्ये विविध विषयांची किमान कौशल्यही त्यांचेमध्ये विकसित झाले नसल्याचे आपल्या लक्षात येईल. गुणवत्ता विकास, दर्जेदार शिक्षण ह्या गोष्टी तर फार दूर आहेत. तथापि हार मानून चालणार नाही. समस्येचा सामना करण्याची तयारी ठेवावीच लागेल. असाध्य ते साध्य करीता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे. अभ्यासपूर्ण व परिणामकारक कृतीमुळे गुणवत्ता विकास शक्य आहे किमान त्याची सुरुवात तर करूया.

प्रत्येक कारखानदार, उद्योगपती, उत्पादक वस्तूंचे उत्पादन करीत असताना त्याच्या मनात सदैव एक विचार असतो व त्यादृष्टीने तो प्रयत्नशील असतो नव्हे त्याला प्रयत्नशील रहावेच लागते. तो विचार म्हणजे आपल्या कारखान्यात तयार होणारी वस्तू कमीत कमी खर्चात पण जास्तीत जास्त, आकर्षक टिकाऊ व दर्जेदार कशी तयार होईल, हा विचार जर त्यांनी केला नाही व त्याप्रमाणे प्रयत्नांचे सातत्य ठेवले नाही तर एक दिवस त्याला कारखाना बंद करावा लागेल.

शिक्षणामध्येदेखील हेच तत्व लागू पडते कमी वेळात व कमी परिश्रमात गुणवत्ता विकासाकडे कसे जाता येईल याचा शिक्षकांनी सतत विचार केला तर मार्ग नक्की सापडेल, मला सापडलेला एक मार्ग मी आपणासमोर ठेवत आहे.

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणातील तीन मुद्द्यांपैकी पहिला १००% पटनोंदणीचे उद्दिष्ट जवळपास पूर्ण झाले आहे. स्थलांतरित कुटुंबातील व ज्यांना निवासासाठी घर नाही अशी काही मुलं अजूनही शाळेत दाखल नाही. उर्वरित सर्व मुलांना शाळेत दाखल करून उद्दिष्टाप्रत पोहचलो आहे. प्रश्न आहे दुसऱ्या व तिसऱ्या मुद्द्याचा विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थिती व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा. नियमित उपस्थिती व गुणवत्तापूर्व शिक्षण या दोन मुद्द्यांचा अगदी जवळचा संबंध आहे. एक दुसऱ्यावर अवलंबून आहे. विद्यार्थ्यांची गुणवत्ता चांगली असेल तरच नियमित शाळेत उपस्थित राहतो. जर शाळेत नियमित उपस्थित राहत असेल तर गुणवत्ता चांगली असते या दोन्ही गोष्टी एकमेकांवर अवलंबून आहेत.

शासन, शाळा, समाज यांचकडूनही विद्यार्थी उपस्थिती वाढविणे करिता खूप प्रयत्न झाले. त्यामुळे काही प्रमाणात विद्यार्थी उपस्थितीत वाढही झाली. परंतु या उपस्थिती वाढीचा उपयोग मात्र गुणवत्तावाढीसाठी होत नाही असे माझे मत आहे. कारण विद्यार्थी उपस्थिती दोन प्रकारची असते.

१. केवळ शारीरिक उपस्थिती २. शारीरिक व मानसिक उपस्थिती पहिल्या प्रकारात विद्यार्थी केवळ शरीराने वर्गात उपस्थित असतो. मनाने तो वर्गाबाहेर असतो तर दुसऱ्या प्रकारात विद्यार्थी शरीराने व मनाने दोन्ही प्रकारे वर्गात उपस्थित असतो.

## १. केवळ शारीरिक उपस्थिती

शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच आई-वडील व शिक्षकांच्या आग्रहाखातर असे विद्यार्थी नाखुशीने वर्गात उपस्थित असतात. वर्गात असे विद्यार्थी दडपणात वावरत असतात, शाळेला सुट्टी कधी होते याची वाट बघत असतात. त्यांचे शिक्षकांच्या अध्यापनाकडे लक्ष नसते. मन बाहेर भटकत असते. फक्त शरीराने ते वर्गात उपस्थित असतात. अशा परिस्थितीत शिक्षक कितीही अभ्यासपूर्ण अध्यापन करीत असले तरी अशा विद्यार्थ्यांसाठी त्याचा काहीही उपयोग होत नाही.

## २. शारीरिक व मानसिक उपस्थिती

या प्रकारात विद्यार्थी शरीराने व मनाने दोन्ही प्रकारे वर्गात हजर असतो. शाळेत हजर राहण्यासाठी शिक्षक व पालक यांचेकडून आग्रह करण्याची आवश्यकता नसते असे विद्यार्थी स्वयंस्फूर्तीने अगदी नियमित व वेळेपूर्वीच शाळेत उपस्थित राहतात. हे विद्यार्थी वर्गात /शाळेत अगदी आनंदाने वावरत असतात त्यांच्या मनावर कोणतेही दडपण नसते. शाळेला सुट्टी झाल्यानंतर देखील शिक्षकांभोवती रेंगाळत राहतात. या विद्यार्थ्यांचे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत पूर्ण लक्ष असते. शिक्षक-विद्यार्थी यांचा आंतरक्रियेत अधिकाधिक सहभाग असल्यामुळे अध्ययनाची क्रिया सुलभ व गतीने होते.

विद्यार्थी उपस्थितीचे वर उल्लेख केल्याप्रमाणे दोन प्रकार पाहिल्यानंतर शारीरिक उपस्थितीचे मानसिक उपस्थितीमध्ये रूपांतर करण्याचा विचार आपल्या मनात येईल. तत्पूर्वी विद्यार्थी केवळ शरीरानेच वर्गात का उपस्थित राहतात. मनाने का नाही? याचा शोध घेणे जरूरीचे आहे.

प्रत्येक वर्गात सारख्या क्षमतेचे, गुणवत्तेचे विद्यार्थी असणे अपेक्षित आहे. परंतु दुर्दैवाने प्रत्यक्षात तसे नसतात. उदा. वर्ग ८ वी मध्ये शिकणारे सर्व विद्यार्थी वर्ग ७ वी मध्ये अभ्यासक्रमानुसार निर्धारित केलेल्या सर्व क्षमता आत्मसात केलेले असावे असे अपेक्षित आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र त्यातील २५% विद्यार्थी ७ वी च्या दर्जाचे असतात. २५% विद्यार्थी ६ वी च्या दर्जाचे असतााात,२५ % ५वी च्या दर्जाचे असतात तर २५% विद्यार्थी ३ री ४ च्या दर्जाचे देखील नसतात अशी अवस्था कमी-जास्त प्रमाणात सर्वच वर्गाची असते. शिक्षक अध्यापन मात्र ८ वी ला शासनाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाचे करतो. अशा परिस्थितीत शिक्षकाचे अध्यापन केवळ २५% विद्यार्थ्यांना उपयोगाचे, फार झाले तर पुढचे २५% विद्यार्थी (वर्ग ६ वी च्या दर्जाचे ) शिक्षकाचे अध्यापन समजून घेण्याचा प्रयत्न करतील. उर्वरित ५०% विद्यार्थ्यांचे काय? शिक्षकाचे विषय अध्यापन डोक्याचे वरून जात असल्यामुळे व त्याला काहीच कळत नसल्यामुळे वर्गात त्या विद्यार्थ्याचे मन लागेल का? शाळेत आपल्यासाठी काही नाही ही मानसिकता त्याची तयार होते शिवाय शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर या अभ्यासात कमजोर विद्यार्थ्यांना देता आले नाही. त्यामुळे शिक्षकाला होणारा मनःस्ताप इतर हुशार विद्यार्थ्यांकडून होणारी हेळसांड या सगळ्या गोष्टींचा एकत्र भडीमार होत असल्यामुळे तो खुशीने शाळेत कसा येईल? आपली अडचण/समस्या कोणालाही न सांगता या सर्व जाचातून सुटका कशी करून घेता येईल हा विचार सदैव त्याच्या मनात असतो. अशा परिस्थितीत विद्यार्थी केवळ पालकांच्या/शिक्षकांच्या आग्रहास्तव नाईलाजाने केवळ शरीराने वर्गात उपस्थित राहात असल्यामुळे त्याचे शिक्षण होत नाही.

विद्यार्थी कोणत्या कारणाने वर्गात मनाने उपस्थित राहू शकत नाही. याचे सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. यापेक्षाही अजून काही कारण असू शकतात त्याचा शोध शिक्षकांनी घेतला पाहिजे व त्यावर उपाययोजना करून अशा विद्यार्थ्यांची केवळ शारीरिक उपस्थितीचे मानसिक उपस्थितीमध्ये रूपांतरित करता येईल हे काम केवळ शिक्षक आणि शिक्षकच करू शकतो.

केवळ शरीराने वर्गात उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संदर्भात केलेल्या कारणमीमांसांमध्ये त्यावरील उपाययोजना दडलेल्या आहेत. प्रत्येक माणूस मग तो लहान असो की मोठा असो गरीब असो की श्रीमंत, आत्मसन्मान आत्मस्तुतीचा भुकेला असतो. असे मानसशास्त्र सांगते मात्र शाळेत केवळ शरीराने उपस्थित राहणा-या मुलामुलींच्या वाट्याला आत्मस्तुती, आत्मसन्मान कधीच येत नाही. बरं याला काही पैशाची देखील गरज नाही ही संधी त्यांना उपलब्ध करून देण्याचे कौशल्य शिक्षकांनी आत्मसात करावे.

सत्राचे सुरूवातीला वर्गातील सर्व विद्यार्थ्यांची वैधानिक चाचणी घेऊन प्रत्येक विद्यार्थ्यांचा स्तर निश्चित करावा त्यानुसार प्रत्येकाला त्याच्या आवश्यकतेनुसार (उदा. वर्ग ८ वी तील काही विद्यार्थ्यांना दोन अंकी संख्येची बेरीज येत नसेल तर दोन अंकी संख्येच्या बेरजेपासून) अध्यापनाची संधी अगदी प्रथमपासून आनंदाने उपलब्ध करून दिल्यास शाळेत/वर्गात आपल्याकडे देखील शिक्षकाचे लक्ष आहे. आपली देखील दखल वर्गात घेतली जाते ही भावना त्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होऊन हळूहळू त्याच्या शारीरिक उपस्थितीचे मानसिक उपस्थितीमध्ये रूपांतर होण्यास सुरुवात होते या शिवाय वर्गातील मुलांचा अपमान होणार नाही असेच वक्तव्य शिक्षकांनी करावे हुशार विद्यार्थ्यांकडून अभ्यासात कमजोर विद्यार्थ्यांची हेळसांड होणार नाही याची दक्षता घेणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी दिलेल्या उत्तराचा विचारलेल्या कोणत्याही प्रश्नाचा आनंदाने स्वीकार करून काही चूक असल्यास प्रेमाने समजावून सांगणे गरजेचे आहे. याचे कारण असे की, वर्गातील विद्यार्थ्यांना प्रमाण भाषेत विचारता येत नाही किंवा सांगताही येत नाही. तसेच काही विचारण्याचा, सांगण्याचा प्रयत्न केलाच तर वर्गातील इतर विद्यार्थी हसतील का? शिक्षक रागावतील का? एवढे प्रश्न त्याच्या मनात असल्यामुळे समस्या सांगण्याचा तो कधीच प्रयत्न करीत नाही ही बाब ओळखून शिक्षकांनी त्याच्या न बोलण्याच्या समस्येचा शोध घेऊन व त्यावर उपाय योजना करून अशा विद्यार्थ्यांना बोलते करावे. या सारख्या अशा विद्यार्थ्यांच्या अनेक सुप्त समस्या जाणून घेऊन त्यावर योग्य प्रकारे उपाययोजना केल्यानंतरच या अभ्यासात कमजोर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून मनाने शाळेत उपस्थित राहण्यापूर्वी प्रक्रियेला गती मिळते.

मानसिक उपस्थितीपेक्षा केवळ शरीराने वर्गात उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. या शारीरिक उपस्थितीचे रूपांतर मानसिक उपस्थितीमध्ये करण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न करण्यात आलेला नाही आणि म्हणून विद्यार्थी शाळेत उपस्थित असल्याचे वरवर दिसत असले तरी ते शाळाबाह्यच आहेत.

शिक्षणाची प्रक्रिया विद्यार्थ्यांमध्ये तेव्हाच सुरू होते जेव्हा विद्यार्थी स्वच्छेने व मनाने अध्ययन अध्यापन प्रक्रियेत सहभागी होतो. याला मानसशास्त्रीय आधार आहे. तेव्हा शिक्षक/मुख्याध्यापक/पर्यवेक्षकीय यंत्रणा यांनी या गोष्टीचा विचार करून कार्यवाही केली तर निश्चितच कमी वेळात व कमी परिश्रमामध्ये गुणवत्ता विकासाचे उद्‌दिष्ट गाठता येईल.

*****

# बालक - पालक आणि समाज

श्री. विजय भदाणे
राज्यमंडळ, पुणे
संपर्क : ९४२१८८६६२०

"वर्तनात परिवर्तन घडविणारी प्रक्रिया म्हणजे शिक्षण होय." अशी शिक्षणाची व्याख्या सर्वसाधारणपणे करता येईल. मानसिक जडण-घडण शिक्षणामुळे होते. सुसंस्कार घडविण्याची क्षमता शिक्षणात आहे. एक सुसंस्कारित, सुशिक्षित, सुजाण नागरिक शिक्षणामुळे घडत असतो की जो राष्ट्र विकासात मोलाची भर घालतो. चांगलं शिक्षण घेऊन राष्ट्राचे नाव जगाच्या पाठीवर नेणाऱ्या अनेक व्यक्ती भारतात जन्माला आल्या आहेत.

**दहावी आणि बारावी या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या, दिशा ठरविणाऱ्या ठरतात.**

आज-काल समाजात शिक्षणाच्या संकल्पना बदलल्या आहेत. काळ झपाट्याने बदलतो आहे. जीवनाच्याही संकल्पना बदलत आहेत. अनाठायी गोष्टींना समाजमान्यता मिळत आहे. विद्यार्थी-शिक्षक-पालक हे तीन मुख्य घटक शिक्षणप्रणालीत आहेत. हे तिन्ही घटक अलीकडे एकमेकांपासून दूर जात आहेत. एका शब्दात सांगायचं तर यांच्यातला एकमेकातील जिव्हाळा, ओलावा, काहीसा कमी होत असल्याचे भयावह चित्र निर्माण झालं आहे. याबाबत चिंतन करायची वेळ आली आहे.

थोडसं मागे वळून पाहिलं तर तीस-पस्तीस वर्षांपूर्वीचा शिक्षक-पालक आणि विद्यार्थी आता कुठेही आढळत नाही. त्याची काही कारणे प्रकर्षाने जाणवतात, शाळेत शिकविले जाते ते अधिकाधिक ज्ञान देण्यासाठी. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हे ध्येय असते. दहावी आणि बारावी या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या, दिशा ठरविणाऱ्या ठरतात. या महत्त्वाच्या दोन वर्षांमध्ये पालक व विद्यार्थी यांचा कल खाजगी शिकवणी वर्गाकडे असतो. यातही ज्यांचे शुल्क जास्त तो शिकवणी वर्ग चांगला किंवा ज्याची जास्त जाहिरात तो अधिक चांगला. या ठिकाणी शिकवणी घेणे किंवा लावणे यावर भाष्य करायचे नाहीए. परंतु शिकवणीचे फॅड किंवा पालकांचा निष्काळजीपणा याची खंत वाढते. खरंतर मुलगा शाळेतून घरी आल्यावर तासभर खेळायचा. मग रात्रीचे जेवण झाल्यावर पालक त्याचे गृहकाम करून घ्यायचे आणि मग त्याचा अभ्यासही घेतला जात असे. आजकाल बडे-बडे शिकवणी वर्ग लावले की आपण जबाबदारीतून मुक्त झालो अशी विचारधारा पालकांमध्ये रुजली आहे. वर्गात शिकविताना शिक्षक त्याच्या पद्धतीने विषयाशी समरस होऊन शिकविण्याचा प्रयत्न करतो, परंतु विद्यार्थ्याचे त्याच्या शिकविण्याकडे लक्ष नसते. एकतर तो धडा शिकवणी वर्गात शिकविलेला असतो किंवा शिकविला जाणार असल्याने विद्यार्थी जाणीवपूर्वक वर्गात दुर्लक्ष करतो. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद नाही म्हणून शिक्षकाचाही हिरमोड होतो. शाळेतली उपस्थिती अनिवार्य असल्यामुळे विद्यार्थी शाळेत शारीरिकदृष्ट्या

मारूनमुटकून उपस्थित राहतो असे म्हणावे लागेल. एकीकडे शाळांचे वर्ग ओस पडत चाललेत तर दुसरीकडे शिकवणी वर्गातील विद्यार्थीसंख्या शेकडोच्या घरात दिसते.

बदलत्या काळात म्हणा किंवा आजच्या धकाधकीच्या वेळापत्रकातही मुलांच्या अभ्यासासाठी वेळ काढला पाहिजे, हे मूल्य रुजणे खूप महत्त्वाचे आहे, या प्रक्रियेतून पाल्य-पालक संबंध वृद्धिंगत होत असतो. एकमेकातील प्रेम आणि आदरही वाढत असतो. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे मुलाची शैक्षणिक क्षमता आपल्याला लक्षात येते व त्याची पुढची दिशा ठरवता येते, शेवटी पोकळ भ्रमनिराशा पदरी पडत नाही. मी ठामपणे सांगेन की साधारणत: सत्तर टक्के पालकांना आपल्या पाल्याची बौद्धिक पातळी आणि क्षमता ठाऊक नसते. माझा मुलगा जाहिरातीतील मुलाएवढाच हुशार आहे. त्याला भरघोस गुण मिळतील असे एकांगी स्वप्नांचे इमले पालक बांधत असतात. मग पुढे जाऊन कुठेतरी अपयशाला सामोरे जावे लागते. यातून पालकांची मानसिकता बिघडते किंवा मुलगा हतबल होतो, त्याला प्रचंड नैराश्य येते. त्याचे दूरगामी परिणाम होताना आपण पाहिले आहेत.

दुसरी बाजू आहे गुणांची स्पर्धा ! या जीवघेण्या स्पर्धेमुळे विद्यार्थी ज्ञानार्जनापासून दूर जात आहे. विद्यार्थी ज्ञानार्थी नव्हे तर फक्त परीक्षार्थी उरला आहे. गुणपत्रिकेवर गुणांचे आकडे वाढत आहेत परंतु मुलभूत ज्ञान शिल्लकच राहिले नाही. अलीकडच्या काळात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घ्यायचा तर त्या-त्या विभागाची परीक्षा द्यावी लागते. या परीक्षांमध्ये घोकंपट्टी करणारे विद्यार्थी मागे पडतात. जे विद्यार्थी ज्ञानार्जनाच्या उद्देशाने सर्वंकष अभ्यास करतात त्याच विद्यार्थ्यांना चांगले गुण या परीक्षांमधून मिळतात. शालेय अभ्यासक्रमातील परीक्षेची पद्धत ही सर्वसमावेशक आहे. सर्व गटातील व क्षमतेच्या विद्यार्थ्यांचा विचार करून तयार केलेली आहे. ज्ञानरचनावादावर आधारित आहे. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला व धारणेला बळकटी देणारी आहे. विद्यार्थ्यांचे गुणांसाठी अभ्यास करणे घातक ठरत आहे. त्यामुळे वेळीच सावध होण्याची वेळ आली आहे.

सखोल ज्ञानाशिवाय उत्तुंग व्यक्तिमत्त्व घडू शकत नाही. पण दुर्दैवाने सखोल ज्ञानप्राप्तीसाठी समाजातून अभावानेच प्रयत्न होत असताना दिसतात. ज्ञानप्राप्तीसाठी गुणात्मक दर्जा वाढणे आवश्यक आहे. त्यासाठी समाजातील सर्वच स्तरातून प्रयत्न होण्याची गरज निर्माण झाली आहे. अपुरे ज्ञान व्यक्तिमत्त्वाला बाधा आणणारे असते, यामुळे व्यक्तिमत्त्व खुंटते. विद्यार्थ्यांना याची जाण नसते, तेव्हा पालकांनी आपल्या पाल्यापासूनच सुरुवात करावी. स्पर्धेच्या काळात सखोल ज्ञान प्राप्तीला पर्याय नाही. आजच्या इन्स्टन्टच्या काळात कठोर परिश्रमाला स्थान दिले जात असल्याचे दिसत नाही. सहज मिळवता आले तर मिळवावे ही भावना पाल्यांच्या मनातून घालविली गेली पाहिजे. यासाठी शाळेतील शिक्षकांनीही जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. पालकांनी पाल्यांकडून फक्त भरमसाठ गुणांची अपेक्षा न करता परिपूर्ण अभ्यास करण्याचा आग्रह धरला पाहिजे. समाजातून फक्त जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना हुशार समजले जाण्याची धारणा टाकली पाहिजे. राजकीय, सामाजिक व सर्वच स्तरातून शिक्षणातून सुजाण माणूस कसा घडेल याबाबत जाणीवपूर्वक प्रयत्न झाले तरच खऱ्या अर्थाने गुणवत्तापूर्ण शिक्षणाची प्रक्रिया पूर्ण होईल.

*****

# Our Obligntions to Environment

*Dr. D. G. Bhapkar*
Associate Dean (Education)
M. P. K. Vidyapeeth, Rahuri.

The deteriorating conditions of the natural resources and pollution of environment through reckless., continuous and ravage use to the point of extinction have brought in pessimism. Some have even gone to the extent of predicting doom's day. The cry is not totally unwarranted but it may be recalled that the early predicted environmental collapse in early 70s did not come about. There is no doubt degradation of congenial environment for human continuance. The modern technology has triggered richness of human life. Yet, proper balance of natural resources is not maintained. What is astonishing is apart from the illiterate masses, the educated have also not learnt about the quality of environment. The people badly need to be educated in integrated approach of ecology, sociology and economics.

*An economist has pinpointed the limited nature of our planet and called it a spaceship earth although we have resources, which can be wisely deployed unto thousands of years.*

Technologically advanced nations and their affluence spew out waste products that pollute air, poison waters and soils as also disturb atmospheric sounds, which are detrimental to the human health. With increased industrialisation and urbanisation, it is becoming difficult to mitigate the menace. Public awareness to undo harm or to keep exploiting to the minimum is the dire necessity. There is no use criticising technology since knowledge and technology can come handy to depollute nature to the greater extent though not to pristine purity. Schools and colleges can evolve methods to bring home the essentiality of holding nature in as undisturbed and rich condition as possible.

Man must live in harmony with nature not conquer it.

An economist has pinpointed the limited nature of our planet and called it a spaceship earth although we have resources, which can be wisely deployed unto thousands of years. With the asset of technology, there is no reason to become panicky but there is absolute necessity of understanding the situation and to adjust ourselves with nature.

About three lakhs of species of green plant and micro-organism are at work as primary producers giving out synthesised organic material, which is consumed by more than ten lakh other species. The cyclic reactions of most of the matters and elements permit human beings of their re-use. Bio-sphere has evolved a self regulatory system with internal checks and balances and thus developed a remarkable degree of homeostasis. Non-renewable resources are to be cautiously and wisely utilised. The man-made systems such as houses, factories, transport are not self-sustaining since they demand energy, cause pollution as compared to natural eco-system such as ponds, grass lands, forests, which have self-regulation and self-restoration.

Knowing well the growing harm pollutants can inflict the State Governments are waging steps to combat the affliction. Departments of Environmental Engineering are installed. Courses in environmental sciences are being imparted. New restrictions of treatment of released waste products of industries are imposed. As usual saga continues that the implementation of existent structures are not adhered to very regidly. In the realm of bringing more land under irrigation in a shorter span of time, a substantial proportion of good cultivated land is actually alienated from plough due to development of salinity and alkalinity.

We hear 16 hz (1 hz = l oscillation per second ) to 20,000 hz as lowest and highest frequencies. Sound waves propagate about 330 meters per second in air, 1468 m/sec in water and even faster in solids.

“Sound” is more objective and comprehensive denoting a range from an almost inaudible whisper to an explosion or a scream of a siren. Noise connotes lack of a pleasant musical quality or a disagreeable loudness. A phon scale is a logarithmic measure of perceived sound loudness. A sound pressure level of 120 decibels is considered to represent the pain threshold and an increase of 6 decibels indicates a doubling of sound pressure level.

A 'Phon' is a measure of loudness; the Sound Pressure Level at 1,000 cycles per second (cps), which is equally noisy as the perceived sound pressure level at another frequency. A sound pressure level of 92 dB at 20 cps has a “loudness” of 40 phons. Thus, whispering is 10-20 dB, normal conversation 60 dB, threshold of pain 130-140 dB.

People overexposed to noise cannot live in harmony. Besides, noise would cause ill-effect on other animals including fish or dog. Sonic boom may add fire to the already decimating effect on mankind and other animals.

Cacophony through automobiles and loud speakers with raucous music deeply affects human physiology. Noise pollution limit is quantified in decibel, which is only on the paper and is intruded very often in every day life.

Fertiliser factories are great culprits in excretion of poisonous substances for human life as well as sea fauna including fish. Not only fish growth is stagnated but fish contain more selenium, which is harmful to mankind on consumption of such fish. Chimneys of factories emit detrimental gases and solid particles.

Until recently, ocean was a symbol of unadulterated purity. Now, it has become a storage and dumping place of industrial waste, sewage sludge and rubbish disposals. As a result, sea water contains an alarmingly high proportion of paihogens, sulphuric acid, iron sulphate, mercury, radioactive materials, warm effluents, pesticides, oils, lead and what not.

Pollution menace emerging from reckless dumping of untreated wastes in rivers has endangered life since such water is drunk along the river banks. Release of urban drains in streams has brought in more serious problem of health hazards than accomplishing city sanitation. It is the moral and legal responsibility of every polluting industry to instal safeguard treatment plants.

Water pollution assumes a very serious form mainly because of industrial pollutants. Polluted water may carry human disease causal organisms. Like water, air pollution is also very intense because of the fall-outs from the heavy industries and automobile exhausts. Chemical adulterants of the air produces health hazards. Another very serious form of pollutant is the radio-isotopic accumulation.

Mankind is faced with an ecological crisis. The near collapsing quality of environment will have to be salvaged from the stalemate. Environmental pollution amounts to the unfavourable alteration of our surroundings through our doings. All the three media soil water and air are polluted through different agents to varying degrees. Introduction of heavy amounts of water into the soils which have not been furnished with drains, renders the soils unworthy for profitable cultivation. Chemical wastes are sometimes allowed to leach into the soils. Large quantities of chemical fertilisers are added to the cultivated soils. In the long run, the reckless administration of excessive doses of fertilisers will lead the soil to low productivity. Pesticides are very liberally used in control of pests and plant diseases, which also affect plants and animals,. Heibicidal effects are very much deteterious. Continuous cropping, non-addition of organic matter, elimination of legume

cultivation and mismanagement of lands are slow but sure ways of causing deterioration in soil fertility.

The man in the street is less aware or conscious to consequences of intensive use of fertilizers and pesticides than to the more visual dangers caused by industries. Dangers are equally existent and insidious although it is underestimated.

Change in from a "discarding economy" to a "cycling economy" is the need of the hour.

India has nearly 306 million hectares of land of which 46 percent is for agricultural use and 20 per cent is under forests. Conversion of forests to cultivated lands is rampant. Besides substantial area is transformed as non-agricuitural and devoted to industries and urbanisation. Deforestation is so prolific that it has come to give a blow on reduced precipitation, heavy erosion of soils and flooding of area, which engulf human dwellings.

Biological equilibrium is maintained in an ecosystem through the activities of producers, consumers and decomposers. Predator-prey system or the perasite-host system is selfregulatory. Human intervention is causing pseudoeco systems, which disturb balances in forests, water and wild-life, as well as, result in collapse of acquatic ecosystem. Man must strive an integrated approach to agriculture a synthesis of chemical and biological pest control, new methods of crop rotation, appropriate breeding programmes in plants and economic animals etc.

Land clearing has also resulted in reduced percolation of water through soil causing noncharging of underground water veins and consequently depleting ground water supply. Many times, illeffects of denuded soils resulted in configuration of scarred gullies, and heavy soil run-offs carrying clay particles. Thousands of years are required for formation of soils but no time is required to lose such a soil if kept unclothed vegetatively. Eventually, the quality of life deteriorates. Human being uses natural resources and leaves back wastes. Recycling of such organic wastes like agricultural residues throws a great challenge for human being to accept. Bio-degradation of city wastes is possible. Certain countries and people are enjoying excessive economic exploitation of natural resources. Usually, a common property is more prone to excessive exploitation. In cultivation of land, man must remember its obligation and follow the land ethic.

We must arouse and foster the environmental consciousness among the masses.

National committee on environmental, planning and coordination, felling trees

indiscriminately-filling the equilibrium with the environment and upsetting ecological balance.

Russia is developing a new type of motor fuel based on gas condensule. It will reduce Loxicity of waste gases by 30-40 per cent, the black content by half and cancerogetinc hydro- carbon by a third.

It is estimated that the world population at the beginning of the Paleolithic, about a million years ago, was 1,25,000 restricted mainly in the African region. About 3,00,000 years ago, which was mid Paleolithic period the population grew to a million spreading to Eurasia. Toward the end of the Paleolithic, about 25,000 years ago, when Neanderthal and Cro-Magnon man were both living, there were about three million people on the earth. Neanderthal man was exterminated by **Homo sapiens** (**Sapiens** meaning wise, intelligent, insightful, understanding). Population exploded to nearly 4 billion by now. At this geometric population growth, there would shortly be hardly any room for living let alone sustaining human life. Alternate sources of food will have to be researched. A cow weighing 250 kg synthesizes only a quarter kg of protein in a day while 250 kg of yeast organisms are said to produce 625 kg protein daily.

Population explosion has set in a chain of reactions such *as* geometric progression of population, shifting of people from rural to urban areas, availability of lesser and lesser resources for an individual in the sprawling cities, formation of bee lines for procurement of commodities, a very high degree of competition, disturbance in human relationship, opening of flood gate of human deficiencies, malnutrition, starvation, confrontations, goondaism, break up of law and order, spread of diseases etc. Thus, the social problems are interdependent with ecological conditions. The man is a member of global eco-system and not as its sole master. He must learn to live in harmony with the ecology and environment.

Man needs energy for his continuance and for the mannual work. With the escalation of technological take off, more and more energy is consumed serving human needs such in agriculture, transport, industries etc. The flora of the ecosystem depends on sun-light for synthesis of food. Man has depended increasingly more on fossil fuels (petrolium, coal and natural gas) and also other forms of energy such as heat and electricity. Thus, today we derive our energy resource from coal mines, oil wells, power plants and nuclear reactors. The developed countries have a very high per capita energy consumption. In India, daily per capita energy consumption is 6000 K calories and annual per capita gross national

production is worth 80 US dollars. Corresponding figures for Japan and USA are 40,000 K-cal and dollar 1404 and 230000 K-cal and dollar 4369 respectively. High standard of living does not necessarily mean a high quality of life. The man is exploiting more and more energy. In primitive age, he required 2-4 thousand K calories of energy per person per day. In predominantly agriculture societies, the energy reqired increased to the level of 2000 to 6000 K calories per person per day. Today in the USA, more than 230 thousand K calories energy is used per person per day. At no other time and no other place, have people utilised energy faster than Americans do today. They form 6 per cent of the world population but prodigiously utilise 35 per cent of the world's energy consumption. In India, energy consumption is less than 10 thousand K calories per person per day.

Whereas per capita GNP is a general indicator of certain meterial values, it is not necessarily a valid indicator of the quality of life

Fossil fuels are being utilised so extravagantly that in the next ten years, more petrolium and natural gas will be consumed than in the previous 100 years. The vast petrolium resources of the Middle East estimated at $350 \times 10^9$ barrels will last only 23 years at the present level of consumption. Coal reserves are enormous and will relatively last longer than petrolium resources. However, it posses the problem of extraction, which is hazardoes causing lung diseases in miners besides clouding a danger of accidents through fires or collapse. Coal as an energy source contributes air and water pollution as sulpherdioxide, soot and fly ash. Currently, nuclear energy consumption is relatively low but it would increase in the years to come. Reactors use the fuel as uranium 235, which release heat when it undergoes fission. Uranium releases about 20 thousand times more heat energy than obtainable from equivalent weight of coal. Nuclear energy is environmentally cleaner but it creates radio-active waste, which must be stored for thousands of years in leak proof chambers. Nuclear plants are also facing problems of fuel shortage in some countries.

The solar energy is virtually unlimited and non-polluting but it involves difficulties of capture and conversion to heat or electricity. On an average, solar radiation reaches the earth in amounts 15,000 calories per square metre per minute, which is equivalent to 9 million calories per square metre per day for 10 hours sunshine or more than 90 billion calories per hectare per day. The total solar energy striking the earth surface each day is equivalent to the energy of 684 billion tonnes of coal ($6.84 \times 10^{11}$ tonnes). Thus, solar energy striking Indian soil is about 15 minutes is sufficient to meet India's entire power

needs for one year provided it could be harnessed. The sunshine falling on any place in India on a sunny day in March or April is equivalent to the energy produced by all the-power plants in the entire world at peak per-formance. However, we lag behind in developing an efficient and practical way of utilising solar energy on a large scale. Provision for storing solar energy will have to be made. Solar energy can be utilised directly in heat conversion to water, indirectly conversion to electric power to thermal energy or by direct conversion to electricity through silicon or cadmium solar cells known as photo voltaic conversion.

Solar radiation serves as the source of incredible amount of energy. At sea level, the intensity of solar radiation averages 15,000 calories per sq m per minute, which amounts to more than 90 billion calories per hectare per day. Thus, the solar energy striking the earth surface each day is equivalent to the energy in 684 billion tonnes of coal. However, most of the solar energy striking the earth surface is scattered or transformed into heat. Plants absorb about *2* per cent and utilise only one per cent.

There are alternative sources of energy such as geothermal, tidal, wind, hydro electric and waste incineration. All these forms are mostly unlimited and have no polluting effect although they involve very high capital investment.

There are over two million different kinds of animals and plants. An ecosystem, which is an organisational unit of living organisms and non-living substances, comprises abiotic substances and organisms, some of which are producers, consumers or decomposers. Gross productivities of an ecosystem vary from 0.5 gram of dry organic matter (carbon compounds) to nearly 20 grams per square metre per day. Net productivities are half or less of the gross productivities. In nature, biogeochemical cycles accomplish the job of continuity of life.

Thus, ecological factors cannot be disregarded although we cannot support the prophecies of doom and gloom and raising of similar bogies. At the rate of 2 per cent of annual world's population growth, human population will increase seven fold in one century, then reaching 30 billion people, there is reason to heed warnings and plan pragmatically instead of becoming panicky and losing heart. The technology is sure to come handy to surpass the formidable job of healthy environment. In 1967, there were about 3-5 billion people on earth, each requiring about 10 kilo calories per year for life maintenance. Thus, against the food energy requirement of $3.5\times 10^{15}$ kilo calories the world's agriculture harvest for human consumption in the same year was $5.3 \times 10^{16}$ kilo calories. Nevertheless, the existence of disparities and ill distribution of resources have

remained to be contained. More attention needs to be focused, supported with fiscan allocations for developing new technologies to achieve the proper ecological balance.

It is claimed by some scientists that, ‘cultural man has been on earth for some 2,000,000 years-for over 99 per cent of this period, he would have lived as a hunter-gatherer. Only in the last 10,000 years, has man begun to domesticate plants and animals to use metals and to harness energy other than human body. Early man denoting pre-agricuiture stage, was a successful practising ecologist. He adapted to his environment, although it does not mean that the early man was a good conservationist. With the introduction of agriculture, the changes in soil and atmospheric factors were set in motion. Transpiration return from an acre of forest may reach 2,500 gallons per day, creating a natural system of water reuse. With the degradation of forests, the multitudinal repressive effects on the natural resources proliferated. This is the result of man’s ignorance in this regard of the laws of nature. The process of depletion is not on unabated but is accelerated greally. The thar desert has increased its size by 60,000 acres in the last 100 years. The green revolution in agriculture is offering some hope that trends of environmental destruction, which prevailed for many centuries can be reversed. Therefore, as expressed by one author, man must recognise necessity of cooperating with nature. He must temper his demand and use the natural living resources of this earth in a manner that alone can provide for the continuation of civilisation. Achievement will require the application of intelligence, imagination, courage, unselfish help, planning and prodigious efforts. The editors of the Johns Hopkins Magazine elaborated effects around the theme “war against suffering ” 2/3 of the human race lives in the underdeveloped world, drinking unsafe water, disposing wastes recklessly and living in unfit dwellings. Every living individual is afflicted with intestinal parasites. Half of the children never reach their fifth birth day. Most of these people are suffering from one or the other diseases. Thus, 2/3 of the worlds’ people live in countries, whose annual per capita income is 300. whereas in India -worlds’ largest democracy - it is less than 100. In Calcutta, the 77 per cent of the population has less than 40 sq ft of living space per person. It appears as if the mankind is engaged in a programme of self defeat. Therefore, a writer has observed “the human prospect is not an irrevocable death sentence; it is not an inevitable doom’s day, toward which we are headed, although the risk of enormous catastrophes exists.”

*****

# सूत्र संचालन : एक कला

*पारंपरिक शिक्षणापेक्षा जरा 'हट के' विचार करून जीवनासाठी आवश्यक कला म्हणून सूत्र संचालनाची ही ओळख*

**प्रा. दिलीप आ. जाधव**
महात्मा गांधी ज्युनिअर कॉलेज,
आष्टा, सांगली

**वक्तृत्व, कथाकथन, अभिनय या साऱ्या गोष्टीसाठी आवश्यक असलेले गुण सूत्रसंचालकाकडे असावे लागतात.**

## प्रस्तावना :

बदलत्या जगामध्ये कार्यक्रमप्रियता वाढली आहे. घरगुती, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक, आध्यात्मिक, व्यावसायिक अशा नानाविध स्वरूपाच्या कार्यक्रमांमध्ये अदृश्य जागा भरून काढण्यासाठी व कार्यक्रम शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी सूत्रसंचालन हे महत्त्वाचे क्षेत्र आहे. युवापिढीला ही कला अवगत व्हावी म्हणून सूत्रसंचालन व सादरीकरणाची कौशल्ये आत्मसात होणे ही काळाची गरज आहे.

प्राचीन परंपरा असलेल्या देशात निवेदकांची परंपरा आहे. महाभारतातील संजय हा उत्कृष्ट निवेदक होता. युद्धभूमीवरील वृत्तांत निवेदनाद्वारा धृतराष्ट्राला सांगत होता. संस्कृत नाटकात नाट्यसंहिता पुढे नेणारा सूत्रधार असे. सूत्रसंचालक हा यशस्वी सभेचा आत्मा असतो. महाभारतातील श्रीकृष्ण उत्कृष्ट सूत्र संचालक होता. 'सांगेन गोष्टी युक्तीचा चार' हे भगवान श्रीकृष्णाचे वचन यासंदर्भात महत्त्वाचे आहे. सूत्रसंचालन आज प्रत्येक क्षेत्राची गरज बनली आहे. कार्यक्रमातील व्यवस्थापन करणाऱ्याला सूत्रसंचालन या शास्त्राला समजून घेतलेच पाहिजे. सूत्रसंचालक ही एक कलासुद्धा आहे. तिचा विकास कसा करावा व ती आत्मसात कशी करावी याचे तंत्र जाणून घेतले पाहिजे.

## सूत्रसंचालन म्हणजे काय ?

सूत्रसंचालन या शब्दांचा अर्थ समजावून घेण्यासाठी 'सूत्रसंचालन' या शब्दाचा विग्रह करावा लागतो. सूत्र आणि संचालन या दोन शब्दापासून 'सूत्रसंचालन' हा शब्द तयार झाला आहे. 'सूत्र' या शब्दाचा अर्थ धागा, सूत, नियम व तत्त्व असा होतो. तर सूत्र या शब्दाचा दुसरा अर्थ संबंधित व माहितगार व्यक्ती असा होतो. 'संचालन' या शब्दाचा अर्थ धोरण अंमलात आणणे किंवा एखाद्या व्यवहाराचे मार्गदर्शन करण्याची क्रिया असा होतो. थोडक्यात 'सूत्रसंचालन म्हणजे माहितगार व्यक्तीद्वारे नियम व तत्त्वाने एखाद्या कार्याचे धोरण अंमलात आणण्यासाठी केलेली मार्गदर्शनाची एक क्रिया होय.'

कोणतीही गोष्ट साध्य करण्यासाठी त्याचा मनी ध्यास घ्यावा लागतो. सूत्रसंचालक (निवेदन) ही कला काही तासा दोन तासात साध्य होणारी कला नव्हे. वरकरणी साधं, सोपं आणि ग्लॅमरस दिसलं तरी प्रत्यक्षात तसं नसतं. हे काम जबाबदारीचं आहे. सूत्रसंचालन उरकण्याचा भाग नसून तो साकारण्याचा भाग आहे. एक चांगला सूत्रसंचालक होण्यासाठी काही गोष्टी आपणास माहिती हव्यात.

## पूर्वतयारी :

सूत्रसंचालनाची पूर्वतयारी ही सर्वांगाने होणे गरजेचे असते. त्यासाठी साधनेची आवश्यकता असते. जसं एखादी पाककृती करण्यासाठी विविध प्रकारचे मसाले हाताशी असणे गरजेचं असतं तसं उत्तम सूत्रसंचालक होण्यासाठी चौफेर माहिती हाताशी

असणं आवश्यक असतं. सूत्रसंचालन ही एक कला आहे. वक्तृत्व, कथाकथन, अभिनय या साऱ्या गोष्टीसाठी आवश्यक असलेले गुण सूत्रसंचालकाकडे असावे लागतात. कार्यक्रमपत्रिका नीट समजून घेऊन त्यानुसार निवेदनाची आखणी करावी. बारकाईने निरीक्षण करून शब्दसंपत्ती, सामान्यज्ञान, भाषाशैलीचा व्यासंग, हजरजबाबीपणा, प्रसंगानुरूप काव्याच्या ओळी, सुभाषिते, विनोदी चुटके, यांचा वापर निवेदनात करावा. त्यासाठी कार्यक्रमाचे स्वरूप समजावून घ्यावे. सकारात्मक दृष्टीने केलेले सूत्रसंचालन सर्वांचे मन जिंकते. आपला व सूत्रसंचालनाचा प्रभाव निर्माण करण्यासाठी तयारीचा सराव महत्त्वाचा आहे.

**चांगल्या सूत्रसंचालकाचे गुण :**

सूत्रसंचालनाच्या कलेला सर्वांसमोर ठेवण्यासाठी सूत्रसंचालक हा माध्यमाचे कार्य करतो. सूत्रसंचालकच सूत्रसंचालनास आकार देत असतो. म्हणून सूत्रसंचालकाच्या अंगी काही गुण असलेच पाहिजेत किंवा ज्यांना सूत्रसंचालन करावयाचे आहे त्यांनी हे गुण ग्रहण केले पाहिजेत.

कार्यक्रमात सूत्रसंचालन करणाऱ्या व्यक्तींना सामाजिक जीवनातील विविध कार्यक्रमाला सामोरे जाण्याची आणि त्या त्या कार्यक्रमांच्या उद्देशाची पूर्ती करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये पाहिजे. साहित्यसंमेलन, नाट्यसंमेलन, सत्कारसमारंभ, पुरस्कार वितरण, प्रचारसभा, शोकसभा, संगीतविषयक कार्यक्रम, ग्रंथ प्रकाशन इत्यादी कार्यक्रमात अलीकडच्या काळात सूत्रसंचालकांना इतके महत्त्व प्राप्त झाले आहे की सूत्रसंचालक नाही तो कार्यक्रम नाही ! अशी अवस्था आहे. म्हणून एक चांगला सूत्रसंचालक होणे गरजेचे आहे. एक सुसंस्कृत आणि सुहृदय सूत्रसंचालक होण्यासाठी काही गुणांची आवश्यकता आहे.

**भाषा प्रभुत्व :**

भाषेमुळेच संदेशवहन होत असते. भाषा ही संस्कृतीचे प्रतिक असते. 'दिसेल ते पुस्तक व भेटेल तो माणूस वाचण्याची सवय सूत्रसंचालकानं स्वत:ला लावली पाहिजे'. भाषेचे व्याकरण व भाषेतील शब्दांचा अर्थ यांची परिपूर्ण जाण असल्यास भाषेवर प्रभुत्व आहे असा त्याचा अर्थ होतो. वाक्यात स्वल्पविराम, उद्गारवाचक, पूर्णविराम यांची समज व त्यानुसार भाषेचे प्रकटीकरण करता आले पाहिजे. शब्दसंपत्ती वाढवण्यासाठी दक्ष असलं पाहिजे. विविध विषयाच्या संदर्भाचे भान, परिपूर्ण माहितीचा शब्दसाठा असावा. 'या हृदयीचे त्या हृदयी' घालण्याची सहजता हवी. खूप अलंकारिक भाषेचा वापर न करता प्रत्येकाला तुमच्या बोलीतून तुम्ही जवळचे वाटावे अशी ओघवत्या भाषेचा वापर करावा.

**अष्टावधानी :**

सूत्रसंचालक अष्टावधानी असावा. कार्यक्रम ठरलेल्या नियोजनाप्रमाणे व्हावे, असे वाटत असताना बऱ्याच गोष्टींचा प्रत्यय येतो. नैसर्गिक अथवा मानवनिर्मित बाबींना व्यत्यय येतो. कसलेला सूत्रसंचालक या बाबींवर मात करतो. कधी विजेचा व्यत्यय, कार्यक्रम उधळण्याचा कट, पदाधिकारी यांच्या चुकांचा परिणाम, यामुळे सर्वांना सांभाळून घेण्याचे आणि कार्यक्रम योग्य प्रकारे पार पाडण्याचे काम सूत्रसंचालकाला करावे लागते. प्रसंगावधान, हजरजबाबीपणा, समयसूचकता, ताज्या घडामोडींचे ज्ञान या कौशल्यांचा वापर करून मधे-मधे येणारे पाहुणे, चिठ्ठ्या इत्यादींचे स्वागत करावे लागते. त्यांचा सन्मान करावा लागतो.

**विनोद बुद्धी :**

दोन कार्यक्रमांना जोडणारा दुवा म्हणजे सूत्रसंचालक. हे सूत्रसंचालन यांत्रिक असेल तर कंटाळवाणे होते. श्रोत्यांचे अवधान टिकवण्यासाठी अधून-मधून विनोदाची पेरणी व्हावी लागते.

**प्रसन्न व्यक्तिमत्त्व :**

प्रसन्न चेहरा व मन दुसऱ्यालाही प्रसन्न करत असते म्हणून सूत्रसंचालकाकडे प्रसन्नता पाहिजेच. विनोबा भावे 'गीताई'

मध्ये म्हणतात की,

*प्रसन्नते सर्व, दुःखे जाती झडोनिया ।*
*प्रसन्नतेने बुद्धीची स्थिरता शीघ्र होतसे ।।*

सूत्रसंचालक हा कोणत्याही कार्यक्रमाचा महत्त्वाचा दुवा असतो. सर्वांशी समान वर्तन हा त्याचा स्थायीभाव हवा. सूत्रसंचालकाला जे काही मांडायचे आहे ते जर सुहास्य वदनाने मांडले तर त्याचा सकारात्मक प्रभाव निश्चित पडतो.

**प्रसंगावधान :**

कार्यक्रम कोणत्या प्रकारचा आहे याची सातत्याने आठवण असली पाहिजे. संगीतविषयक कार्यक्रम असेल तर संगीत घराणे, गुरू, शिष्य, परंपरा राग, यांची माहिती करून घेतली पाहिजे. गाण्याची मैफल असेल तर गाण्याच्या निर्मितीचे किस्से ज्ञात करून घेऊन निवेदन करताना मांडणी केली पाहिजे.

**हजरजबाबीपणा :**

हजरजबाबीपणामुळे सूत्रसंचालन उठून दिसे. हजरजबाबी असणे म्हणजे एखाद्या घडलेल्या घटनेवर, बोललेल्या वाक्यावर उत्स्फूर्तपणे दिलेली प्रतिक्रिया किंवा भाष्य होय. हजरजबाबीपणा हा गुण अंगी बाणवण्यासाठी शब्दांचा खजिना मोठ्या प्रमाणात आवश्यक असतो. एकाच शब्दाचे अनेक अर्थ माहीत असणे आवश्यक असणे. वक्त्याच्या बोलण्यातील शब्दाचा लगेच अर्थबोध झाला पाहिजे तरच हजरजबाबीपणा दाखविता येतो. जुन्या कल्पना टाळून नव्या कल्पना मांडताना शब्दांचा काळजीपूर्वक वापर केला गेला पाहिजे.

**कार्यक्रमाचा अभ्यास :**

सूत्रसंचालन करणाऱ्याने ज्या संस्थेचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्या संस्थेच्या कार्यक्रमाचा बारकाईने अभ्यास करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे ज्या उद्देशाच्या व्यक्ती संदर्भातील कार्यक्रम आहे. त्या व्यक्तींचा अभ्यास करावा. सत्कारमूर्ती, व्याख्याते, प्रमुख पाहुणे, उपस्थित मान्यवर इ. कार्यक्रमाचे नियोजन करावे. आवश्यकता असल्यास नोटस् काढाव्यात. समारंभाचा अभ्यास करावा. क्रमवार टिपणी व आपले निवेदनाचे टिपण करावे. कार्यक्रमाविषयी पूर्ण ज्ञान मिळविण्यासाठी आवश्यक धडपड व जागरूकता सूत्रसंचालकाकडे असावी लागते.

**श्रोत्यांचे मानसशास्त्र व समाजशास्त्राचा अभ्यास :**

सूत्रसंचालक बहुश्रुत असावा लागतो. त्याची समजशक्ती चांगली हवी, श्रोत्यांच्या समूहमनाची जाणीव सूत्रसंचालकांमध्ये असावी लागते. समूहाच्या भावना हळव्या असतात. सूत्रसंचालकाचे शब्दांच्या हिंदोळ्यावर भावना खालीवर होत असतात. आणि समूह मनास योग्य दिशेने नेऊन कार्यक्रमाचा उद्देश सफल करणे सूत्रसंचालकाच्या हाती असते.

**उत्कृष्ट वक्तृत्व :**

सूत्रसंचालकाचा महत्त्वाचा गुण म्हणजे त्याचे वक्तृत्व चांगले पाहिजे. आवाज ही नैसर्गिक देणगी आहे. माहितीपूर्ण व रंजक निवेदनाबरोबरच निवेदकाचा सुमधूर आवाज असेल तर निवेदन अधिक श्रवणीय होते. आपण एकाच वेळी व्यासपीठावरील मान्यवर व्यक्ती आणि श्रोते यांच्याशी बोलत असतो याचे भान असावे. शब्दांची स्पष्टता, आरोह–अवरोह, मोठा व आकर्षक आवाज आणि स्पष्ट उच्चार आवश्यक असतात. सूत्रसंचालकाकडे सभाधीटपणा आणि भाषणाची कला असावी लागते.

या गुणांबरोबरच स्मरणशक्ती, उत्तम अभिव्यक्ती, योग्य समन्वयदृष्टी, पोशाखाची निवड, देहबोली, शीघ्रकवित्व, वेळेचे नियोजन हे गुण असले पाहिजे. उत्कृष्ट सूत्रसंचालक हा प्रभावी सूत्रसंचालनाचे स्वप्न साकार करत असतो आणि कार्यक्रमाला आकार देत असतो. म्हणून प्रत्येक सूत्रसंचालकाकडे उपरोक्त गुण असले पाहिजेत.

*****

# विद्यार्थीकेंद्री शिक्षणातील शिक्षकांची भूमिका

सौ. राधिका देशमुख

काळाच्या प्रवाहाबाहेर शिक्षणपद्धतींकडे पाहण्याच्या दृष्टिकोन बदलत जातो. दृष्टिकोन बदलल्यावर शिक्षणपद्धतीतही योग्य ते बदल घडत जातात. पूर्वी शिक्षणप्रक्रियेमध्ये 'शिक्षण' हा केंद्रबिंदू मानला जात होता. कालांतराने अभ्यास विषयांना महत्त्व प्राप्त झाले. या गदारोळात ज्यांच्यासाठी शिक्षण द्यावयाचे, विषय शिकवायचे त्या विद्यार्थ्यांची कुणीच दखल घेत नव्हते. हळूहळू विचारवंतांना त्यातील दोष दिसू लागले. शिक्षणप्रक्रिया जर यशस्वीरीत्या राबवायची असेल तर मुलांना समजून घेतले पाहिजे. बालकांची कुवत, व्यक्तिभेद, त्यांच्या आकांक्षा व गरजा कोणकोणत्या आहेत हे लक्षात घेऊन त्यानुसार शिक्षण दिले पाहिजे. हा विचार पुढे आला व 'विद्यार्थीकेंद्रित' शिक्षण पद्धतीचा स्वीकार केला गेला.

**शिक्षक आणि विद्यार्थी हे शिक्षण प्रक्रियेतील दोन मूलभूत घटक आहेत.**

शस्त्राने प्रदेश जिंकता येतो पण मन जिंकता येत नाही
सत्तेने प्रशासन साधता येते पण माणूस उभा करता येत नाही
पैशाने माणूस विकत घेता येतो पण माणूस माणसाशी जोडता येत नाही
पण या साऱ्या गोष्टी साध्य होतात त्या केवळ शिक्षणाने.
शिक्षण हे माणसाला अधिक उन्नत करते, परिपूर्ण करते, त्याच्या वर्तनात परिवर्तन घडविते.

शिक्षण हे माणसाला पायापासून क्षितिजापर्यंत बघायला शिकवते. शिक्षणामुळेच माणसाच्या कौशल्यांचा गुणांचा विकास होतो. समाजातील साऱ्या विकृतीवरील एक आणि अंतिम उपाय म्हणजे संस्कारसंपन्न शिक्षण होय. शिक्षणाने आपल्या जीवनात सुसंगती, शिस्त निर्माण होते. व्यक्तीचा सर्वांगीण विकास, राष्ट्राची चौफेर प्रगती, समाजाचा सर्वांगीण अभ्युदय, सुप्त गुणांचा उत्तम विकास आणि भविष्याला आकार देणारी संस्कार संपन्न नि कर्तव्यनिष्ठा पिढी तयार करण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा कोणताही चिरस्थायी उपाय नाही. थोडक्यात देशाच्या सर्वांगीण अभ्युदयासाठीच शिक्षण.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणते. हे शिक्षण प्रक्रियेचे ध्येय आहे. शिक्षणाचा 'केंद्रबिंदू' विद्यार्थी आहे. तर शिक्षक शिक्षणाचा 'आत्मा' आहे. कारण शिक्षणाची प्रक्रिया शिक्षकांच्या सक्रिय सहकार्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही म्हणूनच शिक्षकांचे स्थान अनन्यसाधारण आहे.

"Teachers are the builders of nations"

शिक्षण समाज घडवणारे गुरू आहेत. प्राचीन काळी गुरूंना आईवडील देवाच्या स्थानी मानले आहे. गुरूंना विशेषार्थीने आचार्य, ज्ञानदाता, शिक्षक उपदेशक इत्यादीने संबोधले जाई.



आजच्या शिक्षण प्रणालीत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे महाविद्यालयाचे ध्येय आहे. समाज, पालक संस्थाचालक यांच्या अपेक्षा विद्यालयाशी व शिक्षकांशी निगडित आहेत. ह्या विद्यार्थीकेंद्री शिक्षणात शिक्षकांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. कुटुंबाला आधार देणारा समाजाची सेवा करणारा, राष्ट्राच्या कामी येणारा मानवाचा हितासाठी झटणारा माणूस केवळ शिक्षकच घडवू शकतो. विद्यार्थ्यांतील कलागुणांचा विकास, संस्काराची शिकवण, मानवी मूल्यांचे संक्रमण, स्वावलंबन, उद्योगप्रियता, श्रमप्रतिष्ठा याची जाण शिक्षकच प्रभावीपणे करू शकतो. वर्गाच्या चार भिंतीच्या आत व क्रीडांगणावर राष्ट्राचे भवितव्य आकार घेत असते. याचा शिक्षकच कल्पक, रचनाकार व शिल्पकार असतो. माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांनी म्हटल्याप्रमाणे मुलांवर संस्कार रुजविल्याचे काम आई, वडील व शिक्षकांनीच करणे आवश्यक आहे. आई-वडील मुलांना जन्म देतात. पोसतात, वाढवितात पण शिक्षक या बालपिढीला जीवनाची मूल्ये, जीवनाचा मार्ग दाखवितो म्हणून अंतिम यशाचा उद्गाता शिक्षकच आहे. पण हे सर्व साधण्यासाठी मुलांसमोर शिक्षणक्षेत्रात काम करण्याचा शिक्षकाचे वर्तन अतिशय चांगले व आदर्श असले पाहिजे. मूल्यांच्या संदर्भात 'Values are caught, they are not taught' असे म्हटले जाते.

मोठ्यांच्या चांगल्या वागण्यातूनच मुलांवर चांगले संस्कार रुजविले जातात. त्यासाठी शिक्षकांनाही चांगले घडले पाहिजे. विद्यार्थ्यांनाही अतिशय चांगले घडविले पाहिजे. मुलांना चांगले वळण लावणे, ज्यांना माणूस म्हणून घडविणे हे महत्त्वाचे काम शिक्षक करीत असतात. शिक्षक हे विद्यार्थ्यांचे स्फूर्तिस्थान, प्रेरणास्थान असतात. मुले जेव्हा शाळेत येतात. त्यावेळी त्यांना प्रेमळपणे समजवून घेणारे, त्यांच्या निकोप दृष्टीने पाहणारे त्यांच्यातील उणिवा शोधून योग्य मार्गदर्शन करणारे त्यांचा आत्मविश्वास वाढविणारे शिक्षक आज हवे आहेत. शिक्षकांच्या संस्कार प्रभावातून अनेक विद्यार्थी घडत असतात. झाडे जरी नैसर्गिकरीत्या आपल्या गतीने वाढत असली तरी त्यांना खतपाणी घालण्यास माळ्याची आवश्यकता असते. शिक्षक म्हणजे केवळ व्यवहार किंवा व्यवसाय नाही. शिक्षकाला विद्यार्थ्याचे सारे जीवनच घडवायचे असते.

आजच्या धकाधकीच्या जीवनात, अस्थिर परिस्थितीत आजचा विद्यार्थी मानसिकदृष्ट्या असुरक्षित आहे. भरकटलेला आहे. सभोवतालच्या अस्थिर परिस्थितीमुळे त्याच्या मनात सतत काहीतरी खदखदत असते. वाईट मुलांच्या संगतीमुळे त्यांचे वर्तन बिघडण्याची शक्यता असते. कधी मुले संघर्षाच्या कड्यावर उभी असतात. त्यांच्या मनात विचारांचे मोहोळ उठलेले असते. अशावेळी त्यांना समजून घेणारे, समस्यांतून मार्ग काढणारे, त्यांना योग्य सल्ला देणारे कुणीतरी हवे असते. निकोप जीवनदृष्टीची संथा देण्याचे कार्य शिक्षकाला करायचे आहे जो शिक्षक सतत विद्यार्थ्यांच्या हिताचे चिंतन करतो, जागरूक असतो तोच विद्यार्थ्यांमध्ये विधायक बदल घडवून आणतो.

'जीवनाच्या महासागरातून आपली जीवननौका हाकणाऱ्या खलाशांना महासागरात विखुरलेल्या दीपस्तंभामुळेच आपले मार्ग सापडत असतात.'

आजच्या ह्या विद्यार्थीकेंद्री शिक्षणप्रणालीत अध्यापन हा पोटार्थी धंदा नसून तो धर्म आहे. अध्यापन हे समर्पित भावनेने करावयाची उपासना आहे. ते केवळ उपजीविकेचे साधन नाही. तर देश उत्थानाचा ऐतिहासिक प्रयोग आहे. जी केवळ अक्षरओळख करून देणारी आणि चार गणिते, दोन कविता शिकवणारी शाळा नव्हे. नवी कर्तबगार पिढी घडविणारी प्रयोगशाळा आहे अशी भूमिका घेऊन काम करणारा शिक्षक असायला हवा.

*****

# Apathy of Educational Experts Regarding

## Improvement of Educational Standard

*Mrs. Vaishnavee V. Borgaonkar*
Koshatwar Daulatkhan High School and
Godhaairao Mukhare Jr. College, Pusad

### Introduction :

In these 50 years, the State Board has left no stone unturned as far as the efforts to improve the educational standards are concerned. National Curriculum Framework (NCF) aptly launched the concept of constructivity in 2005. Changes in the syllabii, training, different paper patterns, child-centred approach, constructivity with creativity could not bring about the desired change. Overflowing classrooms, lack of communication between teachers and teachers, teachers and students or teachers and the Board, exam-oriented mindset of students, teachers and parents etc. may be some of the causes. However one of the reasons behind the inability to reach the set target is the apathy of the experts regarding improving the educational standard.

**Experts should come out of their shells and contribute to their best.**

### Today's scenario :

Despite Board's praiseworthy efforts to elevate the level of schools or Junior Colleges, many schools in Maharashtra are facing severe problems. As few people are needed to rearrange the curriculum, frame the paper-pattern and question-papers, these works are done almost neatly. Valuation of S.S.C. and H.S.C. papers has been made compulsory. So the number of complaints has considerably decreased and due to new rules (e.g. Xerox), there has been transparency. However, for implementation of effective teaching, many experts are needed. In fact, experts are the backbone of all trainings.

### The need of experts :

Trainings are arranged with a definite purpose. Teachers also go there and should go there with a wish to acquire new knowledge, update information, new learning and teaching methods, expectation of exchange of educational precepts and to know the

objectives set by the educationists. Only the expert teachers have the ability to quench everybody's thirst for knowledge. So these experts should come out of their shells and contribute to their best.

## Trainings :

Regularly the Board arranges trainings at State, Divisional and District levels. The trainings of state level are mostly satisfying, standard and pleasant too. Even the lodging and the cuisine are satisfactory. The experts are talented and give full justice to the completion of their mission truly justifying the fact that 'Teaching is a mission, not a profession'.

Those who attend the state level trainings are generally called on the basis of their experiences. Does talent always accompany experience ? Do they absorb the knowledge imparted or is it mere adsorption ? Can they really prepare those who work at District levels ? Some do try their best and gladden the hungry hearts and brains. But some fail at the Divisional level. So the trainees at Divisional level don't have adquate information to transfer to the ones who will work at district level and it hurts.

Those who attend trainings find them monotonous, tiresome, boring, painful and less useful. They are unwilling to attend. Many come late, next day or two days after and yawn on the last benches. Some come only for certificates. Much time, money and efforts go in vain.

## Unwillingness of experts :

Many talented minds are working in cities, town or even in far off villages. Some wish to work and have the ability too. But the Board doesn't know them. Headmasters or principals don't readily send them as school work suffers. Some experts at the divisional level are forced to work even at the District level due to absence of some teacher - experts. They grumble. Often these experts are experienced and careless for the monetary gain. If they are above 45 or 50, they have their age - problems and find themselves unfit to work. In changed surroundings. Some are called merely on the basis of experience and have no talent or knowledge. So either they don't go or they fail if they go. Trainees don't allow them to teach and literally vacate the classroom. The main reason appears to be 'no wish' to work beyond the utmost necessity.

**Remedial measures :**

The Board should take a test and select (good) experts. The experts should be informed two months earlier. None wants to spoil the precious planned holiday - programmes. Young, talented and devoted teachers should be preferred. Age or experience should not be the criterion for selection. The Borad can also take the help of some lecturers from senior colleges who are enthusiastic and love teaching. (at least for subject - trainings). Primary, High School and Jr. College teachers should work in harmony. Many Jr. Colleges are attached to schools. Experience of Jr. College teachers can be useful to High School teachers for clarifying ideas about the subject. No 'expert' should be recommended because he has contacts with some VIP officials. There should be a rapport between the Board and the experts.

**Conclusion :**

We are shaping the destiny of the country. So the experts should come forward and generously impart their skills and knowledge to others. Only if good experts contribute from heart, the trainings will be uploaded with healthy discussions, lively practicals, qualitative approach, neatly planned resource material (provided in advance) just evaluation after completion of the trainings and even parents participation schools will come to know about the curricular and co-curricular activities of one another and learn new things. Constructivity and creativity will go hand in hand. The educational standard will improve when the experts will take keen interest and put their heart and soul in the work.

*****

## निवेदन

सर्व मुख्याध्यापक, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी, विषयतज्ज्ञ, शिक्षण प्रेमी यांना आवाहन करण्यात येते की, मंडळाकडून 'शिक्षण संक्रमण' हा अंक दरमहा प्रकाशित केला जातो. शिक्षण संक्रमण मासिकाच्या सर्व वाचकांनी अंकाबाबतची आपली **प्रतिक्रिया** मंडळाकडे मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं. ८३२-ए, फायनल प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटमागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ येथे पाठवाव्यात. प्राप्त झालेल्या प्रतिक्रियांना या मासिकातून प्रसिद्धी देण्यात येईल.

# TEACHING ENGLISH GRAMMAR IN SECONDARY & HIGHER SECONDARY LEVEL

*Dr. Samuel Roy*
*Member of Board of Studies, Maharashtra state*
*Mobile 9420446581*

## 1) INTRODUCTION :

Teaching English Grammar in Secondary and Higher secondary level is a great task now, when speaking and writing effectively is probably more important today than ever before. While the importance of communication skills increases, many students find it difficult to set about acquiring them. So the Secondary and Higher Secondary teachers of English should try to teach the 'nuts and bolts' of language to the students first. The 'nuts and bolts' of English language is its grammar, spelling, punctuation and pronunciation, which should be taught in a user-friendly style with an emphasis on practical problem-solving method. Therefore the teachers should apply the three principles consistently in the Grammar classes-those of Explanation, Exemplification, and Examination.

To many students, grammar appears threatening and even impossible to understand. This is often because of the way in which it has been presented to them. Grammar is a set of rules which describe how a language works. The rules which describe how words are arranged to make sentences. The technical name for this is "Syntax". eg

**'The Cat Sat on the Mat'**

The rules which describe how words are changed to fit into sentences are called "morphology", which explains why these following two sentences have different meaning; e.g.:

**'The Cat Sat On the Mat' 'The Cat Sits On the Mat'.**

## 2) STRUCTURAL GRAMMAR :

The term **'Structural Grammar'** was originally introduced by Noam Chomsky. It is otherwise known as 'Constituency grammar' In Linguistics, phrase,' structure grammars ' are all those grammars that are based on the Constituency relation, as opposed to the dependency relation associated with dependency grammars. The fundamental trait is that these frameworks share the sentence structure in terms of the constituency relation. The constituency relation derives from the subject-predicate division of Latin and Greek grammars that is based on logic. Basic 'clauses' structure is understood in terms of a binary division of the clause into subject (Noun phrase) and predicate (verb phrase).

In 1957' **Noam Chomsky** published 'syntactic structures', in which he developed the idea that each sentence in a language, has two levels of representation- a deep structure represent the core semantic relations of a sentence and mapped on to the surface structures which

followed the phonological form the sentence. Structural grammar describes on the analysis of the description of the "structure" of the sentence. The conventional way of presenting English grammar in terms of structure has a certain drawback in itself. In such a grammar, notions of time may be dealt within as many as four different places: under the tense of the verb, under time adverb, under prepositional phrases denoting time, and under temporal conjunctions and clauses. The student who is primarily interested in making use of the language rather than in learning about its structure is not likely to find such an arrangement particularly helpful.

## 3) FUNCTIONAL GRAMMAR

Functional theories of grammar are those approaches to the study of language that see the function of language and its elements to be the key in structures. Functional theories of language propose that since language is fundamentally a tool, it is reasonable to assume that its structures are best analyzed and understood with reference to the function they carry out. It differs from the formal theories of grammar, in that the latter seeks to define the different elements of language and describe the way they relate to each other as systems of formal rules or operations, whereas the former defines the functions performed by language and then relates these functions to the linguistic elements that carry them out. This means that functional theories of grammar tend to pay attention to the way language is actually used in communicative context, and not just to the formal relations between linguistic elements. Functional English grammar provides second language teachers with a functional description of English grammar in which grammar is viewed not as a set of rules but as a communicative resource. It explores ways in which English grammar enables speakers and writers to represent their experience of the world, to interact with one another and to create coherent messages.

## 4) COMMUNICATIVE GRAMMAR :

It is sometimes argued that grammar is not important in a communicative approach to language. Communicative competence is composed minimally of grammatical competence, socio-linguistic competence, and communication strategies. There is no strong theoretical or empirical motivation for the view that grammatical competence is very more or less crucial to competence or strategic competence. The primary goal of a communicative approach must be to facilitate the integration of these types of knowledge for the learner, an outcome that is not likely to result from over emphasis on one form of competence over the other throughout a second language programme.

We, as teachers of English expect students to Improve and extend their range of competence and their use of communication strategies in the language, eventhough we believe in the **"grammar fatigue"** in them. The student may therefore benefit from looking at grammar from another angle, where grammatical structures are systematically related to meaning, use and situations. In this way we expect students to improve and extend their range of competence and their use of communication strategies in the language. An important element in the

communicative approach is the student's ability to use and understand the spoken language. Communication is not a simple process. It is helpful to think of four circles one inside another, representing different kinds of meaning function and the different ways of organizing such functions, The first circle is that of notional or conceptual meaning. Here we find the basic meaning categories of grammar. The second circle represents logical aspects of communication. The third circle involves the social dimension of communication, relating grammar to the attitudes and behavior of speaker and hearer. At the speaker's end language expresses attitudes and emotions, and is a means of carrying out social goals. At the receiving end, language can control or influence the actions and attitudes of the learner. This 'controlling' aspect of communication is performed through such speech acts as commanding, requesting, advising, promising etc. Although the logical aspect of meaning is made use of it is extended or perhaps even 'distorted 'to perform different kinds of social function. The fourth circle deals with the organization of communication.

English, like other languages, makes use of two channels: speech and writing. They have different transmission systems. Speech is transmitted by sound -waves, originated in speaking and received in hearing. Writing is transmitted by letters and other visible marks, produced in writing and received in reading. Good, all-round communicative competence involves all four skills: speaking and writing ( production), learning and reading (reception). Spoken and written English do not have different grammars , but the shared English grammar is used differently on the two channels. Spoken language is the most widely used form of language. Normal speech is processed in real time and is transitory, leaving no trace other than what we may remember. Writing, on the other hand, take longer to produce and can be read not just once but many times. Writing leaves permanent record. Spoken communication requires fast, almost instantaneous production and understanding. When we write, we usually have time to revise, check and re- write what we have written. Likewise, when we receive a piece of writing we can read it, re-read it, ponder over it and discuss it.

## 5) CONCLUSION :

The English language has an increasingly influential position in the world. In all, English has official or special status in at least 75 countries ( with a combined population of 2.5 billion people.). It is estimated that one out of four people worldwide speak English with some degree of competence. The new English speaking communities have filled gaps in vocabulary, not only by borrowing and by loan translation from the language they encountered, but also by the creation of new English words and phrases. So we can only speculate that the English language will continue to respond in dynamic and unpredictable ways as its use increases across the world. In short, we the English language teachers should concentrate more on the communicative skills to **tight the 'nuts and bolts'** of the language for the improvement of our students.

*****

# शिक्षण : सामाजिक परिवर्तनाचे साधन

प्रा. बबन य. माळी
संपर्क : ९४२१२३४०३४

*मन शुद्‌ध तुझं*
*गोष्ट आहे पृथ्वीमोलाची*
*तू चाल पुढं*
*तुला रं गड्या*
*भिती कुणाची ।।*

**म**न ही अशी गोष्ट आहे, जी अवयवरूपात शरीरात नाही, पण या मनावरच मानवी आयुष्य साकारलं जातं. मनाचा मोठेपणा, मनाची अलवार स्फुलिंगे असे अनेक शब्द आपण वारंवार वापरतो. पण मन चांगलं असणं यालाच शुद्‌ध चारित्र्य म्हणावे असे माझे मत आहे. या मनालाच घडवण्याची धडपड मुलाच्या आई-वडिलांपासून ते समाजातील अनेक लोक जे अप्रत्यक्षपणे त्या मुलाशी बांधील असतात, हे सर्वजण अगदी मनापासून करीत असतात. यातील एक घटक म्हणजे शिक्षण! शिक्षण फक्त शाळेतील - या अर्थाने नसून अनुभव, निरीक्षण, श्रम, संस्कार या साऱ्या गोष्टींशी शिक्षणाचा संबंध असतो असा व्यापक अर्थ मला अभिप्रेत आहे.

**शिक्षण आणि चारित्र्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.**

शिक्षण याचा अर्थच असा आहे की, प्रत्येक क्षणी नवं आत्मसात करणं, नवं शिकणं म्हणजे शिक्षण. शिक्षणातून स्वत:चा आणि समाजाचा विकास व्हावा, सामाजिक परिवर्तन घडावं. रूढी, परंपरा, अंधश्रद्‌धा यातून समाजानं मुक्त व्हावं.

खरं तर शिक्षण आणि चारित्र्य याचा संबंध एकरूपतेचा आहे. शिक्षण आणि चारित्र्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. चारित्र्याशिवाय शिक्षण कवडीमोलाचं आहे. चारित्र्य म्हणजे शील, सदाचरण, उच्च नैतिक मूल्ये, सद्‌वर्तन, सद्‌विचारी, शीलवंत अशा विविध अर्थाने हा शब्द आपण वापरतो. महाकवी गटे यांनी निश्चयात्मक वर्तनास चारित्र्याचे प्रमुख लक्षण मानले आहे. तर अनेकविध प्रेरणांचा मेळ घालून त्यांचा सुसंवाद साधणारा 'स्व' किंवा 'अहम' म्हणजे चारित्र्य असे मानतात. पुराणामध्ये धर्म, सत्य, सदाचार, बल आणि संपत्ती या पंच गुणांचा मिलाप म्हणजे शील आणि शील म्हणजे शुद्‌ध चारित्र्य असा उल्लेख आढळतो.

चारित्र्य संपन्न व्यक्ती आपल्या प्रेरणांवर नियंत्रण ठेवून विशिष्ट धोरणाने वागते. उलट चारित्र्याबाबत दुबळ्या असणाऱ्या माणसाच्या मनामध्ये प्रेरणांची रस्सीखेच चालते. चारित्र्यसंपन्न मनुष्य स्थिर वृत्तीचा असतो. इतर व्यक्तींच्या प्रभावाने तो भारून जात नाही. स्वत: निश्चित केलेल्या मार्गापासून तो सहसा ढळत नाही.

माणूस कितीही मोठा ज्ञानी असला आणि तो चारित्र्यसंपन्न नसेल तर त्याच्या ज्ञानाला किंमत नसते. हिरा रंगीत दगडच असतो पण जेव्हा त्यावर पैलू पडतात तेव्हाच त्याचे सौंदर्य वाढते आणि मूल्यही वाढते.

यशस्वी जीवनाचा पाया हा चारित्र्यावरच अवलंबून आहे. चारित्र्यहीन जीवन अनेक मजली असले तरी ते पत्त्याच्या बंगल्यासारखे कोसळून पडायला वेळ लागत नाही. कोणत्याही राष्ट्राची उन्नती ही त्या राष्ट्रातील चारित्र्यसंपन्न नागरिकावरच अवलंबून असते. म्हणून अशा चारित्र्यसंपन्न व्यक्ती निर्माण करण्याची जबाबदारी हेतूपूर्वक शिक्षणाने साधायला हवी. श्रवण, भाषण, वाचन, लेखन या मूलभूत शैक्षणिक कौशल्यातील पारंगतता म्हणजे शिक्षण नव्हे. चारित्र्यसंपन्न नागरिक घडविणे ही शिक्षणाची मूलभूत जबाबदारी आहे.

आज जगाचा ओढा चंगळवादाकडे अधिक आहे. भौतिक सुखप्राप्ती हाच यशस्वी जीवनाचा मूलमंत्र असे समजले जात आहे. आपणास भुलवणारी अनेक अमिषे आज जागोजागी आहेत. त्यातूनच व्यसनाधीनता, कुकर्म, भ्रष्टाचार या गोष्टी अगदी सहजपणे आपण स्वीकारतो. जीवनातील जाणीवसंपन्नता नष्ट होऊन बेगडी आवरणे चढवली जात आहेत. यातून जर सुटका व्हायची असेल तर चारित्र्यसंपन्न शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे.

आजकाल सामूहिक बलात्काराच्या घटना इतक्या घडताना दिसतात की याचा विचार करताना आपली मती खुंटते. मग त्या नराधमांनी कोणत्या ना कोणत्या तरी शाळा-महाविद्यालयातूनच शिक्षण घेतले होते ना ? मग ते असे का वागले आणि वागतात ? याचा स्पष्ट अर्थ आहे, आजचे शिक्षण हे चारित्र्यनिर्मितीसाठी कुठेतरी कमी पडत असावे, अन्याय, अत्याचार, गुंडशाही, खून, दरोडे, मारामाऱ्या, फसवेगिरी, लाचारी, चंगळवाद या आणि अशा अनेक घटना आणि दृश्ये विद्यार्थी प्रसारमाध्यमातून पाहतो, वाचतो आणि कधी-कधी त्या घडतानाचा साक्षीदारही असतो. मग यापासून दूर राहण्यासाठी त्याला चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्वाची गरज आहे. माणूस ही जात आणि मानवता हा धर्म त्याला कळावा, तो चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्वाचा आदर्श नागरिक घडावा म्हणून चारित्र्यनिर्मितीचे शिक्षण महत्त्वाचे वाटते. सुसंस्कारातून ज्ञान आणि ज्ञानातून सर्वांगीण विकास, त्यातून समाजपरिवर्तन आणि समाजपरिवर्तनातून नव्या आदर्श समाज उभारणीच्या कामी आजच्या शिक्षणामध्ये चारित्र्यनिर्मितीसाठी शिक्षण ही काळाची गरज आहे.

घर, शाळा व समाजातील वातावरण चांगल्या चारित्र्याच्या विकासास पोषक हवे. मुलांच्या सद्वर्तनास भरपूर संधी हवी. प्रार्थना, संमेलने, चित्रपट, सभा, विशेष कार्यक्रम, वाङ्मय, आदर्श व्यक्तीचे चरित्रवाचन, वडीलांचा धाक, आईची प्रेमळ हाक आणि शिक्षकांनी पाठीवर मारलेली शाबासकीची थाप यातून विद्यार्थी घडतो. त्याला संस्काराची संजीवनी मिळते. सद्वर्तनी मुलांची नेहमी प्रशंसा करावी. त्यांना पारितोषिके द्यावीत. शाळेत आदर्श विद्यार्थ्यांची निवड करावी. नैतिक स्थिरभाव निर्माण करावेत. त्यासाठी सूचना व अनुकरणे याचा उपयोग करावा. उदा. कर्णाचे औदार्य, रामाचे एकवचनी व्रत इ. उदाहरणे द्यावीत. शाळेतील संस्कारक्षम कथातूनही नैतिक स्थिरभाव आणि शीलसंवर्धनाचे धडे द्यावेत.

स्थिर भावांचा चारित्र्याशी फार निकटचा संबंध आहे. चारित्र्याला जोम व स्थैर्य आणण्याचे कार्य स्थिरभाव करतात. या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा स्थिरभाव म्हणजे अहंभाव होय. हा स्थिरभाव सर्व स्थिरभावात नियंत्रण ठेवून व्यक्तीच्या आचरणात सुसंगती आणतो. 'मी अमुक आहे!' ही भावना किंवा अस्मिता जीवनावर प्रभुत्व गाजविते. इतरांचे अभिप्राय, मते, अपेक्षा, स्वत:ला मिळालेले यश यातून आत्मविषयक स्थिरप्रवृत्ती दृढ होत जातात. व्यक्ती हळूहळू स्वत:ची एक आदर्श कल्पना करते. या आदर्शाचे पालन हेच जीवन सर्वत्र ठरते. ही आत्मविषयक स्थिर प्रवृत्ती जीवनावर प्रभुत्व गाजविते. कर्तव्य, निष्ठा, धनप्राप्ती, पत्नीप्रेम, देशप्रेम इ. स्थिरवृत्तींच्या साहाय्याने चारित्र्य घडते. विद्यार्थ्यांच्या चारित्र्याचा विकास व्हावा म्हणून त्यांच्यासमोर अनुकरणीय आदर्श हवेत.

'समाजरचनेत घडून येणारा बदल हा सामाजिक परिवर्तनाचा मूलभूत अर्थ आहे' असे डॉ. हॅरी जॉन्सन म्हणतात. आता समाजरचनेत बदल घडून यायचा असेल तर तो प्रथम प्रत्येकाच्या घरात म्हणजे घरातील व्यक्तीत होणे गरजेचे आहे. विद्यार्थी त्याला अपवाद कसे असतील ? समाज परिवर्तनामध्ये रुढी, परंपरा, अंधश्रद्धा, अज्ञान, दुष्ट प्रवृत्ती हे सर्व काळाच्या कसोटीवर तपासून पाहणारा विद्यार्थी घडवायचा असेल तर तो चारित्र्यसंपन्न हवा. यासाठी त्याला विद्यार्थीदशेतच असे शिक्षण द्यायला हवे. विद्यार्थी चारित्र्यसंपन्न व्हावा यासाठी शिक्षणात थोरा-मोठ्यांच्या आदर्शाचा मोठ्या प्रमाणात समावेश होणे गरजेचे वाटते. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जयंत नारळीकर, यशवंतराव चव्हाण, लालबहादूर शास्त्री, छत्रपती शिवाजी महाराज, म. फुले, सावित्रीबाई फुले, मदर तेरेसा या आणि अशा कितीतरी कर्तृत्ववान आणि चारित्र्यसंपन्न व्यक्तींचे आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवता येतील. कारण थोर माणसं ही चारित्र्यसंपन्न असतात. शीलवंत असतात.

बहिणाबाईंसारखी एक निरक्षर स्त्री, चार ओळीत जीवन जगण्याचं तत्त्वज्ञान मांडते आणि अनेक शिक्षणतज्ज्ञ तिच्या कवितांवर आपले मांडे आजही भाजतात. तिने मांडलेले तीन-चार ओळीतील भाष्य भाषाशास्त्रालाही चकित करून सोडते. तिने भलेही लिपीचे शिक्षण घेतले नव्हते पण नीतिमत्ता ती उगाळून प्यायली होती हे मात्र नक्की.

शिक्षण हे जेव्हा आपण सामाजिक परिवर्तनाचे साधन मानतो तेव्हा त्या शिक्षणात मूल्यशिक्षण तेही चारित्र्यनिर्मितीसाठी शिक्षण विद्यार्थ्यांना देणे ही आजच्या काळाची गरज वाटते.

जीवनातील शिक्षणाची विभागणी दोन विभागात मानतात. जीवनासाठी तयारी करावयास लागणारा काळ आणि ज्ञान किंवा कौशल्ये प्राप्त झाल्यानंतर त्यांचा जीवन जगण्यासाठी करावयाच्या उपयोगाचा काळ हे दोन भाग आहेत. त्यामुळे जीवनाच्या तयारीसाठी द्यावयाचे शिक्षण हे शाळा-कॉलेजमधून औपचारिक रूपात दिले जाते. ते काळ आणि स्थळ यांनी बंदिस्त आहे. हे शिक्षण संपले की लौकिक अर्थाने शिक्षण संपले असे म्हटले जाते. या प्रक्रियेबरोबर विद्यार्थ्यांवर घरातील आणि समाजातील विविध ठिकाणाहून अनुकरणातून शिक्षण मिळते. मग काय घ्यायचे आणि काय घ्यायचे नाही हे ठरविणारे मन चारित्र्यसंपन्न हवे. आणि तसे चारित्र्यसंपन्न मन तयार करण्यासाठी शिक्षणामध्ये चारित्र्यनिर्मितीचे शिक्षण हवे.

पुस्तके ही ज्ञानाचा महासागर आहेत. ही पुस्तके व्यक्तीस चारित्र्यनिर्मितीसाठी आधारस्तंभासारखी वाटतात. व्यक्तीच्या चारित्र्याच्या विकासासाठी श्वासासारखी पूर्ण शरीरात विलीन व्हावी लागतात. मानवी जीवनात मरणानंतर कीर्तीरूपाने जीवित रहावयाचे असेल तर चारित्र्याची तेजोवात जिवंतपणीच प्रज्वलित करून त्या प्रकाशात जगावे लागते.

चारित्र्य घडण आणि चारित्र्य संवर्धन याची प्रक्रिया वैयक्तिक व सार्वजनिक जीवनात निरंतर होण्यासाठी संस्काराचे संक्रमण सतत कृतिशील व क्रियात्मक होणे अत्यावश्यक आहे. आदर्श आणि आचारसंहिता एकत्रितपणे वर्तनात सहजतेने अविष्कारित होणे ही शिक्षणाची भूमिका असली पाहिजे. मूल्यांची रुजवण नैतिकतेच्या मार्गावर येणे आणि तसे जगणे-वागणे-बोलणे होणे म्हणजेच खऱ्या अर्थाने संस्काराची प्रवाहित स्वच्छ गंगा जीवनात अवतरल्याचा चमत्कार घडणे होय. हा चमत्कार ज्या मनामध्ये व पर्यायाने माणसामध्ये घडून येतो तेथेच सत्यम् शिवम् सुंदरम् या प्रचितीचा स्रोत सुरू होतो आणि पावित्र्याची विधायकता प्रसवित होते.

जिथे सुसंस्कारित शिक्षण तिथे सुसंस्कारित विचार आणि या विचाराच्या बैठकीवर प्रशिक्षित मनाची घडण होते. व्यक्तिमत्त्वाला दैवत्वाचा प्रभाव अंगिकारतो. म्हणूनच संस्कारक्षम शिक्षण हे चारित्र्य घडविणारे ठरते.

*****

# स्वच्छता अभियान – काळाची गरज

## (स्वच्छ भारत, सुंदर भारत)

## भारत – स्वच्छता अभियान

**श्री. जगन्नाथ कोळी**
सहशिक्षक – दि मॉडेल हायस्कूल, माळीनगर,
ता. माळशिरस, जि. सोलापूर – ४१३ १९८
संपर्क : ९९२२३६५५८०

### प्रास्ताविक :

मनुष्य हा असा प्राणी आहे की, तो एकटा कधीच राहू शकत नाही. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. त्याला समाजात राहायला आवडते. तसेच त्याला समाजातील सर्व स्तराबरोबर राहावे लागतेच. मनुष्य हा स्वच्छशील देखील आहे. प्रत्येक माणसाला स्वच्छ राहायला आवडते. तो स्वत: कधीच अस्वच्छ राहत नाही. आपले घर, आपला परिसर, गाव हे स्वच्छ असावे असे त्याला वाटते. परंतु सर्वत्र त्याला अस्वच्छता दिसते.

माणसे स्वत:च्या घरातील कचरा काढून रस्त्यावर किंवा इतरत्र कोठेही टाकतात. मनुष्य स्वत:चे घर स्वच्छ ठेवतो परंतु इतरांची, समाजाची त्याला चिंता नसते. कारण घर 'माझं' आहे म्हणून ते स्वच्छ राहायला हवं. पण रस्ता, परिसराबाबत तो वेगळा विचार करतो. रस्ता, परिसर आपला आहे असे समजून त्याच्यावर मी घाण, कचरा टाकू शकतो. तो त्याचा हक्कच समजतो. माझं म्हटलं की ते स्वच्छ करायचं पण आपलं म्हटलं की ते अस्वच्छ करावे. समाजाशी माझं काही घेणं-देणं नाही असा विचार सर्व समाजातील व्यक्ती करू पाहत आहे. म्हणून भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी १५ ऑगस्टच्या स्वातंत्र्य दिना दिवशी त्यांनी देशातील लोकांना आवाहन केलं आहे. २०१९ पर्यंत आपल्या भारत देशाने संपूर्ण जगात स्वच्छतेमध्ये प्रथम क्रमांकाने यावे. त्यासाठी समाजातील सर्व नागरिकांनी या अभियानात सहभागी होणे आवश्यक आहे.

### स्वच्छता अभियानाची आवश्यकता

जगांमध्ये सर्व विकसित देश स्वच्छता व पर्यावरण संरक्षण या दोन गोष्टींसाठी अग्रक्रम देत आहेत. आपला देश स्वच्छ राहिला तर आरोग्य चांगले राहते. आरोग्य चांगले राहिले तर माणूस (मनुष्य) निरोगी होतो. निरोगी माणसाचा मेंदू (मन) चांगले काम करतो. त्याच्या मनामध्ये वाईट विचार, वाईट भावना येणार नाहीत. त्याचे मन स्वच्छ व पवित्र राहील व तो दिवसभरात उत्साहाने प्रसन्नतेने काम करेल. त्यामुळे त्याच्या हातून काम चांगले होईल. चांगले काम झाल्यास आपोआपच देशाचा विकास होईल.

ज्या देशाच्या संस्कृतीमध्ये पर्यावरण व स्वच्छता या गोष्टी प्रत्येक बालकाच्या मनावर बिंबवल्यास तो देश कधीच मागे पडणार नाही. देशाची प्रगती होईल व २०२० सालचा भारत देश जगातील पहिल्या क्रमांकाचा देश स्वच्छ व आनंदी

देश म्हणून जगात भारताचे नाव होईल. या उपक्रमात घरात प्रत्येक व्यक्तीने सहभागी होणे आवश्यक आहे. घर स्वच्छ राहिले, परिसर स्वच्छ राहिले तर माणूस आजारी पडणार नाही. दवाखान्यात जावे लागणार नाही. त्यामुळे माणसांनी कष्टाने मिळविलेला पैसा योग्य मार्गाला जाईल व माणसांची आर्थिक स्थिती सुधारेल.

जगातील पर्यटक आपल्या देशाकडे घाणीचे साम्राज्य असणारा व अस्वच्छ राहणारा देश म्हणून हिणवतात. या सर्व पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी भारताचा कोना-कोना स्वच्छ राहील असे करावे. म्हणजे आपल्या देशाची प्रतिमा इतर देशात व जगात चांगली होईल. खेड्यात, शहरात, प्रत्येक गल्लीमध्ये अस्वच्छ राहिल्याने आजारी पडण्याचे प्रमाण वाढले. त्यामुळे मिळविलेला पैसा (४० टक्के रक्कम) दवाखान्यासाठी खर्च होऊ लागल्याने, देशातील गरिबीचे प्रमाण वाढतच चालले आहे. त्यासाठी हे स्वच्छता अभियान राबवणे खूप आवश्यक आहे.

**भारत देश स्वच्छता अभियानाची वैशिष्ट्ये, महत्त्वाची तत्त्वे**

१. भारतातील प्रत्येक नागरिकाने आरोग्यमय जीवन जगावे.
२. भारतातील प्रत्येक नागरिकाने निरोगी व रोगमुक्त जीवन जगावे.
३. भारतातील प्रत्येक मूल स्वच्छ व पवित्र भावनेने शाळेत जावे.
४. प्रत्येक नागरिकाने जीवन स्वच्छ, प्रसन्नतेने व आनंदाने जगावे.
५. भारतातील प्रत्येक नागरिकाचे पुरुष, महिला, लहान मुले, प्रौढ, वृद्ध माणसे यांची स्वच्छतेबाबत सर्वांची काळजी घेणे.
६. भारतातील सर्व प्राणी, जंगली प्राणी, पाळीव प्राणी, स्वच्छ सुंदर रहावे.
७. भारतातील सर्व नागरिकांचे स्वच्छतेबरोबर सामाजिक, भावनिक, सांस्कृतिक व आर्थिक विकास व्हावेत.
८. स्वच्छतेचा ध्यास घेऊन माणसाच्या बुद्धीचा विकास साधणे.
९. प्रत्येक नागरिकाला त्याच्या आवडीने त्याचे जीवन समृद्ध करणे.
१०. केवळ जाहिरातीने, स्टंटबाजीने, आकर्षित न करता प्रत्येक नागरिकाने तन, मन, धनाने स्वच्छता अभियान राबविणे.
११. देशाचा सामाजिक स्तर उंचावणे.
१२. देशाची प्रतिमा उच्च स्थानावर नेऊन पोहोचवणे.
१३. स्वच्छतेची सुरुवात स्वत:पासून सुरू करणे.
१४. नागरिक भेदभाव, जातपाती, धर्मवेडेपणा विसरून सर्वांशी प्रेमाने वागणे.
१५. एकमेकांचे आदर करून स्वच्छता अभियान राबवणे.
१६. इतरांना त्रास देऊन, भांडणे न करता हे स्वच्छता अभियान राबवावे.
१७. प्रत्येक नागरिकाने स्वच्छता अभियान विश्वासाने, प्रेमाने राबवणे.
१८. स्वच्छतेचे काम दर्जेदार पद्धतीने राबवणे.
१९. स्वच्छता करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी व कर्तव्य आहे.
२०. हा देश माझा आहे असा विचार करून स्वच्छता अभियान राबवावे.

## स्वच्छतेबाबतचे महात्मा गांधींचे मत

गांधीजी खेड्यातील साफसफाई करण्यासाठी सफाई कामगार व सर्व नागरिकांसोबत, काही महिने स्वत: हातात झाडू घेऊन सर्व गावाची साफसफाई करीत. कचरा स्वत: बादलीत भरून एका खड्ड्यामध्ये पुरत. ओला कचरा व कोरडा (वाळलेला) कचरा वेगवेगळ्या खड्ड्यात टाकून त्याचे खत बनवीत. गांधीजी आश्रमातील केरकचरा (सांडपाणी) बागेत टाकीत असत. बांधलेली ड्रेनेज नसूनसुद्धा आश्रमात माशा, दुर्गंधी राहत नसत.

एकदा परदेशी नागरिकाने गांधीजींना प्रश्न विचारले, तुम्हाला जर भारताचा एक दिवसाचा व्हाईसरॉय केले तर तुम्ही काय कराल ? गांधीजी म्हणाले, ''व्हाइसरॉयच्या घराजवळची वस्ती साफ करेन.''

लोकांना स्वच्छता आणि निरोगी जगण्याचे मार्ग शिकवण्यावर त्यांचा भर होता. गांधीजी स्वत: स्वच्छ राहून इतरांना स्वच्छतेबाबत प्रबोधन करीत. म्हणून सर्व नागरिकांनी गांधीजींप्रमाणे स्वच्छ राहून आपला भारत देश स्वच्छ बनण्यासाठी प्रयत्न करावेत.

उडत्या पाखरांना, परतीची तमा नसावी.
नजरेत सदा नवी दिशा असावी.
घरट्याचे काय आहे, बांधता येईल केव्हाही.
क्षितिजाच्या पलीकडे झेप घेण्याची जिद्द असावी.

एक शायर म्हणतो –

मंझीले उन्हे को मिलती हैं,
जिनके सपनों में जान होती है ।
दम पंखों मे नहीं होता
उडाण बुलंद होसलोंसे होती है ।।

## स्वच्छता अभियानाचे फायदे

१. माणसांचे आरोग्य चांगले राहील.
२. स्वच्छतेमुळे मन प्रसन्न राहील. माणसे उत्साहाने कामे करतील.
३. घर, घराचा परिसर, गाव व गावाचा परिसर स्वच्छ राहील.
४. रोगराई पसरणार नाहीत. संसर्गजन्य रोग होणार नाहीत.
५. भारत देश स्वच्छ व सुंदर होईल.
६. दवाखान्यात जाण्याचे प्रमाण घटेल.
७. स्वत:चे व इतरांचे आरोग्य चांगले राहील.
८. देशामध्ये रोगी माणूस दिसणार नाही.
९. दवाखान्यात जाणारा पैसा चांगल्या मार्गाला जाईल व देशातील नागरिकांचा आर्थिक स्तर उंचावेल.
१०. जगात भारत देशाचे नाव होईल.
११. जगामध्ये देशाची प्रतिमा सुधारेल.

१२. जगातील स्वच्छ देशामध्ये भारताचे नाव होईल.

१३. साथीचे रोग आटोक्यात येतील.

१४. पर्यटन विकास होईल.

१५. आपला भारत देश पाहण्यासाठी अनेक लोक येतील.

१६. पर्यटकांची संख्या वाढेल.

१७. देशात इतर देशाचा पैसा येईल व भारत देश थोड्याच काळात जगातील नंबर एक देश होईल.

१८. देशाची कला, संस्कृती, देशाचा इतिहास जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचेल.

१९. गावातील व कुटुंबातील सर्व मुले निरोगी राहतील.

२०. निरोगी मुले शाळेत गेल्यास त्यांचा शैक्षणिक विकास होईल.

२१. प्रत्येक लहान मुलाला स्वच्छतेची सवय लागेल व हीच मुले मोठी झाल्यानंतर भारत स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करतील.

२२. स्वच्छतेमुळे माणसांचा मनात वाईट भावना, वाईट विचार येणार नाहीत. त्यामुळे भांडण, तंटे, शिवीगाळ यांना आळा बसेल.

**स्वच्छता अभियान सद्यस्थिती**

गावपातळीवर आपण जर नजर टाकली तर आपल्या गावामध्ये अस्वच्छता खूप ठिकाणी दिसते.

उदा.

**१) एस.टी. स्टँड येथे**

१. कचऱ्याचे ढिग

२. कचरा अस्ताव्यस्त स्थितीत पसरलेला

३. घाणीचे साम्राज्य

४. शौचालय व मूत्रालयाची कमतरता

५. महिलांसाठी शौचालय नसणे.

**२) व्यापारी (दुकानदार) व्यापारी पेठा**

१. प्रत्येक दुकानापुढे कचरा खूप पडला आहे.

२. पान दुकानासमोर कचरा खूप दिसतो.

३. हॉटेल व्यावसायिक यांच्यासमोर कचरा दिसतो.

४. गटारे उघड्यांवर आहेत.

५. कचरा गटारीत साचतो व गटार वाहण्यास बंद होते.

६. दुकानदार व व्यापारी प्लॅस्टिकचा वापर खूप करतात.

७. प्लॅस्टिक अडकल्यामुळे गटारे वाहत नाहीत.

## ३) गावात व रस्त्यावरची परिस्थिती

१. प्रत्येकाच्या घरी शौचालय नसणे.

२. उघड्यावर शौचास बसणे.

३. रस्त्यावर व चौका-चौकात घाण व कचरा टाकणे.

४. ड्रेनेज लाईनची असुविधा

## ४) शालेय परिसर

१. शाळेच्या बाजूला व वर्गातील अस्वच्छता

२. शालेय परिसरात कागदांची संख्या जास्त

३. शालेय पोषण आहार (भाताची शिते सगळीकडे सांडलेली असतात)

४. मुलींचे व मुलांचे शौचालय नसणे.

५. मुलींना वेगवेगळी शौचालय नसणे.

## तातडीने सोडवण्यासाठीचे निकडीचे प्रश्न

## १) कचऱ्याचा विल्हेवाट लावण्याचा प्रश्न

### कचऱ्याचे स्रोत

भारत स्वच्छता अभियानात अत्यंत तातडीने सोडवावयाचे प्रश्न म्हणजे कचऱ्याचा विल्हेवाट लावण्याचा प्रश्न आहे. जसे -

१. कोरडा कचरा

२. ओला कचरा

३. घन कचरा

४. प्लॅस्टिक

५. इलेक्ट्रिकल पार्टस्

६. लोखंडी (गंजलेला)

७. संगणक प्रयोगशाळेतील बिघडलेले व बाद झालेले साहित्य

८. दवाखान्यातील वापरल्यानंतरचे साहित्य

## १) कारखान्यातील उद्योगधंद्यातील रासायनिक सांडपाण्याचा प्रश्न

जसे -

१) साखर कारखाना

१. मळी

२. कारखान्यात तयार झालेला रासायनिक द्रवपदार्थ कसे विल्हेवाट लावावा हा प्रश्न

३. प्रदुषणयुक्त हवा.

## २) प्लॅस्टिक तयार करणारा कारखाना

१. प्लॅस्टिकच्या वस्तू तयार करताना तयार होणारा रासायनिक द्रवपदार्थ

२. प्लॅस्टिक धूर

३. घाणेरडा वास

४. प्रदुषणयुक्त हवा

५. प्लॅस्टिक पिशवी तयार झाल्यानंतर वापरात येणे व त्याची विल्हेवाट न लागणे.

६. प्लॅस्टिक गटारीत अडकून गटार तुंबणे व त्याच्या वासाने अनेक रोगाचा प्रसार

## ३) गावातील डबकी, साचलेले पाणी यांची विल्हेवाट लावणे

१. गावामध्ये पाणी वाहून (सांडपाणी) कसे घेऊन जावे त्याची विल्हेवाट कशी लावावी हा महत्त्वावा प्रश्न.

२. साचलेल्या पाण्याचे काय करावे हा प्रश्न.

३. डासांची उत्पत्ती व त्याद्वारे मलेरिया, डेंग्यू, अनेक संसर्गजन्य रोगांची निर्मिती.

४. क्षय, घटसर्प, कॉलरा असा साथीच्या रोगांची निर्मिती

५. शौचालय व शौचालयातील मैलाचा प्रश्न

६. मैला कोठे न्यावा व त्याची विल्हेवाट कशी लावावी हा प्रश्न

७. दुकानदारासमोरील घाण/कागदी/प्लॅस्टिक कचरा विल्हेवाटीचा प्रश्न

असे अनेक प्रश्न तातडीने सोडवावयाचे आहेत. त्यासाठी अनेक उपक्रम व योजनांद्वारे हे प्रश्न सोडवावे लागतील.

कचरा व्यवस्थापन

## १. कागद, पाने, फुले – कचऱ्यांची विल्हेवाट लावणे

कोरडा कचरा एका ठिकाणी गोळा करून त्याद्वारे वीजनिर्मिती आपल्याला करता येईल. एका भट्टीमध्ये कचरा पेटवून वाफेद्वारे वीजनिर्मिती करता येईल.

२. ओला कचरा (प्लॅस्टिक न वापरता)

ओला कचरा एकत्रित करून गावाबाहेर ५ ते ७ कि.मी. अंतरावर २ ते ३ मीटर साधारण ७ ते ९ फूट खड्डा खोदून त्यात टाकून द्यावे. व त्यावर माती टाकून बुजवून टाकावे व ५ ते ६ महिन्यानंतर कंपोस्ट खत (सेंद्रीय खत) म्हणून शेतीसाठी वापरता येईल.

## ३. प्लॅस्टिक व प्लॅस्टिकपासून बनणाऱ्या वस्तूंची विल्हेवाट लावणे

कोरड्या व ओल्या कचऱ्यातून प्लॅस्टिक बॅग, बाटल्या, कॅरीबॅग या सर्व वस्तू बाजूला काढून भंगाराच्या दुकानात नेऊन टाकावे किंवा वेगवेगळ्या ठिकाणी जमा करावेत. प्लॅस्टिक एकत्रित करून पुनर्निर्मितीसाठी उद्योगधंद्याकडे पाठविणे.

## ४. रस्ता बांधणीकरिता प्लॅस्टिकचा प्रभावी वापर

प्लॅस्टिक पिशवीला पर्याय म्हणून कागदी व कापडी बॅग वापराव्यात.

५. **इलेक्ट्रिकल पार्टस्**

इलेक्ट्रिकल पार्टस्‌मधील शिल्लक राहिलेले लोखंड, तांबे व इतर वस्तू वेगळे करून पुनर्प्रक्रिया करता येईल.

६. **लोखंड**

गंजलेले किंवा जुने झालेले लोखंड भंगार दुकानातून पुनर्प्रक्रियासाठी उद्योगधंदे व कारखान्यात पाठवावे.

७. **संगणक प्रयोगशाळेतील बाद झालेले व बंद पडलेले पार्टस् यांचे विल्हेवाट लावणे**

२१व्या शतकामध्ये संगणकाचे जाळे सर्वच क्षेत्रांमध्ये पसरलेले आहे. संगणकाचा वापर मोठ्या प्रमाणात करत असताना संगणकाची बिघडलेले व बंद पडलेले साहित्य हा कचरा काय करायचा असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यासाठी पुढील उपाययोजना करावी असे माझे मत आहे.

१. संगणक कचरा (स्पेअर पार्टस्) - एका बंद खोलीच्या भट्टीमध्ये जाळून टाकणे.

२. गावाबाहेरील किंवा शहराच्या लांब १५ ते २० कि.मी. अंतराच्या बाहेर ७ ते ८ फूट खड्डा खणून त्यास पुरावे.

३. काही/काही साहित्याचा पुनर्वापर करता आल्यास संगणकाच्या नवीन साधनांमध्ये जुन्या पार्टस्‌चा योग्य त्या वस्तूचा वापर करावा.

८) **दवाखान्यातील वेस्टेज (कचरा) विल्हेवाट लावणे**

दवाखान्यामध्ये आता भरपूर प्रमाणात कचरा (वेस्टेज पार्ट) भरपूर प्रमाणात तयार होत आहे. त्यासाठी अनेक वस्तूंचा पुनर्वापर किंवा त्या वस्तू जाळणे किंवा खड्ड्यात पुरणे.

**प्लॅस्टिकच्या वस्तू**

सलाईन, पट्टी, काच वगैरे वेगवेगळे करून त्या वस्तू एका मोठ्या भट्टीत जाळावे.

९) **कारखान्यातील रासायनिक द्रव्य विल्हेवाट लावणे**

कारखान्यातील तयार होणारे रासायनिक द्रव्य खूप प्रमाणात तयार होत आहे. असे रासायनिक द्रव्य नदी, नाल्यात न सोडता गावाबाहेर माणसांच्या वस्तीपासून लांब घेऊन जावे व १० ते १५ फूट खोल खड्ड्यात पुरावे. ती रासायनिक द्रव्ये जेवढ्या लवकर नष्ट होईल तेवढ्या लवकर नष्ट करावे.

रासायनिक द्रव्य सोडताना पाण्याचे स्रोत पाहूनच ते खड्ड्यात सोडावे. प्रदुषणयुक्त हवा तयार होत असल्यास आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्याची तीव्रता कमी करण्यास प्रयत्न करावेत. शास्त्रज्ञ व संशोधकांनी पर्यावरण व विकास यांचा समतोल कसा राखता येईल याचा विचार करावा.

स्वच्छ भारत अभियान राबविण्यासाठीच्या शिफारशी किंवा करावयाचे उपक्रम खालीलप्रमाणे

**शासकीय पातळी**

**शासकीय पातळीवर शासनाने करावयाचे उपक्रम**

१. **रेडिओ, दूरदर्शन, मोबाईल या नवीन साधनांद्वारे लोकांचे प्रबोधन करणे**

२. **प्रशासकीय अधिकारी व त्यांचे टिमवर्क घेऊन समाजप्रबोधन करणे.**

उदा.

जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा समाजकल्याण ऑफीस, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी,

जिल्हा कृषी अधिकारी, जिल्हा सार्वजनिक व रस्ते बांधकाम अधिकारी. ह्या सर्व अधिकाऱ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रांचे व तालुक्यांचे वाटप करून सर्वांनी मनापासून स्वत: या अभियानात सामील होऊन सामान्य नागरिकांना सूचना देणे, स्वच्छतेसाठी प्रबोधन करणे.

### ३. प्रशासकीय अधिकारी

उदा.

तालुकास्तरीय प्रशासकीय अधिकारी

१. तहसिलदार
२. तालुका आरोग्य अधिकारी
३. तालुका कृषी अधिकारी
४. तालुक्यातील सर्व प्रशासकीय यंत्रणेतील अधिकाऱ्यांनी ग्रामस्वच्छता वैयक्तिक स्वच्छता, कौटुंबिक स्वच्छता याबद्दल मार्गदर्शन, सूचना व प्रबोधन करणे.

### ४. प्रशासकीय अधिकारी

उदा. गावपातळीवरील प्रशासकीय अधिकारी

तलाठी, ग्रामसेवक, कोतवाल, पोलीस-पाटील, यांच्याकडून गावपातळीवर नागरिकांना स्वच्छतेबाबत सूचना देणे, मार्गदर्शन करणे अत्यंत आवश्यक आहे.

### नागरिकांनी स्वच्छता अभियानात सहभागासंदर्भातील शिफारशी उपक्रम

१. आपले घर, आपला परिसर स्वच्छ ठेवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.
२. नागरिकांनी कचरा नेमून दिलेल्या जागेवर एकाच ठिकाणी कचरा टाकावा.
३. नागरिकांनी घन कचरा (कोरडा कचरा) व ओला कचरा वेगळा करावा.
४. दुकानदारांनी आपआपल्या दुकानासमोर डस्टबीन किंवा कचराकुंडी ठेवावी.
५. पान दुकान व हॉटेल व्यावसायिक यांनी आपल्या दुकानासमोर दोन वेगवेगळे डस्टबीन ठेवावे. (ओला व कोरडा कचरा टाकण्यासाठी)
६. नागरिकांनी रस्त्यावर कचरा टाकू नये.
७. नागरिकांनी प्लॅस्टिक पिशवीचा वापर करू नये.
८. प्लॅस्टिक पिशवीला कायद्याने बंदी घालावी.
९. कचरा व्यवस्थापन करताना, कायदा करावा, कचरा टाकताना नागरिकांनी कुचराई केल्यास दंडात्मक कारवाई करावी.
१०. कचरा व स्वच्छतेबद्दल नागरिकांनी जागरूकता बाळगावी.
११. आपआपल्या घरासमोरील गटारे कशी वाहतील त्याचा विचार करावा.
१२. नागरिकांनी साचलेली डबकी, बुजवून घ्यावी.
१३. नागरिकांना प्रतिज्ञा करून अस्वच्छ न राहता आपला भारत देश स्वच्छ कसा राहील त्यासाठी प्रयत्न करावे.
१४. नागरिकांनी स्वच्छतेपासून मानसिकता बदलावी.

१५. माझा देश, माझा गाव, माझे कुटुंब व माझा आसपासचा परिसर कसा स्वच्छ होईल यासाठी स्वच्छ करावा.

१६. एखादा माणूस तुमच्या समोर घाण करत असेल तर त्याला समजावून सांगावे. ऐकत नसेल तर आपण स्वत: कचरा उचलून टाकून द्यावा.

१७. आरोग्याबाबत नेहमी जागरूकता राखावी.

१८. डास व इतर कीटक आपल्या आजूबाजूला परिसरात तयार होणार नाहीत याची काळजी घ्यावी.

१९. लोकांनी एकमेकाला स्वच्छतेबाबत जागरूक करावे.

२०. नागरिकांनी तन, मन व स्वयंस्फूर्तीने हा कार्यक्रम राबवावा.

**समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींनी करावयाची कामे**

**अभिनेते/खेळाडूंनी स्वच्छता प्रतिनिधी दूत**

**कामे**

समाजातील मंत्री, आमदार, अभिनेते, खेळाडू, स्वच्छता प्रतिनिधी, सभापती, जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, नगरसेवक, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच असे अनेक नेतेमंडळी खालीलप्रमाणे स्वच्छतेबाबत कार्यवाही करावी असे माझे स्वत:चे मत आहे.

१. आपआपल्या कार्यक्षेत्रात आठवड्यातून २ तास स्वच्छता अभियानासाठी द्यावेत.

२. स्वच्छतेबाबत स्वत:हून मार्गदर्शन करावे, सूचना करणे, प्रबोधन करणे आवश्यक आहे.

३. प्रतिष्ठित व्यक्तींची छाप सामान्य नागरिकांवर पडली तर भारत स्वच्छता अभियान यशस्वी होण्यास वेळ लागणार नाही.

४. सर्व प्रतिष्ठित व्यक्तींनी फक्त फोटोसाठी व स्वत:च्या जाहिरातीसाठी काम न करता, स्वत: आत्मा, परमात्म्याने हे मी जे काम करतो आहे ते मनापासून करावे.

५. फक्त मार्गदर्शन करून किंवा प्रबोधन करून न थांबता अपवादात्मक एखादा नागरिक विनाकारण स्वच्छतेबाबत त्रास देत असल्यास त्या नागरिकांवर पोलीस कारवाई व दंडात्मक कारवाई करावी.

६. प्रतिष्ठीत नागरिकांनी केलेले काम जनतेला व देशाला ५ वर्षात दिसायला हवे.

७. ग्रामपंचायतीला स्वच्छतेसाठी निधीची खास व्यवस्था करून प्रत्येक ग्रामपंचायतीच्या बँकेच्या अकौंटमध्ये पैसे डायरेक्ट जमा करावेत.

८. नागरिकांना/विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे द्यावीत.

**नगरपालिका व ग्रामपंचायतीची कामे**

**स्वच्छता अभियान राबविताना नगरपालिका, ग्रामपंचायत यांनी खालीलप्रमाणे सहकार्य करावे**

१. गावात दुकानासमोरील कोरडा कचरा व ओला कचरा उचलून घेऊन जाणे.

२. नगरपालिकांनी जास्तीत जास्त घंटागाडीचे उपयोग करावा.

३. प्रत्येक कुटुंबाच्या घरासमोर जाऊन कचरा गोळा करणे.

४. स्वच्छता झाल्यानंतर कागद, प्लॅस्टिक वगैरे कर्मचाऱ्यांनी स्वत: गोळा करावे.

५. ड्रेनेज लाईन किंवा गटारी तुंबल्यास कर्मचाऱ्याद्वारे लवकरात लवकर साफसफाई करावी.

६. प्लॅस्टिकचा वापर करू नका किंवा गटारीमध्ये प्लॅस्टिक टाकू नका याचे आवाहन करावे.

७. कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे. वेळोवेळी तक्रारी आल्यास तक्रारी निपटणे हे कर्मचारी व अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे.

८. नगरपलिकेत व ग्रामपंचायतीमध्ये साफसफाई करणारे कर्मचाऱ्यांची संख्या दुप्पट करावी किंवा जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांची भरती करावी.

९. साफसफाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारामध्ये भरपूर प्रमाणात वाढ करावी.

१०. चांगले वेतन दिल्यास कर्मचारी मनापासून काम करतील व स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवता येईल.

स्वच्छतेबाबत व्यापारी तरुण मित्र मंडळ, गणेश मंडळ, सामाजिक बांधिलकीसाठी एकत्र आलेली मंडळे विविध संस्था, कर्मचारी या सर्वांनी भारत स्वच्छ अभियानात भाग घेऊन करावयाची कामे

## १) व्यापारी / दुकानदार

१. दुकानदारांनी स्वत: दुकानासमोर कचराकुंडीची व्यवस्था करावी.

२. गिऱ्हाईकांना कचरा किंवा कागद कचराकुंडीतच टाकण्यास सांगावे.

३. गिऱ्हाईक ऐकत नसेल तर आपण स्वत: कचरा कचरापेटीत टाकावा.

४. आठवड्यातून १ दिवस ठरवून २ ते ४ तास दुकाने बंद करून सर्व व्यापाऱ्यांनी हातात झाडू घेऊन गावात स्वच्छता करावी.

५. व्यापारी मित्र मंडळातर्फे स्वच्छता करणाऱ्या नागरिकांना बक्षिसे ठेवावीत.

६. बेकार, बेरोजगार युवक असतील तर त्यांना व्यापारांनी सामुदायिक रक्कम जमा करून अशा स्वच्छता काम करणाऱ्या युवकांना काम द्यावे.

## २) गणेश मंडळ, तरुण मित्र मंडळ

१. गावातील गणेश मंडळ, तरुण मित्र मंडळ व इतर मंडळांनी गावासाठी व स्वच्छता करण्यासाठी आठवड्यातून १ दिवस निवडून गावातील कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावावी.

२. स्वच्छताविषयक मंडळाचे स्पर्धा व बक्षिसे वाटप

सर्व मंडळातील कार्यकर्त्यांनी जसे आपण उत्सव साजरे करतो तसे स्वच्छतेविषयी सांस्कृतिक कार्यक्रम, निबंध स्पर्धा, लोकांमध्ये जागरुकता आणावी.

३. हा देश तरुणांचा आहे. तरुणांनी एकत्र आल्यास आपला देश स्वच्छतेबाबत नंबर एक (१) च्या पातळीवर जरूर आणतील.

## ३) खाजगी संस्था बँक

विविध सहकारी संस्था, पतसंस्था व बँका यामधील कार्य करणारे सर्व कर्मचारी या सर्वांनी मिळून सुट्टीच्या दिवशी २ ते ३ तास वेळ काढून गावातील साफसफाई करण्यासाठी वेळ द्यावा.

स्वच्छता अभियानात स्वयंस्फूर्तीने काम करून लोकांना सूचना, मार्गदर्शन करणे, गाव पातळीवर स्वत: रस्त्यावर, गल्लीमध्ये स्वच्छता करावी.

### ४) महिला बचत गट

सर्व गावांमध्ये आताच्या काळामध्ये अतिशय भक्कमपणे उभे राहिलेले सामाजिक एकताचे गट म्हणजे महिला बचत गट. या महिला बचत गटामार्फत स्वच्छता मोहीम हाती घेतल्यास बऱ्याच प्रमाणात स्वच्छता अभियान यशस्वी होईल असे मला वाटते.

१. बचत गटातील महिलांना मार्गदर्शन करणे.
२. स्वच्छता अभियानाचे फायदे सांगणे.
३. स्वच्छतेचे प्रबोधन करणे.
४. सर्व महिलांनी इतर महिलांच्या सहकार्याने गावात स्वच्छता अभियान राबवावे.
५. गावातील कचरा गोळा करून ठेवावे.
६. ओला कचरा व कोरडा कचरा वेगवेगळा करून ठेवणे.
७. गटारीतील साफसफाई, स्वत:च्या घरासमोरील स्वच्छता करावी.
८. शौचालय बांधणे व शौच्यास फक्त शौचालयात बसण्यासाठीचे मार्गदर्शन करणे.
९. महिलांना प्रशिक्षण देऊन इतर महिलांना त्यांना माहिती सांगण्यास सांगावे.
१०. महिला बचत गट यामार्फत स्वच्छता अभियान राबविणे अत्यंत चांगल्या रीतीने होईल.

*****

कानमंत्र

## येत नाही असं म्हणू नका ...

मुलांनो ! तुम्ही अभ्यास करता, त्यावेळी मन एकाग्र झालेले नसेल तर किंवा मनात अभ्यास करताना काही दुसऱ्याच गोष्टींचा विचार चालू असेल तर त्यावेळी तुम्ही वाचलेले तुमच्या लक्षात रहात नाही, नंतर वाचलेले आठवायचा प्रयत्न तुम्ही करता आणि ते आठवले नाही की, मग म्हणता मला येत नाही, येत नाही असं म्हणू नका, आठवत नसेल तर पुन्हा पुन्हा वाचा, समजून घ्या. अभ्यास वाचून लिहून करायला शिका, तुम्ही खूप हुशार आहात. पण केवळ सराव कमी पडतो. तुम्ही पहा परीक्षेला गेलात ना की, नक्की तुम्हाला कळेल, अभ्यास आठवेल पण त्यासाठी समजून केलेला अभ्यास आवश्यक. परीक्षेला गेला की प्रश्न माहीत असतो, उत्तरही माहीत असतं, प्रश्नाचं उत्तर वहीच्या-पुस्तकांच्या कोणत्या पानावर आहे, कोणत्या बाजूस आहे, पानावर खालच्या की वरच्या बाजूस, कोणत्या ओळीवर आहे. इथपर्यंत आठवतं, पण नेमकं उत्तर आठवत नाही. त्यामुळे येत नाही असं म्हणू नका. पुन्हा सराव करा, अभ्यास करा. परीक्षेच्या वेळी तुम्हाला नक्की सर्व आठवेल आणि तुम्ही यशस्वी व्हाल.

- अनिल गुंजाळ
(सहा. सचिव, एस.एस.सी., एच.एस.सी. बोर्ड, पुणे)

# पायाभूत संबोध : डळमळता पाया

**श्री. काकासाहेब वाळुंजकर**
पर्यवेक्षक,
लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालय,
सदस्य - हिंदी अभ्यास मंडळ
कापडबाजार, अहमदनगर - ४१४ ००१.
संपर्क : (०२४१) २३४४००६

भाषा म्हणजे विचार भावना आणि अनुभव व्यक्त करण्याचं एकमेव साधन. बोलून कधी पालवून तर कधी खाणाखुणा करून आपण आपले विचार व्यक्त करत असतो. मातृभाषा ही सर्व विषयाकलनाची जननी. इंग्रजीबरोबरच इतर भाषांच्या भडिमारामुळे आपण मातृभाषेचे मूळ वस्त्रांलंकार काढून तिला नको त्या भाषिक अलंकारांनी सजवल्याने तिचे मूळ रूप व प्रकृती बदलत चालली आहे. मातृभाषेतून एक शुद्ध मराठी वाक्य बोलताना आपण इंग्रजी, हिंदी, अरबी, फारसी, उर्दू अशा अनेक शब्दांचा वापर करत असतो. वास्तविक इतर भाषांचे साहित्य आपल्या भाषेत स्थलांतरित होऊन ती दर्जेदार व सकस व्हावी. पण आजकाल प्रसारमाध्यमे व इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या बेसुमार वापरामुळे आपले मराठी खटकताना दिसते.

शिक्षण परिषदेच्या आदेशानुसार मराठी, इंग्रजी व गणित विषयांची मूळ संबोधनाअनुसरून पायाभूत चाचण्या घेण्यात आल्या. अगदीच वस्तुनिष्ठ व कॉपीविरहित घेतल्या गेल्याने शहरी शाळा वजा करता बाकी सर्व शाळा ग्रामीण भागात असून शहरी मुलांपेक्षा यांच्यावर होणारे भाषिक संस्कार त्यांच्याच ग्रामीण वातावरणाशी जुळणारे असतात. शिक्षक व मार्गदर्शक ही त्याच वातावरणातील असल्याने शहरी भागापेक्षा त्यांचा भाषिक, वाचिक व लेखनाचा कस त्याच वातावरणातील असतो.

बोर्ड परीक्षांचे निकाल पाहता मराठी विषयात इतर विषयांच्या तुलनेने कमी गुण मिळतात. भाषेविषयीचा व्यासंग, वाचन, लेखन व व्याकरण याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत गेल्याने वर म्हटल्याप्रमाणे मराठी सर्व विषयांची जननी न राहता केवळ आम्ही घोकंपट्टी करून अंदाज बांधून तर कधी केवळ कामचलाऊ उत्तरे तोंडपाठ करून परीक्षार्थी म्हणून विद्यार्थ्यांना बनवतो. त्याला भाषा किती येते ? तो किती शुद्ध लिहितो ? नावीन्य व कल्पकता व अनुभव व व्यवहार यावर तो किती चिंतन करतो ? यापेक्षा आम्ही त्याचे परीक्षेत गुण कोठे कमी पडले याचा शोध घेऊन केवळ गुणांची सूज वाढवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करतो. अपवादात्मक स्थितीचा विचार बाजूला ठेवला तर आम्ही पालक, शिक्षक, शाळा व एकूण समाजच व्यासंगापेक्षा, भाषिक उद्दिष्टातून भविष्यात कार्य निर्माण व्हावे व म्हणावयास हवे याचा विचार अलगद बाजूला ठेऊन केवळ कृत्रिमपणे परीक्षांची तयारी करण्यास वर्षानुवर्षे गुंतलेलो असतो व मुले परीक्षेच्या दावणीला बांधून निरंकुशीपणे टक्केवारीची सूज वाढवतो.

**परीक्षा : पायाभूत संबोधांची**

केवळ मराठी भाषेचा विचार केल्यास आजही या विषयाचे मूळ संबोध कच्चे असून किंवा त्यांचे नीट अध्ययन व अध्यापन होण्याची नितांत आवश्यकता आहे. भाषेचा वैकरणिक पायाच आपण डळमळीत व भुसभुशीत ठेवत गेल्याने भाषेचे मजले दुभंगत चालले आहेत. इतर भाषाही आम्हांस धड लिहिता-बोलता येण्यास अनेक अडचणी संभवतात. भाषेतून

पढतपंडित बनवण्यापेक्षा ज्ञानसमृद्ध विद्यार्थी घडवा ही अपेक्षा गैर नाही. परीक्षेपुरतेही आज आमचे वाचन होत नसेल तर पायाभूत संबोधांचं काय ?

पायाभूत परीक्षा अशा घेतल्या गेल्या - पाचवीच्या मराठी इंग्रजी माध्यमाच्या मुलांना इ. ४थीचे पायाभूत संबोध किती येतात याप्रमाणे इ. ९वी पर्यंत मागील इयत्तांचे संबोध किती दृढ झाले आहेत किंवा ते येतात किंवा नाही. अगदी सोप्या भाषेत वस्तुनिष्ठ ५० गुणांच्या पायाभूत चाचण्या घेतल्या. त्यांची अचूक उत्तरपत्रिका शिक्षकांना देऊन त्या तपासून त्यांचे संबोधानुसार पृथक्करण व विश्लेषण व कृतीसंशोधन करण्यात आले. आश्चर्य वाटायला नको. मराठी विषयाचा निकाल ६%, गणिताचा २% व इंग्रजी विषयाचा ४%. महाराष्ट्रातील शाळांमधून प्रामाणिकपणे पायाभूत घटकांवर चाचण्या वस्तुनिष्ठ व निकोप आणि प्रामाणिकपणे घेतल्या. यापेक्षा वेगळा टक्का निघेल, परिणाम दिसतील वाटत नाही.

**काय आहेत भाषेचे मूळ संबोध ?**

इयत्ता ५वी ते ९वी चा विचार केल्यास एकत्रित मूलभूत व्याकरणविषयक संबोध पहिलीपासूनच वा घरापासूनच संस्कारित केले जातात. कधी औपचारिकपणे तर कधी अनौपचारिकपणे सर्वसाधारणपणे या पायाभूत परीक्षेत खालील शिकलेल्या संबोधांवर प्रश्नपत्रिका काढण्यात आल्या होत्या.

इयत्ता ५वीसाठी : वर्णमाला, शब्दरचना, शब्दांचा जाती, लिंग, वचन, काळ, वाक्य प्रकार, वाक्‌प्रचार, म्हणी, विरामचिन्हे, पत्रलेखनाचा मायना, गद्य-पद्य आकलन, साहित्य परिचय.

इयत्ता६वी साठी : (पाचवीत झालेल्या भागावर) शब्दांच्या जाती, नाम व त्याचे प्रकार, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, शब्दांचा वाक्यात उपयोग, शब्द समूहाबद्दल एक शब्द, अव्यय, शुद्ध शब्द लेखन, कर्ता, कर्म.

इयत्ता ८वी साठी : (सातवीत झालेल्या संबोधांवर) विकारी शब्द, अविकारी शब्द, सामान्यरूपे, विभक्ती प्रत्यय, संधी प्रकार व विग्रह आणि प्रयोग व सामान्यज्ञान.

इयत्ता ९वी साठी : ८वी पर्यंत शिकलेल्या मूलभूत संबोधांवर म्हणजे वरील संबंधांबरोबरच - समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, पर्यायी शब्द, अचूक शब्द ओळखणे, समास, सामासिक शब्द व विग्रह, अलंकार वृत्ते, पत्र, बाह्य आकलन, व सामान्य ज्ञान.

**भाषाध्ययनात मूळ संबोधांचे महत्त्व**

कोणतीही भाषा ठरावीकपणे व त्या त्या व्याकरणाच्या रचनेनुसार बोलली व लिहिली जाते. ती आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. 'वाच्यार्थी नियत: सर्वे' या न्यायाने आपल्या जीवनातील सारे व्यवहार भाषेवर अवलंबून आहेत. म्हणून कोणीही व्याकरणाला भाषेपासून बगल देऊ शकत नाही. 'तो काव्य वाचला' असे चुकीचे त्रैपदी वाक्य सुद्धा आपल्याला खटकते. व्याकरणकारांनी भाषा विचारांची विशिष्ट नियमावली तयार केली. शास्त्रीयदृष्ट्या सुव्यवस्थित रचना करून मांडणी केली आहे. व्याकरणामुळेच प्रत्येक शब्दाला, वाक्याला शिस्त लाभली आहे. व्याकरण आणि भाषा यात भेदाची सीमारेषा आपण ओढू शकत नाही. ती परिवर्तनशील असली तरी मूळ रचनेला बाजूला सारत नाही. म्हणून वर्ण, शब्द व वाक्य या विचारांनी आपण भाषाध्ययनात विशेष महत्त्व देतो म्हणून आज पायाभूत संबोधांकडे पाठ फिरवून चालणार नाही.

**भाषिक कौशल्यांसाठी व्याकरण**

मानवी विचारांचे व्यवहार आदान-प्रदान करताना बोलणाऱ्याचे विचार ऐकणाऱ्याला पुरेपूर समजावेत व त्यातून

भावभावना समजाव्यात यासाठी तयार केलेली विशिष्ट नियमावली व ती ज्या नियम व पायाभूत संबोधांवर अधिष्ठित केलेली असते त्याला व्याकरणविषयक शास्त्र म्हणून संबोधले जाते. व्याकरणाचा अभ्यास म्हणजेच भाषिक कौशल्यांचा अभ्यास. इतर भाषा शिकण्यासाठी प्रथम स्वभाषा चांगली अवगत असावी लागते. केवळ लेखन नियमात व क्लिष्टतेत व्याकरण अडकवून ठेवत नाही. आपले व्याकरण शुद्ध बोलणे, स्पष्ट करणे, वक्त्यातील कौशल्य व शुद्धलेखन यासाठी आणि शब्दोच्चारातील बिनचूकता नेमक्या व चपखल शब्दांचा सार्थ वापर, वाक्यात वापरल्या जाणाऱ्या शब्दांचा योग्य क्रम या बाबी विद्यार्थिदशेतच आल्या तर ते संस्कार जीवनभर उपयुक्त ठरतात. म्हणून पायाभूत संबोध इयत्तांच्या प्राथमिक अवस्थेतच होणे गरजेचे आहे.

भविष्याचा विचार करता केवळ पोपटपंची भाषा येऊन चालणार नाही. कसदार साहित्य निर्मिती व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उन्मुक्त आविष्कार करण्यासाठी पायाभूत संबोधांचे बाळकडू शिकण्याच्या वयात बालकांना देणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील भाषिक मूळ संबोध कचकडी पायावर उभे आहेत. प्राथमिक स्तरांपासून पुन्हा नव्याने या संबोधांची पायाभरणी करावी लागणार आहे. पुस्तकाखाली दिलेले कार्यात्मक व्याकरण केवळ घोकंपट्टी करून व परीक्षार्थी म्हणून आपण अध्ययन अध्यापन करत असू तर मराठी भाषेच्या मौलिक संबोधांवरच आपण प्रहार केल्यासारखे होईल. व्याकरण लेखन हा भाग आज त्यामानाने दुर्लक्षित होत चालला आहे. एक वाक्य धड नीट बोलता-लिहिता न येणे ही शैक्षणिक महावृक्षाला लागलेली वाळवी आहे. आज नसेल कदाचित पण भविष्यात आपल्याला आपलीच शुद्ध भाषा शोधून काढणे कठीण होत जाईल. म्हणून सर्वच स्तरावर शासकीय व शैक्षणिक भाषाप्रेमी व तज्ज्ञांनी डोळसपणे पाहण्याची गरज आहे.

मुलांना परीक्षा सोपे करण्याचे धोरण आखत असताना आपण थोर विचारवंत व भाषाविद् यांना मुकणार असू तर हे खचितच आपणच आपल्या पायावर आघात केल्यासारखे आहे.

### भाषा शिक्षक म्हणून जबाबदाऱ्या

प्राथमिक स्तरावर शिक्षकाने वर्गाध्यापनात जाणीवपूर्वक पायाभूत संबोधांवर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. आपण म्हणत असू येणाऱ्या तरुण पिढ्या व्यवसाय म्हणून केवळ अर्थार्जनासाठी किंवा इतरत्र नोकरीस शिरकाव नसल्याने शिक्षकी पेशात येत असतील तर पिढ्या बिघडवण्याचा आम्हाला काडीचा अधिकार नाही. आज शिक्षकी पेशा स्वीकारताना मुलाखतीस येणाऱ्या पदव्युत्तराला वाक्यातील कर्ता, कर्म, विभक्ती, क्रियापद ओळखता येत नसेल तर आपण यांच्याकडून कोणती अपेक्षा करणार ? अपवाद वगळता वरील विधानाशी आपणही सहमती दर्शवाल.

एका दिवसात परिवर्तन ही जादूची कांडी नाही पण वेळीच या बाबीकडे लक्ष दिल्यास आपण उज्ज्वल भाषा भविष्य घडवू शकतो. केवळ नियमावली व सूत्रे पाठ करून घेऊन चालणार नाही. आवश्यकता आहे सामाजिक जाणिवेची, मनापासून स्वत:ला बदलण्याची. सामाजिक व नैतिक जबाबदारी म्हणून भाषा शिक्षकच काय पण सर्वच शिक्षकांनी व भाषाप्रेमींनी पुन्हा मूळ संबोधांकडे वळले पाहिजे. आज मोबाईल, व्हाटस् ॲप, फेसबुक व इतर प्रसारमाध्यमांचा भडीमार होत असताना भाषा शुद्धीकरणाला कितीही सूक्ष्म गाळणे लावले तरी हाती काही सापडेल न सापडेल त्यापेक्षा स्वत:पासून सुरुवात करणे हीच एक शिक्षक म्हणून सश्रद्ध भाषापूजा होय.

*****

# ROLE OF TEACHERS
## WHILE FACING NEW SYLLABUS

*Shri. Anil Vasantrao Kohale*
Junior College Teacher
Shri Shivaji Science College, Amravati.

Education has been defined, 'systematic training and instruction designs to impart knowledge and developed skills'. Pluto calls it as a process of reawakening the consciousness for practical affairs and for service of the state. John Dewey has pragmatic approach and wants to impart education through experience and Mahatma Gandhiji calls it, 'drawing out the best in child and man-body, mind and spirit. Every one of us has accepted education as a dynamic process which affects the individual at cognitive level, affective level and psychomotor level, which helps in the development of self, society and nation and brings about international understanding.

Education has been all time the way or the means to achieve the noble set of goals and the teachers have tried to inculcate all the principles of life in the students according to their abilities and capacities......Despite this ideal state (view) the reality speaks something else.

*"We have learnt to swim in water, we have learnt to fly in the air, but we have not learnt to live on the earth".*

Today the world has become cess-pool: a society without values. Human values like sacrifice, kindness, courtesy, dedication or national values like patriotism, freedom, justice, equality or aesthetic values have developed from society. Barbarism prevails in spite of our desperate efforts to civilize and educate our younger generation. Although we have noble set of goals, why have we failed in changing the face of the society? Dr. S. Radhakrishnan has rightly pointed out, "We have learnt to swim in water, we have learnt to fly in the air, but we have not learnt to live on the earth".

Education is a dynamic process. To say something final on it is not possible. It is like a living organism-ever growing. Therefore there is a need to review, reconsider and rearrange every educational theory. When already said, 'Teachers have tried to impart knowledge and tried to inculcate the principles of life in the students', have they not played their role effectively? Are the teachers not able to accept the new challenges of life? Are the teachers optimists? It is said that even class should be a laboratory for the teacher. But do the teachers have research attitude to carry out new experiments? Is it because the authorities have not chosen suitable candidates as Teachers? The society needs Dronacharyas, Dr. Radhakrishnan and a galaxy of teachers in the present scenario to change the face of the society to-day. Let us try to find a teacher described in the poem by 'P. Seshadri'.

*In halls of learning have I toiled these years*
*And hourly sought to draw the youthful mind*
*To love of knowledge, urging it to find*
*The highest joy in books .No haunting fears,*
*Of fruitless work have chilled my soul and sneers,*
*Have not becalmed my endeavours; no kind*
*Of wavering faith, 1 trust, will ever blind*
*My eyes to bliss that in this task appears*
*But then, what guerdon do I seek for all*
*This work? If once, some pupil toiling hard*
*Will find the rapture of a Master's word,*
*And pausing gratefully my name recall,*
*Tracing his joy, in part, to what he heard,*
*And learnt from me- it'll be rich reward!*

The society needs Eklavya and Aruni too. Eklavya is a symbolic representation of self-learner, where as Aruni is a symbolic representation of devotee disciple. The newly added 'Project Work' in the new syllabus will definitely help the students in the direction of self learning. Already 'Project Work' and 'Assignment work' have created interest for learning amongst the students. 'Oral test' in languages can definitely develop the 'speaking skill' of the students and develop their self-confidence. The results can be encouraging if the teachers are promising and ready to accept the new winds. The teachers will not only have to teach the students in the classrooms but will also have to guide them outside the class rooms. They will have to be trained and mentally prepared to carry out this noble profession for more and better interactions. Abraham Lincoln's letter to the headmaster is not just meant to be framed and hanged in the principals/headmaster's office. It has to be brought into reality. The present new syllabus speaks of it.

Another important role played in shaping the student's personality is the role of parents. Many a time parents overburden the students and thrust upon them their own interest without thinking of their ward's capacity and ability. It will be always better not to tax the minds of the students unnecessarily and so there is always a need of 'Parents-Teachers meeting' in which the teacher will have to play the role of counsellor as well as friend, philosopher and guide for the students. Perhaps the character like Mr. Kaplan in the short story "The Joy of Learning" narrated by Jacqueline D Cross and Aamir khan's movie "Tare Jamin Par" may help our teacher community to understand our students in a much more better way.

It is said 'Where there is a will, there is a way' and so let us pray God for our teachers-

Oh Teachers-Learners of Language and Literature! Do not lament upon your lots.

Instead light the lamp of knowledge in every lad and lass. So as to make life worth-living."

"LONG-LIVE TEACHER COMMUNITY! LONG-LIVE THE POLE-STAR"

*****

# परीक्षेचा बागुलबुवा .... कशासाठी ?

**प्रा. प्रकाश संतोष माळी**
श्रीरामनगर, उल्हासनगर
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

**जेवढा अभ्यास करता येईल तेवढा अभ्यास जरूर करा. परंतु प्रत्येक चाळीस मिनिटानंतर ५ मिनिटांची विश्रांती घ्या.**

विद्यार्थ्यांमधील कौशल्य आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर उत्तुंग झेप घेण्यासाठी त्यांना नवनवीन मार्ग उपलब्ध करून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या परीक्षांचं जीवघेणं रूप आज पहायला मिळत आहे. आपल्याकडे बारावी आणि दहावी या परीक्षांना अवाजवी महत्त्व दिले जाते. आपल्या मुलाच्या मानसिक क्षमतेचा विचार न करता प्रत्येक आई-वडिलांना मुलांकडून असलेल्या अपेक्षा आणि आपल्या सामाजिक प्रतिष्ठेचे काय होईल, याची भीती जास्त असते. वास्तविक परीक्षा पद्धती अतिशय सोपी असून भीती बाळगण्याची काही गरज नाही. पण परीक्षांकडे पालकांचा बघण्याचा दृष्टिकोन आणि आजच्या स्पर्धात्मक युगात सुरू असलेली चढाओढ, ध्येयपूर्तीसाठी चाललेली अनावश्यक धडपड यामुळे मुलांच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होऊन मुलांमध्ये अस्वस्थता निर्माण होतं. परीक्षेला जाताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वासाऐवजी भीतीच अधिक दिसून येते. या सर्व गोष्टींना जबाबदार कोण ? स्वत: विद्यार्थी, पालक की शाळा.

खरं पाहता स्पर्धात्मक जीवनात परीक्षा अटळ आहे. त्यामुळे परीक्षांना आत्मविश्वासाने सामोरं गेलं पाहिजे असा भावनिक आधार पालकांकडून विद्यार्थ्यांना मिळणे गरजेचे आहे. परंतु चांगला क्लास लावून दिला, भरपूर पुस्तके उपलब्ध करून दिली, अभ्यासासाठी सगळ्या सुखसोयी करून दिल्या म्हणजे आपली जबाबदारी संपली अशी पालकांची भूमिका अत्यंत चुकीची आहे. चांगलं कॉलेज मिळावं म्हणून चांगले मार्कस् मिळविण्यास विद्यार्थी दिवस-रात्र एक करत आहेत. पण त्यांच्या या प्रयत्नात अपयश आले तर ? याची भीती सदैव मनात असते. केव्हातरी अपयश पचवायला लागेल हे विद्यार्थ्यांना कोणी शिकवत नाही. यामुळेच शाळा, क्लास, पाठांतर, परीक्षा अशा अघोरी दिनक्रमात आजचा विद्यार्थी रुतत चालला आहे. जर चांगल्या रीतीने, कोणताही त्रास न होता परीक्षा द्यावयाची असल्यास स्वच्छंद मनाने

कार्यरत राहणे अत्यंत गरजेचे आहे. अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या मानसिक तयारीसाठी पालकांनी स्वत: शांत राहण्याची आवश्यकता आहे.

## पालकांसाठी आवश्यक सूचना

१) प्रत्येकालाच परीक्षेला समोर जायचे आहे. पूर्ण प्रयत्न करा आणि मिळालेल्या यशाचं समाधान सहजरीत्या कसे होईल याची शिकवण मुलांना द्या.

२) परीक्षेच्या काळात मुलांशी सतत अभ्यासाबद्दल चर्चा न करता इतरही विषयांवर संवाद साधा.

३) मुलांसमोर परीक्षेबद्दलचे सकारात्मक विचार मांडून त्यांच्या समस्या त्यांना सोडवू द्या. त्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढेल व त्यांची मानसिक स्थिती स्थिर राहील.

४) जर आपल्या मुलास प्रशंसेची गरज असेल तर त्याची प्रशंसा करून त्याच्या प्रयत्नात आपणही सहभागी व्हा.

## मुलांसाठी आवश्यक सूचना

१) परीक्षेच्या वेळापत्रकावरून आपल्या अभ्यासाचे नियोजन करा. आपल्या सभोवतालचे वातावरण स्वच्छ व नीटनेटके असावे. त्यामुळे अभ्यासात एकाग्रता वाढते.

२) मित्रांबरोबर अभ्यास करताना फक्त परीक्षेसंबंधी चर्चा करून प्रश्नोत्तरे द्वारा अभ्यासाची उजळणी करा.

३) परीक्षेच्या वेळी मानसिक व शारीरिक स्थिती बिघडणार नाही याची काळजी घ्या. उत्तम निकालासाठी उत्तम आरोग्य गरजेचे आहे, हे लक्षात घ्या.

४) आपल्या अभ्यासाविषयी आईवडिलांना सांगून चर्चा करा. त्यामुळे त्यांच्या मनातील भीती कमी होईल. काही अडचण येत असल्यास आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शन घ्या.

५) जेवढा अभ्यास करता येईल तेवढा अभ्यास जरूर करा. परंतु प्रत्येक चाळीस मिनिटानंतर ५ मिनिटांची विश्रांती घ्या.

६) जास्त वेळ अभ्यास करण्यासाठी चहा-कॉफी जास्त पिणे, धुम्रपान याचा आधार घेऊ नये.

७) परीक्षाकेंद्रात प्रश्नपत्रिका येईपर्यंत शांत बसून दीर्घ श्वास घ्यावेत. यामुळे आत्मविश्वास वाढेल आणि असलेली भीती देखील कमी होईल.

८) जे प्रश्न आपण चांगल्या रीतीने सोडवू शकतो, ते अगोदर सोडवा. अवघड प्रश्न शेवटी घ्या.

९) उत्तर लिहिताना सर्व प्रश्नांना सारखाच वेळ द्या आणि शेवटी २० मिनिटे उत्तर पुन्हा तपासणीसाठी ठेवा.

१०) परीक्षा संपल्यावर प्रश्नपत्रिकेची चर्चा न करता पुढच्या पेपरच्या तयारीसाठी वेळ द्यावा.

**बेस्ट लक !**

*****

## शासननिर्णय

**शिक्षण हक्क कायद्यानुसार आरक्षित २५% जागांवरील प्रवेशासाठी प्रथम प्रवेश स्तर (Entry Level Point) निकष ठरविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः आरटीई-२०१४/प्र.क्र.१७४/एस.डी.-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई

दिनांक: २१ जानेवारी, २०१५

**वाचा -**

**१) महाराष्ट्र शासन राजपत्र क्र. पीआरई-२०१२/प्र.क्र.११२/प्राशि-१, दि. १५/३/२०१३**

**२) महाराष्ट्र शासन राजपत्र क्र. आरटीई-२०१४/प्र.क्र.४५/एस.डी.-१, दि. १५/५/२०१४**

**प्रस्तावना -**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १२(१)(c) नुसार विना अनुदानीत खाजगी शाळांमध्ये वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना इ. १ ली किंवा पूर्व प्राथमिक वर्गात (प्रथम प्रवेश स्तरावर) २५% जागा राखीव ठेवण्याची तरतूद आहे. सदर तरतूदीच्या अनुषंगाने दि. १५/३/२०१३ च्या अधिसूचनेद्वारे नियम अधिसूचित केलेले आहेत. राज्यात राज्य शिक्षण मंडळाशी संलग्न शाळांबरोबर सीबीएसई, आयबी, आयसीएसई व आयजीसीएसई या मंडळाची संलग्न शाळाही कार्यरत आहेत. त्यातील काही शाळांमध्ये इ. १ ली ची प्रवेश क्षमता व पूर्व प्राथमिक वर्गाची प्रवेश क्षमता भिन्न असल्याचे आढळून आले आहे. यामुळे २५% प्रवेश प्रक्रियेमध्ये अडचणी येत आहेत. यामुळे, सदर आरक्षित २५% जागांसाठी प्रथम प्रवेश स्तर निकष ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय-**

आरक्षित २५% जागांवरील प्रवेश प्रक्रीयेमध्ये उद्भवणाऱ्या अडचणी विचारात घेता, यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

अ) पूर्व प्राथमिक वर्गातील प्रवेश क्षमता इ. १ ली मधील प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त असल्यास इ. १ ली मधील प्रवेश क्षमतेनुसार २५% जागा राखीव ठेवून त्यावर पुर्व प्राथमिक वर्गामध्ये प्रवेश देण्यात यावेत.

ब) पूर्व प्राथमिक वर्गातील प्रवेश क्षमता इ. १ ली तील प्रवेश क्षमतेपेक्षा कमी असल्यास पूर्व प्राथमिक वर्गाला जेवढी प्रवेश क्षमता असेल त्याच्या २५% प्रवेश पूर्व प्राथमिक वर्गाला देण्यात यावेत. उर्वरित प्रवेश इ. १ ली मध्ये देण्यात यावेत.

क) पूर्व प्राथमिक वर्गाची प्रवेश प्रक्रिया झाल्यानंतर काही जागा रिक्त राहिल्यास सदर जागा इ. १ ली च्या प्रवेशावेळी भरण्यात याव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०१२०१२०६२८९५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KAMBLE GOVIND B

Digitally signed by KAMBLE GOVIND B
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=KAMBLE GOVIND B
Date: 2015.01.21 13:12:49 +05'30'

**( गोविंद कांबळे )**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
५. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य
६. मा. सचिव (शा.शि.), मंत्रालय, मुंबई
७. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
८. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,चर्नी रोड, मुंबई.
९. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
११. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१२. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), सर्व जिल्हे
१४. सर्व शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, सर्व महानगरपालिका / नगरपालिका
१५.निवड नस्ती (एस.डी-१)

**शाळा प्रवेशासाठी बालकाचे किमान वय निश्चित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण -९८१४/प्र.क्र.१६०/एस.डी.१**
मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २१ जानेवारी, २०१५

**वाचा -** १) शासन निर्णय क्र.पीआरई/२०१०/(२१५)/प्राशि-१, दि.११ जून, २०१०

**प्रस्तावना -**

शासनाने दि. ११ जून, २०१० च्या शासन निर्णयान्वये शाळा प्रवेशाबाबतची कार्यपध्दती निश्चित केलेली आहे. सदर शासन निर्णयात प्रवेशाबाबतच्या इतर तरतूदीसोबत शाळा प्रवेशासाठी बालकाचे वयाबाबतची तरतूद आहे. सदर तरतूदीनुसार विद्यार्थ्यांच्या इ. १ ली मधील प्रवेशासाठीची वयोमर्यादा ६ वर्षे निश्चित केलेली आहे. तथापि, ५ वर्षे पूर्ण झालेले बालक इ. १ ली मधील प्रवेशासाठी पात्र राहतील, असे आदेशात नमूद केलेले आहे. राज्यात राज्य मंडळाचा अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळा, सी.बी.एस.ई, आय.सी.एस.ई, आय.बी. अशा विविध प्रकारच्या शाळा आहेत. सदर सर्व प्रकारच्या शाळांमध्ये प्रवेशाच्या वेळेस इ. १ ली साठी वेगवेगळी वयोमर्यादा वेगवेगळया दिनांकास ग्राहय धरुन प्रवेश दिले जातात. तसेच, पूर्व प्राथमिक वर्गातील प्रवेशासाठी निश्चित अशी वयाची अट सध्या अस्तित्वात नाही. सदर बाबी विचारात घेवून यामध्ये एकवाक्यता आणण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी शिक्षण संचालक (प्राथ) यांच्या अध्यक्षतेखाली एकसदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समितीने दिलेल्या शिफारशीनुसार इ. १ ली तील व पूर्वप्राथमिक वर्गातील (प्ले ग्रुप / नर्सरी) प्रवेशासाठी बालकाचे किमान वय निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

सदर शासन निर्णयान्वये दि. ११ जून, २०१० च्या शासन निर्णयामधील "शाळा प्रवेशासाठी बालकाचे वय" याबाबत असणारी तरतूद वगळण्यात येत आहे.

२. पूर्व प्राथमिक व इ. १ ली मधील प्रवेशासाठीचे किमान वय खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रवेशाचा वर्ग | किमान वय | वयाबाबत मानिव दिनांक | अंमलबजावणी वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | प्ले ग्रुप / नर्सरी<br>(इ. १ ली पूर्वीचा ३ रा वर्ग) | ३+ | ३१ जुलै | २०१५-१६ |
| २ | इ. १ ली | ६+ | ३१ जुलै | २०१८-१९ |

३. वरील परिच्छेद २ मधील इ. १ ली मधील किमान वयाच्या निर्णयाची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात यावी.

| अ.क्र. | इ.१ ली साठी प्रवेशाचे किमान वय (दि. ३१ जुलै रोजीचे) | अंमलबजावणीचे शैक्षणिक वर्ष |
|---|---|---|
| १ | ५ वर्षे पूर्ण | २०१५-१६ |
| २ | ५ वर्षे व ४ महिने पूर्ण | २०१६-१७ |
| ३ | ५ वर्षे व ८ महिने पूर्ण | २०१७-१८ |
| ४ | ६ वर्षे पूर्ण | २०१८-१९ |

४. सदर आदेश राज्यातील सर्व प्रकारच्या, सर्व व्यवस्थापनाच्या शाळांना लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०११९१७०४२०८३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KAMBLE GOVIND B

Digitally signed by KAMBLE GOVIND B
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=KAMBLE GOVIND B
Date: 2015.01.21 12:53:00 +05'30'

**( गोविंद कांबळे )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६. मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
७. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
८. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
९. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. शिक्षण संचालक (प्राथ.), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. सर्व विभागीय उपसंचालक
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
१३. सर्व आयुक्त, महानगरपालिका
१४. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद
१५. निवड नस्ती (एस.डी.१)

# Maharashtra State Board of
# Secondary and Higher Secondary Education, Pune

## Statement about ownership and particulars about Newspaper Form IV
## (See Rule 8)

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | **Place of Publication** | : | Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education. S. N.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Bhamburda, Shivajinagar, Pune - 411004.: |
| 2. | **Periodicity of its Publication** | : | Monthly |
| 3. | **Printer's Name** | : | Shri. Shah Shrikant Jethalal |
| | **- Whether citizen of India** | | Yes |
| | **- Address** | | **Delight Printers** 16-A, Shivaji Nagar, Himalaya Industrial Estate, Pune - 411 005. |
| 4. | **Publisher's Name** | : | **Shri. Krishnakumar Patil** |
| | **- Whether citizen of India** | : | Yes |
| | **- Address** | : | Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education. S. N.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Bhamburda, Shivajinagar, Pune - 411004. |
| 5. | **Editor's Name** | : | **Shri. Krishnakumar Patil** |
| | **- Whether citizen of India** | : | Yes |
| | **- Address** | : | Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education. S. N.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Bhamburda, Shivajinagar, Pune - 411 004. |
| 6. | **Name and Address of Individuals who own the News Paper and partners, holding more than** | : | Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education.'S. N. 832-A, Final Plot No, 178,179, Near Balchitrawani, Bhamburda, Shivajinagar, Pune - 411004 |
| | **Registration No. (Provisional)** | : | PNCW/M-18/2012-14 |

I Krishnakumar Patil hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Pune - 411004

Date : 1st February, 2015

# प्रतिक्रिया...

**चंद्रशेखर ओक**, भा.प्र.से.
महासंचालक

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.

दि. २४/१२/२०१४

आपण पाठविलेला **'शिक्षण संक्रमण' माहे डिसेंबर २०१४** चा अंक मिळाला. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत दरमहा प्रसिद्ध करण्यात येणारे शिक्षण संक्रमण म्हणजे शैक्षणिक क्षेत्रातील घडामोडींचा आढावा घेणारे व नवनवीन संकल्पनांची मांडणी करणारे असे मासिक आहे. वाचनीय व संग्रहणीय असलेले हे मासिक शैक्षणिक क्षेत्रासाठी खरोखर एक आदर्श आहे.

दि. १५/०१/२०१५

आपण पाठविलेला **'शिक्षण संक्रमण' माहे जानेवारी २०१५** चा अंक मिळाला. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाची नांदी म्हणून प्रसिध्द झालेला अंक वैशिष्टयपूर्ण आहे. यापुढील अंकात मंडळाच्या गेल्या ५० वर्षातील वाटचालीचा परिपूर्ण आढावा घेतला जाईल. असा मला विश्वास वाटतो.

'शिक्षण संक्रमण' हा अंक विद्यार्थी, पालक आणि शिक्षक या सर्वांसाठी मार्गदर्शक आहे. मंडळाचा हा उपक्रम खरोखरच स्तुत्य आहे.

मंडळास शुभेच्छा !

आपला स्नेहांकित

**(चंद्रशेखर ओक)**

# प्रतिक्रिया...

शिक्षण संक्रमण डिसेंबर २०१४ मधील 'इंग्रजी विशेषांक' हा अंक विशेष आवडला. विशेषकरून The Role of English Teacher +2 level या दिलीप घायल यांच्या लेखामधून आपल्यातील उणीवा जाणवल्या. यातील एकूण २५ मुद्दे आवडले. डॉ. व्ही. टी. पाटील यांचा पान क्र. १८ वरील तोंडी परीक्षेवरील लेख चांगला आवडला. पान क्र. ४५ मधील Teachers as a facitator या लेखामधून एक जाणीव निर्माण होते. पान क्र. ६३ मधील Books you like to read यामुळे ग्रामर/कौशल्ये यातील अनेक पुस्तकांची माहिती मिळते. याचा उपयोग शिक्षक व विद्यार्थी दोघांनाही होतो.

मा. संपादकांनी हा विशेषांक काढल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. वर्षातून एकदा असा 'इंग्रजी विशेषांक' काढावा ही नम्र विनंती.

सर्व शिक्षण संक्रमणाशी संबंधितांचे आभार !

*– श्री. सतीष व. ठाकरे*

मोबाइल : ९४२३४२७५३३

I read your article "Don't Teach" in Shikshan Sankraman. Its simply wonderful. we here have already implemented experiential learning approach in our school. I would like to know your views about education.

Please, let me know about your other write ups.

*- Mrs. Anjali Kaduskar*

Mob. : 919850470250

I just read your article "Shaikshanik Upakramshilta" in Shikshan Sankraman, Nov. 14. Really it is very useful and fruitful to English teachers as well as students. In this article you mentioned the benefits of this new method of teaching. Students do new things by themselves with more interest. You also mentioned the procedure for conducting this new collaborative method. I am sure it works. Because I am using this in my classroom. Thanks you for providing us this valuable information. I hope all English teachers should implement this.

*- Ashok Gaikwad*

Mob. : 918275280274

माहे नोव्हेंबर २०१४ चा शिक्षण संक्रमण अंक वाचला. अंकामधील शिक्षण दिनाच्या निमित्ताने (११ नोव्हेंबर २०१४) डॉ. न. म. जोशी यांचा लेख वाचला. तसेच बालदिन (१४ नोव्हेंबर) श्रीमती स्वाती ताडफळे यांचा अभ्यासपूर्ण लेख वाचला. एकंदरीत नोव्हेंबरचा अंक वाचनीय तर होताच, पण संग्रही ठेवण्याइतपत चांगला आहे. पंडित नेहरू पंतप्रधान असताना घडलेले अनेक जिवंत प्रसंग लेखात सांगितले, त्यामुळे पंडितजींचा भूतकाळ चित्रपटाप्रमाणे डोळ्यासमोर उभा राहिला.

'बालदिन' हा बालकांसाठी जसा अविस्मरणीय आनंदाचा तसा शिक्षण म्हणून आपल्यातील 'मूलपण' जगण्याचा ! खरोखरच आम्ही शिक्षक मंडळी इतके भाग्यवान आहोत की, आमचे आयुष्य मुलांसोबत व्यतीत होते. तो आनंद शब्दात चित्रतीत करणे शक्य नाही.

श्रीमती स्वाती ताडफळे यांच्या लेखास हार्दिक शुभेच्छा, यापुढे देखील असेच वाचनीय लेख प्रसिद्ध करावे, ही विनंती.

*– श्री. मोरे वैजनाथ ल.*

संपर्क : ९४२०७८४६०१

# प्रतिक्रिया...

शिक्षण संक्रमण सुवर्ण महोत्सवी विशेषांक माझ्या हातात पडला आणि मी अत्यंत भारावून गेलो. यातील सर्वच मान्यवरांचे लेख अतिशय उत्तम असून शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देणारे ठरतील यात शंका नाही.

मी ग्रामीण भागातून आलेला असल्याने हे लेख वाचताना मला विशेष लेख आवडला तो श्री. दिपक पोवार यांनी लिहिलेला 'शिक्षणाच्या विकासासाठी अभ्यासिका' त्याचे कारण असे की ग्रामीण भागातील झोपडपट्टीतील वाडी, वस्तीवरती राहणाऱ्या मुलांना अभ्यासव्यतिरिक्त साहित्याची ओळख खूप कमी असते. त्यासाठी अनेक कारणे असतात. त्याचाही आढावा श्री. पोवार यांनी घेतला आहे. महत्त्वाचे म्हणजे त्यावर त्यांनी उपाय सुद्धा सांगितलेले आहेत. त्यामुळे त्यांचा हा लेख विचारांची दिशा मला भावली. या अभ्यासिकेमुळे ग्रंथ, ललित साहित्य, आत्मचरित्र्य, प्रवास, वर्णने व्यवसायभिमुख पुस्तके वरील मुलांना वाचावयास उपलब्ध होतीलच त्याबरोबर आपण त्यांना आदर्श नागरिक म्हणून घडवू शकतो.

त्यामुळे श्री. पोवार यांचा लेख मला असे वाटते की, वस्तुस्थितीला धरून, विचार प्रवर्तक असा आहे.

तरी कृपया याचा शासन स्तरावर विचार झाल्यास विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीला हातभार लागेल असा मला विश्वास वाटतो.

*– श्री. कल्याण विठ्ठल कुलकर्णी*

उपशिक्षक

हौसाई कन्याशाळा, मलकापूर,

ता. कराड, जि. सातारा

नवीन वर्षाचे स्वागत करणारा शिक्षण संक्रमणाचा जानेवारी-२०१५ हा अंक आजच माझ्या हाती पडला. मंडळाचा हा सुवर्णमहोत्सवी अंक अत्यंत उद्‌बोधक व प्रेरणादायी आहे. प्रत्येक शाळेने संक्रमण अंक प्राप्त झाल्यानंतर शाळा सुटल्यावर एखादे दिवशी अर्धा तास चर्चा घडवून आणावी. अंकातील विचार, माहितीची देवाणघेवाण करावी असे सुचवावे वाटते. जानेवारी अंकातील सर्व तज्ज्ञांचे लेख वाचनीय व वस्तुस्थितीदर्शक आहेत.

परीक्षा पद्‌धती, मूल्यशिक्षण, शिक्षण व चारित्र्य, डॉ. आंबेडकर आदर्श शाळा, भाषा शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, शिक्षणातून राष्ट्रविकास, अभ्यासिका, अंधश्रद्‌धा निर्मूलन उपक्रम, शिक्षकांनी स्वत:ला समृध्द कसे करावे ? असे सर्वच लेख अंर्तमुख करणारे व आत्मपरिक्षण करावयास लावणारे आहेत. अंकाचा कागद व छपाई दर्जेदार आहे. वाचनीय अंकाबद्‌दल संपादक मंडळास धन्यवाद.

*– श्री. डी. एस. पाटील*

उपशिक्षक – अरविंद सावंत सरदार माध्य.

विद्यालय, नाधवडे, जि. सिंधुदुर्ग

जानेवारी २०१५ च्या अंकातील समाज परिवर्तनासाठी शिक्षण हेच महत्त्वाचे साधन आहे हा

डॉ. बाबासाहेबांसंबंधी प्रा. गौतम डांगे यांनी लिहिलेला लेख खरोखर बोधप्राय होता. भाषा शिक्षणावर सौ. कुवळेकर यांनी टाकलेला प्रकाश व तसेच श्री. पांडे सरांनी मुख्याध्यापकाच्या नेतृत्व विषयाचे प्रबळ व सुंदर उदाहरण देऊन प्रत्येक प्रसंग लेखात सांगितला. यावरून मुख्याध्यापकांच्या नेतृत्वावर निश्चितच प्रभाव पडेल. एकूण जानेवारी २०१५ चा शिक्षण संक्रमण अंक हा वाचनीय व स्फुर्तीदायक होता. शिक्षण संक्रमणातील लेख व मार्गदर्शन हे नेहमी शिक्षक व मुख्याध्यापकाच्या मार्गात मार्गदर्शन करीत राहो हीच अपेक्षा.

*– श्री. टी. व्ही. फाले*

हेडमास्तर – मॉडेल हायस्कूल, वाढोणा

ता. आर्वी, जि. वर्धा

# सुवर्णमहोत्सवाच्या कार्यक्रमातील क्षणचित्रे



मा.ना.श्री.विनोदजी तावडे, मंत्री, शालेय शिक्षण,
कार्यालयामध्ये प्रवेश करताना मान्यवरांसह



मा.ना.श्री.विनोदजी तावडे, मंत्री, शालेय शिक्षण यांचे
स्वागत करताना श्री.गंगाधर म्हमाणे, अध्यक्ष, राज्यमंडळ



मा.श्री.विक्रमजी काळे, आमदार यांचे स्वागत करताना
श्री.गंगाधर म्हमाणे, अध्यक्ष, राज्यमंडळ



मा.प्रा.श्रीमती मेधा कुलकर्णी, आमदार यांचे स्वागत करताना
श्री.गंगाधर म्हमाणे, अध्यक्ष, राज्यमंडळ



मा.श्रीमती माधुरी सहस्त्रबुध्दे, नगरसेविका यांचे स्वागत
करताना श्री.गंगाधर म्हमाणे, अध्यक्ष, राज्यमंडळ



मा.श्रीमती अश्विनी भिडे, सचिव, शालेय शिक्षण, यांचे
स्वागत करताना श्री.गंगाधर म्हमाणे, अध्यक्ष, राज्यमंडळ



मा.श्री.एस.चोक्कलिंगम्, आयुक्त शिक्षण, यांचे स्वागत
करताना श्री.गंगाधर म्हमाणे, अध्यक्ष, राज्यमंडळ



मा.श्री.प्रकाश ठुबे, सहसचिव, शालेय शिक्षण यांचे स्वागत
करताना श्री.गंगाधर म्हमाणे, अध्यक्ष, राज्यमंडळ

Shikshan Sankraman Education Bulletin is
Date of Publication - 06/2/2015 (previous month)
Date of Posting at Pune Pso - 06/2/2015

RNI NO.MAHMAR/2011/38461
Regd. No.PCW/007/2015-2017
(Decl.No.SDM/PUNE/SR/87/2014)

# इयत्ता - १० वी, विषयांच्या हस्तपुस्तिका

## सर्व विभागीय मंडळामध्ये हस्तपुस्तिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | पुस्तकाचे नाव | पुस्तकाची किंमत (रुपये) | अ.क्र. | पुस्तकाचे नाव | पुस्तकाची किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| | इयत्ता १० वी | | ११ | इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञान | ६०/- |
| १ | बाटिक कला | ५८/- | १२ | प्लंबर | ६५/- |
| २ | बेकरी उत्पादने | ४४/- | १३ | सृजनात्मक कला | ५८/- |
| ३ | घरगुती विद्युत उपकरणे | ६२/- | १४ | मत्स्यव्यवसाय | ६२/- |
| ४ | भारतीय संगीत | ६०/- | १५ | स्क्रीन प्रिंटींग | ५९/- |
| ५ | कागदकाम, पुठ्ठाकाम व पुस्तकबांधणी | ७७/- | १६ | बाहल्या व मऊ खेळणी तयार करणे | ६१/- |
| ६ | सौंदर्य प्रसाधन कला | ७०/- | १७ | शालोपयोगी साहित्य निर्मिती | ५८/- |
| ७ | हरितगृह | ५३/- | १८ | साबण आणि अपमार्जके | ५४/- |
| ८ | व्यवसाय मार्गदर्शन | ५४/- | १९ | टाकाऊ वस्तूपासून सौंदर्याकृती | ५९/- |
| ९ | टंकलेखन | ७०/- | २० | वाणिज्य मूलतत्त्वे | ५६/- |
| १० | आरोग्य व शारीरिक शिक्षण | ५८/- | २१ | पुस्तपालन मूलतत्त्वे | ७३/- |

**इ.१० वी व इ. १२ वी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना**

**हार्दिक शुभेच्छा!**



if not delivered please return to :

संपादक
शिक्षण संक्रमण
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
स.नं.८३२-ए, फायनल प्लॉट नं १७८,१७९
बालचित्रवाणीजवळ, आधारकर रिसर्च इन्स्टिट्यूटमागे,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४
दूरध्वनी: ०२०-२५७०५०००
फॅक्स नं: ०२०-२५६६५८०७
ई-मेल: monthly@msbshse.ac.in
वेबसाईट: http.//www.mahahsscboard.maharashtra.gov.in

stamp

प्रति ______________________